डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें
१५० रुपये बक्षीस दिलेला ग्रंथ

# परोपकार

192·8

लेखक

प्रोफेसर धोंडो केशव कर्वे, बी. ए.

प्रकाशक आणि संपादक

बळवंत गणेश दाभोळकर

[illegible] नारायण पेठ, पुणें सिटी

192·8
Kar
420

611 [illegible]

420
1428 / Kar
7-11-92

# परोपकार

हा ग्रंथ

हर्बर्ट स्पेन्सर नामक तत्त्ववेत्त्याच्या " Beneficence " ग्रंथाधारें
प्रोफेसर धोंडो केशव कर्वे, बी. ए. ह्यांनीं लिहिला.

---

प्रकाशक आणि संपादक
बळवंत गणेश दाभोळकर
५४९ नारायण पेठ, पुणें सिटी.

---

पुणें पेठ शनिवार घर नंबर १२१ येथें, महादेव सखाराम दाते ह्यांनीं
उ… " वैद्यकपत्रिका " छापखान्यांत छापिला.

---

( द्वितीयावृत्ति )

शक वर्ष १८४३—इ० सन १९२१

ग. म. ब. वा. …

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रीमंत माधवराव मोरेश्वर पंतअमात्य

हुकमतपन्हा, संस्थान गगनबावडा इ० कोल्हापूर

ह्यांस हा ग्रंथ

परवानगी घेऊन

परमादरपूर्वक परमनम्रतेनें अर्पण केला आहे.

# प्रस्तावना

प्रस्तुत विषयाच्या संबंधानें आपल्या लोकांची कल्पना काय आहे ह्याचा प्रथम विचार करूं. आमची परोपकाराची इमारत धर्माच्या पायावर उभारलेली आहे. धर्माचा रोंख मनुष्याच्या ऐहिकसुखाकडे दुर्लक्ष करून त्याच्या परमार्थिक सुखाकडे लक्ष देण्याचा असतो. मनुष्याला ऐहिकसुखाची प्राप्ति करून देण्यासंबंधानें जरी धर्माज्ञा असल्या तरी त्या पाळण्यासाठीं देखील स्वर्गप्राप्तीची आशा दर्शविलेली असते. प्राचीनकाळीं, मनुष्याला पारमार्थिक सुखाचीं साधनें सुलभ करून देण्याला मदत करणें हा परोपकाराचा मुख्य उद्देश समजला जात असावा, व त्या धोरणानें परोपकारविषयक प्रघात पडत गेले असावे. परंतु ज्याप्रमाणें मनुष्याच्या व्यावहारिकवर्तनाच्या बहुतेक बाबींचा धर्मांत समावेश झाला आहे, व त्या संबंधाच्या रूढींना धर्माज्ञांचें स्वरूप आलें आहे, त्याचप्रमाणें परोपकाराच्या संबंधाच्या रूढींचीही स्थिति झाली आहे. सध्यां, कांहीं ठरींव गोष्टींस परोपकार म्हणावें व परोपकार केला असतां पुण्य लागतें किंवा पापांचा नाश होतो म्हणून तो करावा, हाच लोकांच्या परोपकारविषयक समजुतींचा मथितार्थ आहे. ह्या ठरींव गोष्टींपैकीं कांहींचा संबंध मनुष्याच्या पारलौकिकसुखाकडे आहे असें स्पष्ट दिसतें. ब्राह्मणांना दान करणें व ब्राह्मणभोजनें घालणें हे सर्वांत श्रेष्ठ परोपकार समजले जातात. आपल्या शरीराच्या भारंभार सोन्याचीं किंवा रुप्याचीं नाणीं ब्राह्मणांना वांटणें व सहस्रभोजनें किंवा लक्षभोजनें घालणें हे अवर्णनीय परोपकार मानिले जातात. लोकांना पारमार्थिकसुखाची प्राप्ति होण्यासाठीं त्यांच्यांत धर्मज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे व तें ज्ञान नेहमीं जिवंत राहिलें पाहिजे. सदरहू काम ब्राह्मणांवर सोंपविलेलें असल्यामुळें त्यांना निर्वाहाचीं साधनें मिळविण्याचे श्रम करावे लागूं नयेत म्हणून त्यांच्यासाठीं ही योजना केलेली दिसते. कोणाचें लग्न जुळवून देणें हा मोठा परोपकार समजला जातो. पुत्रावांचून मनुष्याला सद्गति नाहीं असा समज फार प्राचीनकाळापासून असल्यामुळें व लग्न करून देणें म्हणजे पुत्रोत्पत्तीस साधन करून देणें असल्यामुळें, ह्या गोष्टीला एवढें महत्त्व आलें असावें. पन्नाससाठ वर्षांच्या गरीब मनुष्यानें आपल्या बाराचौदा वर्षांच्या मुलास बरोबर घेऊन दारोदार फिरावें व त्या मुलाच्या लग्नासाठीं भिक्षा मागावी, अशीं उदाहरणें अनेक आढळतात. लोकांनाही पैसाभर देऊन त्याच्या

लमाला मदत केल्यानें आपणांस पुण्य लागेल असें वाटतें. यात्रेला जाणाऱ्या मनुष्याला मदत करावी हा समज उत्पन्न होण्याचें कारण उघडच दिसत आहे. अन्नसत्रें घालणें,—देवळें, धर्मशाळा, तळीं वगैरे बांधणें ह्या गोष्टीही परोपकाराच्या समजल्या जातात. गरीब मनुष्यांनीं घरोघर भिक्षा मागत फिरावें व त्यांस मूठमूट दाणे किंवा आटा घालावा हा परोपकाराचा प्रकार नित्यशः घरोघर घडत असतो. ह्या ठळक गोष्टींशिवाय पुष्कळ बारीकसारीक गोष्टींचा परोपकारांत समावेश होतो.

आपल्या लोकांच्या परोपकारविषयक समजुतींचें दिग्दर्शन केल्यानंतर सध्यांच्या काळीं त्यांपैकीं कित्येकांमध्यें बदल करणें किती जरूर आहे ह्याचा विचार करूं. ज्याकाळीं ह्या समजुती बनल्या गेल्या तो काळ व हल्लींचा काळ ह्यांच्यामध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे. त्या वेळच्या राहटीला ज्या परोपकारांची अवश्यकता होती ते सर्व जसेच्यातसेंच प्रस्तुतच्या राहटीस उपयोगीं पडणार नाहींत. ब्राह्मणांना दान देणें व त्यांना भोजन घालून तृप्त करणें हा जो सर्वांत श्रेष्ठ मानिलेला परोपकार त्याविषयींच विचार करूं. त्यापूर्वीं इतकें सांगणें जरूर वाटतें कीं श्रद्धाळु लोकांची टवाळी करून त्यांस दुखवावें असा ह्या लेखाचा मुळींच उद्देश नाहीं. परंतु ज्या गोष्टींना लोक उपकार म्हणून मानितात त्या उपकारक नसून अपकारक आहेत अशी ज्यांची समजूत असेल त्यांनीं आपल्या मताप्रमाणें लोकांच्या अपकारकप्रवृत्ति नाहींशा करण्यासाठीं प्रयत्न करणें अवश्य आहे. प्राचीनकाळीं जेव्हां बहुतेक ब्राह्मणांचा काळ शिक्षण आणि अध्यापन ह्यांतच जात होता त्यावेळीं ह्या परोपकाराची अवश्यकता होती. परंतु ज्यांच्याकडून तें काम आतां होत नाहीं व पुढेंही होण्याचा रंग दिसत नाहीं त्यांना अशा प्रकारें मदत करण्यांत पैशाचा दुरुपयोग होतो. पूर्वींची विद्या आपल्या लोकांत जागृत रहावी अशी इच्छा असल्यास ती दुसऱ्या साधनांनीं परिपूर्ण करून घेतली पाहिजे. ह्या परोपकारानें विशेषतः वेदपठन करणाऱ्या भिक्षुकवर्गास मात्र उत्तेजन मिळतें. ह्या वर्गांतील बहुतेक लोक निरर्थक काळ घालविणारे असतात. ह्या परोपकाराचा ओघ पूर्वींच्या विद्यांचें रहस्य जाणणारे पंडित तयार करण्याकडे वळेल तर कांहीं फायदा होईल.

परोपकाराच्या आणखी कांहीं प्रकारांसंबंधेंही बरेंच लिहिण्यासारखें आहे, परंतु ते सोडून दारोदार हिंडणाऱ्या भिकाऱ्यांना भीक घालण्याच्या

प्रघातासंबंधानें विचार करूं. भिक्षा मागण्याचा ज्यांचा कुलधर्म आहे, अशाही कित्येक जाति आपल्या लोकांत आहेत. शरीरानें धडधाकड व ज्यांच्या अंगीं काम करण्याला चांगली शक्ति आहे अशीं मनुष्यें देखील कांहीं उद्योग न करितां भिक्षा मागून निर्वाह करणारीं बरींच आढळून येतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत प्रामाणिकपणें श्रम करणाऱ्या लोकांचें पोट भरूं नये, परंतु निरुद्योगी लोकांनीं याचना करून सुखानें पोट भरावें अशी जोंपर्यंत समाजाची स्थिति असेल तोंपर्यंत त्याचें डोकें वर निघण्याची आशा नको. पुष्कळ पिढ्यांच्या संवयीमुळें भिक्षा मागावयास आलेल्या मनुष्यास 'जा' म्हणून सांगणें फार जड वाटतें. संवयीचा जोर फार विलक्षण आहे. विचारानें मनुष्याला जरी बरेंवाईट कळूं लागलें तरी संवय आपला थोडाबहुत तरी अंमल चालविल्यावांचून राहत नाहीं. मांजर आडवें गेल्यानें किंवा विधवा स्त्री पुढें आल्यानें आपलें कांहीं अनिष्ट होण्याचा संभव नाहीं अशी मनाची पक्की खातरी असली तरी तसा प्रकार घडून आला असतां मनुष्याचें पाऊल एकदम थबकल्यावांचून राहत नाहीं. त्याप्रमाणें दारोदार हिंडणाऱ्या धडधाकड लोकांना भीक घालणें अपायकारक आहे असा मनाचा पक्का ग्रह झाला असला तरी, तसा भिकारी दारांत येऊन उभा राहिला कीं ते विचार जागच्या जागींच राहून, त्याला मूठभर दाणे घालून वाटेस लावण्याच्या कामाला मनुष्य लागतो. पण ह्या कृतीचा परिणाम काय होतो तो पहा. मनुष्य स्वभावतः आळशी आहे. तो काम करण्यास जो प्रवृत्त होतो तो नाइलाजामुळें. भिक्षेवर पोट भरणाऱ्या मनुष्यांना उद्योग करणें अगदीं जिवावर येतें. अशा लोकांची संततीही भिक्षेवर उपजीविका करणारी निपजावयाची. शिवाय बाहेरूनही ह्या वर्गांत थोडीबहुत भरती होणार. कारण, धंदा करून पोटाला मिळत नाहीं ह्यामुळें कंटाळलेले लोकही भिक्षेचा सोपा मार्ग पतकरणार. अशा रीतीनें ज्या लोकांचा समाजाला काडीइतकाही उपयोग नाहीं अशा लोकांचा वर्ग समाजावर चरत राहून त्याला नेहमीं मागें ओढीत राहणार. शिवाय दुसरेही वाईट परिणाम आहेत. मनुष्य उद्योगांत असलें म्हणजे त्याला नानाप्रकारचे ढंग सुचत नाहींत, परंतु निरुद्योगी मनुष्यांचा वेळ कांहीं तरी उपद्व्याप करण्यांत जात असतो. ह्या भिकाऱ्यांत बारीकसारीक गुन्हे करणारी मंडळी बरीच असते. तेव्हां धष्टपुष्ट मंडळीस भिक्षा घालणें म्हणजे 'आपल्या खर्चानें गुन्हेगार मंडळी तयार करणें' होय.

ह्या भिकाऱ्यांच्या संबंधानें विचार करितांना आणखी एका प्रकारच्या प्रतिष्ठित भिकाऱ्यांसंबंधानें चार शब्द लिहावेसे वाटतात. ह्या लोकांस देणग्या किंवा दक्षिणा त्यांच्या योग्यतेप्रमाणें द्याव्या लागतात. पारायणी, वैदिक, भिक्षुक, शास्त्री, हरिदास इत्यादि वर्गांतील कांहीं लोक संभावितपणें भिक्षा मागण्याचें काम करितात. हरिदासानें कथा करून श्रोत्यांना खुष केलें व बिदागीबद्दल पांचदहा रुपये घेतले तर तो एका प्रकारचा देवघेवीचा व्यवहार झाला. परंतु एकाद्यानें कोणा गृहस्थाकडे जाऊन आम्ही हरिदास आहों असें सांगून याचना केली व त्यानें रुपया-आठ आणे काढून त्याच्या हातावर ठेविले तर ती भिक्षा होय. त्याचप्रमाणें कांहीं धर्मकृत्य चालविण्याकरितां एकाद्या वैदिक ब्राह्मणास बोलावून त्याच्या कामाबद्दल त्याला दक्षिणा दिली तर तो सरळ व्यवहार झाला. पण यजमानाचें तसें कोणतेंही काम न करितां पैसा मागणें म्हणजे शुद्ध भिक्षा होय. अशा प्रकारच्या संभावित भिक्षेकऱ्यांचाही आमच्या समाजाला बराच उपद्रव आहे. आपापल्या धंद्यांत जर निर्वाहापुरता पैसा मिळत नसेल तर आणखी पैसा मिळविण्याकरितां वर्षांतून कांहीं दिवस दुसरा तरी धंदा करावा, किंवा अजीबातच हा धंदा सोडून देऊन ज्यानें पोट भरेल तोच धंदा करावा. याचनेपासून याचक व त्याची इच्छा पुरविणारा दाता ह्या दोघांवरही वाईट परिणाम होतात. याचकाला तोंडपुजेपणा करण्याची संवय लागून त्याचें स्वातंत्र्य नष्ट होतें, व दात्याला आत्मस्तुति ऐकण्याची संवय होऊन त्याच्या विरुद्ध कोणी बोललें असतां तें त्याला सहन होत नाहींसें होतें.

वरील विचार जरी पुष्कळांना सर्वांशीं पसंत नसले तरी आपल्या अनेक प्रकारच्या समजुतींप्रमाणेंच परोपकारविषयक समजुतींनाही चालन मिळालें पाहिजे असें बहुतेकांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. जी परोपकारबुद्धि आपल्या लोकांत आहे ती नष्ट होण्याचा प्रयत्न न करितां तिला निराळें वळण दिलें पाहिजे. पाश्चात्यज्ञानाचा थोडाबहुततरी प्रकाश ज्यांच्यावर पडला आहे त्यांच्या मनांत अशा प्रकारचे विचार येऊं लागले आहेत, व नकळत त्यांच्या समजुती पालटत आहेत. अशा वेळीं इंग्लंडांतील अतिविख्यात वृद्ध तत्त्ववेत्त्याच्या विचारांचा आपल्या लोकांस फार उपयोग होईल.

मनुष्याच्या वर्तनाचे स्थूलमानानें दोन विभाग करितां येतात; एक आत्मविषयक वर्तन, आणि दुसरें समाजविषयक वर्तन. ज्या वर्तनाचा परि-

णाम मुख्यत्वेंकरून तें वर्तन करणाऱ्या व्यक्तीवरच घडतो तें आत्मविषयक वर्तन; व ज्याचा परिणाम इतर व्यक्तींवर घडतो तें समाजविषयक वर्तन. जें समाजविषयक वर्तन समाजाच्या अस्तित्वाला किंवा शांततेला साधक अथवा बाधक असतें त्याचा विचार करणें हें न्यायनीतीचें काम आहे. समाजाचें साधारणरीतीनें तरी पोषण होणें हें त्याच्या अस्तित्वाला अवश्य आहे; परंतु त्याचें चांगल्यारीतीनें पोषण होऊन त्याची भरभराट होणें ह्या हेतूला उपायकारक किंवा अपायकारक असें जें मनुष्याचें समाजविषयक वर्तन त्याचा विचार करणें हें परोपकारनीतीचें काम आहे. या दृष्टीनें ज्या सामाजिकवर्तनानें समाजाचें चांगल्याप्रकारें पोषण होऊन त्याचा उत्कर्ष होण्यास मदत होईल त्याचा परोपकारांत अंतर्भाव होईल. व्यक्तीवर परोपकार करणें झालें तरी वरील हेतु साध्य होण्यास मदत झाली पाहिजे, तरच परोपकारांच्या तत्त्वांची त्यास अनुमति मिळेल--नाहींतर मिळणार नाहीं. हा ह्या पुस्तकांतील परोपकाराच्या कल्पनेचा मथितार्थ आहे असें म्हटलें तरी चालेल.

कित्येक वाचक उडतउडत वाचणारे असतात. पुस्तककर्त्याचे विचार आपल्या विचारांशीं जुळले नाहींत तरी तें पुस्तक शांतपणें आरंभापासून अखेरपर्यंत वाचून त्याचे विचार काय आहेत हें पाहण्यापुरता त्यांना धीर निघत नाहीं. पुस्तक हातात पडलें म्हणजे मधलेंच एकादें प्रकरण उघडावें व त्यांतील विचार त्यांच्या विचारांशीं जुळून त्यांत त्यांना गोडी लागली तर पुढें वाचावें--नाहींतर टाकून द्यावें. अशीं दहापांच प्रकरणें चाळलीं म्हणजे त्यांचें पुस्तक वाचून झालें. अशा लोकांस एवढेंच सांगावयाचें कीं, ह्या पुस्तकांत जे परोपकाराचे अनेक प्रकार सांगितले आहेत ते त्यांच्या विचारांशीं न जुळले तरी येथें जी परोपकाराची व्याख्या केली आहे तिच्याशीं जुळतात. वेळोवेळीं मनुष्यांच्या वर्तनासंबंधानें ज्या सूचना केल्या आहेत त्यांपासून परोपकाराचा मुख्य हेतु साध्य होतो असें दूरवर विचार केला असतां दिसून येईल.

आतां परोपकाराच्या अवश्यकतेविषयीं विचार करूं. समाजाचें चांगल्या प्रकारें पोषण होऊन त्याचा उत्कर्ष व्हावा ही गोष्ट सर्वांस इष्ट वाटेल. ह्या गोष्टीची इष्टता कबूल करून तिच्या सिद्ध्यर्थ उपाय करण्याची अवश्यकता कबूल केली पाहिजे म्हणजे परोपकाराची अवश्यकता आपोआपच सिद्ध होते. कारण परोपकाराच्या वर दिलेल्या व्याख्येप्रमाणें ही गोष्ट घडवून आ-

णण्याला सहायभूत असें जें वर्तन त्यालाच ‘ परोपकार ’ म्हणावयाचें.

मनुष्यसमाजाचें चांगल्या रीतीनें पोषण होऊन त्याची भरभराट व्हावी हा हेतु गृहीत घेतांनाच त्यांत आपोआप आणखी एका गोष्टीचा अंतर्भाव होतो. ती गोष्ट ही कीं, त्या समाजाला एकंदरीच्या मानानें सुख झालें पाहिजे. तसें होण्याचा संभव नसेल तर समाजाचें अस्तित्व कायम राखण्यांत कांहीं अर्थच नाहीं. मनुष्याच्या जीवितापासून सरासरीच्या मानानें सुखोत्पत्ति किंवा दुःखोत्पत्ति असेल त्याप्रमाणें तें इष्ट किंवा अनिष्ट समजलें पाहिजे ह्यासंबंधानें मतभेद नाहीं. कोणत्याही वर्तनाचा एकंदर परिणाम स्वतःला, इतरांना किंवा दोघांनाही सुखोत्पादक असेल तर तें वर्तन चांगलें व दुःखोत्पादक असेल तर वाईट असें मानण्याचा प्रघात सर्वत्र आहे. ह्या मुख्य तत्त्वापासून नीतिचीं इतर गौणतत्त्वें उत्पन्न होतात. स्वतःच्या, इतरांच्या किंवा दोघांच्याही सुखाची कल्पना मुळाशीं असल्याशिवाय “ मनुष्यस्वभावाची पूर्णता ”, “ सद्वर्तन ”, “ सद्धेतु ” इत्यादि शब्द निरर्थक होतील. म्हणून परोपकाराच्या वर्तनाची समाजाच्या पोषणाला किंवा उत्कर्षाला अवश्यकता आहे असें म्हटलें म्हणजे, त्यापासून व्यक्तीला किंवा समाजाला सुखोत्पत्ति होते असें ध्वनित होतें. वास्तविक ह्या दोन कल्पना भिन्न नसून एका कल्पनेकडेच निरनिराळ्या दृष्टींनीं पाहिल्यामुळें हीं तिचीं दोन स्वरूपें दिसतात.

मनुष्येतरजीवसृष्टीच्या उत्क्रमणांतही ह्या दोन गोष्टींचा निकट संबंध दिसून येतो. सुखोत्पादकक्रिया करण्याकडे प्राण्याची प्रवृत्ति होते आणि दुःखोत्पादकक्रियांपासून तो मागें सरतो. सुखदुःखावांचून प्राण्याच्या वर्तनावर दुसऱ्या कशाचाही परिणाम होत नाहीं. मनुष्याच्या उत्पत्तीच्या पूर्वीं ज्या लक्षावधि प्राण्यांच्या असंख्य पिढ्या होऊन गेल्या त्यांचे आरंभापासून ज्या क्रिया—प्राण्याच्या, त्याच्या जातीच्या किंवा उभयतांच्या संवर्धनाला अवश्यक असतील त्यांपासून त्याला सुखोत्पत्ति व्हावी व ज्या अपायकारक असतील त्यांपासून दुःखोत्पत्ति व्हावी असा क्रिया व त्यांचीं फळें ह्यांमध्यें स्वाभाविक संबंध जडत आला आहे. शारीरिक गरजा भागविण्याच्या संबंधानें मनुष्याच्या प्रवृत्ति त्याला त्याच्या पूर्वजांपासून आनुवंशिकसंस्कारानें प्राप्त झाल्या आहेत, व त्यांच्या योगानें घडणाऱ्या क्रिया आणि सुखदुःख ह्यांमधील स्वाभाविकसंबंध बहुतेक कायम राहिला आहे. एकंदरींत मनुष्याच्या स्वाभाविक-

प्रवृत्ति त्याच्या व त्याच्या जातीच्या कल्याणाचा मार्ग दाखविण्यास समर्थ आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. रानटी स्थितीकडून सुधारणेच्या स्थितीकडे प्रयाण होत असतांना मनुष्याच्या स्वाभाविकप्रवृत्ति आणि त्याच्या गरजा ह्यांमधील ऐक्याचा थोडासा बिघाड झाला. तो नाहींसा करण्याचे स्वाभाविक व कृत्रिम प्रयत्न पूर्वींच सुरू झालेले आहेत, व तें ऐक्य पूर्णपणें स्थापित होईपर्यंत ते युगांचींयुगें तसेच चालू राहतील. सरतेशेवटीं मनुष्याच्या पूर्णावस्थेंत मनुष्यस्वभावाची घटना अशी होईल कीं, इतर जीवसृष्टींत ज्याप्रमाणें सुखोत्पादकक्रिया करण्याकडे प्राण्याची प्रवृत्ति होते आणि त्याच क्रिया पोषक व संवर्धक असतात त्याचप्रमाणें मनुष्याच्या संबंधानेंही होऊं लागेल. मनुष्येतरप्राण्यांत शारीरिक गरजांशींच बहुतेक संबंध असतो, परंतु मनुष्याच्या मानसिक गरजांचा भाग महत्त्वाचा आहे व त्यासंबंधानेंही सुखोत्पादकक्रिया करण्याकडे त्याची प्रवृत्ति व्हावी व त्याच क्रियांपासून व्यक्तींचें व जातीचें हित व्हावें असें स्वाभाविकरीतीनें घडून येऊं लागेल.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, मनुष्यसमाजाचें चांगल्या रीतीनें पोषण होऊन त्याचा उत्कर्ष व्हावा, म्हणजे त्याच्या एकंदर सुखाची वृद्धि व्हावी, ह्या इच्छेंत परोपकाराचा उगम आहे. परोपकाराच्या संबंधानें लोकांत प्रचलित असलेल्या समजुतींत देखील हीच इच्छा अस्पष्टपणें दिसून येते. कारण ज्या वर्तनानें एकंदरींत दुःखाची वृद्धि होत असेल तें वर्तन उपकाराचें नसून अपकाराचें आहे असें मानण्याचा सर्वत्र प्रघात आहे.

असो. सरतेशेवटीं, ज्यांनीं मला आज तीनचार महिने एका लोकोत्तर तत्त्ववेत्त्याचा निकट सहवास घडवून दिला त्या प्रकाशकांचे व ज्याच्या कृपेनें प्रारब्धकृत्य कसेंबसें तरी तडीस गेलें त्या जगच्चालकाचे आभार मानून हा प्रस्तावना लेख पुरा करितों.

**धोंडो केशव कर्वे.**

# अनुक्रमणिका


परोपकाराचे प्रकार .... .... .... १

## निवृत्त्यात्मक परोपकार

प्रकरण पृष्ठ

१ जीवनकलहामुळें होणाऱ्या चढाओढीची मर्यादा .... २१
२ कराराची मर्यादा .... .... .... ३४
३ अयोग्य मोबदला न देण्यासाठीं अत्मसंयमनाची आवश्यकता .... .... ४८
४ स्वोत्कर्षाची मर्यादा .... .... .... ६१
५ परदोषाविष्करणाची मर्यादा .... .... .... ७१
६ परगुणप्रशंसेची मर्यादा .... .... .... ८३

## प्रवृत्त्यात्मक परोपकार

७ विवाहित स्त्रीपुरुषांचे परस्परांवर उपकार .... .... ९४
८ मातापितरांचे मुलांवर उपकार .... .... १०७
९ मुलांचे आईबापांवर उपकार .... .... .... ११८
१० अजाण्यांची शुश्रूषा .... .... .... १२३
११ जुलमानें व संकटानें गांजलेल्यांस मदत .... .... १३२
१२ आप्तमित्रांस पैशाची मदत .... .... .... १४२
१३ गरीबांस मदत .... .... .... .... १५०
१४ सामाजिक परोपकार .... .... .... १७६
१५ राष्ट्रीय परोपकार .... .... .... २००

परोपकाराविषयीं सामान्यतः विचार .... .... २१७

# परोपकाराचे प्रकार

मूल उपजल्याबरोबर डोळे उघडून चोहोंकडे पाहूं लागलें म्हणजे जे अनेक पदार्थ त्याच्या दृष्टीस पडतात त्यांमधील भेद ओळखण्याचें प्रथमतः त्याचे अंगीं सामर्थ्य नसतें. परंतु तें जसजसें मोठें होत जातें तसतसा निरनिराळ्या पदार्थांमधील थोडथोडा भेद त्याच्या लक्षांत येऊं लागतो. वारंवार तेच तेच पदार्थ त्याच्या डोळ्यांपुढें आले म्हणजे त्यांच्या गुणांविषयीं कांहीं अस्पष्ट कल्पना त्याचे मनांत येऊं लागतात. कित्येक पदार्थांच्या अंगीं चलनवलनादि व्यापार करण्याची शक्ति असते व कित्येकांच्या अंगीं ती नसते ही गोष्ट त्याच्या लक्षांत येऊन सजीव व निर्जीव पदार्थांमध्यें ठोकळरीतीनें त्यास भेद करितां येऊं लागतो. एका जातीचे पदार्थ असले म्हणजे त्या सर्वांमध्यें आढळून येणारे असे कांहीं गुण असतात ते त्याच्या मनांत येऊन पदार्थांच्या जाति ओळखण्याची शक्ति त्याच्या अंगांत येते. पदार्थांच्या गुणांची पृथक् पृथक् प्रतिबिंबें त्याच्या मनावर पडत असतात व त्यांपैकीं समान गुणांच्या प्रतिबिंबांचें एकीकरण होऊन जातिविषयक कल्पना बनत असते. साधारण समजूत ज्यास आली आहे अशा मुलास नानाप्रकारचीं फुलें दाखविल्यानंतर एकादें त्यानें न पाहिलेलें असें फूल त्याच्या पुढें आणून ठेविलें तर हें फूल आहे असें तो सहज सांगूं शकेल. अनेक प्रकारचीं फुलें पाहिल्यानंतर त्याच्या मनानें त्यांतील समान गुणाचें एकीकरण केलें असतें, व अशा गुणांचा समुदाय एकाद्या पदार्थांत एकत्र पाहिल्याबरोबर हें फूल आहे असें त्यास ज्ञान होतें. ही क्रिया फार जलद होत असते, व ती होत असते ह्या गोष्टीचेंही ज्ञान त्या मुलास नसतें. अशा रीतीनें सभोंवतालचे पदार्थ, क्रिया व त्यांचे धर्म आणि संबंध ह्यांच्या प्रतिबिंबांचें अनेक प्रकारचें वर्गीकरण प्रत्येक मनुष्याच्या मनांत अज्ञानतः होत असतें. हीच क्रिया ज्ञानतः होऊं लागून पूर्णतेस पोहोंचली म्हणजे तिला शास्त्रीय विचारांचें स्वरूप येतें.

आपणाला नकळत जे वर सांगितलेल्या प्रकारचे मनोव्यापार घडत असतात व ज्यांच्या योगानें आपणास नकळत आपला वर्तनक्रम बनत असतो त्यास ' विवेक ' अशी संज्ञा दिली असतां चालेल. बुद्धि म्हणून जो मनोधर्म आहे तो ह्या विवेकशक्तीवरच अवलंबून आहे. जितकी जितकी प्राण्यांमध्यें

विवेकशक्ति अधिक, तितकी तितकी त्यांच्यामध्यें बुद्धिमत्ता जास्त असते. प्राण्यांचें उत्क्रमण* होत असतां त्यांच्या विवेकशक्तीचेंही उत्क्रमण चाललेलें असतें. हें विवेकशक्तीचें उत्क्रमण होण्याला दोन कारणें असतात; एक उपयोग आणि दुसरें जीवनकलहामुळें होणारी योग्यतर प्राण्यांची निवड. उपयोगानें सर्व प्रकारच्या शारीरिक व मानसिक गुणांची वृद्धि होत असते, व त्याप्रमाणें ती विवेकशक्तीचीही होते. योग्यतर प्राण्यांची निवड होत असतांना प्राण्यांची योग्यता बुद्धिमत्तेवरच अवलंबून असते. अनेक प्रसंगीं प्राण्यांचा जीव वांचविण्यास विवेकशक्ति कारण होते, व तिच्या अभावानें कित्येक प्रसंगीं आयुष्याचा नाशही होतो. ह्या विवेकशक्तीची चांगली माहिती होण्याकरितां तिच्या उत्क्रमणमार्गांतील कित्येक पायऱ्यांची ओळख करून घेऊं.

आकाशाकडे तोंड करून डोळे मिटून उभे रहावें व आपल्या डोळ्यांपुढून एकादा पदार्थ फिरविण्यास दुसऱ्या कोणास सांगावें, म्हणजे आपल्या डोळ्यांपुढें कांहीं तरी पदार्थ आला एवढा मात्र आपल्यास भास होतो, परंतु तो पदार्थ कोणता, त्याचें आकारमान काय, त्याचें आपणापासून अंतर किती इत्यादि गोष्टींविषयीं आपणास कांहींएक समजत नाहीं. आपल्या डोळ्यांपुढें एक पदार्थ आला खरा असें आपणास जें ज्ञान होतें, तें, डोळे मिटलेले असले तरी त्या स्थितींत जी अंधक उजेड व काळाकुट्ट काळोख ह्यांच्यामध्यें विवेक करण्याची त्यांची शक्ति असते, तीमुळें होतें. अशाच प्रकारची स्थिति समुद्राच्या पाण्यांत राहणाऱ्या अत्यंत सूक्ष्म प्राण्यांची होत असेल. सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साह्यावांचून जे आपणास दृष्टिगोचर होत नाहींत अशा सूक्ष्म प्राण्यांचें प्रकाश व सभोंवतालचे पदार्थ ह्यांच्या संबंधाचें ज्ञान आतां सांगितल्या प्रकारचें असण्याचा संभव आहे. अशा स्थितींत आपल्या डोळ्यांपुढें असणारा पदार्थ लांकूड आहे, किंवा पान आहे, किंवा एकादा प्राणी आहे, व प्राणी असल्यास त्याजपासून आपल्यास कांहीं अपाय होण्याचा संभव आहे कीं काय, इत्यादि गोष्टींचा विवेक होणें अशक्य आहे; आणि ह्या विवेकाभावामुळें ते प्राणी अकालीं मृत्युमुखीं पडणें साहजिक आहे.

---

* वरिष्ठ प्रतीच्या प्राण्यांची उत्पत्ति कनिष्ठ प्रतीच्या प्राण्यांपासून कालान्तरानें त्यांच्या परिस्थितींत बदल होऊन झालेली आहे असें अनेक अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांचें मत आहे. त्या मतास उत्क्रमणवाद अशी संज्ञा आहे, व खालच्या प्रतीच्या प्राण्यांपासून वरच्या प्रतीचा प्राणी उत्पन्न होण्याची जी क्रिया तिला उत्क्रमण असें म्हणतात.

आतां कांहीं पायऱ्या टाकून एकदम बऱ्याच वरच्या पायरीवर जाऊं. वनस्पतींवर उपजीविका करणाऱ्या प्राण्यांना अनेक प्रकारच्या वनस्पति आणि त्यांचे गुण ह्यांच्यामध्यें विवेक करितां येण्याची शक्ति असणें हें फार आवश्यक आहे. स्वरूप, वास, रुचि इत्यादिकांवरून कित्येक प्राण्यांस कांहीं वनस्पतींचा विषारीपणा कळून येतो, व ह्यामुळें ते प्राणी त्या वनस्पति खाऊन आपल्या जिवास अपाय करून घेत नाहींत; परंतु ज्यांस हा विवेक करितां येत नाहीं ते प्राणी त्या वनस्पतींच्या विषानें प्राणास मुकतात. जसजशी विवेकशक्ति वाढत जाते तसतशी असमानगुणांचें पृथक्करण व समानगुणांचें एकीकरण करण्याची मनाची शक्ति वाढत जाऊन, बहुतेक गुणांत सारखे असे पदार्थ असले तरी त्यांमध्यें भेद करितां येतो व अपायकारक पदार्थ ओळखतां आ.त्यामुळें जीविताचा बचाव होतो.

आतां आणखी कांहीं पायऱ्या टाकून वर जाऊं व अधिक बुद्धिमान् प्राण्यांविषयीं विचार करूं. पदार्थ, क्रिया, गुण आणि संबंध ह्यांचें विशेष बारकाईनें पृथक्करण व एकीकरण करण्याची शक्ति त्यांच्यामध्यें असली पाहिजे. ती असावी तितकी नसेल तर तिच्या कमीपणाचे परिणाम त्यांस भोगावे लागतील. कल्पना करा कीं, एक प्राणी रानांत उभा असतां बऱ्याच अंतरावर दुसरा एक प्राणी आल्याची चाहूल त्याला समजली. आतां त्याचा आकार, वर्ण, चेष्टा इत्यादि गोष्टींवरून तो कोण प्राणी असावा ह्याचें बरोबर अनुमान त्यास एका क्षणांत झालें पाहिजे. तो बलाढ्य शत्रु असल्यास त्याला जीव बचावण्याकरितां एकदम पळून गेलें पाहिजे, पण आपल्या भक्ष्यस्थानीं पडण्यासारखा प्राणी असल्यास त्यानें त्याजवर एकदम झडप घातली पाहिजे. हा विवेक जर त्या प्राण्यास क्षणमात्रांत करितां आला नाहीं तर उभयपक्षींही त्याचें नुकसानच होणार.

विवेकशक्तीच्या आणखी वरच्या पायरीवर गेलें म्हणजे विचार अधिकाधिक गुंतागुंतीचे किंवा संकीर्ण होत जातात. वर्तमानकाळीं व भूतकाळीं आपणापुढें असलेल्या वस्तु, क्रिया, गुण व संबंध ह्यांचेंच पृथक्करण व वर्गीकरण करून भागत नाहीं, तर कल्पनासृष्टींत ज्यांचें अस्तित्व आहे अशा वस्तु, क्रिया, गुण व संबंध ह्यांचेंही पृथक्करण व वर्गीकरण करावें लागतें. वरिष्ठ प्रतीच्या चतुष्पाद प्राण्यांमध्यें ह्या शक्तीचा थोडा अंकुर दृष्टीस पडतो, परंतु तिचें उन्नतस्वरूप मनुष्यामध्यें मात्र दिसून येतें. चौकोनी शेताच्या एका

कोनावर एकादा कुत्रा उभा असला व त्यास समोरच्या कोनावर जावयाचें असलें, तर तो चौकोनाच्या बाजूंनीं न जातां थेट समोरच्या कोनाकडे सरळ-रेषेनें जाऊं लागेल. दुसऱ्या वाटेन गेलें असतां आपणास अधिक त्रास पडेल अशा प्रत्यक्ष न घडलेल्या परंतु कल्पनेनें मनावर प्रतिबिंबित केलेल्या विचा-रामुळें तो सरळरेषेनें जाण्यास प्रवृत्त होतो. मनुष्यांमध्यें जरी ही शक्ति बऱ्याच उन्नतदशेस पोहोंचली आहे तरी अनेक प्रसंगीं त्याच्याही चुक्या होत असतात. अशा चुक्या होण्याला दोन कारणें आहेत. एक, सभोंवतालच्या गोष्टींचें त्यांच्या मनावर हुबेहुब प्रतिबिंब उठत नाहीं; व दुसरें, पाहिलेल्या परंतु दृष्टीपुढें नसलेल्या गोष्टींचीं प्रतिबिंबें कल्पनेनें पुन्हां पहिल्याप्रमाणें उठ-वितां येत नाहींत. ज्यांना फुलझाडांच्या बागांचा मोठा शोक असेल अशा गृहस्थांसही, अमुक प्रकारच्या दोन फुलझाडांची तुलना करून त्यांच्यामधील सारखेपणा व भेद काढा म्हणून सांगितलें, तर फारच थोड्यांना तें काम समाधानकारक रीतीनें करितां येईल; परंतु तींच फुलझाडें त्यांच्या दृष्टीपुढें आणून ठेविलीं तर हें काम चांगल्या रीतीनें करणारीं बरींच मनुष्यें आढळतील.

अशा सामान्य गोष्टींमध्य विवेक करणें देखील जर बहुतेक मनुष्यांस कठिण जातें, तर ज्यांमध्यें विशष गुंतागुंत आहे अशा गोष्टींच्या संबंधानें त्यांच्या हातून चुक्या झाल्यास फारसें आश्चर्य नाहीं. विशेषतः, विचार कर-णाराला ज्यावेळीं आकार, रंग, रूप, चेष्टा, व स्वतःचे मनोविकार इतक्यां-मध्यें विवेक करून, शिवाय अमुकएक प्रकारची कृति केली असतां तिचे तात्कालिक परिणाम काय होतील, व कालान्तरानें काय होतील ह्या गोष्टीं-मध्यें सुद्धां विवेक करावयाचा असतो, तेव्हां तर चुकण्याचा फारच संभव असतो. ज्यावेळीं एकदम नानाप्रकारच्या शुद्ध व मिश्र कल्पना मनांत जागृत ठेवाव्या लागतात, त्यावेळीं ज्यामध्यें बरेंच सादृश्य आहे अशा दोन गोष्टीं-तील वैषम्य विवेकानें शोधून काढणें हें काम ज्यांचीं मनें विचारानें संस्कृत झालीं आहेत त्यासही जड जातें. कांहीं उदाहरणें घेतल्यानें ह्या म्हणण्याची यथार्थता ध्यानांत येईल.

भूमितीचा एक सोपा प्रश्न मुलांस शिकवावयाचा आहे अशी कल्पना करूं. एकादा सामान्य शिक्षक नेहमींच्या पद्धतीस अनुसरून तो प्रश्न सोडवि-ण्याकरितां काय करावयाचें तें आपल्या विद्यार्थ्यांस समजून सांगेल, किंवा स्वतः तो प्रश्न सोडवून दाखवील. दुसरा एकादा मार्मिक शिक्षक अगदीं निराळ्या

मार्गाचें अवलंबन करील. तो मुलांस कोणतीही गोष्ट प्रत्यक्ष सांगणार नाहीं, पण नानाप्रकारचे सूचक प्रश्न विचारून ती त्यांची त्यांजकडूनच काढून घेईल. वेळोवेळीं थांबून, आपण आलों कोठें व जावयाचें कोठें हें त्यांच्या मनावर चांगलें बिंबवून, इच्छिलेल्या स्थळीं जाण्याचा मार्ग कोणता ह्याचा विचार करावयास तो त्यांस सांगेल; व वारंवार येणाऱ्या अडचणींतून पार पडण्याच्या युक्त्या आपण न सांगतां त्यांनीं होऊन शोधून काढाव्या ह्याविषयीं यत्न करील, आणि अशा रीतीनें आपल्या विद्यार्थ्यांस तो प्रश्न समजून देईल. दोघेही शिक्षक आपलें काम करतील. दोघांच्याही विद्यार्थ्यांस तो प्रश्न कसा सोडवावा हें समजेल, व दोघांचीही रीति बहुतकरून एकच असेल. परंतु दोघांच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक क्रियांमध्यें किती फरक पडेल तो पहा. पहिल्या शिक्षकाच्या विद्यार्थ्यांचे मनोव्यापार, एका ठिकाणाहून मध्यें न थांबतां दुसऱ्या स्थळीं प्रवास करावा त्याप्रमाणें अगदीं कंटाळवाणे झाल्यामुळें त्यांच्या मानसिकशक्तीस शीण येईल, व नवे प्रश्न घेऊन सोडवीत बसण्याला त्यांना हौस वाटणार नाहीं. परंतु दुसऱ्या शिक्षकाच्या विद्यार्थ्यांचे मनोव्यापार, एका स्थळाहून निघून दुसऱ्या स्थळीं जावयाचें असतां, वाटेवाट विश्रांति घेऊन वनश्रीची शोभा पाहत जावें त्याप्रमाणें चित्ताकर्षक झाल्यामुळें, त्यांच्या मानसिकशक्तीस शीण येणार नाहीं, त्यांचे मनोव्यापार चालले असतां मधून मधून आशा, समाधान, उमेद इत्यादि मनोवृत्तींची चमक दृष्टीस पडेल, व अशा प्रकारचे नवे प्रश्न सोडविण्याची त्यांस इच्छा होईल. वरील दोन पद्धतींमध्यें इतकें वैषम्य असतांही त्याचा विवेक पुष्कळांस होत नाहीं.

जितके जितके अधिकाधिक गुंतागुंतीचे प्रश्न घ्यावे तितकें तितकें मन अधिकाधिक घोंटाळ्यांत पडून विवेक करण्यास समर्थ होतें. वरच्या प्रश्नापेक्षां पुढील प्रश्न जरा बिकट आहे. कर्कश वाद्यें वाजवून जवळपासच्या लोकांस त्रास होईल अशा रीतीनें उच्च स्वरानें भजन करीत बसणें किंवा रस्त्यांतून फिरणें, आणि कर्कश वाद्यें वाजवीत रस्त्यांतून मिरवणुकी काढणें हा आपला हक्क आहे असें पुष्कळांस वाटतें. "तुमच्या ह्या वर्तनापासून कांहीं लोकांस त्रास होतो" असें त्यांस सांगितलें असतां, "धर्माचारांचें पूर्ण स्वातंत्र्य सर्व लोकांस असलें पाहिजे, व आह्मीही आपल्या धर्मसमजुतीप्रमाणेंच आचरण करीत आहों" असें लागलेंच त्यांच्याकडून आपल्या वर्तनाचें समर्थन केलें जातें. ह्या ठिकाणीं स्वातंत्र्याच्या दोन प्रकारांमध्यें विवेक केला पाहिजे.

दुसऱ्या मनुष्यांस कोणत्याही प्रकारचा त्रास न होईल अशा रीतीनें पाहिजे त्या तऱ्हेचें धर्माचरण करण्याचा प्रत्येक मनुष्यास किंवा मंडळीस हक्क असला पाहिजे. परंतु ज्या तऱ्हेच्या धर्माचरणापासून इतरांस त्रास होत असेल असें धर्मविषयक स्वातंत्र्य असणें अन्यायाचें होईल. आशिक्षित लोकांच्या समजुती-करितां पाहिजे तर प्रसंगविशेषीं अशा प्रकारच्या धर्माचरणाचे परवाने द्यावे, परंतु तो त्यांचा हक्क नसून ती त्यांजवर मेहेरबानी आहे असें त्यांच्या नजरेस आणून द्यावें.

थोड्या वर्षांपूर्वी आपल्या शाळांतून व कालेजांतून नीतिशिक्षणाचा अभाव आहे याबद्दल जी बरीच चर्चा चालू होती तिचेंही उदाहरण येथें घेण्यासारखें आहे. नीतितत्त्वांचें बीजारोपण करण्यास योग्य अशी मनोभूमिका असन नीतिशिक्षणाचे जे परिणाम दृष्टोत्पत्तीस येतील ते, ज्या मनोभूमिकेंत त्या तत्त्वांचें बीजारोपण होण्याचा संभव नाहीं, अशा ठिकाणीं दिसून येणार नाहींत. कल्पना करा कीं, नीतितत्त्वें मुलांकडून पाठ करविलीं, तीं त्यांस समजून सांगितलीं, व त्यांच्या महत्त्वाविषयीं मोठ्या जोरदार रीतीनें त्यांस उपदेश केला; इतक्या सर्व गोष्टी झाल्या तरी मुलांच्या मनावर जो पणािम होणार तो त्यांचे विचार, त्यांची ग्राहकशक्ति अ णि त्यांचे मनोविकार ह्यांस अनुरूपच होईल. पदवीधरांच्या हातून कांहीं विशेष अनीतीचें वर्तन झाल्याचें कानीं आलें म्हणजे पूर्वी सांगितलेला शिक्षणपद्धतींतील दोष एकदम पुढें करण्यांत येतो. परंतु ह्या लोकांच्या असें ध्यानांत येत नाहीं कीं, कोणत्याही गोष्टीचें ज्ञान आणि तदनुरूप आचरण ह्या गोष्टी अगदीं भिन्न आहेत. ज्ञान झाल्यानंतर त्यासंबंधानें ज्या प्रकारचे मनोविकार असतील त्या प्रकारचें मनुष्याचें आचरण घडेल. आचरणाला मनोविकारांच्या प्राबल्याची फार जरूर असते. शेंकडो लोकांच्या हातून जीं अनीतीचीं कामें होतात तीं नीतितत्त्वांच्या अज्ञानामुळें नव्हत, तर त्या नीतितत्त्वांना अनुकूल अशा मनोविकारांच्या अभावामुळें होत असतात. खोटें बोलणें हें पाप आहे असें माहीत असून लक्षावधि लोक न्यायाधीशांसमोर शपथेवर खोट्या साक्षी देतात. तात्कालिक फायदा करून घेण्याविषयींचे मनोविकार प्रबल झाल्यामुळें त्यांच्या हातून तसें आचरण होतें. ह्या गोष्टींचा विचार करितांना पुष्कळांची चुकी होते ती ही कीं, अनुकूल मनोविकारांनीं युक्त असें ज्ञान आणि अनुकूलमनोविका-ररहित ज्ञान ह्यांमध्यें त्यांस विवेक करितां येत नाहीं. पुष्कळांना असा भ्रम

आहे कीं, केवळ शिक्षणाच्या प्रसारानें लोकांची नीतिमत्ता वाढून त्यांजमधील अपराधांची संख्या कमी होईल.

अत्यंत क्षुद्र प्राण्यापासून तों अत्युच्च स्थितीस पोहोंचलेल्या प्राण्यांपर्यंत सर्वांच्या बुद्धिमत्तेची साक्ष देणारी जी ही विवेकशक्ति तिचा संबंध जोंपर्यंत सृष्टपदार्थ व त्यांचे दृश्यमान गुण, क्रिया, आणि संबंध ह्यांशींच असतो. तोंपर्यंत विवेक करण्याचें काम म्हणण्यासारखें कठिण नसतें. परंतु ज्यावेळीं मनावर प्रतिबिंबित झालेले पदार्थ, गुण, क्रिया व संबंध, आपले व दुसऱ्यांचे मनोविकार, कार्यें आणि कारणें, हल्लींचा काळ व पुढील काळ, इत्यादि अनेक क्लिष्ट कल्पनांचा गोंधळ होऊन जातो त्यावेळीं यथार्थ विवेक करणें हें काम फारच कठिण किंबहुना अशक्य होऊन जातें. समाजशास्त्रांतील व नीतिशास्त्रांतील अनेक प्रश्न इतके गहन आहेत कीं, त्यांच्या अयथार्थ विवेकामुळें नानाप्रकारचे घातक परिणाम आजपर्यंत झाले असतील व पुढेंही होतील.

मानसशास्त्रांतील कांहीं गोष्टींचें स्पष्टीकरण करून विवेकशक्तीच्या निरनिराळ्या स्वरूपांची ओळख करून देण्याकरितां वर अनेक प्रकारचीं उदाहरणें दिलीं आहेत. असें करण्याचा हेतु इतकाच कीं, प्रस्तुत निबंधाचा विषय जो परोपकार त्याच्या संबंधानें कांहीं गोष्टी ध्वनित व्हाव्या. पहिली, परोपकाराच्या स्वरूपाचा विवेक झाल्यानंतर त्याच्या अनेक प्रकारांमध्यें विवेक केला पाहिजे; दुसरी, पदार्थ, गुण, क्रिया, संबंध, मनोविकार, कार्य, कारण, वर्तमान, भूत, भविष्यत् इत्यादि अनेक प्रकारच्या कल्पनांची गुंतागुत सोडवावयाची असल्यामुळें हें विवेकाचें काम फार कठिण आहे; तिसरी, यथार्थ अवलोकन, मार्मिकपणा आणि असामान्य बुद्धिमत्ता हे गुण ज्यांच्यामध्यें एकत्र वास करीत असतील अशा मनुष्यांच्या हातूनच पूर्ण विवेक होणें शक्य आहे; आणि चवथी अयथार्थ विवेकामुळें परोपकाराच्या संबंधानें प्रचलित असलेल्या समजुतींपासून मनुष्यजातीचें फार अकल्याण होत आहे.

मनुष्याच्या हातून हेतुपुरःसर घडणाऱ्या क्रिया दोन प्रकारच्या असतात; स्वार्थपर आणि परार्थपर, किंवा स्वार्थहेतुक आणि परार्थहेतुक. ज्या क्रियेचें फल कर्त्यास मिळतें ती स्वार्थहेतुक क्रिया, आणि ज्या क्रियेचें फल कर्त्याहून अन्य व्यक्तीस मिळतें ती परार्थहेतुक क्रिया. परार्थहेतुक क्रियांचे दोन प्रकार आहेत. एकादे वेळीं शरीराकडून कांहीं क्रिया करविण्यासाठीं उद्युक्त झालेलें मन आंवरून

धरल्यानें परार्थ साधतो; व दुसऱ्या प्रसंगीं परार्थ साधण्याकरितां विशेष प्रकारच्या क्रिया कराव्या लागतात. पहिल्या प्रकारच्या क्रियांस निवृत्त्यात्मक क्रिया व दुसऱ्या प्रकारच्या क्रियांस प्रवृत्त्यात्मक क्रिया असें म्हटलें तरी चालेल. न्यायाच्या दृष्टीनें योग्य अशा क्रिया, व न्यायाच्या दृष्टीनें न केल्या तरी चालतील परंतु केवळ परोपकाराकरितां केलेल्या क्रिया ह्या दोहोंचाही परार्थहेतुक क्रियांमध्यें समावेश होतो. प्रत्येक मनुष्याला पाहिजे तो उद्योग करण्यास पूर्ण अधिकार आहे व त्यानें केलेल्या श्रमांच्या फळाचा उपभोग त्यास निर्विघ्नपणें घेतां आला पाहिजे, ह्या तत्त्वाच्या पायावर न्यायाची इमारत बांधिली आहे. न्याय नें योग्य अशा क्रिया करण्यास वरील तत्त्व आपणास कबूल आहे असें व्यक्त होतें; व केवळ परोपकारार्थ क्रिया करण्यांत, इतरांना आपल्या श्रमाचें योग्य फळ मिळावें व त्यांची संसारयात्रा सुखकर व्हावा ह्याकरितां त्यांस मदत करणें योग्य आहे, हें तत्व आपण कबूल केल्याप्रमाणें होतें. एकाद्या समाजांतील मनुष्यांनीं जर आपला वर्तनक्रम केवळ न्यायतत्त्वांच्या धोरणावर ठेविला, तर त्या समाजाला व त्यांतील व्यक्तींना कधींही अत्युन्नत स्थिति प्राप्त होणार नाहीं; ती प्राप्त होण्याला न्यायतत्त्वें आणि परोपकार ह्या दोहोंच्याही धोरणावर वर्तनक्रम ठरविला पाहिजे. अशी कल्पना करूं कीं, एका समाजांतील मनुष्यें परस्परांस यत्किंचित्‌ही उपद्रव न देतां आपापले व्यवसाय चालवीत आहेत, परस्परांशीं केलेले करार काडीइतकी हरकत न आणितां पाळीत आहेत व अपत्यसंगोपनाचें कामही अत्युत्तम रीतीनें बजावीत आहेत. परंतु कायदेशीर रीतीनें ज्या गोष्टी करण्यास ते बांधलेले नाहींत त्या करून इतरांचा अत्यल्पही फायदा करून देण्यास ते तयार नाहींत. उदाहरणार्थ, एकादा पांथस्थ रस्त्यानें चालला असतां त्यानें जर कोणास अमुक ठिकाणीं जाण्याची वाट कोणती म्हणून विचारिलें तर त्यानें त्या प्रश्नाचें उत्तरच द्यावयाचें नाहीं. कारण, तसें उत्तर देण्यास न्यायाच्या दृष्टीनें तो बांधलेला नाहीं. तें उत्तर देण्यास जर त्याच्या इच्छेप्रमाणें मजुरी मिळेल तरच तो तें उत्तर देणार. नेहमींच्या अनुभवावरून प्रत्येक मनुष्याच्या सहज लक्षांत येईल कीं, सर्वांस नित्यशः अनेक प्रकारचीं कामें मोबदला दिल्यावांचून करून द्यावीं लागतात व तीं तशीं न होतील तर मनुष्य अनेक प्रकारच्या सुखांस मुकेल व अनेक प्रकारचा उपद्रव त्यास सहन करावा लागेल. प्रत्येक मनुष्याला बहुतेक गोष्टी स्वतः कराव्या लाग-

तील व त्यामुळें त्याचें फार नुकसान होईल. समाजाकरितां म्हणून कोणतीही गोष्ट कोणी प्रत्यक्ष मोबदला घेतल्यावांचून करणार नाहीं व त्यामुळें व्यक्तिमात्रास स्वहित साधण्यासही व्यत्यय येईल. अशा प्रकारच्या स्थितींत समाज असल्यावर मनुष्याच्या आचरणाला अत्युन्नतस्वरूप प्राप्त होणें अशक्य आहे. तें प्राप्त होण्यास मनुष्यांनीं एकमेकांस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें कोणत्याही प्रकारचा उपद्रव न होईल असें वर्तन ठेवून, शिवाय आपापले उद्योग चालविण्यास व त्यांच्या फळांचा उपभोग घेण्यास परस्परांस मदत होईल अशा रीतीचेंही आचरण त्यांनीं ठेविलें पाहिजे.

न्यायप्रेरित क्रिया आणि परोपकारप्रेरित क्रिया ह्या दोहोंचाही परार्थहेतुक क्रियांमध्यें अंतर्भाव होतो असें पूर्वीं सांगितलेंच आहे, व वर जें एका काल्पनिक समाजाचें उदाहरण घेतलें आहे त्यावरून ह्या दोन प्रकारच्या क्रियांमधील भेदही स्पष्टपणें कळून येण्यासारखा आहे. परंतु समाजांतील सामान्य लोकांच्या समजुतींत पुष्कळ वेळां विचाराचा अंश कमी असल्यामुळें, व एकदां समजुती बनून गेल्यानंतर त्यांच्या खरेखोटेपणाविषयीं संशय घेणें बहुतेकांच्या आहाराबाहेर असल्यामुळें, न्याय व परोपकार ह्यांजमधील भेद बरोबर समजला नाहीं, असें दर्शविणाऱ्या अनेक समजुती प्रत्येक समाजांत दाखवितां येतील. भिक मागणें हा आपला हक्क आहे असें समजणारे व ती न घालणारांस शिव्याशाप देणारे शेंकडो भिकारी आढळतील. भिकाऱ्यांचीच अशी समजूत असती तर विशेष आश्चर्य करण्याला कारण नव्हतें. पण हजारो भिक घालणारे लोक तें आपलें कर्तव्य आहे असें म्हणणारे आढळतील. आणखी एक उदाहरण पुष्कळ लोकांमध्यें आढळून येण्यासारखें आहे. अविभक्त कुटुंबांतील एकाद्या मनुष्यानें आपल्या उद्योगानें द्रव्यार्जन केलें असतां, त्यानें आपल्या निरुद्योगी भाऊबंदास पोसणें हें त्याचें कर्तव्य समजलें जातें, व स्वकष्टार्जित नव्हे अशा वित्तावर यथेच्छ चरणें हा आपला हक्क आहे असें ते निरुद्योगी भाऊबंद समजतात. अनेक पिढ्यांपासून हाडीं खिळलेल्या समजुतींमुळें असे प्रकार होणें जितकें शक्य आहे, तितकेंच अशा प्रकारच्या नवीन समजुती बनणेंही शक्य आहे. अत्यंत दीनावस्थेंत असणाऱ्या गरीबांची काकळूत येऊन प्रबल मनोविकारांमुळें ज्यांच्या विचारशक्तीचा समतोलपणा नाहींसा झाला आहे असे सद्बुद्धि धारण करणारे कांहीं परोपकारशील गृहस्थ, व लोकांकडून मदत मिळविण्याविषयीं अत्युत्सुक झालेले

हजारो गरीब लोक न्याय व परोपकार ह्यांमधील भेद विसरून जातात व परोकारालाही हक्क समजतात. न्याय व परोपकार ह्यांच्या कल्पनांमध्यें असा गोंधळ झाल्यानंतर, ते घडवून आणण्याच्या साधनांमध्येंही विवेक होणें शक्य नसतें. दुसऱ्या पक्षाच्या लोकांचें काय म्हणणें आहे हें शांतपणें ऐकून घेऊन त्याचा विचार करण्याची उदारता ज्यांच्यामध्यें नाहीं, अशा संतप्तमेंदूच्या परोपकारी गृहस्थांच्या खटपटींचा रोंख, हल्लींची समाजव्यवस्था समूळ नष्ट करून तिच्या जागीं श्रीमंत आणि गरीब, शाहणा आणि मूर्ख, वाकबगार आणि गैरवाकबगार, ह्यांमधील भेद जेगेंकरून अगदीं नाहींसा होईल अशा प्रकारची नवीन व्यवस्था सुरू करण्याकडे असतो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें व्यवस्था झाली तर मनुष्याचें आचरण आणि त्याचें फल ह्यांजमधील कार्य-कारणभावाचा संबंध शिथिल होईल; व परोपकारालाच न्यायाची जागा मिळून, योग्यतेचा विचार न होतां संपत्तीची वांटणी होऊं लागली म्हणजे कसबी आण बिनकसबी हा भेद करण्याचें कांहीं कारणच रहाणार नाहीं, व भेद असला तरी तो लवकरच नाहींसा होईल.

न्याय आणि परोपकार ह्या दोहोंपासून होणारीं कार्यें भिन्न आहेत. न्यायाच्या व्यवस्थेनें समाजाला स्थैर्य येतें व परोपकारामुळें समाजाच्या उन्नतीला मदत होते. समाजाच्या स्थैर्याला न्यायाची अवश्यकता असल्यामुळें त्याचा संबंध राष्ट्राशीं जाऊन पोहोंचतो व सर्वांस न्याय मिळेल अशी तजवीज करणें हें राज्यव्यवस्थेचें एक प्रधान अंग होऊन जातें. समाजाच्या स्थैर्याला परोपकाराची अवश्यकता नसल्यामुळें त्याला राष्ट्रीय स्वरूप येत नाहीं. व्यक्तिमात्राला त्यासंबंधानें आपल्या इच्छेप्रमाणें वर्तन करण्याची मोकळीक राहते. अशा रीतीनें ह्या दोहोंमध्यें भेद ठेवणें किती आवश्यक आहे ह्याचा विचार करूं.

प्रत्येक प्राण्याला आपल्या आचरणाचा परिणाम भोगिला पाहिजे हें न्यायाचें मुख्य तत्त्व सर्व प्राणिसृष्टींत दिसून येतें. सिंहव्याघ्रादि एकलकोंड्या प्राण्यांचे तर एकून एक व्यवहार ह्या नियमाला अनुसरून चाललेले असतात. ह्या तत्त्वानें प्राण्याची प्रवृत्ति स्वार्थपर क्रिया करण्याकडे होते. ज्या प्रकारच्या क्रिया केल्यानें स्वतःचें अहित होण्याचा संभव आहे अशा क्रिया मात्र तो प्राणी अनुभवानें करीनासा होईल. परार्थहेतुक क्रिया करण्याकडे त्याची प्रवृत्ति होण्याचा संभव नाहीं. कळप करून राहणाऱ्या प्राण्यांमध्यें त्यांच्या

समाजशीलतेच्या पायरीप्रमाणें वरील नियमाचें स्वरूप थोडेंसें संकुचित होतें.

समाजशीलतेच्या अत्युच्च पायरीस पोंचलेल्या मनुष्यप्राण्याच्या संबंधानें विचार केला असतां वरील नियमाला बरेच अपवाद करणें जरूर आहे असें दिसून येईल. इतर प्राण्यांप्रमाणें आचरणाच्या परिणामाकडे लक्ष देऊन व अनुभवानें स्वार्थासाठीं जो त्यांत फेरबदल करावा लागेल तो करून, व शिवाय समाजास्थितीला अत्यावश्य इतकाच आपणापासून इतराना त्रास होईल, त्याहून जास्त होणार नाहीं, ह्याबद्दल योग्य विचार करून जो फेरफार करणें इष्ट वाटेल तो करून आपला वर्तनक्रम ठरविला पाहिजे. कोणत्याही समाजाचें अस्तित्व शक्य होण्यासाठीं त्यांतील प्रत्येक व्यक्तीला इतर व्यक्तींपासून जो त्रास होईल तो तिनें सोसला पाहिजे हें न्यायाचें दुसरें तत्त्व होय.

न्यायाच्या दृष्टीनें योग्य दिसेल तें करावयाचें परंतु परोपकार बिलकुल करावयाचा नाहीं, अशी समाजाची स्थिति असेल, तर त्या समाजांतील व्यक्तींची व त्या समाजाची उन्नति होणें अशक्य आहे असें पूर्वीं दर्शविलेंच आहे. ती उन्नति शक्य करण्यासाठीं, ज्या गोष्टी करण्याबद्दल परस्परांमध्यें करार नाहींत अशा गोष्टी केवळ परोपकारबुद्धीनें करण्यास मनुष्यांनीं प्रवृत्त झालें पाहिजे.

एवढ्या विवेचनावरून स्पष्ट ध्यानांत येईल कीं, समाजांतील व्यक्तींना आपापले उद्योग शांतपणें चालवितां यावे व स्वकष्टार्जित वित्ताचा कोणत्याही रीतीनें अपहार होऊं नये ह्याकरितां न्यायाची आवश्यकता आहे, व समाजाच्या उन्नतीला मदत व्हावी म्हणून परोपकाराची जरूर आहे. परोपकारावांचून समाजाचें अस्तित्व शक्य आहे, परंतु न्यायावांचून तें शक्य नाहीं. परोपकारावांचून समाजाची थोडीबहुत उन्नति होणेंही शक्य आहे, मात्र ती परोपकाराच्या मदतीनें जितकी होईल तितकी व्हावयाची नाहीं. ह्यावरून न्यायाचें प्राधान्य व परोपकाराचें गौणत्व सिद्ध होतें. समाजाचें अस्तित्व कायम राहून त्यांतील व्यक्तींचे व्यवहार सुरळीतपणें चालतील अशी समाजाची स्थिति ठेवणें हें मनुष्याचें मुख्य कर्तव्य होय, व त्या समाजाची स्थिति सुधारणें हें कमी महत्त्वाचें होय. ह्याकरितां न्यायाच्या तत्त्वांचा अंमल कायद्यानें करून परोपकाराच्या तत्त्वांचा विचार व्यक्तिमात्रावर सोंपविला पाहिजे. तोही कायद्यानें अमलांत आणावयाचा म्हटल्यास न्यायाला फांटा देण्याचा प्रसंग येईल. कसा, तो पहा.—

राजानें अथवा राज्य करणाऱ्या मंडळींनें परोपकाराच्या तत्त्वांचा अंमल कायद्यानें करावयाचा म्हटला म्हणजे, निर्वाहास पुरून उरण्यासारखें कष्टार्जित वित्त ज्यांच्याजवळ असेल त्यांच्यापासून त्याचा कांहीं भाग घेऊन तो ज्या लोकांचें स्वकष्टार्जित वित्त त्यांचे निर्वाहास पुरत नसेल त्यांस दिला पाहिजे. हें जबरीनें करावयाचें म्हटलें तर प्रत्येक प्राण्याला आपल्या वर्तनाचें फळ भोगिलें पाहिजे ह्या न्यायाच्या तत्त्वाला बाध येतो. आचरण आणि त्याचें फळ ह्या दोहोंमधील संबंध नेहमीं कायम राखिला पाहिजे. एकाजवळून त्याची मालमत्ता घेऊन ती दुसऱ्यास द्यावी असा कायदा केला तर हा संबंध नष्ट होतो. ज्याच्याजवळून ती मालमत्ता घ्यावी त्याला आपल्या श्रमाचें फळ मिळण्यास हरकत होते, व ज्याला ती द्यावी त्याला दुसऱ्याच्या श्रमावर निर्वाह करण्यास कायद्याची मदत मिळते. अशानें समाजांतील व्यक्तींचें परस्परांशीं सलोख्याचें वर्तन राहणार नाहीं. कारण, आपल्या श्रमाचा फायदा दुसरे लोक अयोग्यरीतीनें घेत आहेत ही गोष्ट पुष्कळांच्या मनांत डांचत राहील, व ज्या लोकांकरितां हा जुलूम केला जाईल ते लोक नेहमीं त्यांच्या डोळ्यांत खुपत राहतील. अशा प्रकारचा अन्याय शिखरास जाऊन पोहोंचला तर त्यापासून मोठाले अनर्थ उद्भवतील; त्यांपैकीं तीन फारच महत्वाचे आहेत. त्यांचा निरनिराळा विचार करूं.

बुद्धिमत्ता, उद्योगशीलता, शरीरसामर्थ्य इत्यादि गुणांनीं श्रेष्ठ अशा लोकांस आपल्या गुणांचा उपयोग करण्याची व त्यांत सुधारणा करण्याची जी वुद्धि होते तिचें कारण हेंच कीं, आपणांस त्यांपासून जी फलप्राप्ति होईल तिचा उपभोग आपणांस निर्विघ्नपणें घ्यावयास सांपडेल हें त्यांस माहीत असतें. गुणहीनांना देण्याकरितां गुणवानांनीं आपल्या प्राप्तीचा जो अंश द्यावयाचा तो बेताचाच असल्यास त्यामुळें गुणवानांच्या वर्तनांत फारसा बदल होणार नाहीं. तथापि तशा कायद्याचाही दुसऱ्या रीतीनें वाईट परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. गरीबांना वांटून देण्याकरितां म्हणून थोडासा कर बसवून त्याप्रमाणें व्यवस्था होऊं लागली म्हणजे श्रमांवांचून पैसा मिळविण्याची त्यांस चटक लागेल व तेवढ्यानें त्यांची तृप्ति न होतां ते अधिक कर बसवून आह्मांस त्याचा फायदा द्यावा म्हणून ओरड करूं लागतील; व तेणेंकरून सरकारास त्रास होऊन असंतुष्ट लोकांस तृप्त करण्याकरितां कर वाढवावा लागेल. थोडासा कर बसविण्याच्या संबंधाची ही गोष्ट

झाली. परंतु सर्वांची स्थिति सारखी होण्याकरितां ज्या प्रकारची व्यवस्था करणें जरूर दिसेल त्या प्रकारची व्यवस्था करावयाची असा परोपकाराच्या परमावधीचा कायदा केला असतां, आपण गुणवान् व्हावें असें कोणाचे मनांत येण्याला कांहीं कारण राहणार नाहीं. इतक्या थरावर जाऊन पोहों-चण्यापूर्वीच हुषार व उद्योगी मनुष्यांना आपापल्या धंद्यांत फारसें मन घालूं नये असें वाटूं लागेल, व विचार करणाऱ्या उत्तम आणि मध्यम स्थितींतील लोकांमध्यें असंतोष उत्पन्न होऊन अखेरीस ते बंडाच्या किंवा तशाच दुसऱ्या एकाद्या घातक उपायाच्या साह्यानें अशा दुःसह स्थितींतून आपली सुटका करून घेण्याचा यत्न करूं लागतील. निदान अशा समाजाला संपन्नतेच्या दृष्टीनें उतरती कळा लागून त्याचें स्थैर्य डळमळूं लागल्यावांचून कधींही राहणार नाहीं.

दुसरी मोठी हानि म्हटली म्हणजे त्या समाजाचें शारीरिक व मान-सिक सामर्थ्य, ह्यांनाही ओहोटी लागण्यास सुरुवात होईल. आधींच समा-जांतील मध्यम स्थितींतील मनुष्यांस त्यांच्या स्थितीच्या मानानें निर्वाहास जेमतेम पुरे इतकाच पैसा मिळतो. त्यांतलाही अंश कनिष्ठ प्रतीच्या लोकांस पोसण्याकरितां जाऊं लागला म्हणजे, त्यांना आपल्या मुलाबाळांचें चांगल्या रीतीनें संगोपन करणें व त्यांस योग्य रीतीचें शिक्षण देणें हीं कामें करण्यास उरावा तितका पैसा उरणार नाहीं. अर्थात् पुढील पिढीच्या अंगीं मागच्या पिढीइतकें शारीरिक व मानसिक सामर्थ्य राहणार नाहीं. कनिष्ठ स्थितींतील लोकांस मदत मिळाल्यामुळें त्यांना पूर्वीच्या स्थितीपेक्षां आपला व आपल्या मुलांबाळांचा चरितार्थ बऱ्या रीतीनें चालवितां येईल. परंतु अशा कृत्रिम उपायांनीं त्यांच्या शारिरिक व विशेषतः मानसिक स्थितींत फारसा फरक पडण्याचा संभव नाहीं; व एकंदरींत राष्ट्राच्या मानसिक व शारीरिक साम-र्थ्याला उतरती कळा लागेल. दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, यदाकदाचित् बुद्धिसामर्थ्याचें व शरीरसामर्थ्याचें सरासरीचें मान कमी न होतां कायम राहिलें, तरी त्यांत समाजाचें नुकसानच आहे. समाजाच्या भरभराटीला कांहीं विशेष बुद्धिमान् व विशेष शक्तिमान् अशा पुरुषांची जरूर असते. एक हांडाभर पाणी तापलेलें असेल तर त्याचा स्नान करण्याचे कामीं उपयोग करितां येतो, परंतु तेंच हांडाभर पाणी एकाद्या थंड पाण्यानें भरलेल्या हौदांत ओतलें तर त्या पाण्याचा स्नानाकडे उपयोग करितां येणार

नाहीं. हांड्यांतलें व हौदांतलें मिळून पाणी घेतलें तर, सरासरीच्या मानानें, उष्णतेंत बदल झाला नाहीं, परंतु ती उष्णता आतां विवक्षित कामाच्या उपयोगीं नाहींशी झाली. त्याचप्रमाणें एखाद्या मनुष्याच्या अंगीं विशेष बुद्धिसामर्थ्य असलें तर तो एकादी नवी युक्ति काढून आपल्या बांधवांचा फायदा करून देईल, किंवा अनेक अडचणींच्या कामांत त्यांस कांहीं उपाय सुचवील. परंतु सर्वांस सारखी बुद्धि वांटून दिल्यानें हा परिणाम घडणें शक्य नाहीं. जबरीच्या परोपकाराच्या कायद्याचा प्रत्यक्ष परिणाम जरी संपत्तीची सारखी वांटणी करणें एवढाच होतो, तरी त्याचा अप्रत्यक्ष परिणाम बुद्धि व शरीरसामर्थ्य ह्यांचीही सारखी वांटणी करून देणें हा आहे.

तितकाच किंवा त्याहूनही घातक परिणाम अद्यापि सांगावयाचा आहे. अशा प्रकारची व्यवस्था एकसारखी चालू राहिल्यास तिच्यापासून *काम्यूनिझम् व अराजक हीं उद्भवतील. कायदेशीर गोष्टी लोकांकडून करविणें व त्या ते न करतील तर त्यांस शिक्षा देणें हें जसें सरकारचें कर्तव्य, त्याचप्रमाणें लोकांकडून परोपकार करविणें व ते न करतील तर त्यांस शिक्षा करणें हेंही सरकारचें कर्तव्य समजलें गेलें, म्हणजे कनिष्ठ स्थितींतील लोकांचा दिवसेंदिवस असा समज होत जाईल कीं, आपणाला सुखोपभोगाचे कामीं अडथळा होईल तो दूर करणें एवढ्यानेंच सरकारचें कर्तव्य संपत नसून, आपणास सुखोपभोगाचीं साधनें मिळवून देणें हेंही सरकारचें कर्तव्य आहे. हें शिक्षण त्यांना प्रत्यक्ष उदाहरणानें मिळूं लागल्यामुळें तें त्यांच्या मनावर उत्कृष्ट रीतीनें ठसेल. ज्यांच्या अंगीं कोणत्याही प्रकारची योग्यता नाहीं अशा निरुद्योगी लोकांचा एकदां असा ग्रह झाला म्हणजे त्यांना आपल्या सर्व दुःखांचें कारण सरकार आहे असें वाटूं लागेल. आपल्या आळसामुळें व मूर्खपणामुळें आपण विपत्ति भोगीत आहों अशी कल्पना त्यांच्या डोक्यांत न शिरतां, समाजाची व्यवस्था बरोबर नाहीं व त्यामुळें आपणांस समाजाकडून मिळावी तितकी मदत मिळत नाहीं हें आपल्या दुःखाचें मूळ आहे, असें त्यांस वाटूं लागेल. बाहेरची मदत कितीही मिळाली तरी त्यांची तृप्ति

---

* श्रीमंत आणि गरीब हा भेद काढून टाकण्यासाठीं हल्लींची समाजव्यवस्था मोडून टाकून तिच्या जागीं नवीन व्यवस्था सुरू करण्याचे यत्न युरोपांत आजपर्यंत अनेक मनुष्यांनीं केले आहेत. ह्या लोकांनीं स्थापिलेले पंथ काम्यूनिझम्, सोशिआलिझम्, वगैरे नांवांनीं प्रसिद्ध आहेत व त्यांच्या अनुयायांस काम्यूनिस्ट, सोशिआलिस्ट वगैरे नांवें आहेत.

होणार नाहीं, आणि एकदां अशा प्रकारचा असंतोष अविचारी व अशिक्षित लोकांमध्यें उत्पन्न झाला म्हणजे परिणाम काय होईल त्याचा नियम नाहीं. प्रत्येक समाजामध्यें अशा लोकांचाच भरणा विशेष असतो व हे लोक एकदा बिथरले म्हणजे काय पाहिजे तें करतील. मनुष्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें मजुरी देऊन त्यांजकडून ती कराच्या रूपानें सरकारानें घेऊन गरीबांस वांटून द्यावी ह्यापेक्षां गुणावगुणाकडे लक्ष न देतां सर्वांस रोजमुरा सारखा दिला असतां अधिक सोईचें होईल, असें त्यांच्या डोक्यांत भरेल. सारांश, समाजाच्या चालू असलेल्या व्यवस्थेचें सर्वतोपरी उच्चाटन होऊन त्यांच्या कल्पनेप्रमाणें नवीन व्यवस्था झाल्याशिवाय त्यांस चैन पडणार नाहीं. अशा रीतीनें काम्यूनिझम्‌ची स्थापना होईल आणि त्या स्थितींतही आपणांस मिळावीं तितकीं सुखें मिळत नाहींत ह्यामुळें असंतुष्ट होणाऱ्या उपद्रवापी लोकांना अराजकाशिवाय दुसरा मार्ग दिसणार नाहीं. हिंस्र पशूंप्रमाणें प्रत्येकानें आपल्या बळाच्या सामर्थ्यानें आपणास पाहिजे तें मिळवावें व जें जें आपल्या मार्गांत येईल त्याचा निःपात करावा असा क्रम सुरू होईल. पशूंच्या भुकेला कांहीं मर्यादा आहे परंतु मनुष्याच्या भुकेला तीही नाहीं. म्हणजे पशूंच्या स्थितीहूनही नीच अशा प्रकारच्या सामाजिक स्थितीला मनुष्य जाऊन पोंचेल.

न्याय व परोपकार, आणि न्यायाचीं व परोपकाराचीं कामें घडवून आणण्याचीं साधनें ह्यांजमध्यें विवेक झाला नाहीं तर काय परिणाम होतील त्याचा विचार झाला. आतां कोणास असें वाटेल कीं, ज्या गोष्टी कधीं कोणाच्या स्वप्नांतही येत नाहींत त्यांच्याबद्दल एवढा उहापोह कशास पाहिजे? ह्यास उत्तर एवढेंच कीं, अशा प्रकारच्या विचारांचे लोक आपल्या इकडे जरी फारसे आढळून येत नाहींत तरी युरोपांत अशा प्रकारचे लोक बरेच झाले व अजूनही आहेत. ते लोक स्वस्थ न बसतां आपले विचार प्रचारांत आणण्यासाठीं अनेक प्रकारच्या खटपटी करितात, व ह्या चढाओढीच्या काळांत काम मिळत नाहीं, किंवा मजुरी फार कमी मिळते म्हणून त्रासलेले हजारो लोक त्यांस साह्य करितात आणि कधींकधीं अनर्थ करूं पाहतात.

आतां कित्येक लोकांच्या एका प्रश्नाचा विचार करूं म्हणजे पुष्कळ लोकांच्या मनांतील ह्या विषयावरील विचारांचा घोंटाळा नाहींसा होईल. प्रथमतः त्यांच्या दृष्टीनें व त्यांच्या तोंडच्या शब्दांनींच त्या प्रश्नाचें स्वरूप व्यक्त करून नंतर त्याचें उत्तर देण्याचा यत्न करूं.

" तुम्ही म्हणतां कीं, प्राणिमात्रानें आपल्या स्वभावाचा व तदनुरूप आचरणांचा परिणाम भोगिला पाहिजे हें न्यायाचें प्रथमतत्त्व आहे. ह्या तत्त्वाचा अंमल चोहोंकडे चालला असतां मनुष्यांचे संबंधानें विचार करितांना मनुष्याच्या आचरणाला तुम्ही आणखी आळा घालूं पाहतां. तुमच्या म्हणण्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें अशा प्रकारचें आचरण केलें पाहिजे कीं, त्याच प्रकारचें आचरण इतरांनीं केलें असतां कोणाचा कोणास त्रास होऊं नये. ह्यावरून उघडच झालें कीं, पशुपक्ष्यादिकांमध्यें ज्याप्रमाणें प्रत्येक प्राण्याला आपल्या शक्तीचा यथेच्छ उपयोग करितां येतो त्याप्रमाणें मनुष्यप्राण्यांस तो तुम्ही करूं देत नाहीं. त्यांना भक्ष्याकरितां लागणारे प्राणी किंवा इतर पदार्थ पाहिजे त्या रीतीनें मिळवितां येतात एवढेंच नव्हे, तर ते मिळविण्याकरितां स्वजातीयाकडून किंवा परजातीयांकडून अडथळा झाला असतां तो केवळ सामर्थ्याचे योगानें दूर करितां येतो. मनुष्यानें आपल्या सामर्थ्याचा अप्रतिबंध उपयोग करूं नये असें तुम्ही म्हणतां त्याचा परिणाम काय होतो तो पहा. दुर्बल व्यक्तींना समाजसंस्थेकडून किंवा सरकाराकडून टेंका मिळाल्यामुळें त्यांना आपले व्यवहार निर्बंधपणें चालवितां येतात, आणि स्वकष्टार्जित वित्ताचा यथेच्छ उपभोग घेतां येतो. प्रबलांस आपल्या शक्तीचा अवरोध करण्याचें सरकारनें जर भाग पाडलें नसतें, तर दुर्बलांचें अस्तित्व कष्टमय किंवा अशक्य झालें असतें. आतां आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं, ज्या दुर्बलांचा कैवार घेऊन न्यायाच्या प्रथमतत्त्वाला तुम्हीं थोडेंसें बंधन घातलें व त्यांची जीवयात्रा कमी कष्टमय केली, त्यांचाच आणखी थोडासा कैवार घेऊन त्यांचें जीवित सुखावह होईल असें करा. अर्थात् आपापले व्यवसाय निर्बंधपणें चालावतां यावे एवढ्यापुरताच प्रबलांना आणि दुर्बलांना समान हक्क देऊन थांबूं नका. परंतु आपापल्या व्यवसायापासून जी फलप्राप्ति व्हावयाची तीही सर्वांस सारखी होईल अशा प्रकारची व्यवस्था करा. ज्या मार्गानें तुम्ही थोडेसे पुढें गेलां आहां त्याच मार्गानें आणखी पुढें जा एवढेंच आमचें सांगणें आहे. "

पुष्कळ मनुष्यांची दुर्बलता त्यांच्या स्वतःच्या अपराधांपासून उत्पन्न झालेली नसते, असें असतां त्या दुर्बलतेचे दुष्परिणाम त्यांस भोगावे लागतात हा मोठा अन्याय आहे असें प्रथमदर्शनीं वाटण्याचा संभव आहे, व तें एका दृष्टीनें खरेंही आहे. परंतु जीवसृष्टींत जीवनार्थ कलहाचा सपाटा कसा

चालू आहे तो लक्षांत आणिला म्हणजे असा परिणाम होणें अपरिहार्य आहे असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. सृष्टींतील प्रत्येक प्राणी दुसऱ्या प्राण्यांवर उपजीविका करीत आहे असें म्हटलें तरी चालेल. एका प्राण्याचा बळी घेऊन दुसऱ्या प्राण्यानें आपली जीवयात्रा पार पाडावी असा न्याय जिच्या राज्यांत दिसून येतो त्या निसर्गदेवतेला दुर्बलांची कींव बिलकुल येत नाहीं, असें असतां निसर्गदेवतेचा कठोरपणा कमी व्हावा ह्या हेतूनें कृत्रिम उपायांनीं प्रबलांपासून दुर्बलांचें संरक्षण व्हावें ह्याकरितां जर आपण झटतों, तर त्यांच्या दुर्बलतेमुळें ज्या सुखांस ते मुकतात तीं त्यांस प्राप्त करून देण्याकरितां, कृत्रिम उपायांनीं प्रबलांच्या शक्तीचा आणखी थोडासा अवरोध करण्यास काय हरकत आहे ?

येथें मतभेदाचें स्थळ आलें. ह्या ठिकाणीं अनेक प्रकारच्या गुंतागुतीच्या कल्पनांमध्यें विवेक करण्याची आवश्यकता दिसून येते. न्याय व परोपकार ह्यांजमधील फरक किती महत्त्वाचा आहे व त्यामुळें त्यांच्या साधनांमध्येंही फरक करणें किती आवश्यक आहे हें ह्या ठिकाणींच समजतें. मनुष्येतर प्राणिसृष्टींतील कडक नियमाला मानवी सृष्टींत न्याय आणि परोपकार हे दोन जोड लाविले पाहिजेत, असें कबूल करितांनाच पहिल्याचा अंमल जुलमानें करून दुसऱ्याला व्यक्तिमात्राच्या इच्छेवर ठेविलें पाहिजे अशी अट घालणें भाग पडेल. न्याय व परोपकार ह्या दोन्ही गोष्टी सरकारावर सोंपविणें उपयोगी नाहीं असें म्हणण्याचा अर्थ परोपकाराकडे कोणींच लक्ष देऊं नये असा नव्हे. कायद्याच्या तीव्र उपायांनीं तो अंमल न बसवितां दुसऱ्या सौम्य उपायांनीं बसविण्याचा यत्न केला पाहिजे. दुर्बलतेमुळें उत्पन्न होणाऱ्या ज्या दोन अडचणी त्या दोहोंचेंही निवारण व्हावें हें आह्मांस कबूल आहे; मात्र समाजाच्या अस्तित्वाला अत्यंत अपायकारक अशा पहिल्या अडचणीचें निवारण कायद्यानें करा व दुसऱ्या अडचणीचें निवारण खासगी उपायांनीं करा एवढेंच आमचें म्हणणें आहे. कारण, दुसरीचेंही निवारण कायद्यानें केलें असतां समाजावर केवढाले अनर्थ गुदरून समाजाचें स्थैर्य, मानसिक व शारीरिक सामर्थ्य आणि संपत्ति ह्यांवर कसे परिणाम होतात हें पूर्वी विस्तारानें सांगितलेंच आहे. आणखी, समाजाच्या स्थैर्याला परोपकाराची आवश्यकता नाहीं व परोपकाराचा अंमल कायद्यानें बसवूं लागलें तर न्यायाला फांटा द्यावा लागतो, ह्या गोष्टी पूर्वींच सिद्ध केल्या आहेत.

समाजाचें स्थैर्य, संपन्नता व शारीरिक आणि मानसिक सामर्थ्य यांजकडे लक्ष दिलें असतां वरील विवेकाची अत्यावश्यकता दिसून येतेच; पण ह्याशिवाय दुसरींही कारणें आहेत. जुलुमाचा परोपकार सुरू झाल्यावर तो करणारानें केला असतां त्यांत नवल नाहीं. तो न करील तर त्यास शिक्षा होईल. ज्याच्यावर उपकार झाला त्यासही तो झाला असें वाटणार नाहीं. कारण, तो करणें हें प्रबलांचें कर्तव्यच आहे असें त्यास वाटेल. अशानें उपकारी आणि उपकृत ह्या दोघांच्याही मनाला विलक्षण प्रकारच्या सुखाचा अनुभव देण्याचें परोपकाराच्या अंगीं जें सामर्थ्य आहे तें नष्ट होईल. आपल्या बांधवांची विपन्नावस्था पाहून परोपकारी मनुष्यांचें हृदय तिळतिळ तुटत असतें व अनेक प्रकारचे उन्नत विचार त्यांच्या मनांत येत असतात. आपलें सुख कमी करून किंवा त्यावर सर्वस्वी लाथ मारून ह्या दीनांस मदत करावी अशी त्यांस बुद्धि होते. व संवईनें हे त्यांचे मनोविकार प्रबल होऊन परोपकाराचें त्यांस व्यसनच लागतें. अशा रीतीनें मनाच्या कळवळ्यानें परोपकार करणाऱ्या लोकांचें समाधान इतरांस कल्पनेनें समजण्यासारखें नाहीं. त्याचप्रमाणें विपत्तींत पडलेल्या मनुष्यांस अकल्पित मदत मिळाली असतां जें सुख होतें तें त्यांचें त्यांसच माहीत. उपकर्ता आणि उपकृत ह्या दोघांच्याही मनाला मार्दव आणून त्याच्यावर एका प्रकारचा संस्कार करण्याचें सामर्थ्य आपखुषीनें झालेल्या परोपकारांत आहे, जुलुमाच्या परोपकारांत ह्याच्या उलट सामर्थ्य आहे. ज्यांच्याकडून जुलुमानें परोपकार करविला जातो त्यांच्या मनांत आपल्या बांधवांविषयीं तिरस्कार उत्पन्न होतो व ज्यांच्यावर उपकार करविला जातो त्यांच्या अंगीं उद्धटपणा व कृतघ्नबुद्धि उत्पन्न होते. सारांश जुलुमाच्या परोपकारानें उपकर्ता व उपकृत ह्या दोघांवरही अपकार घडतो.

आणखी उपकृतांच्या कृतज्ञतेमुळें उपकारी आणि उपकृत ह्यांच्यामध्यें एकप्रकारचें बंधन उत्पन्न होत असतें. ज्या समाजामध्यें अशा प्रकारच्या लोकांचा भरणा असतो त्या समाजांत श्रीमंत आणि गरीब ह्यांजमध्यें सामान्यतः प्रेमभाव दृष्टीस पडतो व त्याचें समाजाच्या स्थैर्याला मोठें साह्य होतें. जबरीच्या परोपकारानें ह्या दोन वर्गांतील लोकांमध्यें वैमनस्य उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं.

परार्थहेतुक क्रियांचे जे मुख्य भेद न्यायप्रेरित क्रिया आणि परोपकारप्रेरित क्रिया त्यांच्यामधील विवेक बऱ्याच पाल्हाळिक रीतीनें दाखवून झाला,

व अशा प्रकारचा विवेक करण्याची अवश्यकता दाखविण्यांत येऊन तिचें महत्त्वही सांगितलें. आतां परोपकाराच्या प्रकारांचा विचार करूं.

कधींकधीं एकादी क्रिया केल्यानें किंवा कांहीं शब्द बोलल्यानें स्वतःला फायदा किंवा सुख मिळत असतां, तसें न केल्यानें दुसऱ्यांना फायदा किंवा सुख मिळण्याचा संभव असतो. अशा प्रसंगीं ती क्रिया न करण्यासाठीं किंवा ते शब्द न बोलण्यासाठीं आत्मसंयमन करणें हा परोपकारच होय. अनेक गोष्टींत आत्मसंयमन केल्यानें परोपकार घडण्याचा संभव असतो. पुष्कळ प्रसंगीं हे परोपकार आहेत असें कोणास वाटावयाचें नाहीं, तथापि त्यांचें महत्त्व कमी नाहीं. ह्या पहिल्या प्रकारच्या परोपकारांत क्रिया करविण्यास तयार झालेल्या मनाला तीपासून निवृत्त करावें लागतें म्हणून त्यास निवृत्त्यात्मक परोपकार अशी संज्ञा देऊं. सामान्य लोकांची परोपकाराविषयीं जी कल्पना आहे तीप्रमाणें केलेल्या क्रियांचा परोपकाराच्या दुसऱ्या प्रकारांत अंतर्भाव होतो. अशा क्रिया करण्याला उत्तेजन देण्यासाठीं मनाला यत्नानें प्रवृत्त करावें लागतें म्हणून परोपकाराच्या ह्या प्रकारास प्रवृत्त्यात्मक परोपकार अशी संज्ञा देऊं. प्रवृत्त्यात्मक परोपकारांत आत्मयज्ञाची विशेष जरूर असते. आपणाहून अन्य एक किंवा अनेक व्यक्तींना सुख व्हावें किंवा त्यांची विपत्ति दूर व्हावी ह्यासाठीं स्वतः सुखाला मुकणें किंवा स्वतःला विपत्तींत घालणें हा आत्मयज्ञ होय. हा आत्मयज्ञ कधीं संपादित वित्ताच्या किंवा शक्तीच्या रूपानें होत असतो व कधींकधीं प्रत्यक्ष न मिळालेल्या परंतु पुढें मिळणाऱ्या वित्ताच्या व शक्तीच्या रूपानें होतो. परोपकार करितांना उपकर्त्याचें नेहमीं नुकसानच असतें, परंतु त्याला अगदींच मोबदला मिळत नाहीं असें म्हणतां येत नाहीं. परोपकार केल्याबद्दल त्याच्या मनाला समाधान होतें व उपकृतांच्या कृतज्ञताबुद्धीनेंही उपकर्त्यास एका प्रकारच्या सुखाचा अनुभव होतो. आतां, नुकसानाच्या मानानें हा मोबदला अगदींच क्षुल्लक होय, हें उघड आहे.

परोपकाराच्या प्रत्येक विभागाचे दोन ठळक प्रतिविभाग करितां येण्यासारखे आहेत. दुर्बलता किंवा दुर्दैव ह्यांपैकीं एकाद्या किंवा दोहोंच्याही सपाट्यांत सांपडलेल्या लोकांस मदत करण्याच्या उद्देशानें परोपकाराच्या क्रिया करणें हा एक प्रकार, व आपल्या बरोबरीच्या किंवा आपणाहूनही चांगल्या स्थितींत असणाऱ्या अशाही लोकांस ज्यांपासून उपयोग होतो अशा प्रकारच्या क्रिया करणें हा दुसरा प्रकार. पहिल्या प्रकारच्या क्रिया सर्व लोकांस परि-

चित आहेत, परंतु दुसऱ्या प्रकारच्या क्रिया जरी सर्व लोक हरहमेश करीत असतात, तरी पहिल्या प्रकारच्या क्रिया म्हणजे परोपकार अशी त्यांची समजूत झालेली असल्यामुळें, त्यांस ह्या क्रिया परोपकारासारख्या वाटत नाहींत. तथापि आमच्या परोपकाराच्या व्याख्येप्रमाणें न्यायानें ज्या क्रिया करण्यास मनुष्य बांधलेला नाहीं व ज्यांपासून दुसऱ्याला हित किंवा सुख होतें त्या सर्व क्रियांचा समावेश परोपकारांत केला पाहिजे. ह्या दुसऱ्या प्रकारच्या क्रिया अनेक प्रसंगीं फार क्षुल्लक असून असंख्य असतात. थोडींशीं उदाहरणें दिलीं असतां ह्या दुसऱ्या प्रकारासंबंधानें स्पष्ट समज होईल. चार मंडळी कोणाचे घरीं बसली असल्यास यजमान त्यांस पानसुपारी किंवा चहा देतो; एकादा विनोदी मनुष्य आपल्या विनोदाच्या भाषणांनीं जवळ बसलेल्यांस खुष करितो; किंवा कांहीं मंडळीस करमणूक करण्यासाठीं एकादा गाणारा किंवा वाजविणारा एकादी मनोहर चीज गाऊन किंवा वाजवून सर्वांस आनंदित करितो. ह्या सर्व क्रिया परोपकाराच्या होत. मनुष्याच्या सुखाचा बराच अंश वर सांगितलेल्या प्रकारच्या परोपकाराच्या असंख्य क्रियांवर अवलंबून असतो.

परोपकाराचे वर जे भेद आणि पोटभेद सांगितले त्यांच्या संबंधानें विचार करितांना तीन प्रकारच्या परिणामांकडे लक्ष पुरविलें पाहिजे:–( १ ) उपकर्त्यावर उलट होणारा परिणाम; त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या मनुष्यांवर म्हणजे त्याच्या आप्तांवर व चाकरमाणसांवर होणारा परिणाम, व उपकर्ता ह्या दृष्टीनें त्याच्या औदार्याचा उपयोग करून घेण्याची इच्छा करणाऱ्या लोकांवर होणारा परिणाम. ( २ ) उपकृतावर होणारा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे त्याचें सुख वाढणें किंवा दुःख कमी होणें, आणि त्याच्यावर होणारा अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे त्याच्या मनाला मिळणारें शिक्षण व तेणेंकरून त्याच्या वर्तनांत होणारा फरक. ( ३ ) एकंदर समाजावर होणारा परिणाम म्हणजे त्याचें स्थैर्य व भरभराट ह्यांच्या संबंधानें वर्तमानकालीं व भविष्यत्कालीं होणारा फेरफार.

---

# निवृत्त्यात्मक परोपकार

## प्रकरण १

### जीवनकलहामुळें होणाऱ्या चढाओढीची मर्यादा

मनुष्याच्या क्रियांना ज्या प्रकारची मर्यादा घालणें सरकारचें कर्तव्य आहे तीहून अधिक मर्यादा, चढाओढीच्या सपाट्यांत सांपडलेल्या आपल्या बांधवांच्या सोईसाठीं व्यक्तिमात्रानें स्वतः घालून घेतली पाहिजे. ह्या जगांत सुखानें चरितार्थ चालविण्यास किती विघ्नें येतात ह्याचा अनुभव बहुतेकांस आहे व त्यावरून इतरांच्याही स्थितीचा प्रत्येकास अजमास करितां येण्यासारखा आहे. दुसऱ्यांस पाठीमागें टाकून आपण पुढें जावें ही इच्छा कमीअधिक प्रमाणानें सर्व मनुष्यांच्या हृदयांत आहेच. हिलाच अहमहमिका किंवा चढाओढ म्हणतात. तिला कायद्यानें जरी थोडेंसें बंधन घातलें आहे तरी तेवढ्यावरच थांबलें असतां त्याचा परिणाम जवळ जवळ " बळी तो कान पिळी " ह्या तत्त्वाच्या वळणावर जाणार आहे. तसा परिणाम होऊं नये म्हणून कायद्याच्या बाह्य उपायांनीं तर कांहीं तजवीज करितां येत नाहींच, परंतु सुधारलेल्या मनुष्याच्या उन्नत विचारांनीं ती आंतून होण्यासारखी आहे. म्हणजे आत्मसंयमनानें मनुष्यानें आपल्या अहमहमिकेस योग्य मर्यादेच्या आंत ठेविलें पाहिजे.

एका ठिकाणीं एकाच प्रकारचा धंदा करणाऱ्या लोकांमध्यें कांहीं लोक विशेष वाकबगार व बाकीचे कमी वाकबगार असतात. ह्या लोकांत धंद्याच्या संबंधानें चढाओढ नेहमीं चालू असते. न्यायाचा ताजवा तंतोतंत ठेविला असतां अधिक वाकबगार मनुष्यांनीं आपल्या वाकबगारीचा पूर्ण फायदा घेण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाहीं असें दिसतें; आणि जेव्हां स्वतःचा चरितार्थ चालवून मोठमोठ्या कुटुंबांचा चरितार्थ चालविण्याची त्यांच्यावर जबाबदारी असते, किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें अधिक पैसा मिळविण्याची विशेष आवश्यकता उत्पन्न होते तेव्हां ते ह्या कायदेशीर हक्काचा उपभोग घेतातच, व त्यांनीं तो घ्यावा हें रास्त आहे. समाजांतील उत्कृष्ट मनुष्यांच्या शक्तीचा पूर्ण उपयोग झाल्यामुळें एकंदरींत समाजाला फायदाच होतो; कारण त्यांच्या कसबाची सुधारणा होऊन समाजाची बुद्धिमत्ता वाढते व त्यांच्या मुलांबाळांचें संगोपन व शिक्षण अधिक चांगल्या रीतीनें होऊन समाजांत अधिकाधिक चांगल्या लोकांची भर पडत जाते.

आपला व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याकरितां चढाओढीमध्यें ज्यांना आपल्या सामर्थ्याचा पूर्ण उपयोग करून घ्यावा लागतो अशा लोकांची संख्या समाजांत फार असते. विशेषतः शारीरिक श्रम करणाऱ्या लोकांची तर बहुतेक हीच स्थिति असते. ह्या लोकांनीं कोणत्याही रीतीनें आपले शक्तीचा अवरोध करावा हें इष्ट दिसत नाहीं. म्हणजे ह्या लोकांच्या दृष्टीनें वर्तनाला न्यायाची मर्यादा आहे, तितकी पुरे आहे. परोपकारासाठीं आणखी मर्यादा घालण्याची जरूर नाहीं.

परंतु पुष्कळांस हें मत पसंत नाहीं. *सोशिआलिस्ट लोक, मजुरांच्या संपांत शिरणारे मजूर आणि त्यांचे पुढारी, व दुसरेहि पुष्कळ सुशिक्षित विचार करणारे लोक, ह्यांचा ह्या मतावर कटाक्ष आहे. त्यांचें असें मत आहे कीं, कोणत्याही मजुरानें धंद्यात चढाओढ करून इतर मजुरांस संकटांत घालणें योग्य होणार नाहीं. युरोपांत पुष्कळ ठिकाणीं जे मजुरांचे संप आहेत त्यांचा एक उद्देश कोणत्याही मजुराला ठरीव दरापेक्षां कमी मजुरी घेऊं देऊं नये ह्याविषयीं यत्न करणें हा आहे. दिवसांवर किंवा तासांवर मजुरीचा दर ठरवून तो सर्वांस सारखा असावा असा आग्रह धरिल्यानें पुष्कळ मजुरांचा तोटा होतो. अमुक काम केलें असतां अमुक मजुरी घ्यावी अशा करारानें काम घेतलें असतां कांहीं मजूर इतरांच्या दीडपट व कांहीं दुप्पटही मजुरी मिळवूं शकतील. पण असें कोणीं केलें असतां त्यास धंद्याची घाण करणारा असें म्हणून सर्व मजूर त्याच्यावर तुटून पडतील. आपणाला काम मिळावें ह्या हेतूनें जर कोणीं कमी मजुरी पतकरिली तर इतर मजूर त्यास बोचबोचून खातात. मग असें करण्यास तो कोणत्या कारणानें प्रवृत्त झाला हें ते पहात बसत नाहींत. युरोपांत हल्लीं अशा प्रकारच्या मतांचे हजारो सुशिक्षित लोक आहेत व ते मजुरांच्या संपास वगैरे मदत करून अनेक गरीब माणसांचें नुकसान करीत आहेत. अंगांत कर्तबगारी व सामर्थ्य असून अशा प्रकारच्या जुलुमामुळें कित्येकांस अर्धपोटीं राहण्याची पाळी येते व कुटुंबांतील मनुष्यांची उपासमार होते. कृत्रिम उपायांनीं मजुरीचे दर वाढविण्याचे जे प्रयत्न मोठ्या जारीनें युरोपांत चालले आहेत त्यांचा परिणाम कारखानेवाले व मजूर ह्या उभयतासही घातक होण्याचा संभव आहे. खप आणि पुरवठा ह्यांच्या संबंधाचा अर्थशास्त्रांतील नियम कृत्रिम उपायांनीं मोडणारा नाहीं. मजुरांचा संख्या अधिक झाल्यास

* पृष्ठ १४ वरील टीप पहा.

मजुरीचे दर कमी होणें अपरिहार्य आहे. अशा प्रसंगीं कर्तबगार व सामर्थ्यवान् मजुरांनीं पोटभर मिळवून बाकीच्यांनीं अर्धपोटीं राहणें हेंच न्याय्य आहे.

ह्या लोकांचें असें म्हणणें असतें कीं, जर कांहीं लोकांनीं अधिक काम करून अधिक मजुरी मिळविली तर तितक्या पुरते दुसरे लोक निकामी राहतील, आणि कमी मजुरीवर जर कांहीं मजूर काम करूं लागले, तर कारखानेवाले सर्वांचेच मजुरीचे दर कमी करून आपला फायदा करून घेतील व मजुरांचें नुकसान होईल. नूतन अर्थशास्त्रकारांच्या मतें हे मुद्दे निरुत्तर आहेत.

ह्या लोकांची व सामान्यतः सामाजिक व राजकीय प्रश्नांचा विचार करणाऱ्या बहुतेक लोकांची दृष्टि तात्कालिक परिणामांवर असते. मजुरी व काम ह्या दोन गोष्टी मात्र त्यांच्या डोळ्यांपुढें दिसत असतात; परंतु माल कमी अधिक उत्पन्न होणें, त्यामुळें त्याच्या किंमतींत फेरफार होणें, व तो झाला असतां गिऱ्हाइकांची सोय किंवा गैरसोय होणें, ह्या गोष्टींकडे त्यांचें मुळींच लक्ष जात नाहीं. मजूर व कारागीर ह्यांच्या दृष्टीनें विचार केला असतां, त्यांना अधिक मजुरी मिळण्यांत त्यांचें हित आहे खरें; परंतु ते जो माल उत्पन्न करितात त्याचा उपयोग करणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें विचार केला असतां माल जितका स्वस्त मिळेल तितका त्यांस हितावह आहे. म्हणजे माल उत्पन्न करणाऱ्या मजूर व कारागीर लोकांचा जितक्या प्रमाणानें फायदा होईल तितक्या प्रमाणानें तो माल विकत घेणाऱ्या लोकांचें नुकसान असतें. दिवसाच्या मजुरीवर काम न देतां कामाचा आकार करून मजुरी दिल्यानें गरीब मजुरांचें नुकसान होतें, ह्याविषयीं तिखटमीठ लावून व्याख्यानें देणाऱ्या किंवा लेख लिहिणाऱ्या लोकांच्या मनांत एक गोष्ट अगदींच येत नाहीं असें दिसतें. माल उत्पन्न करण्यास कमी खर्च पुरला असतां कमी किंमतीस तो विकतां येईल, व मालाची किंमत कमी झाली असतां गिऱ्हाइकांची संख्या अधिक होऊन मालाचा खप वाढेल, व अशा रीतीनें नवीन मजुरांस काम मिळूं लागेल. शिवाय ज्या दुसऱ्या कारखान्यांतील मजुरांस व कारागिरांस तो माल घ्यावयाचा असतो त्यांचाही फायदा होतो. दुसरी एक गोष्टही त्यांच्या लक्षांत येत नाहीं. ती ही कीं, एका धंद्यांतील कांहीं लोकांनीं अधिक काम केल्यामुळें जर कित्येक लोक निकामी राहूं लागले, तर ते दुसऱ्या एकाद्या धंद्यांत काम मिळविण्याचा यत्न करितील व एकंदरींत समाजाचें व मजुरांचेंही कल्याणच होईल.

सदरील वाद कांहींसा, यंत्रांनीं कामें करण्याची सुरुवात होते त्या वेळीं त्या त्या धंद्यांत गुंतलेले लोक आमचा धंदा बुडाला म्हणून जी ओरड करीत असतात तिच्यासारखा आहे. ज्या ज्या ठिकाणीं प्रथमतः यंत्रांचा उपयोग होऊं लागतो, त्या त्या ठिकाणीं ही चर्चा झाल्याशिवाय राहत नाहीं. केवळ त्या धंद्यांत गुंतलेलेच लोक ही कुरकूर करीत असतात असें नाहीं, तर इतर अशिक्षित व शिक्षित लोकही त्यांस साथ करितात. व्यक्तीच्या दृष्टीनें पाहिलें असतां ह्या ओरडींत अर्थ असतो, परंतु समाजाच्या किंवा एकंदर मनुष्यजातीच्या दृष्टीनें पाहिलें असतां नसतो. आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रें, धातूंचें सामान ओतण्याचे कारखाने, कापडाच्या व कागदाच्या गिरण्या इत्यादि नाना प्रकारच्या कारखान्यांमुळें मनुष्यजातीचें इतकें हित झालें आहे कीं, त्याशीं तुलना करितां थोड्याशा लोकांचें होणारें थोडेंसें नुकसान कांहींच नव्हे; पुष्कळ दिवसांच्या अनुभवानें आतां ही गोष्ट लोकांस समजूं लागली आहे. ह्या थोड्याशा लोकांचें प्रत्यक्ष नुकसान होत असतें त्याशिवाय सर्व जगाला एकादी नवी युक्ति निघाली असतां तिच्यापासून फायदाच होत असतो. आतां कमी दरानें काम करून देण्याचें पतकरून, अधिक वेळ काम करून जो मनुष्य स्वतःचा फायदा करून कारखानदारास स्वस्त माल उत्पन्न करून देतो, त्या मनुष्याला जर इतर मजुरांना काम नाहींसें होतें म्हणून दोष द्यावयाचा, तर ज्या मनुष्यांनीं हजारो युक्त्या काढून लाखो मनुष्यांस कांहीं दिवसपर्यंत निकामी ठेविलें त्यांना किती दोष दिला पाहिजे बरें ? मनुष्यांच्या किंवा जनावरांच्या श्रमानें होणारीं कामें असोत किंवा यंत्राच्या साह्यानें होणारीं कामें असोत, ज्या योगानें काटकसर करूत स्वस्त माल विकतां येईल त्या योगानें एकंदरींत मनुष्यजातीचें कल्याण होईल. दिवसांवर मजुरी न देतां जर कामावर मजुरी देऊन थोड्या खर्चांत पुष्कळ काम करून घेतां येण्यासारखें असलें, तर ती नवी युक्तिच निघाली असें म्हणण्यास हरकत नाहीं; व ज्याप्रमाणें कोणतीही युक्ति निघाली असतां कांहीं लोकांस थोडे दिवस निरुद्योगी बसावें लागते, त्याचप्रमाणें ह्या युक्तीनें कांहीं लोकांस बसावें लागेल. ह्यासाठीं मनुष्यजातीच्या हिताकडे लक्ष देऊन त्या युक्तीचा अव्हेर न करितां आदरच केला पाहिजे.

ज्या वाचकांच्या हातांत हें पुस्तक पडणार आहे त्यांना सदरील विषयावर एवढा पाल्हाळ केलेला पाहून कदाचित् आश्चर्य वाटेल. कारण

आपल्या इकडे अशा प्रकारची स्थिति फारशी आढळत नाहीं. परंतु ह्या विषयाच्या संबंधानें आपलेकडेही लोकमत तयार करणें अगत्याचें आहे. इकडील गिरण्यांतील मजुरांमध्यें आपणास मजुरी फार कमी मिळते अशा प्रकारचा असंतोष कोठें कोठें दिसून येतो व त्यांनीं कट केल्याचींही उदाहरणें क्वचित् आढळून येतात. तिकडील लोकांच्या चुक्या पाहून इकडील लोकांनीं शहाणें व्हावें व आपलें नुकसान करून घेण्यास प्रवृत्त होऊं नये. गिरण्यांतील लोकांशीं ज्या समजदार लोकांचा संबंध असेल त्यांनीं त्यांच्या डोक्यांत भलभलते विचार न शिरतील ह्याविषयीं खबरदारी घेणें जरूर आहे. युरोपांत धंद्याच्या लोकांच्या कटांचें मोठें पीक आलें आहे व त्यांचे घातक परिणाम पुष्कळांस भोंवत आहेत. कोणत्याही देशांत मजुरांचा वर्ग फार मोठा असतो. इंग्लंड वगैरे देशांतील मजूर आमचे इकडील मजुरांइतके अडाणी नाहींत. त्यांस थोडेंबहुत शिक्षण मिळालेलें असून साधारणतः विचार करण्याची शक्ति आहे. तरी सोशिआलिस्ट वगैरे मंडळी ह्या लोकांचा पुढाकार करून त्यांचीं माथीं फिरवून टाकीत आहेत. ह्या विषयाच्या संबंधानें त्यांचे विचार व मनोविकार अगदीं बेताल झालेले आहेत. वाकबगार मनुष्यानें आपल्या वाकबगारीचा उपयोग करणें म्हणजे ह्या मनुष्यांच्या दृष्टीनें अप्रामाणिकपणा आणि अन्याय होय. आणि कमकुवत माणसांनीं बलवानांस आपल्या शक्तीचा उपयोग करूं न देणें हा न्याय! कोणत्याही धंद्यांत बरेच लोक मध्यम प्रतीचे असून थोडे लोक विशेष वाकबगार असतात. मध्यम प्रतीच्या लोकांनीं आपल्या जमावाच्या जोरावर थोड्या वाकबगार लोकांस जर अधिक किंवा आपल्यापेक्षां चांगलें काम करूं दिलें नाहीं तर तें केवळ आपल्या फायद्याकरितां होय. कमी वाकबगार व अधिक वाकबगार ह्या सर्वांस सारखीच मजुरी द्यावी असें केल्यानें कमी प्रतीच्या मजुरास एरव्हीं मजुरी मिळाली असती तीपेक्षां अधिक मिळावी हा तरी एक उद्देश असला पाहिजे, किंवा चढाओढ झाल्यानें कमी प्रतीच्या मजुरास जो विशेष त्रास पडणार तो चुकावा हा उद्देश असला पाहिजे. आणि कोणताही उद्देश असला तरी पुष्कळांनीं आपल्या फायद्याकरितां थोड्यांचें नुकसान करावें हा परिणाम झाला. तेव्हां अप्रामाणिक हा शब्द ह्या ठिकाणीं कोणास लाविता येईल ह्याचा विचार केला तर तो ह्या लोकांसच लाविला पाहिजे. कारण कोणताही सरळ मनुष्य दुसऱ्याचे हातपाय बांधून आपला फायदा करून घेऊं पाहणार नाहीं. एकादी नवी युक्ति निघाली तर पुष्क-

ळांच्या फायद्याकरितां थोड्या लोकांचें नुकसान होतें हें खरें, कारण त्या धंद्यांत गुंतलेले लोक निकामी राहतात; पण त्यांना आपापले धंदे करण्यास पूर्ण मोकळीक असते, व आपल्या शक्तीचा किंवा कसबाचा उपयोग करण्यास त्यांस कोणी कोणत्याही प्रकारचा अडथळा करीत नाहीं. कमी वाकबगार मनुष्य प्रामाणिक असतील तर अधिक वाकबगारांनीं आपलें नुकसान करून घ्यावें हें त्यांस कधीं आवडणार नाहीं, व त्यांच्या नुकसानापासून आपला फायदा करून घ्यावा हें तर त्यांच्या स्वप्नींही येणार नाहीं. उलट अशा प्रत्येक मनुष्याला आपल्या नाकसबीपणाबद्दल वाईट वाटेल व आपण त्या लोकांप्रमाणें हुशार असतों तर बरें झालें असतें असेंही त्याच्या मनांत येईल. परंतु कसबी मनुष्याचा हेवा न करितां आपल्या शक्तीप्रमाणें आपल्या थोड्या कसबानें जें होण्यासारखें असेल तेंच करण्याचा तो यत्न करील. दुसऱ्यांच्या श्रमांचा फायदा तो मागणार तर नाहींच, परंतु दिला असतांही स्वीकारणार नाहीं. आपल्या वांट्याला जी शक्ति आली आहे तिच्या साह्यानें आपणास जें मिळेल तेवढेंच पुरे असें म्हणून तो समाधान मानून स्वस्थ बसेल. अशाच मनुष्याला प्रामाणिक व न्यायी म्हटलें पाहिजे, आणि जे 'प्रत्येक मनुष्याला निर्वेधपणें आपला उद्योग करण्याला कोणीं अडथळा करूं नये' ह्या न्यायाच्या तत्त्वाला हरताळ लावूं पाहतात, ते अन्यायी व अप्रामाणिक होत.

प्रामाणिक मनुष्याची न्यायासाठीं वर दर्शविलेल्या मार्गाकडे प्रवृत्ति होईलच, पण तसें होण्यास आणखीही एक कारण आहे. व्यक्तिमात्राचा विचार एकीकडे ठेविला असतां व एकंदर मनुष्यजातीच्या उन्नतीचा विचार केला असतां, बुद्धिमान् मनुष्याची बुद्धि व शक्तिमान् मनुष्याची शक्ति हे गुण सतत उद्योगानें वाढतील व त्यांच्या संततीच्या अंगींही ते वृद्धिंगत होत जातील; परंतु त्यांच्यानें होण्यासारखा असेल तितका उद्योग त्यांस करूं दिला नाहीं, तर त्यांच्या अंगच्या गुणांची पूर्ण वाढ होणार नाहीं व त्यांच्या संततीच्याही अंगीं ते गुण कमी प्रमाणानें जातील आणि अशा रीतीनें मनुष्यजातीचें नुकसान होईल. दुसरेंही त्याच्या मनांत येईल कीं, शहाणा आणि मूर्ख, सशक्त आणि अशक्त, उद्योगी आणि आळशी हे भेद जर नाहींसे झाले तर चढाओढ मुळींच नाहींशी होऊन, सर्वच बेफिकीर होतील व मनुष्यजातीला दिवसेंदिवस उतरती कळा लागून तिचा नाश होईल. अशा प्रकारच्या उन्नत विचारांनींही त्यास वरील मार्गाचा अवलंब करावासा वाटेल.

जेमतेम आपलें व आपल्या कुटुंबाचें संरक्षण करण्यापुरतें मिळविणारे मजूर व कारागीर ह्यांचा विचार सोडून, त्यांना कामावर लावणाऱ्या कारखानदार वगैरे लोकांविषयीं विचार करूं लागलें, म्हणजे मात्र त्यांच्या चढाओढीला परोपकाराच्या दृष्टीनें कांहीं मर्यादा घालण्याची आवश्यकता दिसून येते. शारीरिक श्रमांवर निर्वाह करणाऱ्या एकाच प्रकारच्या धंद्यांत शिरलेल्या लोकांमध्यें त्यांच्या कमीअधिक वाकबगारीमुळें होणारा फरक म्हणण्यासारखा नसतो, व त्याचा त्यांनीं कितीही फायदा घेतला तरी विशेष घातक परिणाम होण्याचा संभव नसतो. परंतु कारखान्यांचे मालक व व्यापारी कंपन्यांचे व्यवस्थापक ह्यांना मात्र कधीं कधीं एकमेकांचें सफाई नुकसान करितां येतें. विशेषतः मोठमोठ्या कारखानदारांना लहान सहान कारखानदारांचा व कंपन्यांचा चुराडा करण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. इतकें होऊन त्यांचें वर्तन अशा प्रकारचें असूं शकेल कीं, न्यायाच्या दृष्टीनें त्यांस बिलकुल दोष देतां येणार नाहीं. कारण प्रत्यक्ष रीतीनें कोणीं कोणाच्या व्यवसायास हरकत केली नाहीं म्हणजे झालें. कांहीं उदाहरणें दिलीं असतां ही गोष्ट विशेष स्पष्ट होईल.

थोड्या वर्षांपूर्वीं न्यूयार्क शहरांत स्टुअर्ट नांवाचा एक मनुष्य होता, त्यानें मोठ्या प्रमाणावर घाऊक व किरकोळ व्यापार चालवून अपरिमित द्रव्य मिळविलें. त्याचा नेहमींचा व्यापारी कावा असा असे कीं, एकाद्या मालाची किंमत एकदम पुष्कळ उतरून टाकावी. असें करण्यांत त्याचा असा हेतु असे कीं, स्वतःचें बरेंच नुकसान झालें तरी त्या मालाचा व्यापार करणारे बहुतेक लहानसहान व्यापारी रसातळास जाऊन मिळावे व बऱ्याच मोठमोठ्या व्यापाऱ्यांना सुद्धां जबर ठोकर लागावी. अशा रीतीनें आपणाशीं स्पर्धा करणाऱ्या बहुतेक लोकांस चीत केल्यानंतर, त्याच मालाची किंमत तो पाहिजे तितकी वाढवी व आपल्या पूर्वीं झालेल्या नुकसानाच्या अनेकपटीनें फायदा करून घेई. दुसरी त्याची अशी एक लबाडी असे कीं, स्नेहभावानें एकाद्या मनुष्यास कांहीं धंदा काढण्यास उत्तेजन द्यावें व त्याला पैशाचीही पाहिजे तितकी मदत करावी. मग त्याला बरेंच कर्ज झालें आणि तें देण्याचे त्याच्या अंगीं सामर्थ्य नाहीं असें दिसून आलें, म्हणजे योग्य संधि साधून आपले पैसे वसूल करण्यासाठीं त्याला अगदीं निकड लावावी. अखेरीस त्याचा कारखाना विकण्यापर्यंत मजल आणून तो आपणच लिलांवांत थोड्या

किमतीस घेऊन त्यापासून पाहिजे तितका फायदा करून घ्यावा.

अशा तऱ्हेच्या भयंकर रीतीनें व्यापारांतील चढाओढीची परमावधि करून, गरीब बिचाऱ्या लहानसहान व्यापाऱ्यांस जमीनदोस्त करणें म्हणजे व्यापाराच्या दृष्टीनें त्यांचे खूनच करणें होय. प्रत्यक्ष खून पतकरतील, पण हे असले खून पतकरणार नाहींत. एकदां मनुष्याचा धंदा सफाई बुडाला म्हणजे त्यांतून डोकें वर निघणें फार कठिण असतें. अशा सर्वस्वाला मुकलेल्या लोकांची व त्यांच्या कुटुंबांची दुर्दशा पुसूं नये. मनुष्य मेला तरी त्याच्या कुटुंबाची वाताहत होत नाहीं, पण अशा प्रसंगीं सर्वांस देशोधडीस लागावें लागतें.

अशा प्रकारचा अनुदारपणा किंवा परोपकारबुद्धीचा अभाव अत्यंत दूषणार्ह समजला पाहिजे. त्यापासून वर दर्शविल्या प्रकारचे घातक परिणाम होतात हें एक कारण आहेच, पण त्याहूनही अधिक महत्त्वाचें कारण म्हटलें म्हणजे एकंदर समाजाचें त्यापासून जें नुकसान होतें तें होय. नियमित मर्यादेच्या आंत चढाओढ चालूं दिली असतां समाजाला जे फायदे मिळण्याचा संभव असतो, ते अशा अमर्याद चढाओढीनें नाहींसे होतात. व्यापारी लोक तोटा करून माल विकूं लागले म्हणजे तेवढ्यापुरता लोकांचा फायदा होतो, परंतु जेव्हां बहुतेक व्यापाऱ्यांचा धंदा बुडतो तेव्हां थोडेसे व्यापारी राहतात त्यांना त्या मालाच्या व्यापाराचा मक्ताच मिळाल्यासारखें होतें. मग ते म्हणताल ती पूर्व दिशा. त्या मालाची किंमत पाहिजे तशी वाढवून ते समाजाचें नुकसान करितात. अशा रीतीनें लोकांस हितावह अशी चढाओढ नाहींशी करण्याकरितां लबाडीच्या चढाओढीचा उपयोग करितां येतो.

बरें, अशा अधाशी व्यापाऱ्यांचा तरी एकंदरींत फायदा होतो काय? दुसऱ्या एका ठिकाणीं असें दाखविण्यांत येईल कीं, अप्रत्यक्ष रीतीनें त्यांचें आणि त्यांच्यावर अवलंबून राहणाऱ्या मनुष्यांचें नुकसानच होतें. केवळ आपस्वार्थीपणाचेंच त्यांच्या मनाला शिक्षण असल्यामुळें उदार मानसिक गुणांचा त्यांच्या ठायीं अभाव असतो व त्यांचें जीवित, एरव्हीं झालें असतें तितकें, सुखावह होत नाहीं.

" तूं जग आणि दुसऱ्यांना जगूं दे " अशा अर्थाची इंग्रजी भाषेंत एक म्हण आहे, ती अशा ठिकाणीं चांगली लागूं पडते. प्रत्येक मनुष्यानें आपल्या व आपल्या कुटुंबाच्या चरितार्थाची सोय चांगल्या रीतीनें केल्यानंतर, आपल्या धंद्यांतील दुसऱ्या लोकांचाही विचार केला पाहिजे. मनुष्याची

आशा ही अनावर आहे व तिची तृप्ति कधींच होणार नाहीं; परंतु परोपकारबुद्धीनें मनुष्यानें आपल्या आशेला आळा घातला पाहिजे. एकाद्या मनुष्याच्या अंगीं अलोट भांडवलामुळें किंवा धंद्याची व्यवस्था करण्याच्या चातुर्यामुळें, तो धंदा करणाऱ्या इतर लोकांशीं टक्कर देऊन त्यांचा पाडाव करण्याचें सामर्थ्य असलें तरी आपल्या व्यवसायबंधूंवर मेहेरबानी करून त्यानें त्या सामर्थ्याचा उपयोग करूं नये. असें केल्यानें त्यांना आपला व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यास अप्रत्यक्ष रीतीनें मदत केल्यासारखें होईल.

डॉक्टर व वकील लोकांमध्यें देखील जी विलक्षण प्रकारची चढाओढ चाललेली असते तिचाही ह्या ठिकाणीं विचार करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

आपल्या धंद्यांत कुशल असा एकादा नामांकित डॉक्टर कितीही श्रीमंत असला, तरी त्यानें जर नियम केला कीं जो रोगी आपणाकडे परीक्षा करविण्याकरितां येईल त्यास तपासून औषध द्यावें, मग तो रोगी प्रथमच आपणाकडे आलेला असो किंवा प्रथम दुसऱ्या एकाद्या डॉक्टराचें औषध घेऊन मागून तें सोडून आलेला असो; तर त्यास कोणत्याही रीतीनें दोष देतां येणार नाहीं. कारण, जर त्याची कीर्ति यथार्थ असेल तर तो आपल्या औषधानें रोग्याचें दुःख कमी करील, व प्रसंगीं असाध्य ठरलेला रोग बरा करून रोग्याचा जीवही वांचवील; आणि म्हणून इतर डॉक्टरांविषयीं परोपकारबुद्धि उत्पन्न झाली तरी त्या रोग्याची स्थिती मनांत आणली असतां त्यास जा म्हणून सांगणें वाजवी होणार नाहीं. आणखी असेंही म्हणतां येईल कीं, त्यानें आपली फी पाहिजे तर वाढवावी. पण असें करण्यानें देखील जर त्याच्याकडे जाणाऱ्या रोग्यांची संख्या कमी झाली नाहीं, तर दोन प्रकारचे वाईट परिणाम होण्याचा संभव आहे. एक, रोग्यांची संख्या इतकी वाढेल कीं त्याला कोणाकडेच चांगलें लक्ष द्यावयास सांपडणार नाहीं; व दुसरा, अतिश्रमामुळें त्याची स्वतःची प्रकृति इतकी बिघडून जाईल कीं त्याच्या हातून मुळींच काम होत नाहींसें होईल. अशा ठिकाणीं परोपकाराच्या तत्त्वाचा उपयोग करितां येण्यासारखा आहे. जे रोग अगदीं साधारण असून इतर डॉक्टरांच्या हातून सहज बरे होण्यासारखे असतील किंवा ज्या रोगांवर ठराविक औषधें असतील, अशा प्रकारचे रोगी त्यानें दुसऱ्या डॉक्टरांकडे पाठविले असतां त्याचें काम कमी होऊन त्यास विश्रान्ति मिळेल व इतर डाक्टरांसही काम मिळेल. नामांकित डॉक्टरांविषयीं वर जें वर्णन दिलें आहे तें केवळ काल्पनिक नाहीं. मोठ-

मोठ्या शहरांतून असे डॉक्टर लोक आढळतील कीं त्यांस जेवण्यास सुद्धां फुरसत नसते.

आतां डॉक्टरला सोडून वकिलाकडे वळलें असतां, चढाओढीच्या मर्यादेची अवश्यकता त्याहूनही अधिक दिसून येते. वकिलीच्या धंद्यासंबंधानें जे कित्येक प्रघात पडून गेले आहेत ते केवळ परोपकाराच्याच दृष्टीनें अयोग्य आहेत असें नाहीं, तर न्यायाच्या दृष्टीनें अयोग्य आहेत. वकिलाच्या घरीं खटला घेऊन गेलें म्हणजे त्यास पहिल्यांनें फी द्यावी लागते तेव्हां तो खटला पाहतो. मग त्यास वाटलें तर तो खटला घेतो, नाहींतर त्या मनुष्यास परत जाण्यास सांगतो. ह्यामुळें पक्षकाराचें नुकसान होतें. कारण पक्षकारास परत जाण्यास सांगितलें तर त्यानें खर्च केलेल्या पैशाचा मोबदला त्याला कांहींच मिळत नाहीं. पाहिजे तर पहिल्यानें पक्षकाराकडून ठेव म्हणून पैसा घ्यावा, आणि त्याचें काम पतकरावयाचें असल्यास तो ठेवून घ्यावा व नसल्यास परत करावा. धंदेवाल्या मनुष्यास आपल्या धंद्याच्या संबंधानें कधींकधीं व्यर्थ श्रम करावे लागत असतात व ते त्यानें केलेच पाहिजेत. दुकानदाराला येणाऱ्या गिऱ्हाइकास माल दाखवावा लागतो. कोणीं माल घेतला नाहीं, तर दाखविण्याच्या श्रमाबद्दल तो त्याजकडून फी घेत नाहीं. दुसरी एक ब्यारिस्टर लोकांची चाल आहे, ती तर पक्षकारांच्या अतिशयच गैरसोईची आहे. ब्यारिस्टर लोकांना एकादें काम दिलें म्हणजे त्यांना पूर्वींच पैसे देऊन ठेवावयाचे व कदाचित् तें काम करण्याला अनुभवी ब्यारिस्टरास सवड झाली नाहीं, तर एकाद्या नव्या ब्यारिस्टरालाही पक्षकाराकडूनच फी घेऊन गुंतवून ठेवावयाचा. ही विलक्षण कराराची पद्धति दुसऱ्या कोणत्याही धंद्यांत नसेल. एका पक्षाकडून करार पुरा होतो व दुसऱ्या पक्षाकडून अपुरा राहतो. पक्षकारानें ठरलेली रकम दिलीच पाहिजे. काम मात्र पाहिजे तर उत्तम वकिलानें करावें नाहींतर सामान्य वकिलानें करावें ! पक्षकाराला दुसरा इलाजच नसतो. त्यामुळें वकील सांगतील त्याप्रमाणें त्याला करार करून द्यावा लागतो. वास्तविक म्हटलें तर, अनुभवी व हुषार ब्यारिस्टरानें काम चालविलें तर त्यास काय द्यावयाचें व नवीन साधारण ब्यारिस्टरानें चालविलें तर त्यास काय द्यावयाचें ह्याबद्दल निरनिराळे ठराव करून, जो काम करील त्याच्या हुषारीप्रमाणें मोबदला मिळावा.

पुष्कळ वकील आहाराबाहेर काम करितात, त्यासंबंधानें कित्येकांचें

असें म्हणणें असतें कीं, ज्याला आपला धंदा नाटपणें चालवावयाचा असेल त्यानें येतील तितके दावे घेतले पाहिजेत. पक्षकाराच्या खरेखोटेपणाकडे लक्ष देऊन किंवा इतर वकिलानांही कांहीं काम मिळावें ही गोष्ट मनांत आणून, बेतापुरतेच खटले घेऊन बाकी घेऊं नयेत असें केलें असतां वकिलाचा धंदा चालणार नाहीं. हें कारण पुष्कळ लोकांकडून अनेक वेळां पुढें केलें जातें, पण त्यांत फारसा जीव आहे असें दिसत नाहीं. येईल त्या पक्षकाराचें काम न घेतां, ज्याचा पक्ष सत्याला अनुसरून असेल त्याच पक्षकाराचें काम घेतलें असतां त्या वकिलाला बहुतकरून नेहमीं यश येत जाईल, व लोकांची, न्यायाधीशांची, आणि जूरींतील लोकांची त्या वकिलाच्या प्रामाणिकपणाविषयीं खात्री होईल. असें करूं लागलें असतां आरंभीं कदाचित् त्या वकिलाला काम कमी मिळण्याचा संभव आहे, परंतु एकदां त्याच्या प्रामाणिकपणाविषयीं प्रसिद्धि झाली म्हणजे उलट काम वाढून पाहिजे तितकें घेऊन बाकीचें नको म्हणण्यास त्यास सवड राहील.

आपल्या व्यवसायबंधूंना काम मिळावें म्हणून परोपकारबुद्धीनें आत्मसंयमन करून जें काम आपणाकडे येईल त्यापैकीं निवड करून आपणास चांगल्या रीतीनें उरकतां येईल इतकेंच काम घेतलें असतां, आणखीही एक फायदा आहे. ज्या बाजूला सत्य आहे त्या बाजूच्या पक्षाचें काम घेऊन असत्य पक्षाचें काम सोडून दिलें असतां, विनाकारण तंटेबखेडे माजविण्याची जी लोकांची प्रवृत्ति तिच्यावर थोडेंसें दडपण घातल्यासारखें होईल. कारण, आपला पक्ष खोटा म्हणून त्या प्रामाणिक वकिलानें आपलें काम घेतलें नाहीं, असें पक्षकाराच्या मनांत आल्यावांचून रहावयाचें नाहीं. सत्याच्या बाजूला हुशार व प्रामाणिक वकील मिळूं लागले म्हणजे सत्याचाच नेहमीं जय होत जाईल, व खोटेपणा करणाऱ्या लोकांस त्यांच्या खोटेपणाचा योग्य परिणाम भोगावा लागेल.

डॉक्टर, वकील, व्यापारी वगैरे स्वतंत्रपणें धंदा चालविणाऱ्या लोकांच्या हातून त्यांना व समाजाला अपायकारक अशी एक गोष्ट घडण्याचा फार संभव असतो. आपला धंदा वाढत जावा व त्याची तेजी कायम रहावी म्हणून पुष्कळ लोक आहाराबाहेर काम घेतात. काम पुष्कळ झालें म्हणजे तें त्यांच्या हातून व्हावें तसें होत नाहीं, व लोकांनीं दिलेल्या पैशाचा योग्य मोबदला न मिळाल्यामुळें त्यांचें नुकसान होतें. शिवाय त्यांच्या स्वतःच्या शरीरप्रकृ-

तीला अपाय होतो तो निराळाच. असले स्वतंत्र धंदे करणाऱ्या लोकांची पैशाच्या संबंधाची स्थिति मजुरांच्या स्थितीसारखी नसते. मजुरांच्या शरीर-प्रकृतीला अपाय झाला तरी त्यांस पोटासाठीं काम करण्यावांचून गत्यंतर नसतें. तसें ह्या लोकांस करण्याचें कारण नाहीं. काम बेताचें घेतल्यानें तें प्रामाणिकपणानें करितां येईल, हरामाचा पैसा मिळविल्याचा आरोप करावयास कोणास जागा राहणार नाहीं, परोपकाराच्या उन्नत विचारांचा मनावर संस्कार घडविण्यास संधि सांपडेल व अकालीं मृत्युमुखीं पडण्याचा दुःखकारक प्रसंग येणार नाहीं.

आणखी एक चढाओढीचा प्रकार आहे त्याचा निराळाच विचार केला पाहिजे; त्याच्या संबंधानें निश्चयात्मक मत देतां येणें फार कठिण आहे. एखाद्या मनुष्यानें कांहीं नवी युक्ति काढून तिच्या साह्यानें कांहीं माल फार स्वस्त तयार केला, तर त्याच्यामध्यें आणि जुन्या रीतीनें तो माल तयार करणारांमध्यें चढाओढ सुरू होईल. अशा प्रसंगीं नवीन युक्ति शोधून काढणारानें काय करावें ?

तो जर कमी किंमतीस माल विकूं लागेल तर त्याचा उद्देश कसें तरी करून आपल्या प्रतिस्पर्ध्यास त्या धंद्यांतून हुसकून लावावें असा नसून, लोकांचा फायदा करून घ्यावा असा असतो हें उघड आहे. निसर्गदेवतेची सेवा केल्यामुळें तिच्या प्रसादानें त्यास जो लाभ होतो त्याचा बहुतेक अंश त्याजकडून समाजाला मिळतो; कारण त्याच्या युक्तीनें उत्पन्न होणारा माल किती तरी स्वस्त होऊन गरीब लोकांस देखील मिळूं लागतो. तेव्हां, पूर्वापार रीतीनें माल उत्पन्न करून जो फायदा व्हावयाचा त्यापेक्षां थोडासा अधिक फायदा त्यानें आपणास ठेवणें न्यायाचें होईल. आतां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, बेतापुरता नफा ठेवून माल जितका स्वस्त विकावयास सांपडेल तितका विकून त्यानें जुन्या तऱ्हेनें माल तयार करणाऱ्या लोकांचें नुकसान करावें काय ? त्या लोकांस यांत्रिक सामर्थ्याबरोबर कधींही टकर देववणार नाहीं. बरें, परोपकारबुद्धीनें त्यांचें नुकसान न व्हावें म्हणून त्याच्याच दरानें किंवा फारच थोडा फरक ठेवून तो मनुष्य हा माल विकूं लागेल तर, त्याचें स्वतःचेंही मोठें नुकसान होऊन जगाला केवढ्या तरी फायद्याला मुकावें लागेल. कारण, माल पुष्कळ स्वस्त झाला असतां, लाखो गरीबगुरीबांच्या तो आटोक्यांत येईल व त्याचा उपयोग त्यांस करावयास सांपडेल; आणि इतका माल खपूं

लागला म्हणजे नवीन युक्ति काढणाऱ्या मनुष्याला त्यापासून अलोट संपत्ति मिळेल. ह्याकरितां अशा प्रसंगीं पुष्कळ लोकांच्या कल्याणाकडे लक्ष देऊन निरुपायास्तव थोड्या मनुष्यांचें नुकसान झालें तरी तिकडे दुर्लक्ष करणें भाग आहे.

ज्या मनुष्यानें आपल्या शहाणपणानें व चातुर्यानें नवी युक्ति शोधून काढिली असेल त्याला तिच्यापासून योग्य फायदा मिळणें हा न्याय आहे. तो फायदा बुडूं नये, मनुष्यजातीचेंही नुकसान होऊं नये, व नव्या युक्तीमुळें ज्यांचे धंदे बुडतील त्यांस थोडीबहुत मदत व्हावी, ह्याला एक उपाय आहे. युक्ति काढणारानें आपल्या मालकीबद्दल योग्य मोबदला घेऊन त्यांस आपल्या यंत्रांचा उपयोग करूं द्यावा; किंवा आपला माल विकण्यासाठीं जे गुमास्ते नेमावयाचे, तें काम ह्या लोकांस द्यावें. त्या मालाचा खप कसा-कोठें होतो हें त्यांस माहीत असल्यामुळें त्यांचा चांगला उपयोग होईल. असें करितांना इतर लोकांस गुमास्तेपणाचा वगैरे जो फायदा द्यावयाचा त्यापेक्षां ह्या लोकांस थोडासा अधिक द्यावा. अशा रीतीनें त्या लोकांचें होणारें नुकसान पुरें भरून आलें तर फारच उत्तम. नाहींतर तें निदान कमी करण्याचा तरी यत्न करावा.

जीवनकलहामुळें चाललेल्या चढाओढीला मर्यादा कोठें घालावी व प्रत्येकानें आपल्या बुद्धीचा व शक्तीचा किती फायदा घ्यावा हें सांगतां येणें फार कठिण आहे; तें प्रत्येकानें आपल्यापुरता विचार करून ठरविलें पाहिजे. ठळकठळक अशा कांहीं गोष्टींचा मात्र ह्या प्रकरणांत विचार केला आहे. ज्यांच्यासंबंधानें येथें उल्लेख केला नाहीं अशा शेंकडो धंद्यांतील लोकांना ह्या प्रकरणांत सुचविलेल्या तत्त्वांचा उपयोग करितां येणार आहे. लोकसंख्या जितक्या प्रमाणानें वाढत जात आहे तितक्या प्रमाणानें निर्वाहाचीं साधनें वाढत जात नाहींत, व ह्यामुळें जीवनकलहाला दिवसेंदिवस अधिकाधिक भयंकर स्वरूप येत चाललें आहे. अधिकाधिक वरच्या पायरीवर जावें व आपली आणि आपल्या कुटुंबाची स्थिति होईल तितकी चांगली करावी, ह्याकरितां प्रत्येक मनुष्य झटत आहे. ह्या झटपटींत कित्येकांना नैसर्गिकबुद्धीमुळें, कित्येकांना कोणाचा आधार असल्यामुळें व कित्येकांना अन्य कांहीं कारणांनीं, विशेष प्रकारचा फायदा मिळण्याचा संभव असतो. ह्या फायद्याचा उपयोग किती करावा ह्याबद्दल जरी सामान्य नियम घालून देतां आला नाहीं, तरी

एवढें खचीत सांगतां येईल कीं, न्यायाच्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्यानें आपल्या धंद्यांतील लोकांकरितां आपल्या इच्छेला जी मर्यादा घालून द्यावयाची तीपेक्षां अधिक मर्यादा परोपकाराच्या दृष्टीनें, आपल्या स्थितीचा विचार करून व इतर अनेक गोष्टींचें तारतम्य पाहून, घातली पाहिजे. तारतम्य पहावयाचें त्याचें धोरण एवढेंच ठेवावयाचें कीं, आपल्या व्यवसायबंधूंचें हित होऊन एकंदर समाजाचें कल्याण व्हावें, व आपला आणि आपल्या कुटुंबाचा चरितार्थ आपल्या स्थितीप्रमाणें यथास्थित चालावा.

निवृत्त्यात्मक परोपकाराच्या ह्या प्रकारापासून लोकांत औदार्याबद्दल कीर्ति होण्याचा संभव नाहीं. कीर्तीसाठीं जे परोपकारास प्रवृत्त होतात त्यांना ह्या प्रकारचा परोपकार करावासा वाटणार नाहीं; परंतु एका हातानें झालेला उपकार दुसऱ्या हाताला समजूं न देणारे असे जे उदारात्मे असतील त्यांच्याच हातून असला परोपकार घडेल.

---

## प्रकरण २

### कराराची मर्यादा

सरकार पक्षकारांकडून करार अक्षरशः पाळवितें ह्याबद्दल त्याला कोणत्याही रीतीनें दोष देतां येणार नाहीं. उलट, सरकार कधींकधीं लोकांकडून करार पाळवीत नाहीं, किंवा ते मोडण्यास त्यांस उत्तेजन देतें व केव्हां केव्हां तर सरकार आपण होऊन करार मोडतें म्हणून त्यास दोष दिला पाहिजे. जमिनीच्या देवघेवीच्या संबंधाच्या कायद्यांत जेव्हां बदल करण्यांत येतो तेव्हां पुष्कळ लोकांचें नुकसान होतें. कित्येक प्रसंगीं कांहीं मुदतीपर्यंत पूर्वीच्या कायद्याप्रमाणें सवलती दिल्या जातात, तरी त्यांनीं सर्व नुकसान भरून येत नाहीं. पूर्वीच्या कायद्याच्या विश्वासावर फार दूरवर दृष्टि पोंचवून ज्या व्यवस्था केल्या असतात त्या फुकट जातात. अशा प्रसंगीं सरकारनें करार मोडल्यामुळें लोकांचें नुकसान होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. राज्यकारभाराची व्यवस्था वारंवार निरनिराळ्या मनुष्यांच्या हातीं जात असली, म्हणजे एकानें एक प्रकारचा करार करावा व कांहीं वर्षांनीं दुसऱ्यानें त्याचा अर्थ फिरविण्याचा यत्न करून तो मोडावा, अशा रीतीनेंही सरका-

रच्या हातून करार मोडत असतात. मंडळ्यांच्या हातीं राज्यकारभार असला म्हणजेही एकदां बहुमतानें कांहीं करार व्हावा व पुन्हां तो बदलण्याविषयीं बहुमत व्हावें, असे प्रकार घडून येतात. सरकारनें करार मोडिला असतां त्याजवरही फिर्याद करण्याची मोकळीक सुधारलेल्या राज्यव्यवस्थेंत ठेविलेली आहे; तथापि अशा प्रसंगीं सरकारतर्फेच न्याय होण्याचा फार संभव असतो.

एकंदर समाजाच्या हिताकडे लक्ष दिलें असतां, करार अक्षरशः पाळणें व ते पाळण्याची हयगय झाल्यास, ज्या पक्षकाराचें नुकसान झालें असेल तो दाद मागण्याकरितां सरकारकडे आला असतां त्याच्या प्रतिपक्ष्याकडून तो करार सक्तीनें पाळविणें हें आवश्यक आहे. आतां, ज्या प्रकारचे करार कायद्याच्या दृष्टीनें करितांच येत नाहींत, असे करार कोणीं केल्यास ते रद्द करावे लागतील. गुलामांचा व्यापार कित्येक देशांत कायद्यानें बंद करून टाकिला आहे; अशा देशांत जर कोणी आपणास किंवा आपल्या बायकामुलांस विकील तर तो करार रद्द करावा लागेल. कायदेशीर करार पाळण्याच्या संबंधानें कडकपणाचे नियम नसतील व कराराचा योग्यायोग्यपणा पाहून तो कोठपर्यंत पाळावा हें ठरविणें न्यायाधीशावर सोंपविलेलें असेल, तर लोकांचे व्यवहार सुरळीतपणें चालण्यास व्यत्यय येईल. कारण करार पाळण्याची वेळ येईल तेव्हां आपणावर कांहींतरी मेहेरनजर दाखविली जाईल अशा समजुतीनें लोक पाहिजे तसे करार लिहून देऊं लागतील, व त्यांच्यावर विश्वास किती ठेवावा हें करार करून घेणारांस समजणार नाहीं.

आतां सरकारनें जरी कराराच्या कामांत कोणत्याही प्रकारचें तारतम्य दाखविणें इष्ट नाहीं, तरी ज्या पक्षकारांमध्यें करार होतो त्यांनीं त्यांत परस्परांच्या सल्ल्यानें पाहिजे तो फेरबदल करण्यास हरकत नाहीं. कांहीं अकल्पित कारणामुळें अक्षरशः करार पाळिल्यानें एका पक्षाचें फार नुकसान होत असेल तर दुसऱ्या पक्षानें, परोपकाराच्या दृष्टीनें आपलें कर्तव्य असें समजून, त्या दुर्दैवी मनुष्यास देतां येण्यासारखी असेल तेवढी सवलत दिली पाहिजे. अशा प्रकारची सवलत देणें हें मनुष्यपणाचें लक्षण आहे; व दुसरा मनुष्य आपल्या हातांत सांपडला आहे, व कायदेशीर रीतीनें त्याचा आपणास पाहिजे तितका फायदा घेतां येतो, म्हणून तो त्याच्यापासून चोपून घेणें हें निवळ राक्षसीपणाचें लक्षण होय. निर्दयपणानें अक्षरशः करार पाळणें भाग पाडल्यामुळें लोकांना आपल्या वास्तविक हक्कांवरही कधीं कधीं करी पाणी

सोडावें लागतें, हें आयर्लंडांतील जमीनदार व त्यांचीं कुळें ह्यांच्या उदाहरणावरून चांगलें व्यक्त होण्यासारखें आहे. ज्यांना फारसा दूरचा पोंच नाहीं असे अशिक्षित, गरीब, मेहनती लोक उखरवाखर माळाची किंवा दलदलीची जमीन फार थोड्या साऱ्यावर थोड्या मुदतीनें मक्त्यानें घेतात व तींत जिवापाड मेहनत करून ती पिकास आणितात. अशा रीतीनें जमीन चांगली पिकास आली म्हणजे जमीनदार मुदत सरतांच ती आपल्या ताब्यांत घेतो व त्या कुळानें जमिनीच्या सुपीकपणाच्या मानानें मक्ता दिला तरच त्यास ती परत देतो. नाहींतर दुसऱ्या कुळास देतो. त्यांचा करार पाहिला असतां कायद्याच्या दृष्टीनें ह्यांत कांहीं अन्याय होत नाहीं; परंतु गरीब कुळ नें ती जमीन पिकास आणण्याकरितां मेहनतमशागत किती केली, व तिचा त्यास फायदा किती मिळाला, हा विचार मनांत आणिला असतां हा ढळढळीत अन्याय आहे असें म्हटल्यावांचून राहवणार नाहीं. जमीनदाराच्या अंगीं थोडाबहुत मनुष्यपणा असेल तर, तो थोडासा सारा वाढवून ती जमीन त्या कुळाकडेच राहूं देईल व त्याला आपल्या श्रमाचा मोबदला मिळूं देईल. परंतु ज्याच्या कठोर हृदयांत परोपकारबुद्धीला तिळमात्र जागा नसेल तो, जितका अधिक सारा त्या जमिनींतून काढतां येईल तितका काढल्यावांचून राहणार नाहीं. दुसऱ्याच्या श्रमाचा त्याला योग्य मोबदला देणें हा कधींकधीं कायद्याच्या दृष्टीनें जरी उपकार होत असला, तरी सारासारविचाराच्या दृष्टीनें तो अन्यायच असून परोपकार नव्हे असें म्हटलें तरी चालेल. अशा रीतीनें स्वार्थ साधणें म्हणजे कुळाच्या अज्ञानाचा किंवा निरुपायाचा फायदा घेणें होय.

आपल्या देशांतही अशा प्रकारचा अन्याय खुद्द सरकाराकडून घडत असतो. आधींच जमिनीचा सारा जबर असून, कित्येक ठिकाणीं जमीन सोडून देणें पुरवलें पण हा साऱ्याचा जुलूम नको असें लोकांस होत असतें. अशा स्थितींत कोणी नवीन जमीन लागवडीस आणिली असतां, त्यास सरकार फार दिवस तिचा उपभोग घेऊं देत नाहीं. जमिनींत केलेला खर्चही पुरा बाहेर पडूं नये तोंच पुन्हां जमीनमोजणीचे वेळीं त्या जमिनीवर जबर सरकारदस्ताचा बोजा येऊन बसतो, व जमीन लागवडीस आणण्याची आपणास कोठची बुद्धि झाली असा पस्तावा करीत त्या जमिनीच्या मालकास बसावें लागतें.

शहरापासून फार दूरच्या खेडेगांवांतून जे जमीनदार असतात, ते एक-

मेकांपासून फार दूरदूर राहणारे असल्यामुळें त्यांच्यांमध्यें आपसांत चढाओढ लागत नाहीं व त्यामुळें गरीब कुळांचें फार नुकसान होतें. कोणत्याही प्रकारचे करार करून घेण्याला व देण्याला जमीनदार आणि कुळें ह्यांना जरी पूर्ण मोकळीक असते, तरा अनेक प्रसंगीं कुळाचे हातपाय बहुतेक बांधल्यासारखेच असतात. गरीबीमुळें व अज्ञानामुळें, देशांतरास जाऊन कांहीं तरी धंदा करून पोट भरण्याची त्यांच्या अंगीं ताकद नसते; तेव्हां जमीनदारास इष्ट असेल तशा प्रकारचा करार लिहून देऊन कसाबसा अर्धपोटीं राहून तरी निर्वाह चालविणें त्यांस भाग पडतें. नाहींतर मुळींच उपाशीं राहून मरण्याची पाळी यावयाची, अशी त्यांची स्थिति असते. अशा प्रसंगीं जमीनदार सारासार विचार करणारा व थोडाबहुत दयाशील असेल तर कळांस त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळण्याचा संभव असतो. नाहींतर त्या बिचाऱ्या कुळांच्या अंगचें कितीही रक्त शोषून घेतलें तरी त्यांना हूं कां चूं करितां यावयचें नाहीं. न्यायदेवतेकडून ज्यावेळीं न्याय मिळेनासा होतो त्यावेळीं परोपकाराच्या स्फूर्तीनेंच तो मिळाला तर मिळण्याचा संभव असतो.

शहरापासून दूर अंतरावरच्या खेडेगांवांतील गरीब लोकांची पैशाच्या संबंधाची स्थिति वरच्यासारखीच असते. जवळपास जो एकादा सावकार असेल त्याच्यापासून तो सांगेल तें व्याज कबूल करून अडचणीचे वेळीं पैसा काढावा व सर्व जन्म त्याचें व्याज खंडीत बसावें. मुद्दल रकमेच्या अनेक पटीनें जरी व्याज घशांत आलें असलें तरी सावकाराची मुद्दल रकम कायमच असते. कायद्याच्या दृष्टीनें जरी हें कराराप्रमाणें वर्तन असलें, तरी सारासारविचाराच्या दृष्टीनें ही शुद्ध लूट होय. गरीब लोकांस शिक्षण देणें व समाजाची नीतिमत्ता वाढविण्यासाठीं यत्न करणें हेच अशा प्रकारचे कायदेशीर जुलूम नाहींसे करण्यास उपाय होत.

कधींकधीं ज्या गोष्टी स्वाभाविकपणें घडून येतील अशा अजमासावर करार केला असतो त्या गोष्टी घडून येत नाहींत, किंवा एकादें अकल्पित कारण उपस्थित होऊन केलेला करार तडीस नेणें अशक्य होतें. असें झालें असतां पुष्कळ वेळां सारासार विचार करून सवलत देणें भाग पडतें, व तशी सवलत पुष्कळ लोक कधींकधीं स्वहिताच्या दृष्टीनें व कधींकधीं परहिताच्या दृष्टीनें देतातही. साधारण मानानें सालाबादप्रमाणें पाऊस पडेल अशा अजमासावर कांहीं खंड देण्याचें कबूल करून एकाद्यानें जमिनीची लागवड केली

आणि त्या वर्षी पाऊस फारच कमी पडला किंवा अतिशय पडून पुरानें शेत वाहून गेलें अथवा टोळधाडीनें किंवा एकाद्या रोगानें मोठें नुकसान झालें, तर मागेंपुढें पाहणारा जमीनदार झालेल्या नुकसानीप्रमाणें कुळास सूट देतो. असें केल्यानें दोघांचाही फायदा होतो. जमीनदार सूट न देईल तर त्यास खंडानें जमीन करणारा मिळण्यास फार पंचाईत पडेल, पण तोच योग्य सूट देईल तर त्याची जमीन कधींही रिकामी राहणार नाहीं.

उद्योगधंद्याच्या संबंधानें कधींकधीं अश अडचणी उद्भवतात कीं, कायद्याच्या दृष्टीनें जरी कोणत्याही प्रकारचें वर्तन न्याय्य समजलें जाण्यास हरकत नसते, तरी दोनही पक्षांच्या हिताकडे नजर देऊन कांहीं तडजोड करणें इष्ट असतें. अशा अडचणीच्या प्रसंगांची बरोबर कल्पना व्हावी म्हणून निरनिराळ्या प्रकारचीं उदाहरणें घेऊं.

एका धनगराजवळ पुष्कळ गुरें आहेत, परंतु दुष्काळांत सांपडल्यामुळें त्याच्याजवळ वैरण मुळींच शिल्लक नाहीं. जिकडे तिकडे वैरणीची टंचाई असल्यामुळें, अशा वेळीं गुरें विकत घेण्यासही कोणी तयार होणार नाहीं. कदाचित् झालाच तर अति थोड्या किंमतीनें मिळत असली तर घेईल. अशा स्थितींत त्याच्या एकाद्या शेजाऱ्याजवळ वैरणीचा बराच सांठा असल्यास त्यानें काय करावें ? अतितृष्णा धरून जर तो वैरणीची किंमत अतोनात मागूं लागला, तर त्या धनगराला आपलीं गुरें अगदीं थोड्या किंमतीला विकून टाकून मोकळें होणें भाग पडेल. किंवा वैरणीकरितां आहाराबाहेर पैसा खर्च करून जन्माचें दरिद्री व्हावें लागेल. असल्या प्रसंगीं निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उपयोग करणें अत्यंत अवश्य आहे. आपल्या अतितृष्णेला आंवरून धरून, नेहमींच्या किंमतीहून बऱ्याच अधिक परंतु तिला कांहीं मर्यादा आहे अशा किंमतीस त्यानें ती वैरण द्यावी.

कल्पना करा कीं, एका कंत्राटदारानें एका अचाट कामाचा मक्ता घेतला, व सर्व खर्चवेंच जाऊन आपणास आपल्या श्रमाबद्दल वाजवी मोबदला मिळावा एवढ्याच धोरणावर एकंदर खर्चाचा अजमास करून तेवढ्या रकमेंत तें काम पुरें करून देण्याचें कबूल केलें. आतां, साधारण मानानें नेहमीं येणाऱ्या बारीकसारीक अडचणींचा विचार झालेला असून जर एकादी अकल्पित अडचण उपस्थित झाली आणि वास्तविक येणारा खर्च अजमासाच्या फारच बाहेर जाऊं लागला, तर कंत्राट देणारानें आणि घेणारानें कांहीं

तरी तोडजोड काढणें जरूर आहे. आगगाडीची लोखंडी सडक तयार करण्याकरितां मैल दोन मैल डोंगर कापावयाचा आहे किंवा त्यांत बोगदे पोखरावयाचे आहेत अशी कल्पना करूं. त्या डोंगराच्या बाहेरच्या भागावरून व जवळपासच्या डोंगरावरून त्यांत कठीण खडक लागेल अशी कोणाचीही कल्पना झाली नाहीं. म्हणून आंत साधी माती व लहान धोंडे असतील अशा धोरणानें अजमास करून कंत्राट घेतलें. परंतु डोंगर पोंखरण्याचें कांहीं काम झाल्यानंतर आंत खडक लागला व सुरुंगांनीं खडक फोडल्याशिवाय काम पुरें करितां येत नाहीं असें दिसून आलें. अशा प्रसंगीं अक्षरशः करार पाळावयाचा म्हणजे कंत्राटदार फारसा श्रीमंत नसल्यास त्याचें दिवाळेंच निघावयाचें. श्रीमंत असल्यास त्यानें आपली सर्व संपत्ति भरीस घालून केलेल्या करारप्रमाणें काम पुरें करून देऊन मोकळें व्हावें. कायद्याच्या दृष्टीचा न्याय व सारासार विचाराच्या दृष्टीचा न्याय हे फार भिन्न आहेत. ह्या दुसऱ्या प्रकारच्या न्यायाच्या दृष्टीनेंच त्या कंत्राटदाराला बरीच सवलत मिळाली पाहिजे. सारासारविचाराच्या न्यायाच्या दृष्टीनें जी सवलत देणें योग्य ठरेल तिच्याहूनही अधिक सवलत देणें परोपकाराच्या दृष्टीनें इष्ट होईल. मात्र एवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, असे प्रसंग फार क्वचित् येत असून कांहीं अकल्पित कारणानें आहाराबाहेर नुकसान होत असेल तरच निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वावर सवलत देणें इष्ट होईल.

व्यापार करितांना एका व्यापाऱ्यावर असा प्रसंग आला आहे कीं, त्याच्या पेढींतून त्याच्या पतीवर अधिक पैसा मिळत नाहीं व एका रकमेची एकदम भरपाई करून देणें तर जरूर आहे. एका सावकाराजवळ त्याला जरूर तितकी रकम आहे, व आपला माल गहाण ठेवून त्या सावकाराकडून रकम घेऊन ती देण्यावांचून त्या व्यापाऱ्याला गत्यंतर नाहीं. व्यापारी अडलेला असल्यामुळें सावकाराला पाहिजे त्या प्रकारचा करार त्याजकडून करून घेतां येण्यासारखा आहे. पाहिजे तर बेताबाताचा फायदा करून घेऊन त्या दुर्दैवी व्यापाऱ्यास संकटांतून सोडवितां येईल, किंवा अतितृष्णेनें त्याच्या अडचणीचा फायदा घेऊन लवकरच त्याचें दिवाळें निघेल अशा स्थितीस त्यास पोंचवितां येईल. अशा प्रसंगीं परोपकाराच्या दृष्टीनें आपल्या मनाला आंवरून धरण्यास बरीच जागा असते.

वर सांगितलेल्या उदाहरणांत व तशाच इतर प्रसंगीं आपखुषीनें करार

झाले असल्यामुळें ते जरी एका पक्षाचा सर्वस्वी नाश करणारे असले तरी त्यांस अन्याय म्हणतां येत नाहीं. अशा गोष्टींत न्यायतत्त्वांचें जितकें महत्त्व आहे तितकेंच परोपकाराच्या तत्त्वांचें आहे; किंबहुना कधींकधीं न्यायतत्त्वांचें उल्लंघन झालेलें पुरवेल परंतु परोपकाराच्या तत्त्वांचें उल्लंघन झालेलें पुरवणार नाहीं.

कायद्याच्या दृष्टीनें ज्यांस कोणतीही हरकत आणतां येत नाहीं अशा प्रकारचे निर्दयपणाचे व्यवहार होतील तितके कमी करणें किंवा निदान त्यांचा निर्दयपणा तरी होईल तितका कमी करणें हें, ज्या व्यक्तीचें प्रत्यक्ष नुकसान होतें त्याच्याच हिताकरितां जरूर आहे असें नाहीं. तर सामान्य लोकहिताच्या दृष्टीनेंही त्याची अवश्यकता आहे. साधारण मानानें जे लोक प्रामाणिक असून आपला धंदा सचोटीनें चालवितात, त्यांचा अशा प्रसंगीं निर्दयपणानें घात झाला असतां त्यांच्या सचोटीचा समाजाला उपयोग होत नाहींसा होतो, ही एक मोठी हानिच समजावयाची.

कारखानदार आणि मजूर, धनी आणि चाकर, नोकरीस ठेवणारे आणि नोकरीस राहणारे, ह्यांजमधील संबंध ठरविणें कधींकधीं विचाराचें काम असतें, व न्यायतत्त्वें आणि निवृत्त्यात्मक परोपकाराचीं तत्त्वें ह्या दोहोंच्याही साह्यानें उभयतांनीं आपला वर्तनक्रम ठरविणें इष्ट असतें. पहिल्यानें नोकरीस ठेवणाऱ्यांना परोपकाराकडे दृष्टि ठेवून वर्तन करण्याचे प्रसंग कोणते येतात ते पाहून, मग नोकरीस राहणाऱ्या लोकांनींही नोकरीस ठेवणाऱ्या लोकांच्या संबंधानें निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उपयोग करणें कोणत्या प्रसंगीं जरूर असतें तें पाहूं.

प्रत्येक धंद्यांत नोकरीस राहणाऱ्या लोकांची संख्या फारच वाढत आहे व त्यांजमध्यें चढाओढही विलक्षण प्रकारची दिसून येते. एक जागा भरावयाची असली तर शेंकडो अर्ज तिच्यासाठीं येऊन पडतात, व कित्येक अर्जदार तर उपाशीं राहण्यापेक्षां काय मिळेल तो पगार बरा अशा इच्छेनें अगदीं थोड्या पगारावरही राहण्यास तयार होतात. अशा वेळीं नोकरीस राहूं इच्छिणाऱ्या लोकांमधील चढाओढीचा नोकरीस ठेवूं इच्छिणारानें किती फायदा घ्यावा हा प्रश्न आहे. हा प्रश्न प्रथमदर्शनीं जितका सोपा दिसतो तितका तो सोपा नाहीं. कारण, त्याचा संबंध केवळ परोपकाराशींच नसून दुसऱ्या कांहीं गोष्टींशीं आहे. जे कारखानदार आपल्या मजुरांस बाजारनिरखाहून थोडी

देखील अधिक मजुरी देत नाहींत, त्यांस पुष्कळ लोक नांवें ठेवितात. पण नांवं ठेवितांना जे मजूर कामावर लागलेले असतात त्यांच्या स्थितीचा मात्र ते विचार करितात, आणि जे कामावर लागलेले नसतात त्यांच्या स्थितीचा विचार करीत नाहींत. जो कारखानदार बाजारनिरखापेक्षां अधिक मजुरी देतो तो कमी मजुरीवर राहूं इच्छिणारांची दाद घेत नाहीं. जे लोक कमी मजुरीवर राहूं इच्छितात ते हौसेनें तसें करण्यास प्रवृत्त होतात असें नाहीं, तर उपाशीं मरण्याची पाळी आल्यामुळें नाइलाजास्तव तसें करणें त्यांना भाग पडतें. जो कारखानदार बाजारनिरखाहून अधिक मजुरी देतो तो सहजींच ह्या लोकांस नोकरी न देतां, ह्यांच्याहून अधिक मजरी मागणारे जे लोक—म्हणजे अधिक मजुरी दिल्याशिवाय जे लोक काम करण्यास कबूल नसतात, अशांस कामावर ठेवितो. ह्याचा परिणाम असा होतो कीं, ज्या लोकांस मजुरीवांचून कांहीं दिवस काढतां येणें शक्य असते त्यांस काम मिळून, काम न मिळालें असतां ज्यांस उपाशीं राहण्याची पाळी येणार असे लोक निकामी राहतात. ह्याकरितां मध्यम प्रतीच्या गरीब मजुरांच्या हिताकडे लक्ष देतांना, ज्यांच्या गरीबीचा अगदीं कडेलोट झाला आहे अशा लोकांच्या स्थितीकडे दुर्लक्ष करितां कामा नये, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आतां, अतिशय कमी मजुरीवर राहण्यास कबूल असलेल्या मजुरांसच काम देउन त्यांस परोपकारबुद्धीनें थोडी अधिक मजुरी दिल्यास त्यांजवर खरा परोपकार होण्याचा संभव आहे. परंतु तशी सावधगिरी ठेविली नाहीं तर एकादा उदारमनाचा कारखानदार, केवळ परोपकारबुद्धीनें बाजारनिरखापेक्षां अधिक मजुरी देऊनही, अत्यंत विपद्ग्रस्त मजुरांची विपत्ति वाढविण्यास कारण व्हावयाचा.

बाजारनिरखापेक्षां अधिक मजुरी दिल्यानें आणखी एक भयंकर परिणाम होण्याचा संभव आहे. चोहोंकडे धंद्यांत चढाओढ फार आहे, व माल उत्पन्न करण्यास लागणारा खर्च आणि माल विकून येणारा पैसा ह्यांमध्यें तफावत फारच थोडी असते, अशा स्थितींत मजुरीचे दर वाढविल्यानें त्या मालाचा व्यापार करणाऱ्या दुसऱ्या लोकांशीं टक्कर मारण्यास पंचाईत पडावयाची. मजुरीच्या कामांत करवेल तितकी काटकसर करीत असूनही जर पुष्कळ लोकांस धंदा न चालल्यामुळें दिवाळें काढण्याचा प्रसंग येतो, तर जरूरीहून अधिक मजुरी देणाऱ्यांस तसा प्रसंग येणें अधिक संभवनीय आहे. ज्याच्याजवळ धंद्याला लागणाऱ्या भांडवलाहून अधिक भांडवल असेल त्याला

काहीं मुदतीपर्यंत तसें करितां येईल; परंतु त्याला देखील तसाच क्रम सतत चालल्यास दिवाळें काढण्याचा प्रसंग आल्यावांचून राहणार नाहीं. कित्येक असें म्हणतील कीं, नियमित मुदतीनें हिशेब करून योग्य नफ्याहून अधिक नफा मिळाल्यास तो त्या कारखान्यांतील मजुरांस वाटून द्यावा. ह्यावर असें उत्तर देतां येतां येईल कीं, जर कोणी नेहमीं असें करूं लागेल तर त्यास फसण्याचा प्रसंग येण्याचा संभव आहे. समुद्राला जशी भरतीओहोटी असते, तशी व्यापारालाही असते. कांहीं वर्षें नफ्याचीं गेलीं तर कांहीं तोटयाचीं जातात. तोटयाच्या वर्षांचा तोटा भरून येऊन भांडवलाचें व्याज बाहेर पडेल इतकी शिलक नफ्याच्या सालीं मागें टाकीत असलें, तर कारखाना सदोदित चालू राहणार. तोटयाच्या सालांकरितां तरतूद करून ठेवून, त्याहून अधिक नफा राहिल्यास मजुरांमध्यें वांटून देण्यास हरकत नाहीं.

कारखानेवाले आणि मजूर ह्यांजमध्यें वैमनस्य उत्पन्न करून तें वाढविणारे लोक एक गोष्ट अगदीं विसरतात किंवा जाणून बुजून तिच्याकडे ते दुर्लक्ष करितात असें दिसतें. ती गोष्ट ही कीं, सर्व प्रकारच्या मजुरांची मजुरी जर कांहीं प्रमाणानें वाढविली तर सर्व प्रकारच्या पदार्थांची किंमतही तितक्याच प्रमाणानें वाढेल, व असें झालें असतां यक्षिणीच्या गोष्टीप्रमाणें कोणासच फायदा होणार नाहीं. निरनिराळ्या धंद्यांतील मजुरांचे जे संप आहेत त्यांतील प्रत्येक संपांतील मजुरांच्या मनांत आपल्या धंद्याविषयीं मात्र विचार येतात, व आपली मजुरी वाढविणें कारखानदारांस भाग पाडिलें असतां फार उत्तम होईल असें त्यांस वाटतें. परंतु आपली मजुरी वाढली असतां आपण जो माल उत्पन्न करितों त्याची किंमतही अर्थात् वाढली पाहिजे ही गोष्ट त्यांच्या मनांत येत नाहीं. त्याचप्रमाणें इतर धंद्यांतील मजुरांनींही आपणासारखेच कट केले व कारखानदारांस मजुरी वाढविणें भाग पाडिलें, तर इतर सर्व पदार्थांची किंमतही वाढेल. मग प्रत्येक मजुराला जे निर्वाहाचे पदार्थ विकत घ्यावे लागतील, त्या सर्वांस अधिक किंमत पडूं लागल्यावर अधिक मजुरी मिळविल्यापासून फायदा तो काय झाला? सामान्य लोक नेहमीं आकुंचितदृष्टीनें विचार करितात. ह्या विषयाचा पूर्ण विचार होण्याला पुढील गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष दिलें पाहिजे:--( १ ) माल उत्पन्न करण्याकरितां जरूर लागणारे मजूर व कारागीर लोकांचे शारीरश्रम ( २ ) यंत्रसामुग्री आणि कच्चा व पक्का माल यांचा पुरेसा सांठा करून ठेवण्यास लागणारें भांडवल ( ३ ) शारीरिक श्रम

करणाऱ्या लोकांवर देखरेख ठेवणें, पैशाच्या देवघेवीचा हिशेब ठेवणें आणि खरेदी व विक्री यांची व्यवस्था लावणें वगैरे कामांस लागणारे मानसिक श्रम आणि ( ४ ) उत्पन्न होणाऱ्या मालाची व्यवस्था. हा उत्पन्न होणारा माल त्या त्या वेळापुरता तरी नियमित असल्यामुळें, नफ्याचा अधिक अंश शारीरिक श्रम करणाऱ्या लोकांत वांटून दिला असतां, भांडवलवाल्या लोकांस किंवा मानसिक श्रम करणाऱ्या लोकांस किंवा दोघांसही तितका कमी दिला पाहिजे. भांडवलावर साधारण मानानें इतर धंद्यांत जें व्याज पडतें तितकें व्याज पडेल अशा बेतानें भांडवलवाल्या लोकांस नफा वांटून दिला पाहिजे. नाहींतर ते लोक आपलें भांडवल ह्या धंद्यांतून काढून दुसऱ्या धंद्यांत घालण्यास प्रवृत्त होतील. सर्वच धंद्यांत व्याज अगदीं कमी पडूं लागलें तर लोक व्यापारांत पैसे घालीतनासेच होतील. व्यापारांत घातलेला पैसा कधींकधीं बुडण्याचा संभव असतो असें भय ज्या ठिकाणीं असेल, त्या ठिकाणीं व्याज बरेंच पडत असलें तरच भांडवल घालण्याची बुद्धि होणार. दुसऱ्या देशांत भांडवलावर अधिक व्याज पडत असेल तर तिकडे धंदे काढण्याचा यत्न करून भांडवलवाले लोक आपलें भांडवल परदेशीं पाठवितील. मानसिक श्रम करणाऱ्या लोकांनाही त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळाला नाहीं तर ते नाखुष होऊन, ज्या ठिकाणीं अधिक मोबदला मिळावयाचा संभव असेल त्या ठिकाणीं जातील आणि जिकडेतिकडेच मानसिक श्रमाला किंमत मिळत नाहींशी झाली तर मानसिक श्रम करणारे लोकच कमी तयार होऊं लागतील. ज्या प्रकारच्या श्रमांचा मोबदला मिळण्याचा संभव नसतो त्या प्रकारचे श्रम लोक विनाकारण कधींही करीत नाहींत. इतक्या अडचणींचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, गरीब मजुरांच्या शोचनीय स्थितीकडे लक्ष देऊन निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उपयोग करण्याला फारच थोडी सवड आहे व त्या सवडींत देखील कधींकधीं पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें उपकार करूं जातां अपकार होण्याचा संभव आहे. सृष्टिशास्त्राच्या नियमांप्रमाणेंच अर्थशास्त्राच्या नियमांचें स्वरूप फार कडक आहे. त्यांच्यापुढें दया माया कांहीं नाहीं.

एकाद्या धंद्यांत जर चांगली किफायत होत असली व तोट्याकरितां जरूर तितका संग्रह करूनही पुष्कळ फायदा पडत असला, तर तो सर्वच भागीदारांनीं न घेतां, त्याचा अंश नोकर लोकांसही देणें हा खरा परोपकार होईल. अशा प्रसंगीं व्यापाराच्या तत्त्वांस अनुसरून इतर लोकांचें लक्ष त्या

धंद्याकडे वळून, स्वाभाविक रीतीनें मजुरीचे दर वाढतपर्यंत स्वस्थ बसून सर्व फायदा पदरांत टाकितां येण्यासारखा असतो. न्यायाच्या दृष्टीनें जरी अशा वर्तनाला दोष देतां येण्यासारखा नाहीं, तरी तें केवळ स्वार्थहेतुक वर्तन असून मनुष्याच्या उन्नत पदवीला कमीपणा आणणारें आहे. मजुरांच्या संपांचा अशा प्रसंगीं थोडाबहुत उपयोग होण्याचा संभव आहे. परंतु असे प्रसंग फारच थोडे असतात हेंही लक्षांत वागविलें पाहिजे.

पुष्कळ लोकांस असें वाटतें कीं, चाकरीस ठेवणाऱ्या लोकांनीं चाकरीस राहणाऱ्या लोकांवर दया करणें जरूर आहे, व त्यांस मात्र तसे प्रसंग नेहमीं येतात; परंतु नोकरांना आपल्या धन्याशीं परोपकारबुद्धीचें वर्तन करण्याची जरूर नसते व त्यांस तसे प्रसंगही येत नाहींत. परंतु पहिल्या गोष्टीप्रमाणेंच दुसऱ्याही गोष्टीची अवश्यकता पुष्कळ प्रसंगीं उत्पन्न होते. नेहमींच्या मजुरीच्या दराप्रमाणें अजमास करून एकाद्या कंत्राटदारानें कांहीं मुदतींत एकादें मोठें काम करून देण्याचें कबूल केलें, आणि मजुरांस ही गोष्ट समजून त्यांनीं अधिक मजुरी दिल्याशिवाय कामावर जावयाचें नाहीं असा कट केला, तर त्या कंत्राटदारास अधिक मजुरीवर मजूर बोलावून मुदतींत काम पुरें करून देणें भाग पडेल. अशा रीतीनें कंत्राटदाराच्या अडचणीचा फायदा मजुरांनीं घेतला असतां कायद्याच्या दृष्टीनें जरी त्यांस दोष देतां येत नाहीं, तरी मनुष्यपणाच्या दृष्टीनें ही एकप्रकारची अन्यायाची छळणूकच होय. अशा प्रसंगीं मजुरांनींही कंत्राटदाराशीं परोपकाराचें वर्तन करणें जरूर आहे. आतां स्वहित आणि परहित ह्यांची भेटाभेट कोठें करावयाची हें प्रत्येक प्रसंगीं त्या त्या वेळच्या विशेष गोष्टींकडे लक्ष देऊन ठरविलें पाहिजे. अमुक मर्यादेपर्यंत कंत्राटदाराला अडविला असतां त्याचा तोटा न होतां त्याला बेतापुरता फायदा राहील अशी खात्री असल्यास, त्याला त्या मर्यादेपर्यंत अडविणें हें कोणत्याही प्रकारें अनिष्ट होणार नाहीं; किंवा एकाद्या कंत्राटदारानें मजुरीच्या संबंधानें व मजुरांच्या कामासंबंधानें अतिशय घासाघीस करून पूर्वी पुष्कळ कमाई केली असली व एकंदरींत तो मनुष्य आप्पलपोट्या असून दुसऱ्याच्या कल्याणाची फारशी पर्वा करणारा नाहीं असें पक्कें माहीत असलें, तर त्यास अशा प्रसंगीं पेंचांत धरून त्याजकडून अधिक मजुरी काढणें वाजवी होईल. परंतु अशा प्रसंगीं देखील न्यायतत्त्वांचें उल्लंघन करणें रास्त होणार नाहीं. काम करावयाची सुरुवात केली असली तर काम सोडून

देण्याबद्दल योग्य मुदतीची सूचना दिल्याशिवाय एकदम काम बंद पाडणें अन्यायाचें होईल. असे विशेष प्रसंग खेरीज करून मजुरांचें वर्तन आपणांला काम देणारांच्या कल्याणाकडे दृष्टि ठेवून असलें पाहिजे. केवळ स्वार्थावर नजर देऊन मजुरांनीं अनेक वेळां अशा प्रकारचें वर्तन केल्यामुळें एकाद्या कंत्राटदारास दिवाळें काढावें लागल्यास, खुद्द त्यांचा व एकंदर समाजाचाही तोटा होतो. त्याच्याकडून त्या मजुरांना नेहमीं काम मिळण्याचा संभव असतो तो नाहींसा होतो व समाजांतील एक उपयुक्त मनुष्य निरुपयोगी होऊन जातो.

कंत्राटदारांच्या किंवा कारखानदारांच्या अडचणींचा फायदा घेऊन त्यांस अडवितांना, मजूर लोक निवृत्त्यात्मक परोपकाराच्याच तत्त्वांचें उलंघन करितात असें नाहीं, तर न्यायाच्या तत्त्वांचेंही बहुतकरून उलंघन करितात. कट करून एकदम काम बंद पाडतांना ते पूर्वी कबूल केलेल्या मजुरीवर काम करीतनासे होतात एवढेंच नव्हे, तर दुसरा कोणी पूर्वीच्या मजुरीवर तें काम करावयास तयार झाला असतां त्यानें काम पतकरूं नये म्हणून पाहिजे त्या प्रकारचे यत्न करितात. कोणत्याही मनुष्याला आपल्या मतांचा प्रसार करण्याकरितां किंवा त्याप्रमाणें आचरण करण्याकरितां दुसऱ्या मनुष्यांचीं मनें वळविण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु ह्या अधिकाराचा उपयोग करितांना योग्य मार्गानें गेलें पाहिजे. त्या मतांच्या सत्यतेचीं कारणें व त्यांच्या आचरणापासून होणारे फायदे ह्यांच्या संबंधाचा पाहिजे तितका ऊहापोह करून लोकांचीं मनें वळवावीं, परंतु जबरी करणें किंवा तशा प्रकारची धमकी देणें हें अगदीं अन्यायाचें होईल. अशिक्षित मजूर एकदां बिथरले म्हणजे धमकीवरच थांबत नाहींत. तर वेळ आला असतां आपल्या हातांचा व शस्त्रांचाही उपयोग करण्यास मागेंपुढें पाहत नाहींत. असें करणें म्हणजे दुसऱ्यांचें स्वातंत्र्य हिरावून घेणें होय. अमुक मजुरी घेऊन काम पतकारावें कीं नाहीं हें ठरविण्याचा प्रत्येक मजुराला पूर्ण हक्क असला पाहिजे. संप करणारे मजूर आपण ह्या हक्काचा उपयोग पूर्णपणें करितात, परंतु दुसऱ्यांस मात्र करूं देत नाहींत. आपल्या फायद्याकरितां गरीब मजुरांना जुलमानें काम पतकरूं न देणें, म्हणजे त्यांना व त्यांच्या मुलांबाळांना उपाशीं किंवा अर्धपोटीं रहावयास लावणें होय.

वर सांगितलेल्या उदाहरणांत व दुसऱ्याही अनेक प्रसंगीं, कंत्राटदा-

रलोकांस किंवा कारखानदारलोकांस व कटांत सामील न होणाऱ्या लोकांस नाना प्रकारचे यत्न करून कसें तरी अडविणें, पुष्कळ लोकांनीं कट करून त्या कटांत सामील न होणाऱ्या मनुष्याला आपणाबरोबर काम करूं न देणें किंवा तो असेल तेथें बाकीच्यांनीं कामास न जाणें, व आयर्लंडांतील लोक ज्याप्रमाणें राजकीय कटांत जे लोक सामील न होतील त्यांवर सामाजिक गोष्टींतही बहिष्कार घालतात त्याप्रमाणें करणें, ह्या गोष्टी न्यायाच्या दृष्टीनेंही अयोग्य होत. सध्यांचे कायदे कसेही असोत, परंतु एवढें स्पष्ट दिसतें कीं, कोणत्याही एका किंवा अनेक व्यक्तींनीं जुटीनें एखाद्या मनुष्याबरोबर काम करूं नये किंवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये असें ठरविलें व त्याप्रमाणें त्यांनीं अचरण केलें तर त्यांत कांहींएक गैर नाहीं. मात्र तसें करितांना त्यांनीं कोणत्याही रीतीनें त्याचे वाटेस जातां कामा नये किंवा त्याच्या उद्योगांत विघ्न आणतां कामा नये. एखाद्या मनुष्याचीं मतें आपणास पसंत नाहींत, ह्याकरितां त्याच्याबरोबर काम करावें कीं नाहीं हें ठरविण्याचें एका किंवा अनेक व्यक्तींस पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे; हें स्वातंत्र्य त्यांस मिळाल्यानें इतरांचें स्वातंत्र्य कमी होत नाहीं. कट करितांना व त्या कटाला येऊन मिळण्याविषयीं लोकांचीं मनें वळवितांना बहुधा अन्याय होत नसतो. अन्याय होतो तो कटांच्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्या लोकांवर जुलूम करणें, किंवा त्यांवर जुलूम होईल अशा प्रकारची त्यांस दहशत घालणें, किंवा कटांतील मनुष्य नियमाप्रमाणें न वागला तर त्यास दंड किंवा शिक्षा करणें इत्यादि साधनांचा उपयोग करण्यांत होत असतो. कटांत जाऊन सामील होणें किंवा न होणें प्रत्येक मनुष्याच्या खुषीवर राहील तर त्याच्यापासून म्हणण्यासारखा वाईट परिणाम होणार नाहीं. परंतु बाहेरून सर्व मनुष्यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे असें दिसत असलें, तरी पुष्कळ प्रसंगीं आंतून अन्यायाच्या उपयांचा उपयोग होत असतो. तो तसा न होईल तर केवळ न्यायतत्त्वांनीं जें काम होईल तें पुरें आहे. मग निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उपयोग करण्याची अवश्यकता राहणार नाहीं.

अशिक्षित लोकांमध्यें कट झाले असतां त्यांचें नेहमीं जें अमर्याद वर्तन दृष्टीस पडतें त्यावरून असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, ते लोक स्वातंत्र्याच्या हक्काचा उपभोग घेण्यास योग्य नाहींत. ज्या समाजांत व्यक्तिस्वातंत्र्य हा एक दोष समजला जातो व समुदायाच्या जुलमी ठरावांना मान

डोलवणें आणि जे विरुद्ध असतील त्यांचा छळ करणें हे गुण समजले जातात, त्या समाजाला स्वातंत्र्य मिळालें असलें तरी तें दिवसेंदिवस लयास जाण्याच्या मार्गास लागावयाचें. ज्या लोकांना स्वातंत्र्याची बरोबर कल्पना करितां येत नाहीं त्यांना तें मिळालें तरी त्याचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असण्याचा संभव नाहीं.

उभयतांच्या खुषीनें होणाऱ्या देवघेवीच्या व्यवहारांत कांहीं विशेष प्रकारच्या अडचणीमुळें एका पक्षाला दुसऱ्या पक्षाचा फायदा घेण्यास सवड मिळाली असतां, निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उपयोग करणें कोणत्या ठिकाणीं जरूर आहे व कोणत्या ठिकाणीं न केला असतां चालेल, वगैरे गोष्टींबद्दल हा वेळपर्यंत विचार झाला. आतां ह्या निवृत्त्यात्मक परोपकाराचें याहूनही उन्नत असें एक स्वरूप आहे त्याचा विचार करूं.

आपल्या फायद्याकरितां दुसऱ्याचें नुकसान झालें तरी त्याची पर्वा न करणारे अशा लोकांचाच भरणा जगांत फार आहे. आपल्या फायद्यानें दुसऱ्याचें नुकसान होत असलें तर आपला फायदा न झाला तरी पतकरला असें म्हणणारे कांहीं थोडे लोक आहेत. व फारच थोडे लोक असे आढळून येतात कीं, ते सर्व प्रकारच्या व्यवहारांत स्वहिताची योग्य काळजी घेऊन दुसऱ्याच्या हिताचीही तितकीच काळजी घेतात; म्हणजे त्यांनें आपणाशीं झालेल्या व्यवहारांत कोणत्याही रीतीनें फसूं नये ह्याविषयीं फार दक्ष असतात. एखाद्या कुळाशीं, गिऱ्हाइकाशीं, किंवा मित्राशीं कांहीं व्यवहार झाला असतां त्याचें जरी समाधान झालें असलें, तरी आपणाकडून त्यास योग्य मोबदला मिळाला नाहीं अशी त्यांची समजूत झाल्यास, त्याचेकडून तो मोबदला घेवविल्याशिवाय ते स्वस्थ बसत नाहींत. पहिल्या वर्गाच्या लोकांच्या हातून कधींकधीं न्यायतत्त्वांचेंही उलंघन होत असतें. निवृत्त्यात्मक परोपकाराचीं या प्रकरणांत सांगितलेलीं तत्त्वें तर त्यांच्या स्वप्नातही येत नाहींत. दुसऱ्या वर्गांतील लोक न्यायतत्त्वांचें उल्लंघन न करितां कित्येक प्रसंगीं ह्या प्रकरणांतील परोपकाराच्या तत्त्वांचाही उपयोग करितात, आणि तिसऱ्या वर्गांतील लोक नेहमीं ह्या तत्त्वांचा उपयोग करून वागतात. ह्या तिसऱ्या वर्गांतील लोकांच्या पायरीस ज्या समाजांतील बहुतेक मनुष्यें पोंचलीं असतील, त्या समाजांत हेंच आचरण स्वाभाविक होऊन जाईल व कोणी कोणापासून वाजवीपेक्षां अधिक फायदा करून घेण्याची इच्छा करणार नाहीं.

अशा प्रकारचें आचरण सध्यांच्या काळीं फार दुर्मिळ आहे. अत्यंत सुधारलेल्या देशांतही शेंकडा नव्याण्णव लोकांचें आचरण पाहिलें असतां अशा प्रकारची उन्नति कधींतरी होईल कीं नाहीं ह्याविषयीं फार शंका येते. परंतु अत्यंत रानटी स्थितींतील मनुष्य व सुधारलेला मनुष्य ह्यांजमधील फरक पाहिला असतां मनुष्यसमाजाला असें उन्नत स्वरूप येणें शक्य आहे असें वाटतें. ज्या समाजांतील लोकांना निढळच्या घामानें मिळालेल्या भाकरीवर निर्वाह करण्याची संवय असून, विनाकारण लोकांच्या कुटाळक्या करीत बसून दुसऱ्याच्या वाइटापासून आपणांला करमणूक करून घेण्याची दुष्ट खोडी नसेल, त्या समाजाला कालांतरानें अशी स्थिति प्राप्त होणें संभवनीय आहे.

---

# प्रकरण ३

## अयोग्य मोबदला न देण्यासाठीं आत्मसंयमनाची अवश्यकता

मागच्या दोन प्रकरणांत मनुष्याच्या ज्या व्यवहारांचा विचार केला, त्यांत जसा पैशाचा व मूल्यवान् पदार्थांचा संबंध होता, तसाच तो ह्या प्रकरणांत ज्या व्यवहारांचा विचार कर्तव्य आहे त्यांतही आहे. मूल्यवान् पदार्थ म्हणजे ह्या ठिकाणीं रत्नें, माणकें वगैरे पदार्थ समजावयाचे नव्हत; तर ज्यांना म्हणून किंमत आहे असे पदार्थ समजले पाहिजेत. निवृत्त्यात्मक परोपकाराच्या ज्या प्रकाराचा विचार ह्या भागांत करावयाचा आहे, तो उपकाराचा प्रकार आहे कीं अपकाराचा प्रकार आहे, ह्याचाच प्रथमदर्शनीं पुष्कळांस संशय पडण्याचा संभव आहे. व्यवहारांत नित्यशः असे अनेक प्रसंग येत असतात कीं, त्यावेळीं तात्कालिक परिणामांकडे लक्ष जाऊन कित्येक गोष्टी करण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. पण विचारानें दूरचे परिणाम दिसून आले म्हणजे त्याच गोष्टी करूं नयेत असें वाटतें. कोणीं कांहीं मागितलें असतां, किंवा त्यानें न मागतां त्याला कांहीं देण्याची आपणास बुद्धि झाली असतां, तें न देण्यासाठीं मन आंवरून धरण्यानें, व त्याचप्रमाणें एकादें काम करावयास कोणीं सांगितलें असतां किंवा न सांगतां तें करण्याची बुद्धि झाली असतां तें न करण्यासाठीं मन आंवरून धरण्यानें, पुष्कळ वेळां परोपकार घडत असतो. अशा प्रकारच्या परोपकाराविषयीं ह्या प्रकरणांत विचार करावयाचा आहे.

निवृत्त्यात्मक परोपकाराचा हा प्रकार एकदम मनांत भरण्यासारखा नाहीं एवढेंच नव्हे, तर उलट त्यासंबंधानें लोकांचा विपरीत समज होण्याचा फार संभव आहे. ह्यामुळें हा परोपकार लोकांच्या हातून फारसा घडत नाहीं. सामान्यतः लोकांची स्वार्थाकडे इतकी प्रवृत्ति असते कीं, कोणाचें कायदेशीर देणें असलें तरी तें देण्याचें देखील अगदीं जीवावर येतें. मग परोपकाराकरितां उचलून देण्याची बुद्धि दूरच राहिली. अशा लोकांचाच भरणा जगांत फार असल्यामुळें, एकाद्या मनुष्यानें केवळ आत्मसंयमन करून, मागावयास आलेल्या गृहस्थास 'नाहीं' म्हणून सांगितलें तरी तें त्यानें स्वार्थामुळेंच केलें असावें असा लोकांचा समज होण्याची भीति असते. तात्कालिक परिणाम व तात्कालिक सुखदुःखें ह्यापलीकडे सामान्य लोकांचे विचार जाऊं शकत नाहींत. कालांतराच्या सुखाकरितां किंवा कालांतराच्या दुःखाचें निवारण करण्याकरितां तात्कालिक सुखाला अंतरण्याला तयार होणें हें त्यांच्या कल्पनेच्या बाहेर असतें. बहुत प्रसंगीं दयाळुपणाचें कृत्य करण्याकरितां आपल्या स्वाभाविक मनोवृत्तींच्या धोरणानें आचरण करावें लागतें. परंतु असेही कांहीं प्रसंग असतात कीं, त्या वेळीं दिसण्यांत दयाळुपणाचीं परंतु वास्तविक तशीं नव्हत, अशीं कृत्यें आपल्या हातून न व्हावीं म्हणून स्वाभाविक मनोवृत्ति आंवरून धराव्या लागतात.

अशा गोष्टींत बहुतकरून समाजाच्या किंवा बहुसमुदायाच्या हिताकडे लक्ष देऊन व्यक्तीच्या किंवा अल्पसमुदायाच्या खऱ्या किंवा काल्पनिक हिताकडे दुर्लक्ष करावें लागतें. स्पष्टीकरणाकरितां कांहीं उदाहरणें घेऊं.

पांचसात उनाड लोकांची एक टोळी कर्कश वाद्यें वाजवीत व त्यांच्या तालावर वेडींवांकडीं गाणीं गात रस्त्यांतून फिरत असतां, त्यांची एकाद्या कनवाळु मनुष्यास दया येते व "गरीब बिचारीं माणसें! ह्यांना कांहीं तरी दिलें पाहिजे" असें म्हणून तो खिशांत हात घालून एकादी चवली पावली काढून त्या टोळीच्या पुढाऱ्याच्या हातावर ठेवितो. ह्या लोकांचा धंदा म्हटला म्हणजे लोकांना त्रास देऊन त्यांच्याकडून पैसा काढावयाचा, व सवड साधली असतां मुरव्या चोऱ्या करण्यासही मागेंपुढें पहावयाचें नाहीं. ह्या गरीब माणसांना पोटासाठीं फार त्रास करावा लागतो, एवढेंच त्यांच्यासंबंधानें डोळ्यांपुढें दिसणारी गोष्ट वरवर पाहणाराच्या लक्षांत येते, व त्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत दया उत्पन्न होते; परंतु त्या मनुष्यांची नेहमींची वर्तणूक कोणत्या प्रकारची



फं. म. स. प. या. पोतदार,

420

असते, वगैरे गोष्टींविषयीं चौकशी करावी असें त्यांचे स्वप्नांतही येत नाहीं. त्या उनाड लोकांस आपण पैसे दिले हें चांगलें केलें नाहीं, असें त्यास कोणीं सांगितलें असतां उलट तो तसें सांगणारावरच निर्दयपणाचा दोष ठेवील.

आतां, अशा प्रकारच्या देणग्यांचा काय परिणाम होतो तें पाहूं. ह्या गोष्टींचा विचार करितांना प्रथमतः हें तत्त्व ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, कांहीं मोबदला घेऊन पैसा देणें हें योग्य आहे. मात्र जो मोबदला मिळावयाचा तो सुखोत्पादक असला पाहिजे. सुखोत्पादक व दुःखोत्पादक गोष्टींची सारखीच किंमत होऊं लागल्यास समाजघटना बिघडून जाईल. आतां सांगितलेली निरुद्योगी लोकांची टोळी कर्कश वाद्यें वाजविते व वेडेंवांकडें गाते. कोणी म्हणेल कीं, ह्या लोकांना त्यांच्या वाजविण्याबद्दल व गाण्याबद्दल मोबदला म्हणून तरी त्यांस पैसे द्यावे. ह्यावर उत्तर एवढेंच कीं, जर कोणास ह्या वाजविण्यापासून किंवा गाण्यापासून आनंद होत असेल तर त्याचा मोबदला देण्यास हरकत नाहीं; परंतु त्यापासून आनंद न होतां जर दुःख किंवा त्रास होत असेल तर त्यांस त्याबद्दल मोबदला कसला द्यावयाचा ? पुष्कळ वेळां असें मात्र होतें कीं, त्या लोकांस कांहींएक देण्याचें मनांत नसतां, व "तुम्हांस कांहीं मिळणार नाहीं" असे जबाब त्यांस वारंवार मिळत असतां, त्यांच्या लोचटपणामुळें त्रासून कांहीं तरी देऊन ही कटकट एकदां घालवावी अशा उद्देशानें पुष्कळ लोक त्यांस कांहींतरी देतात. अशा खुषीच्या व नाखुषीच्या देणग्यांनीं असल्या उनाड लोकांस उत्तेजन मिळतें, व काबाडकष्ट करूनही ज्यांस पोटास मिळत नाहीं ते लोक ह्या निरुद्योगी लोकांची चैन पाहून तोच धंदा करण्यास प्रवृत्त होतात. परंतु इतके दूरवर विचार कोणाचे जात नाहींत व गेले तरी त्यांना अनुरूप असें आचरण फारच थोड्या लोकांच्या हातून घडतें. अशा प्रकारचे लोक त्रास देऊं लागले असतां, त्यांस पोलीसच्या शिपायांकडून घालवून लावणें ह्यांतच त्या उनाड व मूर्ख लोकांचें आणि समाजाचें कल्याण आहे. अशा मनुष्यांस कांहीं दिलें नाहीं तर न देणाराचे अंगीं दयामाया कांहीं नाहीं एवढेंच लोक म्हणतील, परंतु शिपाई आणून त्यांस घालवून लावण्यापर्यंत मजल आली असतां त्यांच्या लोचटपणाबद्दल कोणी कांहीं बोलणार नाहीं, पण असें करणाऱ्या मनुष्याच्या क्रूरतेबद्दल मात्र सर्व लोक टीका करीत राहतील. तात्कालिक परिणामांपलीकडे ज्यांची दृष्टि जाणें अशक्य आहे त्या सामान्य लोकांकडून अशा प्रकारच्या टीका झाल्या तरी

420



आपलें कर्तव्य करणें व अज्ञानी लोकांस योग्य विचाराची व आचाराची दिशा दाखवून देणें ह्यांतच परोपकार आहे.

कित्येकांस असें वाटेल कीं, पदरची दमडी न खर्चितां हा परोपकार करितां येतो तेव्हां तो करणें फार सोपें आहे, परंतु ही चुकी आहे. पदरचे पैसे खर्च करून करितां येणाऱ्या परोपकारापेक्षांही हा परोपकार करणें फार कठिण आहे. हा करण्यानें कधींकधीं अनेक प्रकारचीं दुःखें सहन करावीं लागतात. आपल्याही मनांत कधीं कधीं पूर्ण विचार होण्याचे पूर्वींच दया उत्पन्न होऊन मागणारास कांहीं द्यावें असें येतें, व ह्या आपल्या इच्छेविरुद्ध वागण्यानें एका प्रकारचें दुःख होत असतें. दुसरें, आपण गरिबांस कांहीं देत नाहीं असें पाहून लोक आपणास निर्दय, कठोरमनाचा वगैरे म्हणतील ह्या विचारामुळें होणारें दुःख व तिसरें, त्यांनीं अधिक त्रास दिला असतां त्यांस घालवून लावण्याचे उपाय केल्यामुळें लोक आपणास "क्रूर" "राक्षसी" इत्यादि विशेषणें देतील ह्या विचारामुळें होणारें दुःख, हीं सामान्य नव्हत. लोकांनीं आपणास चांगलें म्हणावें ही इच्छा मनुष्यमात्राच्या हाडीं खिळलेली आहे. एकादें सत्कृत्य असलें तरी लोकांना तें तसें वाटत नसल्यास तें करण्याची इच्छा फारच थोड्या लोकांस होते. आपल्या अंगीं पैसा खर्चण्याचें सामर्थ्य नसलें तरी, कर्ज काढून, किती मनुष्यें आपणांस लोकांनीं चांगलें म्हणावें ह्याकरितां लौकिक कृत्यें करीत असतात हें मनांत आणिलें म्हणजे, लोकांकडून वाईट म्हणवून घेण्याला तयार होऊन परोपकार करणें हें काम किती कठिण आहे हें समजेल.

शहरांत राहणाऱ्या सुखवस्तु गृहस्थांना व श्रीमंत लोकांना वारंवार भाड्याच्या गाड्यांत बसून जाणें जरूर पडतें. त्यावेळीं योग्यायोग्य विचार करून वागणाऱ्या लोकांना अविचाराचें औदार्य आंवरून धरण्याचे व तसें केल्यामुळं होणारा त्रास सोसण्याचे प्रसंग पुष्कळ येतात.

गाडीभाड्याचे दर कायद्यानें ठरवावे किंवा गाडीवाल्यांमधील चढाओढीनें ते आपोआप ठरूं द्यावे ह्या प्रश्नाचा ह्या ठिकाणीं विचार करण्याची गरज नाहीं. जे दर असतील ते लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध मात्र झाले तर चांगलें. गाड्यांची संख्या, त्यांचा उपयोग करून घेणाऱ्या लोकांची संख्या, गाडीवानांचा व गाड्यांच्या मालकांचा होणारा फायदा इत्यादि गोष्टींच्या धोरणानें कोणत्याही ठिकाणची व्यवस्था आपोआप ठरत असते. कायमच्या

डे. ब. म. य. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

ठरलेल्या दरांप्रमाणें व्यवहार चालला नाहीं तर तो आवश्यकतेच्या मानानें, गाडीचा उपयोग करण्यापूर्वी भाडें ठरून होतो. परंतु कधींकधीं असें होतें कीं, एकादा गाडीवाला "शिरस्त्याचें असेल तें द्या" किंवा "तुम्हांला वाटेल तें द्या" असा मोघम करार करितो, व मग गाडी ठिकाणावर आली म्हणजे त्यास शिरस्त्याप्रमाणें भाडें दिलें तरी अधिक मागूं लागतो. कधीं-कधीं गाडीवाले पहिल्यानें कबूल केलेलें भाडें दिलें तरी अधिक मागूं लागतात. गाडीचा उपयोग करणारा मनुष्य अनेक वेळां त्या ठिकाणीं आलेला असला व तेंच भाडें त्यानें अनेक वेळां दिलेलें असलें तरी तो गाडीवाला ऐकत नाहीं. शिरस्त्याप्रमाणें पैसे त्याचे अंगावर फेंकून दिले व गाडींत बसणारा मनुष्य घरांत निघून गेला तरी तो रस्त्यावरच गाडी उभी करून ठेवितो, व मोठमोठ्यांनीं ओरडून प्रसंगीं "मी फिर्याद करून पैसे घेईन" अशी धमकी देखील देतो. काय तमाशा आहे तो पहावा म्हणून रस्त्यावर चोहोंकडून लोक जमतात व त्यांच्याजवळ तो गाडीवाला ओरडून आपली बनावट हकीगत सांगत असतो अशा स्थितींत त्या मनुष्यानें काय करावें? ह्या सगळ्या गोष्टींचा त्याला अतिशय त्रास येणें साहजिक आहे. चारआठ आण्यांकरितां इतकी घासाघीस करणें हा नीचपणा आहे असें शेजारपाजारच्या मनुष्यांस वाटत असेल, असें त्याच्या मनांत आलें म्हणजे, चारआठ आणेच काय पण रुपया दोन रुपये गेले तरी पतकरलें, परंतु हा त्रास नको असें त्यास होऊन जाईल. साधारण मनुष्य तर गाडीवाला ऐकत नाहीं व ओरडाओरड करूं लागतो असें पाहण्याबरोबरच आपणाविरुद्ध होणाऱ्या टीकेच्या भीतीनें व त्या गाडीवाल्याची कटकट मिटविण्याकरितां, लागलेच त्याच्या अंगावर चारआठ आणे फेंकून द्यावयाचा. थोड्याशा अधिक नेटाचा मनुष्य आणखी कांहीं वेळ वाट पाहून अखेरीस त्यास अधिक पैसे देऊन रवाना करील. परंतु दूरच्या परिणामांकडे व सामान्य लोकहिताकडे लक्ष देऊन वागणारा निश्चयी मनुष्य त्या गाडीवाल्याची पिच्छा पुरवील व त्यास दमडीही अधिक न देतां परत लावील आणि तो आपली आरडाओरड बंद न करील तर त्यास कायदेशीर उपयांनीं तसें करण्यास लावील. नवख्या गरीब स्वभावांच्या मनुष्यांकडून गाडीवाले व हेल वाहणारे लोक अशा लबाडीनें नेहमीं पैसा काढीत असतात. गरीब बिचारीं माणसें ह्या लोकांच्या ओरडीला व सभोंवतीं जमणाऱ्या लोकांच्या प्रतिकूल टीकेला भिऊन ते सांगतील तितके पैसे देऊन मो-

कळीं होतात. अशा लोकांची चांगली खोड मोडली नाहीं तर काय परिणाम होतील तें पहा.

गाडीवाल्याच्या गोष्टीचाच आपण विचार करूं. अशा प्रसंगीं तुम्हीं त्रासून जर माघार घेतली व त्या गाडीवाल्यास तो मागेल तितके अधिक पैसे देऊन चालता केला, तर तशाच अडचणींत सांपडलेल्या इतर मनुष्यांनीं तरी विनाकारण अधिक त्रास काय म्हणून करावा? तेही अधिक पैसे देऊन मोकळे होतील. ही पैसे मिळविण्याची बरी युक्ति आहे असें पाहून पुष्कळ गाडीवाले तसें करूं लागतील, व त्यांना फायदाही बराच होऊं लागेल. अर्थशास्त्रांतील नियम आपणांस आवडोत किंवा न आवडोत, ते सृष्टिशास्त्रांतील नियमांप्रमाणेंच फार कडक आहेत. गाडीवाल्यांच्या धंद्यांत चांगले पैसे मिळतात असा लोकांचा समज झाल्याबरोबर बरेच लोक तो धंदा करण्यास प्रवृत्त होतील. बऱ्याच उनाड लोकांस हा धंदा आवडतो व उनाड लोकांचा नेहमीं सुकाळ असतो. दुसऱ्या धंद्यांत ज्यांना चांगली प्राप्ति होत नाहीं असेही कांहीं लोक कंटाळून आपले धंदे सोडून ह्या धंद्यांत शिरतील. आतां, गाड्यांचा उपयोग पूर्वीच्या इतकाच कायम राहील असें धरिलें तरी गाडीवाल्यांच्या वाढलेल्या संख्येवर काय परिणाम होईल तो पहा. वास्तविक पाहिलें असतां भाड्याचे दर वाढल्यामुळें लोक गाड्यांचा कमीच उपयोग करूं लागतील. तथापि पूर्वीच्या इतकेंच काम धरिलें तरी तें पूर्वीपेक्षां अधिक गाड्यांमध्यें विभागिलेलें असल्यामुळें प्रत्येक गाडीला पूर्वीपेक्षां कमी काम मिळेल. परंतु प्रत्येक खेपेचें भाडें पूर्वीपेक्षां थोडेंसें अधिक असल्यामुळें एकंदर प्रत्येक गाडीचें उत्पन्न आरंभीं पूर्वीपेक्षां कांहीं अधिक होईल. परंतु तें हळूहळू कमी होत जाईल आणि अखेरीस इतकें कमी होईल कीं, ह्या धंद्यांत नवीन लोक शिरतनासे होतील, व सरतेशेवटीं जम बसतां बसतां ह्या धंद्यापासून प्रत्येक गाडीवाल्याला पूर्वीं जितकी प्राप्ति होत होती तितकीच होऊं लागेल. पूर्वीपेक्षां गाड्यांची संख्या मात्र आतां वाढली व त्यांची किंमतही वाढली. कारण, नवीन गाड्या घेण्याची गाड्यांच्या मालकांस उत्सुकता आहे, हें पाहिल्याबरोबर गाड्यांचे कारखानदार साहजिकच त्यांची किंमत चढविणार. म्हणजे गाड्यांच्या भाड्यापासून अधिक मिळालेला पैसा कांहीं गाड्यांच्या धन्यांना व कांहीं गाड्यांच्या कारखानदारांना असा वांटला गेला. शिवाय जें काम पूर्वीच्या गाड्यांनीं, घोड्यांनीं व गाडीवाल्यांनीं होत होतें त्याचेपेक्षां

कमी किंवा फार तर तितकेंच काम करण्यास आतां अधिक गाड्या, अधिक घोडे व अधिक माणसें लागतात. म्हणजे अधिक गाड्या घोडे व माणसें ह्यांजकरितां खर्च केलेल्या पैशाचा दुरुपयोग होतो. जरूरीपेक्षां अधिक भांडवल गाड्याघोड्यांत अडवून ठेवणें हें राष्ट्राचें नुकसानच आहे. एवढ्यानेंच संपलें नाहीं. जे लोक श्रीमंत असतील त्यांस भाडें वाढलें असतां फारशी अडचण पडण्याचा संभव नाहीं, परंतु मध्यम प्रतीच्या लोकांवर ह्याचा कितीतरी परिणाम होण्याचा संभव आहे. पूर्वीचे दर कायम असतांना जितके वेळां गाड्यांचा उपयोग त्यांजकडून होईल तितके वेळां दर वाढविल्यानंतर व्हावयाचा नाहीं. म्हणजे कित्येक प्रसंगीं श्रम सहन करवत नसले तरी व घाई असली तरी, पैशाच्या टंचाईमुळें पुष्कळ लोकांस गाड्यांचा उपयोग करितां येणार नाहीं. ह्यावरून असें दिसून येईल कीं, पूर्वीपेक्षां अधिक पैसा खर्च होऊन सुख मात्र पूर्वीपेक्षां कमी झालें.

आतां एकाद्यानें वाजवीपेक्षां जास्त मागणें केलें असतां त्याला "नाहीं" म्हणून साफ सांगतांना, दूरच्या परिणामांचे एवढे सर्व विचार तसें सांगणाराच्या डोक्यांत येतात किंवा आले पाहिजेत असें म्हणणें नाहीं. त्याचप्रमाणें एकाद्या मनुष्यानें असल्या मागण्याप्रमाणें अधिक पैसे दिले तरी लागलाच सर्व परिणाम घडून येतो अशीही गोष्ट नाहीं. वरील विवेचनाचा हेतु एवढेंच दर्शविण्याचा आहे कीं, हा व्यवहार जरी अगदीं क्षुल्लक दिसतो तरी त्याचे सुद्धां परिणाम अतिशय गुंतागुंतीचे व फार दूरवर जाऊन पोहोंचणारे आहेत.

आणखी एक अशाच प्रकारचें उदाहरण घेऊं. मोठमोठाल्या शहरांतून श्रीमंत लोकांसाठीं जीं भव्य भोजनगृहें असतात, त्यांतील चाकरांच्या किफायतीची कल्पना गैरमाहीत मनुष्यास करितां यावयाची नाहीं. मोठमोठे श्रीमंत लोक अशा भोजनगृहांत गेले म्हणजे ह्या चाकरांनीं त्यांचा शब्द झेलण्यास तयार रहावें व ते जाण्यास निघाले म्हणजे त्यांच्याजवळ पोस्त मागावें. श्रीमंत लोकांना तांब्याच्या नाण्याचा उपयोग करण्याची नेहमीं लाजच वाटते; कारण आपण श्रीमंत आहों हें सर्वांस समजावें अशी त्यांची इच्छा असते. रुप्याचीं किरकोळ नाणीं देणें म्हणजे देखील आपल्या योग्यतेस कमीपणा आणणारेंच आहे, असें त्यांस वाटतें. तेव्हां रुप्याचीं मोठीं नाणीं किंवा सोन्याचें एकादें लहानसें नाणें जें हातास लागेल तें देऊन साहेबांची स्वारी चालू

लागावयाची ! अशा किफायतीची भोजनगृहांतील एकाद्या चाकराची जागा रिकामी असल्यास, अनेक लोक तेथील प्राप्तीच्या मानानें कमी पगार घेऊन किंवा मुळींच पगार न घेतां चाकरी करण्याचें कबूल करितात, किंवा पदरचीही कांहीं रकम भोजनगृहाच्या मालकांस देऊन कशी तरी ती जागा मिळविण्याविषयीं यत्न करितात. ह्या गोष्टीचाही परिणाम गाडीवाल्याच्या पूर्वोक्त उदाहरणासारखाच होतो. म्हणजे ती चाकरी मिळविण्याला इतके पैसे भरावे लागतात कीं, अखेरीस त्या धंद्यांत इतर धंद्यांहून अधिक प्राप्ति राहीनाशी होते.

ह्या उदाहरणांवरून असें स्पष्ट लक्षांत येण्यासारखें आहे कीं, जेव्हां एकाद्या धंद्यांतील मनुष्यास झालेल्या चाकरीच्या योग्य मोबदल्याहून अधिक पैसा कोणत्या तरी स्वरूपानें दिला जातो, त्यावेळीं अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणें अधिक लोक तो धंदा करूं इच्छितात व पुन्हां प्राप्तीचें मान पूर्वस्थितीवर येईपर्यंत चढाओढ चालू राहते. असें होत असतां पुष्कळ वेळां पैशाचा व श्रमाचा दुरुपयोग होतो. ही गोष्ट ध्यानांत ठेवून, क्षणिक सुखाकरितां किंवा थोडासा त्रास चुकविण्याकरितां, कामाच्या योग्य मोबदल्याहून अधिक कोणाला न देण्यासाठीं मन आंवरून धरणें हें निवृत्त्यात्मक परोपकाराच्या दृष्टीनें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

नित्यशः रेल्वेच्या स्टेशनांवरून हजारों लोक दिसण्यांत औदार्याचें किंवा परोपकाराचें परंतु वास्तविक लोकांच्या नुकसानाचें काम करीत असतात. हें काम म्हणजे स्टेशनमास्तर, गार्ड, शिपाई व हमाल ह्या लोकांना देणग्या देणें हें होय. कोणत्याही संस्थांची सुरुवात करितांना सर्व व्यवहार प्रामाणिकपणानें चालावे अशी त्यांच्या उत्पादकांची इच्छा असते, व त्या दृष्टीनें निरनिराळीं कामें निरनिराळ्या मनुष्यांवर सोंपवून दिलेलीं असतात. हीं कामें करणें हें त्यांचें कर्तव्य असून त्यांबद्दल त्यांस त्या संस्थांकडून वेतन मिळत असतें, व इतर मनुष्यांनीं त्यांना निराळा मोबदला देण्याची कांहीं जरूर नसते. परंतु मनुष्याच्या आप्पलपोटेपणामुळें लबाडीला अवकाश मिळून लांचलुचपतीचा प्रकार सुरू होतो. इंग्लंडांत पहिल्यानें आगगाडीची सुरुवात झाली त्यावेळीं पुष्कळ वर्षेंपर्यंत आगगाडींतून प्रवास करणाऱ्या लोकांजवळून पैसे घेऊं नयेत म्हणून सक्तीचे नियम असत, व ते मोडणारांस कडक शिक्षा दिल्या जात. परंतु तिकडे देखील हा कडकपणा नाहींसा होऊन, रेल्वेच्या नोकरांमध्यें पैसे

खाण्याची वहिवाट फार चालू आहे. हा प्रघात चोहोंकडे इतका पसरला आहे कीं, तसें करणें हेंच स्वाभाविक, व न करणें हें रीतिविरुद्ध, असें लोकांस वाटूं लागलें आहे. हें करावयाचें नाहीं असा नियम करणारास पुष्कळ वेळां अडचणी सोसाव्या लागतात. कारण, जे लोक पैसे देतील त्यांचें काम प्रथम करावें व न देणारांचें मागून करावें किंवा वेळ नाहीं म्हणून करूंच नये, अशी आगगाडीवरील नोकरांची साधारण रीतच पडून गेली आहे. हा प्रकार आप्पलपोटेपणापासून उत्पन्न झाला असून त्यामुळें अनेक घातक परिणाम होतात हें फारच थोड्यांच्या लक्षांत येत असेल. दुष्ट चालीपासून होणाऱ्या कांहीं परिणामांचा विचार करूं.

रेल्वेकंपनीचे भाड्याचे दर अशा समजुतीनें ठरविले जातात कीं, नियमित भाडें दिलें म्हणजे प्रवास करणाऱ्या मनुष्याला त्याच्या सामानासुद्धां एका स्थळाहून दुसऱ्या स्थळास नेऊन पोंचविण्याची, व वर्गावर्गाप्रमाणें त्यांच्या कांहीं सोई करून देण्याची जबाबदारी कंपनीवर रहावी. वरच्या वर्गांतील उतारूंचें सामान स्टेशनावरून उचलून आगगाडीच्या डब्यांत नेऊन ठेवणें व विवक्षितस्थळीं पोंचल्यानंतर तें डब्यांतून काढून स्टेशनावर आणून देणें, ही सोय कंपनीनें करून ठेविलेली असते. हें काम करण्याकरितां पोर्टर किंवा हमाल लोक चाकरीस ठेविलेले असतात. वरच्या वर्गांतून प्रवास करणाऱ्या सर्व लोकांचीं हीं कामें त्यांनीं केलीं पाहिजेत, व त्यावर सर्वांचा सारखाच हक्क आहे. एकाद्या उतारूकडेच ह्या लोकांनीं अधिक लक्ष दिलें म्हणजे साहजिकच दुसऱ्या उतारूंकडे दुर्लक्ष होणार. आरंभीं चारआठ आण्यांची ज्यांस पर्वा नाहीं, असे लोक ह्या चाकरांनीं आपलें काम विशेष काळजीनें करावें किंवा प्रथम करावें म्हणून त्यांस चोरून पैसे देऊं लागतात. ह्यामुळें त्या लोकांच्या कामाकडे वाजवीपेक्षां जास्त वेळ मोडून ज्या लोकांना त्यांची विशेष जरूर असते त्यांना त्यांचा उपयोग होत नाहींसा होतो. अशा रीतीनें पैसा देणारांचा हेतु जरी आपला स्वतःचा फायदा व्हावा एवढाच असतो तरी त्यामुळें इतरांचा तोटा झाल्यावांचून राहत नाहीं. पैसे घेतल्याशिवाय मनापासून काम करूं नये अशी त्यांस संवयच होते, व ज्यांस शक्य असतें ते लोक पैसे देऊन आपलीं कामें करून घेऊं लागतात. एखादा पहिल्या वर्गाचा श्रीमंतसा उतारू दिसला कीं त्याच्यापासून आपणांस बरीच प्राप्ति होईल असा विचार मनांत आणून पोर्टर लोक त्याचे सभोंवतीं जम-

तात व छत्र्या, पुडकीं, पेट्या, ब्यागा वगैरे त्याचें सामान व्यवस्थेनें डब्यांत नेऊन लावण्यांतच त्यांचा वेळ जातो. इकडे एखादा मध्यम स्थितींतील मनुष्य हातांत जड ब्याग घेऊन उभा असला तरी त्याला कोणीच मदत करीत नाहीं. कारण त्याच्यापासून कांहीं प्राप्ति होण्याचा संभव नसतो. कित्येक बिचाऱ्या बाया तर बरोबर मुलें व सामान असल्यामुळें, आतां गाडी आपणास घेतल्याशिवायच निघून जाते कीं काय अशा भीतीनें अगदीं गांगरून जातात. पण बऱ्या लोकांकडून पैसे मिळविण्याच्या आशेस गुंतलेले हमाल त्यांच्याकडे कोणीच पहात नाहींत. अशा प्रकारें हमालांस पैसे देणें म्हणजे त्यांच्यावर उपकारच करणें आहे असें श्रीमंतांस वाटतें, परंतु इतर लोकांवर ते अपकार होत असतात.

ह्यापेक्षांही अनिष्ट परिणाम वरील प्रकारांपासून कधींकधीं घडून येतात. ज्या उतारूंकडून फारसें कांहीं मिळण्याचा संभव नसतो त्यांनाही सरतेशेवटीं योग्य ठिकाणीं नेऊन बसवावें लागतें, व त्यांचें सामान वर चढविण्याकरितां थोडीबहुत मदत करावी लागते. हें सर्व होईपर्यंत अर्थात् गाडीला खोळंबून पडावें लागतें. श्रीमंत लोकांकडे वाजवीपेक्षां अधिक लक्ष देण्यांत व ते पैसे देतपर्यंत वाट पाहण्यांत जो वेळ जातो त्या वेळांत इतर लोकांचेंही काम होण्यासारखें असतें; परंतु हमालांच्या पैशाच्या लालचीनें अधिक वेळ मोडल्यामुळें गाडीला उशीर होतो. मोठमोठाल्या स्टेशनांवर पुष्कळ वेळां असें झालेलें अनेकांच्या पाहण्यांत असेल. ठिकठिकाणीं थोडाथोडा उशीर झाला तरी दूरदूरच्या प्रवाश्यांस कधींकधीं नेमिलेल्या वेळाहून कित्येक तास उशीर होतो व ह्यामुळें पुष्कळ वेळां त्यांची गैरसोयही होते. ज्या प्रकारची मदत मिळण्याकरितां प्रत्येकानें टिकीट विकत घेतांना पैसे दिले होते त्या प्रकारची मदत कित्येकांना त्यांच्या वांट्याहून अधिक मिळाल्यामुळें सर्वांनाच त्याचा परिणाम भोगावा लागतो. एवढ्यानेंच सर्व संपत नाहीं. आगगाड्यांच्या संबंधानें जे अनेक अपघात होतात त्यांतील बहुतेक अनियमितपणामुळें घडून येतात. ज्याक्षणीं ज्याठिकाणीं प्रत्येक गाडी असली पाहिजे त्याक्षणीं त्याठिकाणीं ती असल्यावर गाड्यांची टक्कर होण्याचा संभवच नाहीं.

दुसरेही आनुषंगिक अनिष्ट परिणाम ह्या प्रकारापासून घडत असतात. हमालांना लांच देण्याच्या प्रघातापासून हळूहळू गार्डलोकांना लांच देण्याची वहिवाट सुरू होते व तिच्यापासूनही बरेच तोटे होतात. गार्डाला रुपया दोन

रुपये दिले म्हणजे तो दहा माणसें बसण्याची खोली (कंपार्टमेंट) दोनतीन मनुष्यांच्या हवालीं करून तिला कुलूप घालून ठेवितो. ह्यामुळें दुसऱ्या ठिकाणीं फार गर्दी होते. ह्या कुलूप घातलेल्या कंपार्टमेंटांत जे दोन-तीन असामी बसलेले असतात ते आपलें सामान चोहोंकडे पसरून ठेवितात व जाणाऱ्या येणाऱ्यांस तेथें आणखी मंडळी बसलेली असून ती बाहेर गेली असावी असें वाटेल अशी तजवीज करितात; व त्यांस प्रत्यक्ष विचारिलें असतांही तसेंच सांगतात. एकादा मनुष्य पक्का असला तर तो इतर डब्यांत गर्दी झालेली असली म्हणजे पुन्हा ह्या रिकाम्या कंपार्टमेंटाशीं येतो, व त्यांत खरोखर आणखी माणसें बसलेलीं आहेत कीं काय ह्याचा पुरा तपास करून गार्डाला ती खोली उघडणें भाग पडतें. परंतु गार्डांना जेव्हां विशेष खरमरीतपणा दाखवावा तेव्हांच ते नरम येतात; साधारण मनुष्याला ते दाद देत नाहींत. ज्या सुखाकरितां सर्व उतारूंनीं सारखे पैसे दिलेले असतात त्या सुखाचा कांहीं अंश कित्येकांपासून घेऊन तो दुसऱ्यास देण्याला तयार होऊन स्वतःचा फायदा करून घेण्यास कंपनीचे पगारी नोकर कसे तयार होतात, हें पूर्वी दिलेल्या पोर्टरांच्या व आतां दिलेल्या गार्डांच्या उदाहरणांवरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. आणखी एका कारणामुळें गार्डांना पुष्कळ वेळां लांच देण्यांत येत असतो. सुधारलेल्या मनुष्यांचें चांगल्या कामांत जितकें बुद्धिकौशल्य दिसून येतें तितकेंच कधींकधीं वाईट कामांतही दिसून येतें. कित्येक रेल्वेकंपन्यांच्या गाड्यांतून सर्व डब्यांत तंबाकू ओढण्याची परवानगी नसते. विडी ओढण्याकरितां निराळे भाग राखून ठेविलेले असतात व त्यांच्यावर "विडी ओढणारांकरितां" अशी पाटी मारलेली असते.* ज्या डब्यांत विडी ओढण्यास परवानगी नसते त्यांत बसून विडी ओढतां यावी म्हणून कित्येक लोक गार्डांस लांच देतात. ह्या लांच घेण्याच्या प्रकारांत कित्येक ठिकाणीं इतकी सुधारणा झालेली आहे कीं, "विडी ओढणारांकरितां" अशीं अक्षरें छापलेल्या चिठ्या गार्ड लोकांचे खिशांत तयार असतात, व जे लोक लांच देतात त्यांच्या डब्याच्या खिडक्यांना त्या अडकावून देतात. ह्या गोष्टीचा परिणाम कित्येक ठिकाणीं असा झाला आहे कीं, गाडीच्या सर्व डब्यांतून नेहमीं तंबाकूच्या धुराची एका प्रकारची घाण सुटलेली असते.

प्रथमतः स्वार्थासाठीं कित्येक उतारूंनीं पोर्टरांना लांच देण्याची जी

* ही माहिती विलायतेंतील आहे.

सुरुवात केली तिच्यापासून होणाऱ्या परिणामांचीं कांहीं उदाहरणें वर दिलीं आहेत. ह्या प्रकारापासून कित्येक प्रसंगीं सामान हरवतें व वित्ताचा आणि जीवाचाही नाश होतो. समाजाचें परिणामीं हित कशांत आहे हें ओळखून तें साधण्याकरितां, तात्कालिक परिणामांकडे लक्ष जाऊन उत्पन्न झालेल्या मनोविकारांमुळें ज्या क्रिया करण्याकडे मनाची प्रवृत्ति झाली असेल त्या न करण्यासाठीं मनाचें संयमन करणें, व प्रसंगीं त्याकरितां लोकांच्या दोषास किंवा द्वेषासही पात्र होणें हीं निवृत्त्यात्मक परोपकाराचीं तत्त्वें होत.

आणखी एक अयोग्य मोबदल्याचा प्रकार पुष्कळ वेळां घडून येतो, तो बंद करण्याविषयीं प्रयत्न करणें फार जरूर आहे. आपल्या गरीब चाकरमाणसांना वर्षांतून एकदोन वेळां कांहीं विशेष देणग्या देण्याची चाल आपल्या लोकांत आहे, व त्या देणग्यांस आपण पोस्त म्हणतों. इमानेंइतबारें चाकरी करणाऱ्या लोकांवर खुष होऊन त्यांस कधींकधीं देणग्या देणें चांगलें आहे, परंतु ह्या चालीचा परिणाम कसाही चाकर असला तरी त्याला पोस्त दिलेंच पाहिजे असा झाला आहे. ह्यासंबंधानें फारसें कुरकुरावयास नको; कारण, पोस्त देणारांचा व घेणारांचा निदान नेहमींचा संबंध तरी असतो. पण चाकरमाणसांचें अनुकरण करून, ज्यांशीं आपला फारसा संबंध नसतो असे लोक देखील पोस्त मागावयास येतात, व "नाहीं" म्हणणें जिवाशीं येतें म्हणून त्यांस कांहीं तरी देऊन लोक त्यांची समजूत करितात. अशा रीतीनें हा प्रकार फारच वाढला आहे. एकादा मनुष्य कोणा बड्या कामगारास भेटावयास गेला कीं त्याचे शिपाई ह्या मनुष्याकडे पोस्त मागावयास येतात. पत्रें वाटणारे पोष्टाचे शिपाई, रेल्वेचीं पार्सलें पोंचविणारे हमाल व तारहपिसांतील तार पोंचविणारे मनुष्य वेळोवेळीं त्रास देऊन पोस्त घेतल्यावांचून राहत नाहींत. ह्या लोकांना आपापलीं कामें करण्याबद्दल चांगला रोजमुरा मिळत असतो व त्यांस विशेष देणग्या देण्यासारखा त्यांचा व लोकांचा संबंध नसतो. पुष्कळ लोक ह्या देणग्या मनापासून देत नाहींत, परंतु त्या दिल्या नाहींत तर आपला क्षुद्रपणा दिसेल व त्यांस वाईट वाटेल म्हणून मोठ्या नाखुषीनें देतात. ह्या पोस्तासंबंधानें बड्या अधिकाऱ्यांचे शिपाई त्या अधिकाऱ्यांच्या हाताखालच्या अगदीं लहान नोकरांना सुद्धां अतिशय त्रास देतात. केव्हांकेव्हां तर पोस्त मागणारा शिपाई पोस्त देणाऱ्या कारकुनापेक्षां श्रीमंत असतो. हे प्रकार बंद करण्यासाठीं, ज्यावेळीं असा कोणी मनुष्य पोस्त

मागावयास येईल त्यावेळीं त्याचा खरमरीत शब्दांनीं निषेध करून त्याबद्दल प्रतिकूल टीका झाली तरी सहन केली पाहिजे.

वरील सर्व उदाहरणांवरून असें अनुमान काढितां येईल कीं, ज्यावेळीं उभय पक्षांमध्यें स्पष्ट करार असतो त्यावेळीं होणारी देवघेव करवेल तितकी त्या करारास अनुसरून करण्याकडे लक्ष देणें, व ज्यावेळीं तसा स्पष्ट करार नसेल त्यावेळीं स्पष्ट करार करावयाचा असता तर तो ज्या प्रकारचा झाला असता त्या प्रकारचा काल्पनिक करार मनांत आणून देवघेवीचा व्यवहार जितका त्याला अनुसरून होईल तितका करणें, ह्या गोष्टींपासून समाजाचें हित आहे.

सृष्टींत चोहोंकडे जी उत्क्रान्ति होत आहे तींत अस्पष्टपणाकडून स्पष्टपणाकडे किंवा अमर्यादितपणाकडून मर्यादितपणाकडे गति चाललेली असते. हा विशेष मनुष्यजातीच्या प्रगमनांतही दिसून येतो. जसजसा मनुष्य सुधारत जातो तसतसा त्याच्या व्यवहारांना अधिकाधिक नियमितपणा येत जातो. मनुष्याच्या प्राथमिक स्थितींत पगार किंवा मजुरी, स्पष्ट करार आणि पदार्थांच्या ठरीव किंमती ह्या गोष्टींच्या कल्पनाही असण्याचा संभव नाहीं. त्यावेळची स्थिति म्हटली म्हणजे प्रबलांनीं दुर्बलांकडून जबरीनें पाहिजे तीं कामें करून घ्यावीं व वाटल्यास त्यांना कांहीं बक्षिसें द्यावीं; दुर्बलांना प्रबलांकडून कामें करून घेणें झाल्यास त्यांनीं त्यांचीं आर्जवें करावीं व कोणत्या तरी रीतीनें त्यांस खुष करून घेऊन आपलीं कामें साधून घ्यावीं. खोताच्या घरीं त्याच्या कुळांनीं वर्षांतून कांहीं दिवस वेठ घालावी, म्हणजे त्याच्याकडे फुकट काम करावें व खोतानें त्यांना कांहीं पोस्त द्यावें, अशी चाल अद्यापि कोंकणांत चालू आहे. ही चाल पूर्वी जबरीनें कामें करून घेण्याची जी सामान्य रीति होती तिचेंच द्योतक आहे. मनुष्याच्या बहुतेक व्यवहारांचा हेतु एका प्रकारचीं सुखें दुसऱ्यांस देणें व दुसऱ्या प्रकारचीं सुखें त्यांजकडून मोबदला घेणें हा असतो. ही सुखांची अदलाबदल मनुष्याच्या रानटी स्थितींत फार अव्यवस्थित असते. तिला व्यवस्थितरूप देऊन कांहीं नियमांच्या आटोक्यांत आणणें हें सुधारणेचें एक अंग आहे. स्पष्ट किंवा मुग्ध करारांचें स्वतः उल्लंघन करणें किंवा दुसऱ्यांस तसें करावयास प्रवृत्त करणें म्हणजे सुधारणेपासून दूर भ्रमण करणें होय. हा समाजाच्या अवनतीचा मार्ग टाळण्याविषयीं यत्न केला पाहिजे.

योग्य मोबदल्याहून अधिक देणग्या दिल्यावांचून मनुष्याचे व्यवहार सरळ रीतीनें चालण्यास हरकत पडणार नाहीं. रेल्वेची सुरवात झाल्यानंतर कांहीं वर्षेपर्यंत सर्व व्यवहार सरळ रीतीनें चालले होते व आपलीं कामें करून घेण्यासाठीं उतारू लोक कंपनीच्या चाकरांना देणग्या देत नसत. भोजनगृहांतील चाकर लोकही आरंभीं आपलीं कामें आपल्या पगारांत संतुष्ट राहून करीत होते. परंतु कांहीं कारणानें एकदां लबाडीचे प्रकार सुरू झाले म्हणजे ते चोहोंकडे पसरतात. असले घातक प्रकार बंद करण्याविषयीं यत्न केला पाहिजे. ज्या लोकांस अयोग्य मोबदला द्यावयाचा त्यांच्या अंगीं प्रामाणिकपणा असल्यास ते लोकही कधीं कधीं अशा देणग्यांचा स्वीकार करीत नाहींत असें आढळून येतें. एकदां एका गरीब बाईनें खुद्द स्पेन्सर* साहेबांचें कांहीं काम केलें. तेव्हां त्या कामाबद्दल तिनें जी मजुरी मागितली ती फार कमी आहे असें त्यांना वाटून ते तिला अधिक पैसे देऊं लागले, परंतु आपली योग्य मजुरी घेऊन बाकीचे पैसे तिनें परत केले. तेव्हां, ह्या प्रकरणांत सांगितलेले अयोग्य मोबदल्याचे कांहीं प्रकार बंद करण्याला उभय पक्षांकडूनही मदत होण्याचा संभव आहे.

धनी आणि चाकर ह्यांजमधील संबंधाला अनुलक्षून निवृत्त्यात्मक परोपकाराच्या दृष्टीनें एक कर्तव्य उत्पन्न होतें, तें हें कीं, उभयतांमध्यें करार ठरतांना चाकराला आपला पगार कमी आहे असें वाटतां कामा नये. अनियमित देणग्या बंद केल्या तर आपलें नुकसान होईल असें चाकरांस वाटेल, पण हें नुकसान कालान्तरानें नियमित पगारांत वाढ होऊन भरून येईल.

---

# प्रकरण ४

## स्वोत्कर्षाची मर्यादा

पैसा किंवा ज्यांची किंमत पैशानें करितां येईल अशा मूर्त किंवा अमूर्त पदार्थांच्या देवघेवीशीं ज्यांचा संबंध आहे अशा निवृत्त्यात्मक परोपकाराच्या प्रकारांचा पहिल्या तीन प्रकरणांत विचार झाला. आतां, मनुष्यांच्या परस्परांमधील दळणवळणापासून त्यांना जे स्वाभाविक रीतीनें फायदे होतात किंवा त्यांच्या मनाला समाधान अथवा सुख होतें, त्याचा विचार पुढील

* ह्या मूळ इंग्रजी ग्रंथाचा कर्ता

तीन प्रकरणांत करावयाचा आहे. पैशाच्या किंवा मूल्यवान् पदार्थांच्या देवघेवीचा ज्यांत संबंध नाहीं असे मनुष्यांचे व्यवहारही परोपकारबुद्धीनें चालले असतां समाजांतील अधिक व्यक्तींस सुख होऊन समाजाचें कल्याण होतें; पण तेच केवळ स्वार्थाच्या दृष्टीनें चालले असतां एकाच्या सुखाकरितां इतरांना दुःख होऊन समाजाचें अकल्याण होतें. प्रत्येक मनुष्याला आपले व्यवहार इतरांच्या फायद्याच्या, समाधानाच्या किंवा सुखाच्या आड न येतील अशा रीतीनें मनाचें संयमन करावयास सांगणें हें निवृत्त्यात्मक परोपकाराचें काम होय.

एकाद्या मनुष्याच्या अंगीं विशेष प्रकारचे शारीरिक व मानसिक गुण असले म्हणजे ते ज्याप्रमाणें त्याला इतरांहून अधिक संपत्ति मिळवून देतात, त्याचप्रमाणें त्या गुणांच्या योगानें त्याची प्रतिष्ठा किंवा वाखाणणीही होत असते. दुसरे कित्येक शारीरिक व मानसिक गुण असे आहेत कीं, त्यांची संपत्ति मिळविण्याचे कामीं मदत न होतां त्यांचे योगानें मनुष्याला लोकप्रियता संपादन करितां येते. चढाओढीच्या संबंधानें विचार करितांना, दुसऱ्यांच्या कल्याणाकडे दुर्लक्ष करून स्वतःच्याच फायद्याकडे आपल्या शक्तीचा अमर्याद उपयोग करणें योग्य नाहीं असें सांगण्यांत आलें आहे. आतां ह्या भागांत मनुष्यानें प्रतिष्ठा मिळविण्याकरितां किंवा लोकप्रियता संपादन करण्याकरितां आपल्या असामान्य गुणांचा उपयोग कोठपर्यंत करावा व इतरांना तशा प्रकारचीं सुखें मिळावीं ह्यासाठीं आत्मसंयमन केव्हां करावें, ह्या गोष्टींचा विचार करावयाचा आहे.

ह्या गोष्टींचा विचार करूं लागलें म्हणजे बरेच कठिण प्रश्न उद्भवतात. मनुष्येतर प्राण्यांच्या बहुतेक व्यवसायांचा रोख जीवनकलहाकडेच असतो. मनुष्याच्या आद्यस्थितींतही जीवनकलहाच्या स्वरूपांत फारसा बदल होत नाहीं. परंतु मनुष्य जसजसा सुधारत जातो तसतसा त्याच्या अनेक शक्तींचा विकास होत जाऊन त्याच्या इच्छा व आशा ह्यांचें स्वरूप फार संकीर्ण होतें. सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें सुद्धां बहुतेक व्यवसाय जीवनकलहानेंच प्रेरित असतात. परंतु ज्या लोकांना निर्वाहाच्या साधनांची फारशी पंचाईत पडत नाहीं, अशा लोकांमध्यें प्रतिष्ठेसाठीं जो कलह चाललेला असतो त्यास ‘ उत्कर्षकलह ’ असें नांव दिलें असतां चालेल. इतर लोकांवर आपण आपल्या गुणांनीं सरशी करावी, वादांत लोकांना पराजित करावें, लोकां-

कडून चांगलें म्हणवून घ्यावें, विद्वत्तेबद्दल किंवा दुसऱ्या कांहीं गुणांबद्दल लोकांनीं आपली वाहवा करावी, अशा नानाप्रकारच्या इच्छा मनुष्यास उत्पन्न होतात व त्यांच्या अनुरोधानें त्याचें वर्तन चाललेलें असतें. ‘ जीवन ’ शब्दांत सर्व शारीरिक व मानसिक सुखें ह्यांचा जर अंतर्भाव केला, तर, ह्या उत्कर्षकलहाचाही जीवनकलहांत समावेश करण्यास हरकत नाहीं. परंतु सोईसाठीं शरीरपोषणाला अवश्य अशा पदार्थांसाठीं जो कलह चाललेला असतो त्यास ‘ जीवनकलह ’ हें नांव देऊन,—लोकप्रियता, प्रतिष्ठा, अभिमान इत्यादि मानसिक सुखांच्या गोष्टींसाठीं चाललेल्या कलहाला ‘उत्कर्षकलह’ असें नांव देऊं. ह्या कलहांत जी चढाओढ चाललेली असते, तिचा संबंध शारीरिक गुणांशीं थोडा असून, मानसिक गुणांशीं फार असतो. मनुष्याच्या मनोवृत्तीच्या संकीर्णपणामुळें उत्कर्षकलहाचें क्षेत्र फार विस्तृत झालें आहे व त्यामुळें मनुष्याच्या जीविताला वैचित्र्य व रमणीयता आली आहे. आतां उत्कर्षकलहांत इतरांच्या सुखाकडे लक्ष देऊन स्वतःच्या शक्तीचें संयमन करणें केव्हां जरूर आहे हें अनेक उदाहरणें घेऊन पाहूं.

अतिशय स्वार्थाचा असा एक आत्मोत्कर्षाचा प्रकार आहे व त्याची पुष्कळांना फार चीड आहे. कित्येक मनुष्यांच्या अंगीं विलक्षण प्रकारचा बोलकेपणा असून संभाषणांत नेहमीं आपलें वर्चस्व मिरविण्याची हातोटी त्यांना साधलेली असते व तिचा ते अमर्याद उपयोग करितात. दुसरा कोणी बोलूं लागला असतां त्याचा पाडाव करून त्यास खजील करावें व कोणालाही आपले विरुद्ध बोलूं देऊं नये असा ह्या लोकांचा यत्न असतो. कांहीं एका प्रकारच्या सामर्थ्यानें ते सर्वांवर अशी छाप बसवून ठेवितात कीं, त्यांच्यापुढें त्यांच्या विरुद्ध बोलण्याची कोणाची छाती होत नाहीं. अशा अनेक संभाषणकुशल गृहस्थांची एका ठिकाणीं गांठ पडली म्हणजे त्यांजमध्यें जी स्पर्धा सुरू होते, तिच्या योगानें बहुधा त्यांजमध्यें वैमनस्य पडल्यावांचून राहत नाहीं. कधींकधीं बऱ्याच मंडळींत असा एकादा मनुष्य असला म्हणजे बहुतकरून त्याचेंच तोंड चाललेलें असतें व दुसऱ्या कोणास बोलण्यास अवकाशच मिळत नाहीं. अशा प्रकारें आपल्या बुद्धीचें व भाषणपटुतेचें प्रदर्शन करून आपल्या प्रकाशांत इतरांचें तेज लपविण्याचा यत्न करणारे गृहस्थ लोकांस आवडत नाहींत. संभाषणपटुता हा गुण आहे खरा, पण त्याचाच अमर्याद उपयोग केला तर दोष होतो. दुसरे कित्येक उदार मनाचे असे

गृहस्थ आढळून येतात कीं, त्यांच्या अंगीं जरी सर्व लोकांवर छाप बसवून आपलें तेज चोहोंकडे पसरण्याची शक्ति असते, तरी त्या शक्तीचा फारसा उपयोग न करितां मंडळींत बसलेल्या अगदीं अप्रसिद्ध किंवा भिडस्त मनुष्यांस देखील बोलावयास अवकाश मिळावा व संभाषणाच्या आनंदाचा उपभोग त्यांना घेतां यावा अशा धोरणानें ते वर्तन करीत असतात. हे जे दोन प्रकारचे लोक सांगितले त्यांत पहिल्या प्रकारच्या लोकांना निवृत्त्यात्मक परोपकाराचा गंधही नसतो, परंतु दुसऱ्या प्रकारच्या लोकांचें आचरण निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांना अनुसरून असतें. कोणत्याही गोष्टीच्या प्राप्तीकरितां विशेष श्रम केले म्हणजे ती अधिकाधिकच दूर जाते असा साधारण नियम आहे, त्याप्रमाणें पहिल्या प्रकारच्या लोकांची स्थिति होते. त्यांना जरी आत्मविजयाबद्दल समाधान वाटतें व बुद्धिकौशल्याबद्दल लोक त्यांची तारीफ करितात, तरी त्यांचा स्वभाव कोणास आवडत नाहीं व ह्यामुळें लोकांत त्यांची किंमत कमी होते.

संभाषणाच्या ओघांत कित्येक लोक गैरमाहितीनें किंवा जाणूनबुजून धडधडीत खोट्या गोष्टी सांगतात किंवा तर्कशास्त्रविरुद्ध अनुमानें काढितात. एखाद्या मनुष्याला जर त्या गोष्टींचा खोटेपणा माहीत असला किंवा विचारांतील चुकी त्याच्या ध्यानांत आली तर त्यानें काय करावें ? जो मनुष्य दुसऱ्यानें सांगितलेल्या गोष्टींचा खोटेपणा लोकांच्या स्पष्टपणें नजरेस आणून देईल किंवा आपलें तर्कशास्त्राचें ज्ञान दाखवून त्याच्या विचारांतील चुकी सर्वांस दाखवील, त्या मनुष्याबद्दल लोकांचें मत चांगलें होईल व दुसऱ्या मनुष्याविषयीं वाईट होईल. आत्मोत्कर्षासाठीं आतुर झालेले मनुष्य अशी संधि कधींच व्यर्थ जाऊं देणार नाहींत; परंतु दुसऱ्याला खालीं ओढून आपण वर जावें ही इच्छा ज्या मनुष्यास नसेल त्याला फार पंचाईत पडेल. अशा वेळीं कोणत्या प्रकारचें वर्तन करणें इष्ट आहे हें ठरविण्याला अनेक गोष्टींचा विचार केला पाहिजे. बोलणाराच्या भाषणांतील खोटेपणा किंवा विचारांतील चुकी ह्यांजकडे मुळींच दुर्लक्ष केलें तर बराच वाईट परिणाम होण्याचा संभव आहे कीं काय ? तो मनुष्य पत्रासखोर व आपणासारखा कोणी शहाणा नाहीं असा अभिमान बाळगणारा आहे कीं काय ? त्याच्या शब्दाला बऱ्याच लोकांकडून विनाकारण महत्त्व दिलें जातें कीं काय ? स्वोत्कर्षार्थ कलहाच्या चढाओढींत तो इतरांवर तुटून पडणारा आहे कीं काय ? इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें मि-

झाल्यावर त्यांच्या धोरणानें अशा प्रसंगीं काय केलें पाहिजे तें सांगतां येईल. सदरील प्रश्नांपैकीं कित्येकांना " होय " असें उत्तर मिळालें तर त्या मनुष्याची चुकी त्याच्या पदरांत घालणें योग्य होईल. परंतु जर चुकी अगदीं क्षुल्लक असेल, किंवा ती करणाऱ्या मनुष्याविषयीं लोकमत असावें तसें असून ती चुकी दाखविल्यानें त्याच्याबद्दल लोकांचा वाईट ग्रह होण्याचा संभव असेल, तर त्याच्या चुकीकडे कानाडोळा करून तिचा उल्लेख न करणें हेंच योग्य होईल. अशा प्रसंगीं स्वोत्कर्षाची स्वाभाविक इच्छा प्रबळ झाली तरी तिचें संयमन करणें ह्यांतच सर्वांचें कल्याण आहे.

संभाषण किंवा खासगी वादविवाद चालविण्याच्या संबंधानें वर ज्या गोष्टींचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे, त्याच गोष्टी मोठमोठाल्या सभांतून होणाऱ्या किंवा वर्तमानपत्रांतून चालणाऱ्या वादविवादांच्यासंबंधानेंही लक्षांत ठेविल्या पाहिजेत. बहुधा अशा प्रकारचे वादविवाद सुरू झाले म्हणजे ते व्यक्तींवर घसरले नाहींत असें फार क्वचित् घडून येतें. व्यक्तींवर आल्यानंतर विचार एका बाजूस राहून विकारांचेंच प्राबल्य होतें व तत्त्वबोध हा जो वादाचा मुख्य उद्देश तो एका बाजूसच राहतो. प्रतिपक्ष्याचा पाडाव केल्यानें होणाऱ्या कीर्तीच्या आशेनें मनुष्य कधींकधीं इतका वेडा होऊन जातो कीं, त्याच्या हातून निर्दयपणाचे व अप्रामाणिकपणाचे प्रकार घडतात व सत्य बाहेर पडण्याला प्रतिबंध होतो. अशा प्रसंगीं चुरचुरणाऱ्या लेखणीला किंवा जिभेला आंवरून धरण्यानें समाजाचा फायदा होईल व खासगी वैमनस्येंही कमी वाढतील. प्रतिपक्ष्यावर स्पष्टपणें कोणत्याही प्रकारचे आरोप न करितां आपल्या बाजूचा पुरावा व प्रमाणें आणि त्यांवरून निघणारीं अनुमानें व्यवस्थित रीतीनें दाखविण्याविषयीं करवेल तितका यत्न करावा; आणि मुख्य मुद्याला बाध न आणणाऱ्या बारीकसारीक चुक्यांकडे औदार्यानें दुर्लक्ष करावें, मग त्या चुक्या वस्तुस्थिति दर्शविण्याच्या संबंधाच्या असोत किंवा तर्कशास्त्राच्या दृष्टीनें झालेल्या असोत. औदार्याचें क्षेत्र आणखी थोडेंसें विस्तृत होण्यासारखें असल्यास प्रतिपक्ष्याचा पुरावा व प्रमाणें ह्यांपैकीं जेवढ्या गोष्टी कबूल करण्यासारख्या असतील तेवढ्या कबूल करून त्यांची अपूर्तता सिद्ध करण्याचा यत्न करावा. जर प्रतिपक्ष्यानें अप्रामाणिकपणा करून सत्य लपविण्याचा यत्न केला असेल तर मात्र तो उघडकीस आणणें जरूर आहे; परंतु तसा कांहीं प्रकार नसेल तर प्रतिपक्ष्याच्या स्वपक्षप्रीतीला मान देणें हें निवृ-

त्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वाला अनुसरून आहे. वादविवादांत जरूर लागणाऱ्या औदार्याच्या अभावामुळें समाजावर फारच घातक परिणाम होतात. चोहोंकडे चाललेल्या राजकीय, सामाजिक व धर्मसंबंधाच्या वादविवादाकडे क्षणभर दृष्टि फेंकिली असतां, उभयपक्षांमध्यें कशीं रणें माजून राहतात व एकमेकांच्या हेतूंबद्दल किती विलक्षणप्रकारचा गैरसमज करून देण्याचा यत्न केलेला असतो हें लक्षांत येईल. आमच्या देशांतील लोकांना राजकीय प्रश्नांवर कडाक्याचे वादविवाद करण्याचा प्रसंगच येत नाहीं, परंतु सामाजिक व धार्मिक विषयांवरील वादविवादांत वरील गोष्टी प्रत्ययास येतात. उभयपक्षांतील पुढाऱ्यांनीं निवृत्त्यात्मक परोपकाराचें तत्त्व, थोडेंसें उपयोगांत आणिलें तरी, बराच अनर्थ टाळितां येण्यासारखा आहे.

स्वोत्कर्षाचे आणखी कांहीं प्रकार आढळून येतात त्यांचें दिलेल्या उदाहरणांशीं कित्येक गोष्टींत साम्य आहे. आपल्या लोकांत गायनवादनकलानिपुण मनुष्यांमध्यें परस्परांच्या उत्कर्षाविषयीं इतकी स्पर्धा आढळून येते कीं, वेळीं अवेळीं ते परस्परांच्या चुक्या काढून एकमेकांस खालीं ओढण्याचा यत्न करीत असतात. गायनवादन ऐकून मनोरंजन करून घ्यावें म्हणून दहावीस मंडळी जमली असतां, जर तेथें प्रतिस्पर्धी गाणारे व वाजविणारे असले, तर ते त्या मजलसींत कधींही रंग येऊं देणार नाहींत. गायनवादनादिकांतील मर्म ज्यांस समजत नाहीं अशा लोकांस सरवर साध्या गाण्यापासून आनंद होतो व अशाच प्रकारच्या मंडळीचा ऐकणाऱ्या लोकांत भरणा असतो, ही गोष्ट त्यांच्या ध्यानींमनींही राहत नाहीं. गाणाऱ्यानें कठिण कठिण चिजा काढून, वाजविणाऱ्याचा पाडाव करण्याचा यत्न करावा, व वाजविणारानेंही गाणाऱ्यास माहीत नसतील असे वाजविण्याचे प्रकार काढून त्यास चुकवावें. उभयतांमध्यें अशा प्रकारची झटापट सुरू झाली म्हणजे ऐकण्यास जमलेल्या मंडळीचा अगदीं विरस होतो. ज्यावेळीं गाणाऱ्या व वाजविणाऱ्या लोकांचाच समाज जमला असेल त्यावेळीं अशा प्रकारच्या झटापटीपासून ऐकणारांस करमणूक होईल; परंतु ज्यांना त्या कलांचा गंधही नसतो त्यांना हा प्रकार अगदीं कंटाळवाणा होऊन जातो. अशा प्रसंगीं परस्परांच्या दोषांकडे दुर्लक्ष करून व एकमेकांस उत्तेजन देऊन, ऐकणारांस आनंद होईल अशीं गोड व सुरस पदें म्हणणें व सोप्या गति वाजविणें ह्यांतच शहाणपण आहे.

कधींकधीं दहा पांच मंडळी एकत्र संभाषण करीत असतां त्यांपैकीं

दोनतीन मनुष्यांसच एकाद्या विषयाचें विशेष ज्ञान असतें व आपल्या ज्ञानाचें इतरांपुढें प्रदर्शन करण्याच्या हेतूनें ते संभाषणाचा ओघ त्या विषयाकडेच वळवितात. बरें, त्यांजमध्यें चाललेल्या वादविवादापासून इतरांना कांहीं उपयुक्त माहिती मिळण्यासारखी असेल तर असें करणें क्षम्य होईल. परंतु बहुधा तसें होत नाहीं. त्यांना आपल्या ज्ञानाची घमेंडी मिरवावयाची असते, व ते आपलें संभाषण दुर्बोध करण्याविषयीं यत्न करितात. अशा रीतीनें आपली विद्वत्ता दर्शविण्याचा यत्न केल्यानें इष्ट हेतु तर तडीस जात नाहींतच, पण उलट अशा मनुष्यांविषयीं इतरांच्या मनांत तिरस्कार उत्पन्न होतो.

ही स्वोत्कर्षाची इच्छा बरोबरीच्या मंडळींतच चढाओढ उत्पन्न करिते असें नाहीं; तर लहानमोठ्या सर्व मनुष्यांवर तिचा परिणाम होतो. नवरा आणि बायको, आईबाप आणि मुलें, शिक्षक आणि विद्यार्थी, धनी आणि चाकर, अधिकारी आणि त्यांच्या हाताखालची मंडळी, ह्या सर्वांमध्यें आपली छाप दुसऱ्यावर बसविण्याचा यत्न चालला असतो. जोंपर्यंत हा यत्न मर्यादित असतो तोंपर्यंत त्याच्यापासून तोटा होण्याचा संभव नाहीं; परंतु तोच अमर्याद झाला म्हणजे त्याजपासून तंटेभांडणें उत्पन्न होतात. प्रत्येक क्षुल्लक दोषाबद्दल व चुकीबद्दल जर प्रत्येक मनुष्य दुसऱ्यास फजीत करूं लागला, तर मनुष्यांना परस्परांच्या सहवासापासून सुखापेक्षां दुःखच अधिक होऊं लागेल; व एकांतवास पुरवला परंतु हा सहवास नको असें त्यांस होऊन जाईल. अनेक कुटुंबांतून जे कलह माजलेले असतात त्यांतील पुष्कळांचें बीज ह्या स्वोत्कर्षाच्या इच्छेंत असतें.

कधींकधीं कांहीं विशेष कारण असल्यास गुणिजनांनीं आपले गुण पूर्णपणें प्रकट न करणें इष्ट असतें. एक दोन उदाहरणें दिलीं असतां असे प्रसंग सहज लक्षांत येतील.

ज्यांत बुद्धीची परीक्षा आहे असा बुद्धिबळांच्या खेळासारखा एकादा खेळ दोन गृहस्थ खेळत बसले आहेत व त्यांपैकीं एकाचा मुलगा जवळच त्या खेळाची मौज पाहणाऱ्या लोकांत बसला आहे, अशी कल्पना करूं. त्या मुलाच्या बापाच्या खेळण्यावरून दुसऱ्या खेळणाऱ्याची अशी खात्री झाली आहे कीं, आपलें सर्व कौशल्य खर्च केलें असतां डाव जिंकण्यास जड जाणार नाहीं, असें असतांही, जर त्या मनुष्याच्या अंगीं निवृत्त्यात्मक परोपकाराची

तत्त्वें बाणलीं असतील, तर तो चातुर्यानें, आपण आपल्या शक्तीचा पूर्ण उपयोग करीत नाहीं हें कोणाच्याही लक्षांत येऊं न देतां, अशा खुबीनें खेळेल कीं, त्या मुलाच्या बापाचा डाव आपणावर व्हावा. त्याच्या असें मनांत येईल कीं, डाव जिंकल्यामुळें आपणास जो आनंद होईल त्याहून अधिक मोबदला आपणास दुसऱ्या रीतीनें मिळेल. आपल्या मुलाच्या देखत आपण हरलों हा विचार मनांत आला असतां त्या बापास जें दुःख होईल त्याबद्दल, व त्याचप्रमाणें आपला बाप खेळण्यांत आपणास वाटला होता तितका कुशल नाहीं हा विचार मुलाच्या मनांत आला म्हणजे त्याला जें असमाधान होईल त्याबद्दल; वाईट वाटून, तें त्यांचें दुःख आपण टाळिलें हा विचार विशेष आनंदकारक व समाधान देणारा आहे. अशा वर्तनांत जरी थोडासा अप्रामाणिकपणाचा भाग आहे, तरी प्रामाणिकपणापासून होणाऱ्या परिणामांचा विचार केला असतां तो दुर्लक्ष करण्यासारखा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

त्याचप्रमाणें वादविवादांत किंवा पकडीच्या बोलण्यांत एकाद्या मनुष्यावर मेहेरबानी करण्याचें साधारण प्रसंगीं कांहीं कारण नसतां, कांहीं विशेष प्रसंगीं त्याचा जरी सहज पाडाव करितां येण्यासारखा असला तरी त्यास फजीत न करण्यांत मनाचा थोरपणा दाखविणें सभ्यपणास अनुसरून असतें. कल्पना करा कीं, पांचपंचवीस मंडळी बसलेली आहे व त्या मंडळींत भावी वधूवरांचें एक जोडपें असून त्या उभयतांचेही मित्र तेथें आहेत. ह्या मंडळींत त्या दोघांपैकीं एकाद्याचें अज्ञान प्रगट करणें, किंवा त्याच्या विचारांतील चुकी दाखविणें, किंवा त्याला लागेल अशा प्रकारचा कांहीं विनोद करणें हें केवळ निर्दयपणाचें होईल. ज्या मनुष्याच्या अंगीं थोडा तरी दयेचा अंश असेल त्याला अशा प्रेक्षकांच्या समक्ष एकाद्या मनुष्याला लाजविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे बुद्धि व चातुर्य ह्यांचा व्यय होय असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. अशा प्रसंगीं सहृदय मनुष्य दुसऱ्याचा पाणउतारा करून त्याच्या नुकसानानें किंवा दुःखानें आपला उत्कर्ष न साधितां, त्याच्या दोषांवर पांघरूण घालून आपल्याच पदरीं अज्ञान किंवा मूर्खपणा बांधून घेण्यास तयार होईल.

आपला उत्कर्ष साधितांना निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांस अनुसरून आपल्या अंगच्या श्रेष्ठ गुणांना समजूनउमजून झांकून ठेवण्याचीं स्थळें कोणतीं, हें वरील उदाहरणांवरून लक्षांत येईल. सहृदयपणाला अनुसरून

अशा प्रकारचें वर्तन मनुष्यांच्या हातून झालें नाहीं तर त्यांजमधील दळणवळण आनंदजनक होणार नाहीं.

निरनिराळ्या मनुष्यांच्या मानसिकशक्तींत फारच विषमपणा दिसून येतो; व प्रत्येक मनुष्य नेहमीं आपणाहून कमी शक्तीच्या मनुष्यावर वरचढपणा करण्याचा यत्न करूं लागेल तर मनुष्याचें जीवित असह्य होईल. ह्या वैषम्याचे अनिष्ट परिणाम करवतील तितके कमी करण्याला ह्या प्रकरणांत ज्या प्रकारचें वर्तन अनुकरणीय ठरविलें आहे त्यासारखें दुसरें साधन नाहीं. निसर्गदेवतेच्या अत्यंत कडक नियमांमुळें प्रबल आणि दुर्बल ह्यांच्यामधील भेद उत्पन्न झाला आहे. मनुष्येतर प्राण्यांमध्यें ह्या भेदाच्या परिणामांचें अत्यंत उग्र स्वरूप कमी करण्याला साधन नाहीं. परंतु मानवी सृष्टींत त्याच कडक नियमांमुळें उत्पन्न झालेल्या श्रेष्ठ मानसिकशक्तीनें तें उग्र स्वरूप थोडेंसें सौम्य करण्याला साधनें उत्पन्न झालीं आहेत. मनुष्याचे विचार जसजसे उन्नत होत जातात तसतसा त्याला प्रबलानें दुर्बलाचा फायदा घ्यावा हा अन्याय वाटूं लागतो. आतां, पूर्वीं दाखविल्याप्रमाणें आचरण आणि त्याचें फळ ह्यांच्यामधील कार्यकारणसंबंध अजीबात नाहींसा करून टाकून प्रबल आणि दुर्बल ह्यांस समानावस्थेंत आणणें जरी हितावह व शक्य नाहीं, तरी मनुष्यजातीच्या सुधारणेला विशेष धक्का न पोंचेल अशा रीतीनें दुर्बलांचें जीवित जितकें कमी कष्टमय होईल तितकें करण्याविषयीं यत्न करण्याची बुद्धि मनुष्याच्या उन्नत स्थितींत उत्पन्न झाली आहे. जीवनकलहांत एकमेकांना सवलती देण्याला जरी बऱ्याच अडचणी येण्याचा संभव आहे, तरी समाजामध्यें मनुष्यांचा जो परस्परांशीं अनेक प्रकारचा संबंध येतो त्या संबंधांत एकमेकांना सवलती देणें फारसें कठीण नाहीं. अशा सवलतींचा बहुधा मनुष्याच्या मनोविकारांशीं संबंध असतो.

कित्येक उदाहरणें अशीं देखील आढळतील कीं, ज्यांमध्यें वादविवादांत किंवा संभाषणांत आपलें वाक्चातुर्य व बुद्धिकौशल्य प्रकट केल्यानें जीवनकलहांत त्यांचा उपयोग करून घेतां येईल, म्हणजे त्यांच्या योगानें पैसा मिळविण्याचे कामीं मदत होईल. असें असल्यास ह्या शक्तींचा योग्यस्थळीं पूर्ण उपयोग करून घेणें न्यायाचें होईल. परंतु ह्या प्रकरणांत जीं उदाहरणें दिलीं आहेत तशा प्रकारचे प्रसंगच फार येत असतात, व त्यावेळीं आपल्या शक्तींचा अवरोध केल्यानें तसें करणारांचें पैशाच्या संबंधानें नुकसान होण्या-

चा संभव नसतो आणि ज्या मनुष्याला सवलत दिली असेल त्याचाही पैशाच्या संबंधानें फायदा होण्याचा संभव नसतो. उत्कर्षकलहाचा जीवनकलहाशीं संबंध असला तरी देखील पहिल्या प्रकरणांत चढाओढीच्या संबंधानें विचार करितांना ज्या प्रकारच्या सवलती देण्याविषयीं सुचविलें आहे त्या प्रकारच्या सवलती परोपकारबुद्धीनें देणें इष्ट आहे. जेथें तसा संबंध नसेल तेथें बऱ्याच सवलती दिल्यानें कोणाचें कांहीं नुकसान न होतां, सृष्टींत स्वाभाविक रीतीनें आढळून येणाऱ्या वैषम्याचें उग्र स्वरूप बरेंच कमी करितां येण्यासारखें आहे.

ज्या स्वोत्कर्षाच्या इच्छेनें संयमन करण्याविषयीं ह्या प्रकरणांत विचार केला, ती स्वोत्कर्षाची इच्छा मनुष्याच्या प्रथमावस्थेंत फारच प्रबल असते. रणांगणांत प्रतिपक्ष्याचा पाडाव करून विजयश्री मिळविल्यानें होणारा आनंद व अभिमान हे रानटी लोकांमध्यें विलक्षण प्रकारचे आढळून येतात. शत्रूस केवळ जिंकिल्यानें त्यांचें समाधान होत नाहीं. त्यास जिता कापणें, किंवा मेला असला तरी त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करून ते प्रसिद्ध ठिकाणीं ठेवून आपल्या पराक्रमाचें प्रदर्शन करणें, ह्या गोष्टींनीं त्यांस अत्यानंद होतो. वाग्युद्धांत किंवा लेखनीयुद्धांत प्रतिपक्ष्याला चीत करून विजयश्रीचा झेंडा मिरविणें ही इच्छा देखील द्वंद्वयुद्धें करणाऱ्या किंवा तरवारींनीं लढणाऱ्या वीरांच्या इच्छेप्रमाणेंच आहे. त्यांना ज्याप्रमाणें प्रतिपक्ष्याचा केवळ पाडाव झाल्यानें समाधान होत नाहीं, परंतु त्याला अगदीं जर्जर करून तो पुन्हां डोकें वर काढणार नाहीं इतकी त्याची विटंबना करावीशी वाटते, त्याचप्रमाणें ह्या मानसिकशक्तींच्या सामर्थ्यानें लढणाऱ्या लोकांस वाटतें. प्रतिपक्ष्याचें व्यंग पाहिल्याबरोबर त्याच्यावर तुटून पडणें व त्याच्याविषयीं मौज पाहणारांची करवेल तितकी वाईट समजूत करण्याविषयीं यत्न करणें हे दुर्गुण उभयतामध्येंही आढळून येतात. हा रानटी स्थितींल अवशेष नाहींसा करण्याविषयीं प्रयत्न करून केवळ सत्यान्वेषणाकरितां वादविवाद केल्यानें व तो करितांना प्रतिपक्ष्याविषयीं शक्य असेल तितकें औदार्य दर्शविण्यासाठीं, निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उपयोग केल्यानें सुधारणेच्या प्रगतीस फार साह्य होणार आहे.

---

# प्रकरण ५

## परदोषाविष्करणाची मर्यादा

ह्या प्रकरणांतील विषयाचा मागील प्रकरणांतील विषयाशीं इतका निकट संबंध आहे कीं, त्या दोहोंमध्यें स्पष्ट भेद करितां येत नाही. संभाषणांत व वादविवादांत मनुष्यें एकमेकांवर ज्या टीका करीत असतात त्यांत एकमेकाचे दोष आपोआपच बाहेर पडत असतात; परंतु त्या प्रसंगीं दुसऱ्याचे दोष बाहेर काढणें हा मुख्य हेतु असून इतर हेतु गौणत्वानें असतात. अशा गोष्टींचा विचार ह्या प्रकरणांत करावयाचा आहे.

दुसऱ्याचे दोष बाहेर काढण्याला योग्य स्थळ व काळ पहाणें आणि ते दाखवितांना कमी अधिकपणाचें तारतम्य राखणें हें मोठें कठिण काम आहे. दुसऱ्याच्या दुःखानें कळवळून जाणाऱ्या दयाशील मनुष्याच्या हातून परदोषाविष्करण व्हावें तसें होणार नाहीं, व तेंच केवळ सत्यासत्य पाहणाऱ्या मनुष्याच्या हातून वाजवीपेक्षां अधिक होईल. कधींकधीं दोष बाहेर न काढणें हेंच परोपकाराच्या दृष्टीनें कर्तव्यकर्म असतें, व कधींकधीं ते न काढणें म्हणजे वर्तनांत चुकी करणें असें होतें. अनेक गोष्टींचा विचार केल्यानंतर ह्यासंबंधानें आपलें कर्तव्य काय हें ठरवितां येईल. उभय पक्षामधील संबंधाचा मुख्य विचार केला पाहिजे. आईबाप आणि मुलें, नवरा आणि बायको, धनी आणि चाकर, वरिष्ठ आणि त्याच्या हाताखालचे नोकर, वडील आणि लहान, अशा अनेक प्रकारच्या संबंधाच्या मनुष्यांना एकमेकांचे दोष दाखविण्याचा प्रसंग येईल. कधींकधीं उभयतांमध्यें तसा कोणताही संबंध नसून दोघेही मनुष्य स्वतंत्र व बरोबरीच्या नात्याचे असूं शकतील. हा संबंधाचा विचार झाल्यानंतर दोघांच्याही वर्तणुकींचा विचार झाला पाहिजे. म्हणजे दोन्ही सारख्या आहेत, किंवा एकापेक्षां दुसरी चांगली आहे, व तशी असल्यास दोहोंमध्यें फरक किती आहे इत्यादि गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें दोष बाहेर काढण्यानें तत्काळ किंवा कालांतरानें फायदे किंवा तोटे कोणते होण्याचा संभव आहे हें पाहिलें पाहिजे. व सरतेशेवटीं जवळ दुसरीं मनुष्यें कोण आहेत व दोषांचें स्वरूप काय आहे ह्या गोष्टींचाही विचार केला पाहिजे.

प्रत्येक प्रसंगीं सर्व गोष्टींचा पूर्ण विचार होऊन वर्तनाची दिशा ठर-

विण्याला मनुष्याच्या अंगीं अनेक गुणांचें वास्तव्य असलें पाहिजे. विशेषतः इतर मनुष्यांविषयीं प्रेम, विलक्षण तऱ्हेची ग्राहकशक्ति, आणि दूरदर्शीपणा हे गुण अवश्य पाहिजेत. इतक्या गोष्टी अनुकूल असल्या तरी, शक्य असल्यास कांहीं वेळपर्यंत शांतपणें विचार करावयास सांपडेल तर चांगलें.

आईबापांना आपल्या मुलांचे दोष काढण्याचे व त्यांकरितां त्यांस रागें भरण्याचे हरहमेश प्रसंग येत असतात, हें पुष्कळांना स्वानुभवानें माहीतच आहे. ज्या लोकांमध्यें पुत्रावांचून पितरांना सद्गति मिळत नाहीं असा समज आहे, त्या लोकांत आईबाप आणि मुलें ह्यांजमधील संबंधाची कल्पना थोडीशी निराळी असली पाहिजे. निपुत्रिक म्हणजे महापापी, त्याचें मुखावलोकनही करूं नये, असे ज्यावेळीं लोकांचे दृढसमज होते, व त्याचप्रमाणें आपल्या मुलांनीं आपल्या पश्चात् श्राद्धतर्पणादि पितृकर्मे करून आपणास अन्नोदक दिलें नाहीं तर पितृलोकीं आपणास उपोषित रहावें लागेल, असें ज्या वेळीं वाटत होतें, त्यावेळीं पुत्रप्राप्ति करून घेणें हें एक अवश्य कर्तव्यांपैकीं समजलें जाणें साहजिक होतें. अशा स्थितींत मुलांचें जन्म व अस्तित्व हीं केवळ आईबापांच्या हिताकरितां आहेत असा सामान्य-लोकसमज असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. आईबापांचें मुलांशीं जें वर्तन होणार त्यावर ह्या समजुतींचा परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. मुलांच्या ज्या प्रकारच्या वर्तनानें आपला फायदा नाहीं तें वर्तन सदोष असें आईबापांस वाटेल आणि त्यापासून मुलांचा स्वतःचा फायदा आहे कीं नाहीं ह्या गोष्टीकडे त्यांचें जावें तितकें लक्ष जाणार नाहीं. वर दिलेल्या कल्पना जरी जुन्या काळच्या आहेत तरी त्या हल्लींही अगदीं नाहींशा झाल्या आहेत असें नाहीं. हल्लीं त्या गोष्टींवर अक्षरशः विश्वास ठेवणारे जरी थोडे लोक असले तरी, त्यामुळें ज्या प्रकारचें वर्तन हाडीं खिळलें आहे तें एकदम जावयाचें नाहीं. दिवसेंदिवस आईबाप व मुलें ह्यांजमधील संबंधाची कल्पना बदलत जात आहे. ह्या नवीन कल्पनेचा रोंख पूर्वींच्या कल्पनेच्या अगदीं उलट आहे. म्हणजे मुलांचें अस्तित्व आईबापांकरितां नसून आईबापांचें अस्तित्व मुलांकरितां आहे. हें मत डोळ्यांपुढें ठेवून वागणाऱ्या आईबापांना अनेक प्रसंगीं आपल्या मुलांचे दोष पोटांत घालण्याकरितां आत्मसंयमन करावेंसें वाटेल. लहान मुलांच्या अंगीं जो शरीराचा व मनाचा विलक्षण प्रकारचा चंचलपणा दिसून येतो त्यापासून होणाऱ्या त्रासानें पुष्कळ आईबापें अगदीं संतापून जातात. परंतु त्यांच्या म-

नांत काय चाललें असावें ह्याचा विचार करून व त्यांच्याविषयीं प्रेमबुद्धि मनांत वागवून, आत्मसंयमनानें हा त्रास सहन केला पाहिजे. त्याचप्रमाणें लहान मुलें जे नानाप्रकारचे उलटसुलट प्रश्न करितात त्यांबद्दल त्यांच्यावर न रागावतां, आपणाला होणारा त्रास निमूटपणें सहन करण्यांत त्या मुलांचें कल्याण आहे. आपल्या मुलांनीं विचारिलेल्या प्रश्नांचीं उत्तरें शांतपणें देऊन त्यांचें समाधान करण्यांतच आनंद वाटावा अशा प्रकारचें वळण आईबापांनीं आपणांस लावून घेतलें पाहिजे. फारच चमत्कारिक व त्रासदायक प्रश्न तीं विचारूं लागलीं तरी त्यांचा तिरस्कार न करितां अन्य रीतीनें त्यांचें मन दुसरीकडे वळविण्याचा यत्न केला पाहिजे.

ज्यांच्या शक्तीची पूर्ण वाढ अद्यापि होणें आहे अशा अज्ञान मुलांचें आचरण, परिपक्व विचारांच्या सज्ञान व प्रौढ मनुष्याच्या आचरणासारखें असूं शकणार नाहीं, ही गोष्ट नेहमीं डोळ्यांपुढें ठेविली असतां, लहान मुलांवर रागें भरण्याचे अनेक प्रसंग टाळितां येतील. ज्या मनोवृत्तींच्या अंगीं मन आंवरून धरण्याची शक्ति असते त्या मनोवृत्तींचा उदय मनुष्याच्या अंतःकरणांत फार उशीरानें होत असतो. खाण्याचा पदार्थ पाहिल्याबरोबर तो घेऊन खाऊं लागावें अशी लहान मुलांच्या मनाची प्रवृत्ति होते. तसें करणें समयास अनुसरून आहे कीं नाहीं हा विचार येण्याला त्यांचे मनांत अवकाशच नसतो. असें केल्याबद्दल अनेक आईबापांनीं आपल्या मुलांस अनेक प्रसंगीं मारिलें असेल. परंतु ह्या माराचा फारसा परिणाम होत नाहीं. आणखी कांहीं वर्षांनीं त्यांस अधिक समजूं लागलें म्हणजे ही त्यांची खोडी आपोआप जाते. दुसऱ्याही अनेक बारीकसारीक अपराधांची अशीच गोष्ट आहे. मुलांना अजून तितकी समजूत आला नाहीं असें मनांत आणून त्यांना फारसा कडकपणा दाखवूं नये. तथापि मुलांच्या अशा प्रकारच्या दोषांकडेही अगदींच दुर्लक्ष करून उपयोगी नाहीं. त्यांचे दोष त्यांस दाखवून ते घालविण्याविषयीं सौम्य शब्दांनीं त्यांस उपदेश केला पाहिजे.

तात्कालिक व कालावधीनें होणाऱ्या परिणामांकडे लक्ष दिलें असतां, मुलांना त्यांच्या दोषांबद्दल वारंवार रागें भरणें अनिष्ट आहे असें दिसून येईल. त्याचत्याच गोष्टीबद्दल मुलांना एकसारखा त्रास दिला तर तीं अगदीं लोचट होतात, व जो दोष घालविण्याकरितां यत्न होत असतो त्याविषयीं तीं बेपर्वा होऊन जातात किंवा हट्टानें तो अधिक करितात. हे परिणाम आईबापांचा

मुलांवर जो एकाप्रकारचा दाब असणें जरूर आहे त्याला अगदीं विरुद्ध आहेत. जीं आईबापें आपल्या मुलांच्या बारीकसारीक अपराधांकडे कानाडोळा करितात किंवा फार झालें तर आपल्या मुद्रेनें मात्र त्यांस आपली नापसंती दर्शवितात व फक्त मोठ्या अपराधांसाठीं कडक शिक्षा करितात, त्यांचा मुलांवर जितका धाक असेल, ततका उठल्याबसल्या कडक शब्दांनीं ताडन करणाऱ्या आईबापांचा असण्याचा संभव नाहीं. सद्वर्तनाचे मूळ उद्देश मुलांस समजावून देऊन त्यांस सन्मार्गाकडे वळविण्याविषयीं यत्न केले पाहिजेत. अमुक प्रकारचें वर्तन आपणाकडून झालें नाहीं तर आपणास मार बसेल अशा भयानें होणारें वर्तन, त्या भयाच्या अभावीं घडत नाहींसें होतें.

आईबापांनीं आपल्या मुलांचे दोष काढितांना अनेक प्रसंगीं निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उपयोग करणें अवश्य आहे असें वर दर्शविण्यांत आलें आहे, तें कुटुंबांतील इतर मनुष्यांस व शाळेंतील शिक्षकांसही लागू पडण्यासारखें आहे. मुलांच्या अपराधांकरिता त्यांना ज्या शिक्षा द्यावयाच्या व तसे अपराध त्यांनीं पुन्हा करूं नये म्हणून ज्या उपायांची योजना करावयाची, त्या शिक्षा व ते उपाय सौम्य परंतु नियमित असून, त्यांचें धोरण मुलांच्या तात्कालिक वर्तनावर न ठेवितां जेणेंकरून त्याच्या अंगीं सदाचरण भिनून जाईल अशा गोष्टींवर ठेविलें पाहिजे.

आतां धनी आणि चाकर ह्यांजमधील संबंधाचा विचार करूं. प्रथमतः हें सांगितलें पाहिजे कीं, उभयतांमध्यें जो करार झाला असेल त्याहून अधिक कोणींही अपेक्षा करूं नये परोपकारापूर्वीं न्यायाचा विचार केला पाहिजे. चाकरानें कराराप्रमाणें काम करणें हें त्याचें कर्तव्य आहे, व तें त्याजकडून योग्य रीतीनें बजाविलें गेलें नाहीं तर धन्यानें त्याची कानउघाडणी केली पाहिजे व त्याला आपलें कर्तव्य करणें भाग पाडिलें पाहिजे. कराराप्रमाणें समाजांतील व्यक्तींनीं आपापलीं कामें केल्यावांचून हें समाजयंत्र सुरळीत चालावयाचें नाहीं. ह्याकरितां कर्तव्यांत चुकी झाली असतां तिच्याकडे दुर्लक्ष करून उपयोगी नाहीं. आतां, जेथें मनुष्याचा इलाज चालणार नाहीं असें कांहीं आकस्मिक कारण घडून आल्यामुळें कर्तव्यांत हयगय झाल्यास गोष्ट वेगळी.

कारखानदार व मजूर आणि विशेषतः धनी आणि चाकर ह्यांजमधील संबंध व उभयतांचें परस्परांशीं वर्तन ह्यांचा नीतिदृष्ट्या विचार बराच

मानगडीचा आहे. नीति दोन प्रकारची आहे:--एक, केवलनीति व दुसरी प्रासंगिकनीति. केवलनीतिशास्त्राचा विचार करितांना, देशकालवर्तमानाकडे लक्ष न देतां सत्य-असत्य, न्याय-अन्याय इत्यादि संबंध ठरवावयाचे असतात. केवल-नीतिशास्त्राच्या तत्त्वांचा उपयोग मनुष्यसमाजाच्या पूर्ण-उत्क्रान्त स्थितींत होऊं शकेल. परंतु ती स्थिति प्राप्त होईपर्यंत प्रासंगिकनीतिशास्त्राच्या तत्त्वांचा उपयोग केला पाहिजे. प्रासंगिक नीतीचा विचार करितांना स्थल, काल, समाजाच्या घटकावयवांची स्थिति इत्यादि अनेक गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. प्रासंगिक नीतिशास्त्राच्या धोरणानें वर्तनाचे नियम ठरवितांना केवल नीतिशास्त्राचे सिद्धांत नेहमीं डोळ्यांपुढें ठेविले पाहिजेत व अखेरीस आपणाला त्या पायरीवर जावयाचें आहे हें लक्षांत बाळागिलें पाहिजे. केवलनीतिशास्त्राच्या दृष्टीनें धनी आणि चाकर ह्यांच्यामध्यें अगदीं बरोबरीचा संबंध असूं शकेल. एकानें आपले श्रम विकत घ्यावयाचे व दुसऱ्यानें त्यांबद्दल पैशाच्या रूपानें त्याला मोबदला द्यावयाचा; अशा प्रकारच्या व्यवहारांत केवलनीतीच्या दृष्टीनें एकमेकांकडे अधिक-उणेपणा असण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु हल्लींच्या लोकस्थितीचा विचार केला म्हणजे, तशा प्रकारचा संबंध असल्यावांचून धनी आणि चाकर ह्यांजमधील व्यवहार सुरळीतपणें चालणार नाहींत असें दिसून येईल. ह्याकरितां प्रासंगिकनीतीला अनुसरून धनी आणि चाकर ह्यांजमध्यें न्यूनाधिक्य राखणें भाग आहे. बरोबरीचें नातें कायम राहून अमुक पगार घेऊन अमुक काम करावें असा करार उभयतांमध्यें होणें केवलनीतिदृष्ट्या जरी शक्य दिसतें, तरी धन्याचा करार महिन्यामहिन्यानें पगार दिला म्हणजे पुरा होतो, पण चाकराला नेहमीं धन्याचे हुकुमाप्रमाणें काम करावयाचें असतें. ह्यामुळें गुलाम आणि त्यांचे धनी ह्यांजमध्यें ज्या प्रकारचा संबंध असेल त्याच प्रकारचा कांहींसा संबंध धनी आणि चाकर ह्यांजमध्यें राहतो. ज्याअर्थीं हल्लींच्या स्थितींत हा संबंध नाहींसा होणें अशक्य आहे, त्या अर्थीं प्रसंगाला अनुसरून ह्या संबंधाचे दुष्परिणाम जितके कमी होतील तितके करण्याकडे लक्ष देऊन धन्यानें चाकराशीं कोणत्या प्रकारचें वर्तन ठेवावें हें ठरविलें पाहिजे. उभयतांमधील अनिष्ट संबंध असह्य न होऊं देण्याचा एक मार्ग म्हटला म्हणजे धन्यानें चाकराशीं वर्तन करितांना शक्य असेल तितक्या सौम्य शासनपद्धतीचा उपयोग करणें हा होय.

चाकरांच्या हातून होणाऱ्या अपराधांपैकीं विशेष महत्त्वाचे अपराध म्हटले

म्हणजे समजून उमजून कराराप्रमाणें काम न करण्याच्या उद्देशानें केलेले होत. पूर्वी सांगितल्याप्रमाणें अशा प्रकारच्या अपराधांबद्दल त्यांस खरमरीतपणानें समजूत दिली पाहिजे. त्यावेळीं त्यांची दया आली तरी त्या अपराधांचें स्वरूप लक्षांत आणून आपलें कर्तव्य केलें पाहिजे. अशा प्रसंगीं हयगय करणें म्हणजे त्या मनुष्याचें व समाजाचेंही नुकसान करणें होय. आपल्या दुर्लक्षामुळें जर आपल्या चाकराला चुकवाचुकव करण्याची संवय लागली तर ती त्याला जन्मभर नडेल, व समाजामध्येंही एक आपल्या कर्तव्यांत हयगय करणारा अप्रामाणिक मनुष्य तयार करण्यास आपण कारण झालों असें होईल. परंतु आपण योग्यवेळीं केलेल्या कानउघाडणीमुळें जर त्याचा हा दुर्गुण नाहींसा झाला किंवा बराच कमी झाला, तर त्याचा फायदा होऊन ज्या दुसऱ्या धन्यांकडे काम करण्याचें त्याला कारण पडेल त्यांचाही फायदा होईल.

कर्तव्यांत हयगय होण्याला अप्रामाणिकपणाप्रमाणेंच विसराळूपणाही कधींकधीं कारण होतो, व ह्या अपराधासाठींही कडक शासनपद्धतीचा उपयोग केला पाहिजे. अप्रामाणिकपणामुळें घडणाऱ्या अपराधांचें स्वरूप नीतिदृष्ट्या जरी विसराळूपणामुळें घडणाऱ्या अपराधांहून बरेंच भयंकर दिसलें, तरी व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें असतां, दोहोंपासून परिणाम सारखाच दिसतो. म्हणजे दोन्ही प्रसंगीं धन्याचें नुकसास सारखेंच होतें. ह्याकरितां अशा अपराधांवरही करडी नजर ठेवणें जरूर आहे. मुलांच्या व चाकरांच्या शासनपद्धतीचें स्वरूप करवेल तितकें सृष्टिशास्त्रांतील क्रिया व प्रतिक्रिया ह्यांच्या नियमांना अनुसरून केलें पाहिजे. सृष्टींत क्रिया आणि प्रतिक्रिया, आघात आणि प्रत्याघात, ह्यांचे संबंध जसे स्वाभाविक आणि अचल असतात, त्याचप्रमाणें अपराध आणि त्यांबद्दल शिक्षा ह्यांचे संबंध स्वाभाविक आणि अचल असे करण्याचा यत्न केला पाहिजे. कोणतेंही काम आपल्या हातून करावयाचें राहिलें तर तें सरतेशेवटीं आपणांसच केलें पाहिजे व हयगयीनें काम वाईट झालें तर तें आपणांसच पुन्हां दुरुस्त करून दिलें पाहिजे, अशी चाकरांची अनुभवानें खात्री होत चालली तर त्यांच्या अंगचे दोष नाहींसे होण्याचा संभव आहे. रात्रीं दरवाजे किंवा खिडक्या बंद करण्यास चाकर विसरला असतां त्यालाच परत बोलावून त्याजकडून तें काम करून घेतलें असतां त्याच्या मनाला थोडेंसें वाईट वाटेल, परंतु वारंवार तीक्ष्ण शब्दांचे प्रहार केल्यानें जितकें त्याला वाईट वाटेल तितकें अशानें वाटणार नाहीं; व ह्या

रीतीनें वागलें असतां आपले दोष नाहींसे करण्याकरितां झटण्याची त्याला बुद्धि होईल.

मूर्खपणामुळें किंवा वेडसरपणामुळें होणाऱ्या अपराधांबद्दल पुष्कळ लोक आपल्या चाकरांना अतिशय त्रास देतात. क्षमा करण्याला योग्य असे जर कोणतेही अपराध असतील तर ते हेच होत. हे अपराध होण्याचें कारण चाकराच्या शक्तीबाहेरचें असल्यामुळें त्याचा इलाज चालण्यासारखा नसतो. अगदीं साध्या गोष्टी सुद्धां लक्षांत येऊं नयेत असा विलक्षण प्रकारचा अप्रबुद्धपणा कित्येक मनुष्यांमध्यें दिसून येतो; परंतु जें बुद्धिमांद्य आनुवंशिकसंस्कारामुळें त्यांस प्राप्त झालें असेल, किंवा पुष्कळ वर्षें वाईट प्रकारची वागणूक मिळाल्यामुळें त्यांच्या अंगीं उत्पन्न झालें असेल, त्याबद्दल त्यांना वारंवार त्रास न देतां क्षमा करणें योग्य आहे. सृष्टिक्रमाला अनुसरून मनुष्यामनुष्यामध्यें जें न्यूनाधिक्य उत्पन्न होतें त्याचे दुष्परिणाम, इतर हेतूंना बाध न आणितां जितके कमी होतील तितके करणें, हा परोपकाराचा उद्देश आहे. ह्याकरितां, ज्यांच्यावर निसर्गदेवतेचा कोप झाला आहे अशा दुर्दैवी मनुष्यांचा इतरांनीं आपल्या निष्कारण कडकपणामुळें आणखी छळ करणें परोपकाराच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट होय. अशा प्रकारच्या चाकरांच्या अपराधांबद्दल दोष देण्याचा प्रसंग आलाच तर निदान सौम्य मार्गाचें तरी अवलंबन करणें निवृत्त्यात्मक परोपकाराच्या दृष्टीनें जरूर आहे.

केवळ परोपकाराकरितांच दोष देण्याच्या आपल्या प्रवृत्तीचें संयमन करणें इष्ट आहे असें नाहीं, तर त्यापासून आपला स्वतःचाही फायदा आहे. कारण वारंवार दुसऱ्यांना बोलल्यानें आपणाला प्रत्यक्ष त्रास होऊन मस्तक संतापून जातें तें जातेंच, पण शिवाय ज्या हेतूनें आपण इतका त्रास करितों तो हेतुही तडीस न गेल्यामुळें आपणास प्रत्यक्ष रीतीनें आणखी त्रास होतो. जे लोक एकसारखे आपल्या चाकरांस किंवा हाताखालच्या लोकांस त्यांच्या अपराधांबद्दल बोलत असतात त्यांजकडे कोणी लक्ष देत नाहींसें होतें; परंतु जे फार थोडे वेळां बोलण्याचा प्रसंग आणितात त्यांच्या बोलण्यापासून थोडाबहुत तरी इष्ट परिणाम घडून येतो.

मित्रभावानें वागणाऱ्या किंवा अगदीं अपरिचित अशा स्वतंत्र व बरोबरीच्या मनुष्यांनीं, खासगी रीतीनें किंवा प्रसिद्धपणें, एकमेकांचे दोष दाखविणें केव्हां योग्य होईल हा प्रश्न बराच गुंतागुंतीचा आहे व त्याचें सर्व

ठिकाणीं लागू पडणारें एक सामान्य उत्तर देतां येणें कठिण आहे. अशा प्रत्येक प्रसंगाचा स्वतंत्रपणें विचार केला पाहिजे.

जर एकाद्या परकी मनुष्याच्या हातून कांहीं अयोग्य वर्तन घडलें, व तें विशेष महत्त्वाचें नसलें, तर त्याकडे दुर्लक्ष करणें किंवा फार झालें तर आपल्या मुद्रेनें किंवा अंगविक्षेपांनीं त्याचें त्याकडे लक्ष जाईल असें करणें हेंच उत्तम. कारण त्याचा शब्दांनीं उल्लेख केला असतां चांगल्यापेक्षां वाईट परिणाम होण्याचा संभव अधिक असतो. विशेषतः त्या अयोग्य वर्तनाचा संबंध आपणा स्वतःशीं पोंचत असल्यास अधिकच तसा संभव असतो. पण जर तें वर्तन विशेष महत्त्वाचें असेल तर तात्कालिक व दूरच्या परिणामांचा विचार करून त्याजकडे विशेष लक्ष देणें भाग पडेल. प्रत्येक मनुष्यानें आपल्या व इतरांच्या हिताकरितां, विशेष व्यक्तींच्या जुलुमी वर्तनाला प्रतिबंध केला पाहिजे. कारण, त्यांच्या जुलुमी वर्तनाला जर कोणीं अडथळा केला नाहीं तर त्यांस तसें करण्यास उत्तेजन मिळतें. ह्याकरितां त्या अयोग्य वर्तनाचा संबंध इतरांशीं पोंचत असला तरी आपण मध्यें पडून त्याचा निषेध करणें अवश्य आहे, किंबहुना अशा प्रसंगीं तर ही अवश्यकता अधिकच आहे. आपला स्वतःचा त्यांत संबंध नसल्यामुळें स्वार्थासाठीं आपण बोलतों असा समज होण्याचा संभव नसतो आणि ह्यामुळें आपल्या शब्दाला अशा वेळीं वजनही अधिक येतें. एका मनुष्यानें दुसऱ्याचा अपराध केला असतां तिऱ्हाईत मनुष्य जर मध्येंच येऊन बोलूं लागला तर त्याचा अपराध करणारास फार राग येतो. अडाणी लोक "तुझा काय त्यांत संबंध आहे ? आमचें आम्ही पाहिजे तसें पाहून घेऊं" असें उत्तर मध्यें पडणाऱ्या मनुष्याला देत असत त. त्याहून वरच्या पायरीवरच्या मनुष्यांनीं जरी तसें उत्तर दिलें नाहीं तरी त्यांच्या मनाची तीच स्थिति असते. अशा प्रसंगीं निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांना मुळींच अवकाश नसतो. अपराधी मनुष्याला त्याच्या अपराधाबद्दल दोष दिला तर त्याच्या मनाला दुःख होईल असा विचार मनात आला असतां, लागलाच त्याच्या अपराधाचा परिणाम ज्याच्यावर घडला आहे त्याला झालेल्या दुःखाविषयीं विचार मनांत आणून, पहिल्या विचाराचें निरसन केलें पाहिजे. निरपराधी मनुष्याला ज्यानें दुःख दिलें त्याला दुःख झालें असतां त्याच्या अपराधाबद्दल योग्य शासन होईल असा विचार मनांत आणला पाहिजे. येथें मनाचें संयमन करण्याची तर अवश्य-

कता नाहींच, पण त्याला उलट अधिक मोकळें सोडलें पाहिजे; म्हणजे प्रवृत्यात्मक परोपकाराची क्रिया करण्यास आपण झटलें पाहिजे. अपराध्याची योग्य मार्गानें कानउघाडणी केल्यानंतर त्याजकडून जर "तुम्ही आपला स्वतःपुरता विचार करा, दुसऱ्याच्या भानगडींत पडण्याचें कारण नाहीं" असें उत्तर मिळालें तर लागलेंच त्यास "शब्दानें किंवा कृतीनें जर कोणीं कोणास दुखविलें, तर दुःखितांचें संरक्षण करून समाजांतील मनुष्यांचे व्यवहार सुयंत्र चालण्यास मदत करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे" असें प्रत्युत्तर मिळालें पाहिजे.

आपल्या मित्रानें जर आपला किंवा दुसऱ्या कोणाचा अपराध केला असला, तर त्याविषयीं त्याला बोलल्यानें त्याच्या–आपल्या स्नेहभावांत अंतर पडेल असा विचार मनांत येऊन त्याचा आपल्या मनावर बराच परिणाम होण्याचा संभव आहे. परंतु ह्या स्वार्थामुळें उत्पन्न झालेल्या विचारांचा अंमल आपल्या मनावर चालूं देणें योग्य नाहीं. आपल्या स्वतःच्या किंवा इतरांच्या हक्कांचें संरक्षण करण्याकरितां आपला मित्र झाला तरी त्यास बोलणें भाग आहे. जवळच्या व दूरच्या परिणामांकडे लक्ष दिलें असतां असें दिसून येईल कीं, आपल्या मित्राला जरी आपल्या अप्रिय भाषणानें मोठा राग येण्याचा संभव असला तरी देखील तें बोलणें ह्यांतच परिणामीं सर्वांचें हित आहे.

परंतु ज्याच्याशीं आपली विशेष सलगी असेल अशा मित्राशीं जर वरच्यासारखा प्रसंग आला तर आपली नापसंती शब्दांनीं न दर्शवितां आपल्या वर्तनानें दर्शविणें बरें. आपला प्रियमित्र नेहमींप्रमाणें आपणाशीं मोकळ्या मनानें व उल्हासानें वागत नाहीं हें ताबडतोब त्याच्या लक्षांत येईल व वर्तनांत अशा प्रकारचा बदल होण्याचें कारणही त्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. पुष्कळ वेळां शब्दांनीं जें काम होत नाहीं तें अशा प्रकारें वर्तनांत बदल केल्यामुळें होतें. आपल्या मित्राला जरी ह्यामुळें दुःख झालें तरी त्याला त्याबद्दल आपणावर रागावण्याला प्रत्यक्ष कारण झालेलें नसतें व त्यामुळें अगदीं संबंध तुटण्याची भीति नसते. आणखी एक चांगली गोष्ट अशा वर्तनानें घडून येते, ती ही कीं, शब्दामुळें शब्द वाढत जाऊन मनुष्य हट्टास पेटण्याचा संभव असतो तो नाहींसा होतो, व आपल्या मित्राच्या मनांत स्वतःच्या अपराधाविषयीं विचार येऊन त्याचा त्याला पश्चात्ताप होण्याचा संभव असतो.

कित्येक प्रसंगीं दुसऱ्यांना दोष देण्याचे कामीं व्हावें तितकें आत्मसंयमन न होणें जितकें अनिष्ट आहे, तितकेंच दुसऱ्या कांहीं प्रसंगीं तें वाजवीपेक्षां अधिक होणें अनिष्ट आहे. न्यायाधीशाचें किंवा जूरीचें काम करितांना किंवा न्यायाधीशासमोर साक्ष देण्याचा प्रसंग आला असतां, मुग्ध बसून चालत नाहीं. कोणत्या तरी प्रकारचें मत द्यावें लागतें किंवा विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देणें भाग पडतें. अशा प्रसंगीं आपली जशी समजूत असेल तशी स्पष्टपणें सांगणें अवश्य आहे, परंतु अपराध्याची दया आल्यामुळें पुष्कळ लोक आपलें योग्य कर्तव्य करीत नाहींत.

ज्या देशांतील लोकांची नीतिमत्ता कमी असते, त्या देशांत कायद्याविषयीं तिरस्कारबुद्धि आणि गुन्हेगारांविषयीं दयार्द्रबुद्धि आढळून येते. कायदा सर्वांचा मित्र आहे अशा समजुतीच्या ऐवजीं तो सर्वांचा घातकशत्रु आहे असा बहुतेक लोकांचा समज असतो. कांहींसे तशाच प्रकारचे मनोविकार सुधारलेल्या देशांतही शाळांतील मध्यम वयाच्या विद्यार्थ्यांच्या अंगीं दिसून येतात. एकाद्या मुलानें अपराध केला असेल तर त्याचा अपराध बाहेर पडून शिक्षकाकडून त्याला शिक्षा होऊं नये म्हणून त्याचें संरक्षण करण्यास झटणें हें मोठें भूषण समजलें जातें; व त्याच्या अपराधाबद्दल शिक्षकास कळविणें हें लज्जास्पद काम आहे असा सर्व मुलांचा समज असतो. एकाद्या मुलावर वहीम असल्यास त्याला शिक्षा भोगण्याचा प्रसंग आला असतां, जर त्यानें खऱ्या अपराध्याबद्दल कांहींएक दाद लागूं न देतां ती शिक्षा निमूटपणीं सोसली तर त्याची किती तरी वाहवा केली जाते. हे विचार पुष्कळ वेळां इतक्या स्थितीस जाऊन पोंचतात कीं, एकाद्या लहान मुलाला मोठ्या मुलानें मारिलें किंवा वाईट रीतीनें वागविलें तरी तें तो निमूटपणें सोसतो व त्याबद्दल शिक्षकाजवळ किंवा आईबापाजवळ अवाक्षरही काढीत नाहीं. कदाचित् एकाद्या मुलानें शिक्षकाकडे फिर्याद नेलीच, तर पुनः ज्या वेळीं तो मुलांच्या टोळींत एकटा सांपडतो, त्यावेळीं " उगाच आपण या भानगडींत पडलों " असें त्यास सर्वजण करून टाकतात.

पुष्कळ लोकांचे हे पूर्व वयांतील विचार प्रौढपणींही कायम राहतात, व त्यांच्या आचरणावर त्या विचारांचा परिणाम झालेला अनेक वेळां दिसून येतो. हे लोक पुष्कळ वेळां अपराध्याच्या तर्फे कड घेऊन भांडतात व अपराध्याला योग्य शिक्षा व्हावी अशासाठीं यत्न करणाऱ्या लोकांवर चरफड-

तात. पुष्कळ वेळां अपराध उघडकीस आणणाऱ्या मनुष्यापेक्षां अपराध करणाऱ्या मनुष्याला लोकांकडून अधिक शाबासकी दिली जाते. ज्यावेळीं दोषारोप करण्याची अत्यावश्यकता असते त्यावेळीं तो करण्यास मनुष्याचें मन कचरत असतें; परंतु ज्या वेळीं दोषारोप करण्यापासून कांहीं फायदा नसतां उलट तोटा होण्याचा संभव असतो, त्यावेळीं तो करण्याकरितां मनुष्य अगदीं उतावळा होऊन जातो, हा मनुष्यस्वभावाचा चमत्कार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. व्यवहारांत मनुष्यें घडोघडीं एकमेकांचीं छिद्रें काढून परस्परांस वाईट वाटेल अशा प्रकारचें वर्तन करीत असतात; परंतु एकाद्या गुन्हेगाराविरुद्ध साक्ष देण्याचा प्रसंग आला असतां, किंवा ज्यूरीचा सभासद ह्या नात्यानें एकाद्या गुन्ह्याबद्दल विचार करावयाचा असतां, त्यांना आपलें मत स्पष्टपणें सांगण्याचा धीर होत नाहीं. पुढें दिलेली गोष्ट प्रत्यक्ष घडून आलेली आहे. एका व्यापारी मंडळीच्या अध्यक्षानें त्या मंडळीस अपायकारक अशा प्रयत्नांना अप्रामाणिकपणानें मदत केल्याचें त्या मंडळीच्या व्यवस्थापकांच्या लक्षांत आल्यावरून त्यांनीं त्याला आपल्या कामाचा राजीनामा देणें भाग पाडलें, परंतु त्याची दया आल्यामुळें त्याला व्यवस्थापकांनीं आपल्या सह्यांचें चांगल्या वर्तणुकीबद्दल एक सर्टिफिकिट दिलें. अशाच प्रकारचें वर्तन पुष्कळ लोकांच्या हातून होत असतें. आपल्या चाकरांनीं किंवा हाताखालच्या नोकरांनीं कांहीं गुन्हा केला तर त्यांस नोकरीवरून दूर करावयाचें व मग त्यांजवर मेहेरबानगी करण्याकरितां त्यांस त्यांच्या हुषारीबद्दल दाखले द्यावयाचे. वास्तविक अशा प्रसंगीं योग्य कर्तव्यकर्म म्हटलें म्हणजे गुन्हेगारांस न्यायासनापुढें आणून त्यांस योग्य शासन देवविणें हें होय. इतकें झालें नाहीं तर त्यांच्या अपराधांबद्दल त्यांस चांगलें फजीत करून तरी लावून द्यावें. परंतु तसें न करितां त्यांस चांगल्या गुणाबद्दल सर्टिफिकेट देणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याची परमावधि होय.

निवृत्त्यात्मक परोपकाराच्या दृष्टीनें दुसऱ्याचे दोष पोटांत घालण्याचे प्रसंग अगदीं निराळे आहेत. वरच्यासारख्या प्रसंगीं दोषांचं आविष्करण करवेल तितक्या स्पष्टरीतीनें करणें अत्यंत अवश्य आहे. ज्या प्रकारच्या वर्तनानें दुर्गुणी मनुष्यांस त्यांच्या दुर्गुणांचे स्वाभाविक परिणाम भोगावयास लावणें कठिण जाऊन उलट त्यांस उत्तेजन मिळतें, त्या प्रकारच्या वर्तनाचें नीतिदृष्ट्या समर्थन करतां येणें अशक्य आहे.

दुसऱ्यांचे दोष बाहेर काढण्याच्या संबंधानें जे विचार येथें दिले आहेत तेच थोडासा फरक केला म्हणजे, त्या दोषांबद्दल जी शिक्षा करावयाची तिच्या संबंधानें लागू पडतील. शिक्षेच्या संबंधानें पूर्वी थोडासा उल्लेख केला आहे त्याप्रमाणें तिचें स्वरूप करवेल तितकें स्वाभाविक करण्याचा यत्न केला पाहिजे. उदाहरणार्थ, नेमिलेल्या वेळीं येऊन कामास सुरवात करण्यास जर नोकर लोकांकडून हयगय होऊं लागली तर आरंभीं कांहीं प्रसंगीं तिकडे दुर्लक्ष करणें परोपकाराच्या दृष्टीनें योग्य होईल; परंतु तसे प्रसंग वारंवार येऊं लागले असतां, कराराप्रमाणें त्यांच्याकडून वर्तन न झाल्याबद्दल त्यांस चांगला चिमटा बसेल अशा रीतीचें शासन झालें पाहिजे. हें शासन करण्याचा स्वाभाविक मार्ग म्हटला म्हणजे कामावर येण्यास लागलेल्या उशीराच्या मानानें त्यांचा पगार कमी करणें हा होय. मजूरलोक उशिरां कामावर येऊं लागले तर धन्याचें तितकें काम कमी होणार व अशा रीतीनें होणाऱ्या नुकसानीचा मोबदला पैशाच्या रूपानें त्यांच्या पगारांतून कापून घेतला असतां त्यांस कुरकुर करण्यास जागा राहणार नाहीं. ज्या मनुष्यांशीं वागण्याचा प्रसंग येतो त्यांच्या स्थितीच्या मानानें त्यांशीं वर्तन ठेवावें लागतें. सध्यां मनुष्यसमाज अशा स्थितींत आहे कीं, बहुतेक मनुष्यांवर कर्तव्याची चाड, सौम्य शब्दांनीं केलेला उपदेश, किंवा तीक्ष्ण शब्दांनीं केलेले प्रहार ह्यांचा म्हणण्यासारखा परिणाम होत नाहीं. अशा लोकांशीं वागण्याचा प्रसंग आला असतां झालेलें नुकसान भरून घेणें ही जी न्यायाच्या दृष्टीनें योग्य दिसणारी शिक्षा तींत परोपकाराच्या दृष्टीनें बदल करण्याचें कांहीं कारण नाहीं.

ज्यावेळीं अपराधाचें स्वरूप निश्चित असतें व त्याबद्दल दोष देणें भाग असतें, तेव्हां शब्दांनीं किंवा कृतीनें दिलेली शिक्षा वाजवीपेक्षां कडक न होईल अशाविषयीं जपणें हेंच निवृत्त्यात्मक परोपकाराच्या दृष्टीनें कर्तव्य आहे. अशा वेळीं मनुष्यास राग येण्याचा संभव असतो व पुष्कळ प्रसंगीं राग येणें योग्यही असतें, परंतु त्यामुळें शिक्षा विनाकारण कडक होणें चांगलें नाहीं. दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी होण्याचा जो मनुष्याचा एक स्वभाव आहे त्यास अनुसरून, पुष्कळ वेळां आपण दुसऱ्याला लागण्यासारखे शब्द ओंठाबाहेर पडणार इतक्यांत जीभ आंवरून धरितों किंवा एकादी कृति हातून घडणार तोंच हात आंखडतों. ह्या स्वभावाचा परिणाम मनोविकार क्षुब्ध झाले असतां होणें फार इष्ट आहे.

रागाच्यासंबंधानें पुष्कळ नीतिशास्त्रकारांचा व विशेष विचार न करितां त्यांवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांचा समज फार चमत्कारिक आहे. राग हा अत्यंत घातक आहे व तो मनुष्यांस कधींही येऊं नये असें त्यांचें मत आहे. केवल-नीतिशास्त्राच्या दृष्टीनें हें मत कदाचित् खरें असेल, परंतु प्रासंगिक नीतीच्या दृष्टीनें तें अगदीं निरुपयोगी आहे. राग हा मनोविकार मनुष्याच्या हिताकरितां उत्पन्न झाला असून मनाची स्थिति प्रकट करण्याला तो फार उपयोगी आहे. ज्यांच्यावर अन्याय किंवा जुलूम होत असेल त्यांनीं त्याबद्दल आपला राग दाखविणें हें अगदीं स्वाभाविक व हितकारक आहे. त्याच्या अभावीं असे प्रकार फारच घडून येतील. मनुष्याच्या सध्यांच्या स्थितींत त्याचे मनावर भीतीचा दाब असणें जरूर आहे. रागावलेला मनुष्य पाहिला म्हणजे, ज्याच्यावर तो रागावला असेल त्याच्या मनांत एका प्रकारचें भय उत्पन्न होतें. ह्यावरून असें दिसून येईल कीं, प्रासंगिक नीतीच्या दृष्टीनें रागाची आवश्यकता आहे. आतां, तो अमर्याद होऊन अनावर झाला असतां त्याच्यापासून दुष्परिणाम घडतील हें उघड आहे. परंतु तशी स्थिति बहुतेक शारीरिक किंवा मानसिक गुणांची आहे. कोणत्याही मनोविकाराच्या अतिरेकापासून घातक परिणाम घडत असले म्हणजे त्या मनोविकाराला दोष समजणें व त्याला अजीबात काढून टाकण्याचा यत्न करणें ही चुकी आहे. त्यांत नेमस्तपणा आणण्याविषयीं यत्न केला पाहिजे. एकद्याच्या अपराधामुळें राग आला असतां, अपराध्याला बोलतांना किंवा शिक्षा करितांना, त्या रागाला योग्य मर्यादेंत ठेवणें हें निवृत्त्यात्मक परोपकाराच्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे.

---

# प्रकरण ६

## परगुणप्रशंसेची मर्यादा

प्रस्तुत प्रकरणांतील विषयाचा निवृत्त्यात्मक परोपकारांशीं कसा संबंध पोंचतो ह्याविषयीं बरेच वाचक बुचकळ्यांत पडतील. दुसऱ्याच्या गुणांची प्रशंसा करण्यास तयार झालेल्या जिभेला किंवा लेखणीला आंवरून धरिल्यानें परोपकार व्हावा ही गोष्ट चमत्कारिक दिसते व कित्येकांस तर ती असंभवनीय वाटेल.

ज्यांना सत्याची चाड असेल ते लोक, दुसऱ्यास खुष करण्याकरितां त्याच्या गुणांची अयथार्थ प्रशंसा करणें हें अयोग्य आहे, असें कबूल करितील. कोणत्याही रीतीनें आपला फायदा करून घेण्याची इच्छा नसतांना देखील जर एकादा मनुष्य, दुसऱ्याच्या अंगीं नसलेल्या गुणांची किंवा अंगीं असलेल्या गुणांची वाजवीपेक्षां जास्त तारीफ करील तर, त्याचें वर्तन सदोष आहे असें म्हणण्यास त्यांस दिक्कत वाटणार नाहीं. फार प्राचीनकाळापासून अशा प्रकारच्या वर्तनाला लोक दोषास्पद मानीत आले आहेत. ज्यांच्यामध्यें सुधारणेचा थोडाबहुत तरी प्रवेश झालेला आहे त्या सर्व लोकांत ह्या दोषाला तोंडपुजेपणा किंवा हांजीहांजी अशा अर्थाचीं निंदाव्यंजक नांवें आहेत. पूर्वीं पुष्कळ देशांत राजांच्या व श्रीमंत लोकांच्या घरीं स्तुतिपाठक बाळगण्याची चाल असे. परंतु अशा प्रकारांचा लोकांस दिवसेंदिवस वीट येत चालला आहे. मनांत एक असून बाहेर दुसऱ्याची स्तुति करणाऱ्या मनुष्याचा पुष्कळांना कंटाळा येतो, आणि ज्या मनुष्याची स्तुति केली असेल त्या मनुष्याच्या मनात सुद्धां आपल्या स्तुतिपाठकाबद्दल तिरस्कार उत्पन्न होतो. दुसऱ्याविषयीं दया उत्पन्न झाल्यामुळें किंवा दुसऱ्याला आपण प्रिय व्हावें अशा उद्देशानें कोणीं कोणाची अयथार्थ स्तुति केली असतां जरी कोणी फारसें प्रत्यक्ष बोलून दाखवीत नाहीं, तरी तसें करणें अयोग्य आहे असें पुष्कळांस वाटतें.

परंतु वर सांगितलेल्या प्रशंसेंत किंवा स्तुतिपाठांत असत्याचा अंश असतो ह्यामुळें त्यांचा तिरस्कार केला जातो. दुसऱ्याची प्रशंसा करितांना ती वास्तविक असेल अशाविषयीं प्रत्येकानें जपलें पाहिजे असें त्यावरून वर्तनतत्त्व निघतें. मिथ्यास्तुतीपासून जें आपल्या मनास निवृत्त करावयाचें त्याच उद्देश आपल्या हातून असत्य घडूं नये हा असून, आपल्या हातून परोपकार घडावा हा नसतो. दुःखोत्पादक शब्द व क्रिया ह्यांपासून मनाला निवृत्त करणें हा निवृत्त्यात्मक परोपकार होय. ह्या परोपकाराचा संबंध, मिथ्यास्तुतीपासून मनाला निवृत्त करणें ह्या क्रियेशीं लावण्याचा प्रयत्न केला जातो. कारण, वास्तविक प्रशंसा असली तर तिला आंवरून धरण्याचें कांहीं कारणच नाहीं असें पुष्कळांस प्रथमदर्शनीं वाटतें, आणि ह्यामुळें परप्रशंसेला मर्यादित करावयाचें म्हणजे मिथ्यास्तुतीपासून मनाला निवृत्त करावयाचें अशी कल्पना त्यांचे मनांत येऊन तिचा निवृत्त्यात्मक परोपकाराच्या कल्पनेशीं मेळ

असत नाहीं. तेव्हां, ह्या विषयाचा निवृत्त्यात्मक परोपकाराशीं संबंध जोडण्यांत कांहीं तरी चुकी झाली असावी असें त्यांस वाटूं लागतें.

सत्यासाठीं परप्रशंसेपासून मनाला निवृत्त करावें लागतें त्याचप्रमाणें दुसऱ्याही कांहीं कारणामुळें तसें करण्याची अवश्यकता उत्पन्न होते. शब्दांनीं किंवा अंगविक्षेपांनीं प्रदर्शित केलेली प्रशंसा अगदीं यथार्थ असून, ती त्या मनुष्याच्या अंतर्वृत्तीची हुबेहूब प्रतिमा आहे अशी जरी कल्पना केली तरी देखील अशा प्रशंसेपासून मनाला निवृत्त करणें कधींकधीं जरूर असतें. समाजाच्या किंवा व्यक्तीच्या पुढील हिताकडे लक्ष देऊन तात्कालिक सुख देण्याच्या इच्छेला आंवरून धरिलें पाहिजे.

परप्रशंसा प्रदर्शित करण्याचे अनेक प्रकार आहेत. कधींकधीं नुसती दृष्टि फेंकिल्यानें आपली पसंती दुसऱ्यास दर्शवितां येते. केव्हांकेव्हां हळूच हसल्यानें किंवा दुसऱ्या प्रकारच्या अंगविक्षेपांनीं किंवा "वाः" "शाबास" इत्यादि उत्तेजनार्थक उद्गारांनीं आपले प्रशंसात्मक मनोविकार दुसऱ्यांस कळून येतात व कांहीं प्रसंगीं शब्दांनीं व लेखांनीं ते कळविले जातात. मनुष्याच्या तात्कालिक हिताकडे दुर्लक्ष करून त्याच्या परिणामींच्या हिताकडे लक्ष द्यावयाचें असल्यास परप्रशंसेला मर्यादित करण्याची अवश्यकता उत्पन्न होते. हें कर्तव्य करितांना पुष्कळ वेळां दुसऱ्यांच्या हिताकरितां मनुष्याला स्वतःच्या आनंदाला मुकावें लागतें व आपलें दुसऱ्या प्रकारचेंही नुकसान करून घ्यावें लागतें.

लहान मुलांची वाखाणणी केल्यानें तिचा थोडाबहुत अंश तरी स्वाभाविकपणेंच त्यांच्या आईबापांस मिळतो. आपल्या मुलांची प्रशंसा झालेली ऐकून आईबापांच्या हृदयास भरतें येतें. सुरेख कपडे, डागडागिने इत्यादिकांबद्दल लोकांनीं आपल्या मुलांस चांगलें म्हणावें ही इच्छा विशेषतः लहान मुलांच्या आयांस फार असते. एकादा ओळखीचा मनुष्य घरीं आला म्हणजे, बायका आपल्या मुलांना त्यांचे उत्कृष्ट पोषाख व काय असतील नसतील ते डागडागिने घालून त्यांस नटवून त्याचे पुढें आणितात. प्रेक्षकानें "किती तरी चांगलें मूल हें !" अशा अर्थाचे कांहीं उद्गार काढावे अशी त्यांची इच्छा असते. डौलीपणाचें बीज मनुष्यस्वभावांत आहेच, पण त्याला विशेष उत्तेजन मिळाल्यामुळें लहान मुलांना थोडेंसें समजूं लागल्याबरोबर त्यांच्या अंगीं डौलीपणा उत्पन्न होतो. फार वेळ मोडून त्यांच्या केंसांचीं ऐटदार र-

चना करणें, वारंवार निरनिराळे झाकीदार पोषाख घालणें, दागदागिन्यांनीं त्यांस आणखी सुशोभित करणें आणि घरांतल्या व बाहेरच्या मनुष्यांनीं त्यांची वेळीं-अवेळीं वाखाणणी करीत सुटणें इतक्या गोष्टी एकत्र झाल्यावर लहान मुलांच्याही मनांत बढाईखोरपणा उत्पन्न झाल्यास नवल नाहीं. अशा प्रकारचें एकादें मूल पुढें आल्याबरोबर त्याला व त्याच्या आईला खुष करण्याकरितां त्याची प्रशंसा करावी कीं नाहीं हा प्रश्न आहे. ती केल्यानें त्या दोघांचेंही अहित होणार. आत्मस्तुतीविषयीं इतकी प्रीति त्या आईच्या व विशेषतः मुलाच्या मनांत असणें हें उभयतांसही अहितकारक आहे. आपल्या प्रशंसेनें ह्या दुर्गुणाला उत्तेजन मिळेल. वरें, तें मूल पुढें आल्याबरोबर आपण त्याजकडे विशेष लक्ष देत नाहीं हें त्या आईनें पाहिल्याबरोबर तिची अगदीं निराशा होईल व तिच्या मनांत आपणाविषयीं जो स्नेहभाव असेल तो कमी होईल आणि त्या मुलालाही फार वाईट वाटेल. अशा स्थितींत त्या मुलाच्या व आईच्या कल्याणाकडे लक्ष देऊन त्यांच्या व आपल्या तात्कालिक सुखाचा जरी विघात झाला तरी प्रशंसात्मक चिन्हें न दाखविणें हेंच इष्ट आहे.

वरच्यासारखेंच आणखी एक उदाहरण घेऊं. सुंदर स्त्रीपुरुषांना व विशेषतः स्त्रियांना आपल्या स्वरूपाचा फार अभिमान असतो व इतर स्त्रीपुरुषांनीं आपणाकडे पाहून आपल्या सौंदर्याबद्दल आश्चर्य करावें व तें त्यांनीं आपल्या मुद्रेनें प्रदर्शित करावें अशी त्यांची फार इच्छा असते. ह्या इच्छा फारच चमत्कारिक रीतीनें उत्पन्न होत असतात व त्यांचें पृथक्करण करणें फार कठिण असतें. कोणत्याही प्रकारचा दुष्ट हेतु नसतांना अशी इच्छा असणें शक्य आहे व बहुतेक प्रसंगीं तसा दुष्ट हेतु नसतोही. मूल्यवान् मोहक पोषाख व दागिने ह्यांचें बीज अशा प्रकारच्या इच्छेंतच आहे. असें एकादें मनुष्य ज्या ठिकाणीं आहे त्या ठिकाणीं जाण्याचा आपणास प्रसंग आला आहे अशी कल्पना करूं. मनुष्य तर इतकें सुरेख आहे कीं, त्याच्या सौंदर्याकडे पाहून क्षणभर चित्तवृत्ति तटस्थ व्हावी. आपणावर त्याच्या सौंदर्याचा काय परिणाम झाला आहे हें पाहण्याकरितां, तें मनुष्य मधूनमधून आपणाकडे पहात आहे. अशा प्रसंगीं आपणास झालेलें आश्चर्य आपल्या मुद्रेनें प्रदर्शित करणें योग्य आहे काय ? तात्कालिक परिणामांकडे लक्ष दिलें असतां तसें करावेंसें वाटेल, परंतु दूरच्या परिणामांकडे लक्ष दिलें असतां तसें करणें अनिष्ट आहे असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. लोकांनीं आपली प्रशंसा

करावी ही इच्छा अशा मनुष्यांच्या अंगीं इतकी प्रबल होऊन गेलेली असते कीं, त्यांस दुसरें कांहीं सुचत नाहीं. नटण्यामुरडण्यांतच त्यांचा सर्व वेळ जाऊन जगांतील इतर व्यवहार त्यांस बहुतेक नाहींसारखेच होतात. इतका डौलीपणा चांगला नाहीं हें त्यांस दर्शविणें जरूर आहे व ह्याकरितां आपणास आश्चर्य वाटलें असलें तरी तें गुप्त ठेवणेंच बरें.

निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांस अनुसरून जी आत्मसंयमनाची अवश्यकता उत्पन्न होते म्हणून वरील दोन उदाहरणांत दाखविलें तशा प्रकारच्या आत्मसंयमनाची कांहीं जरूर नाहीं असें कित्येकांस वाटेल, परंतु ह्या क्षुल्लक वाटणाऱ्या दुर्गुणांना उत्तेजन मिळाल्यामुळें ते परमावधीस जाऊन पोंचतात व त्यामुळें त्या मनुष्यांचें फार अकल्याण होतें. ह्या डौलीपणाचे कधींकधीं इतके वाईट परिणाम होतात कीं, आयांना आपल्या मुलींबद्दलही मत्सर वाटूं लागतो व ह्याचें कारण शोधूं गेलें असतां तें लोकांनीं केलेल्या प्रशंसेतच असतें. त्यांच्या सौंदर्याची सभोंवतालच्या लोकांनीं नेहमीं वाखाणणी करावी, तुमच्यासारखें सौंदर्य साऱ्या जगांत नाहीं असें म्हणून त्यांस चढवावें व त्यांच्या अंगीं इतका अभिमान उत्पन्न करावा, कीं आपल्या इतकें किंवा आपल्याहून सुंदर मनुष्य आढळलें कीं त्याचा त्यांनीं मत्सर करूं लागावें, अशा प्रकारचीं उदाहरणें घडून येत असतात, व ही गोष्ट जितकी क्षुल्लक वाटण्याचा संभव आहे तितकी ती नाहीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

एकादी विशेष गोष्ट केल्याबद्दल लोकांनीं आपली वाहवा करावी अशी पुष्कळांची इच्छा असते व तसे प्रसंगही असंख्य येत असतात. एकादें पुस्तक किंवा काव्य लिहिणें, व्याख्यान देणें, चित्र काढणें किंवा रंगविणें,—गीत, नृत्य, वाद्य इत्यादि कलांतील निपुणतेचे मासले दाखविणें, शरीराच्या किंवा मनाच्या विलक्षण शक्तीचे खेळ करणें वगैरे प्रसंग ह्या प्रकारचे होत. अशा प्रसंगीं कित्येक वेळां सत्याला स्मरून व कित्येक वेळां पुढील दुःखोत्पादक परिणामांकडे लक्ष देऊन प्रशंसा न करण्यासाठीं आत्मसंयमन करणें इष्ट असतें. व्यवहारांत प्रेक्षकाला किंवा श्रोत्याला आपल्या समजुतीप्रमाणें वागणें कठिण जातें. दुसऱ्याची निराशा करून त्याला दुःख देऊं नये ह्या इच्छेनें, आपल्या मनाची खरोखर स्थिति काय आहे हें न पाहतां अपेक्षित प्रशंसा करण्यास तो तयार होतो. आपल्या अयथार्थ भाषणाच्या दुष्परिणामांकडे त्याचें लक्ष जात नाहीं. ज्या ठिकाणीं उत्तेजन देण्याची अवश्यकता असेल

त्या ठिकाणीं सत्याकडे लक्ष देऊन जितकें आत्मसंयमन करणें जरूर असेल त्याहून अधिक करण्याचें कारण नाहीं; आणि प्रत्येकाच्या कृतींत थोडाबहुत गुणाचा अंश असणारच, तेव्हां तेवढ्यापुरती याची प्रशंसा करण्यास हरकत नाहीं. मात्र तसें करितांना ढोंगीपणास उत्तेजन न मिळतां आपल्या गुणांत सुधारणा करण्याची त्या मनुष्यास बुद्धि होईल अशाविषयीं काळजी घेतली पाहिजे. कलाकौशल्याचें काम असेल तर त्याच्या संबंधानें दूरच्या परिणामांकडे लक्ष देण्याचें फारसें कारण नाहीं; परंतु एकादें पुस्तक, काव्य, निबंध, इत्यादिकांविषयीं बोलावयाचें असेल तर फार जपून बोललें पाहिजे. ज्या प्रशंसेनें कर्त्याच्या मनांत त्याच्या शक्तीपलीकडे महत्त्वाकांक्षा उत्पन्न होण्याचा संभव असेल त्या प्रशंसेचें संयमन करणें बरें. मुळींच मुग्ध राहणें किंवा सौम्य शब्दांनीं प्रतिकूल टीका करणें हेंच अशा प्रसंगीं त्याच्या हिताचें होईल. पुढल्या निराशेपासून होणारें दुःख कमी करणें हा एक व्यक्तीचा फायदा आहे; परंतु दुसरा समाजाचाही फायदा त्यापासून आहे. ज्या काव्यांत खरें कवित्व नाहीं, व ज्या पुस्तकांत अथवा निबंधांत महत्त्वाचे विचार किंवा माहितीही नाहींत, त्याच्यासाठीं कागद, शाई व छापण्याचे श्रम हीं तर व्यर्थ जातातच, पण शिवाय उपयुक्त ग्रंथाच्या प्रसारालाही त्याच्यापासून फार अडथळा होतो. ह्याकरितां अशा अनेक प्रसंगीं प्रशंसेचें संयमन करणें किंवा निदान ती मर्यादित करणें जगाच्या हिताचें आहे. निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उपदेश करण्याचें हें एक अत्युत्कृष्ट स्थळ आहे.

मनुष्याचा स्वभाव असा कांहीं चमत्कारिक आहे कीं, कोणतीही चाल एकदां प्रचारांत आली म्हणजे तिच्या आवश्यकतेकडे किंवा उपयुक्ततेकडे न पाहतां, डोळे मिटून तीप्रमाणें करीत असावयाचें. युरोपियन लोकांमध्यें स्त्रियांना गाणें व सुराचे पेटीवर वाजविणें शिकविण्याची एक चालच पडली आहे. ज्या स्त्रीला तें येत नसेल तिचें शिक्षण बरोबर झालेलें नाहीं असें लोक समजतात. करमणुकीकरितां सायंकाळीं मित्रमंडळीचे स्त्रीपुरुषमिश्रित समाज किंवा मेळे जमविण्याची त्या लोकांत फार चाल आहे. हे मेळे जमले म्हणजे स्त्रिया आपल्या गायनवादनादि कलांनीं मंडळीचें मनोरंजन करितात. ह्या गोष्टीचा येथें उल्लेख करण्याचें कारण एवढेंच कीं, अशा कित्येक प्रसंगीं त्यांच्या गायनवादनानें करमणूक होण्याचें तर दूरच राहिलें, पण उलट त्रास आला तरी मनांतल्या मनांत चुरमुरे खाऊन बाहेर "वाः काय आजचा दि-

चस आनंदानें गेला ! ह्या लहान वयांत चांगलें कौशल्य संपादन केलें आहे" इत्यादि गौरवाचक शब्दांनीं त्यांचें अभिनंदन करण्याचा मंडळीस प्रसंग येतो. ज्याप्रमाणें तरुण मुलींनीं गाणें वाजविणें शिकलेंच पाहिजे, त्याप्रमाणें तें कसेंही असलें तरी ऐकणारांनीं त्याचा गौरव केला पाहिजे, नाहींतर तें असभ्यपणाचें लक्षण समजलें जाईल. ह्या गौरवांत असत्याचा अंश असल्यामुळें त्याचें संयमन करणें जितकें अवश्य आहे, तितकेंच त्याच्यापासून समाजावर होणाऱ्या वाईट परिणामामुळेंही आहे. स्त्रियांच्या शिक्षणाच्या संबंधानें लोकांच्या समजुती मूर्खपणाच्या असल्यामुळें अनेक मुलींवर हा जुलूम होत आहे. मुलीला त्या विषयाची गोडी असो वा नसो, तिला त्या शिक्षणक्रमांतून एकदां गेलेंच पाहिजे. ह्या सुधारणेच्या युगांत सर्वांना एकाच प्रकारचें शिक्षण देऊन विद्येच्या गिरणींतून बाहेर पडण्याची जी घातक चाल पडली आहे तिला अनुसरूनच स्त्रीशिक्षणाचे अभ्यासक्रमांत गायनवादनादि कलांचा समावेश केला आहे. ह्यामुळें किती मुलींना व त्यांच्या शिक्षकांना विनाकारण त्रास पडत आहे व काळांचा आणि पैशाचा अपव्यय होत आहे ह्याची कल्पना करितां येणार नाहीं. आपणांस बऱ्याच गोष्टींत इंग्लिश लोकांचें अनुकरण केलें पाहिजे, परतु अशा गोष्टी टाळितां येतील तर बऱ्या. गायनवादनादि कलांसारखें श्रेष्ठ प्रतीचें करमणुकीचें साधन दुसरें नाहीं खरें, परंतु ज्यांस त्या कला साध्य होण्यासारख्या असतील त्यांनींच त्यांवर श्रम करावे. सर्वांना विनाकारण त्रास देणें हा मूर्खपणा आहे.

ज्यांना परप्रशंसेच्या संबंधानें वर्तमानपत्रांतून वगैरे प्रसिद्धपणें लेख लिहिणें असतील त्यांनीं तर फारच सावधगिरी राखिली पाहिजे. त्यांनीं एकाद्या चालीची किंवा व्यक्तीच्या कृतीची अयथार्थ किंवा अस्थानीं स्तुति केली असतां तिच्यापासून फारच अपाय होण्याचा संभव आहे.

हांजीहांजी सारखाच एक परप्रशंसेचा प्रकार चोहोंकडे फार पसरलेला आहे, तो कमी करण्याकरितां निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उपयोग करणें अवश्य आहे. बड्या लोकांची खुशामत करण्याच्या स्पष्ट किंवा अस्पष्ट इच्छेमुळें "रावसाहेबांसारखेंच माझें मत आहे" असें म्हणणारे पुष्कळ लोक आहेत. दुसरे कित्येक लोक खुशामत करण्याचें कांहीं कारण नसतांही सर्वांस खुष करण्याचा स्वभावच असल्यामुळें असा प्रकार करीत असतात. प्रत्येक वेळीं विरुद्ध पक्ष घेऊन भांडत सुटावयाचें व आपलें मत दुसऱ्याच्या मतांना

कधींही जुळूं द्यावयाचें नाहीं अशा प्रकारचे कांहीं लोक आढळतात, त्यांचा जसा तिरस्कार करणें योग्य आहे, तसाच जे लोक आपल्या डोक्याला कधींही त्रास न देतां दुसऱ्याच्या विचारावर अवलंबून राहून, प्रसंग आला असतां "माझे विचार आपणासारखेच आहेत" असें म्हणून मात्र माना डोलवीत बसतात त्यांचाही तिरस्कार केला पाहिजे. अशा वर्तनांत एका प्रकारच्या सदयपणाचा अंश असण्याचा संभव आहे, पण ती एक गुलामगिरीच होय.

दुसऱ्याच्या विचाराशीं आपले विचार जुळते करून घेण्याच्या ह्या प्रकारांत असत्याचा अंश असल्यामुळें त्याचा निषेध करणें जरूर आहे. ज्या मनुष्यांना कोणत्याही गोष्टीची फारशी माहिती नसेल त्यांची गोष्ट वेगळी. परंतु ज्यांना अनेक विषयांची थोडीथोडी माहिती असेल व ज्यांना स्वतंत्रपणें विचार करण्याची संवय असेल, त्यांचीं अनेक विषयांवर मतें बनलेलीं असतात. आपल्या मताशीं न जुळणाऱ्या अशा अनेक मतांचें प्रतिपादन केलेलें ऐकण्याचा प्रत्येकास पुष्कळ वेळां प्रसंग येतो. ह्या प्रसंगीं सत्याची चाड ठेवून वागणें म्हणजे आपलें विरुद्ध मत शब्दांनीं किंवा मुद्रेनें प्रदर्शित केलें पाहिजे. इतर दुष्परिणाम टाळण्यासाठींहीं तसें करणें भाग आहे व म्हणूनच ह्या गोष्टीचा निवृत्त्यात्मक परोपकाराशीं संबंध पोहोंचतो. आपण कांहींच बोललों नाहीं किंवा दुसऱ्याच्या मताप्रमाणें बोलशों तर तो मनुष्य खुष होईल खरा, पण त्यामुळें त्याचे दोन प्रकारचे तोटे होण्याचा संभव आहे. एक, त्याच्या चुकीच्या मतामुळें त्याचें नुकसान होण्याचा संभव असल्यास, त्याचें नुकसान करण्यास आपण मदत केल्यासारखें होईल व दुसरा, आपले विचार बरोबर आहेत ह्याबद्दल त्यास विनाकारण अभिमान उत्पन्न होईल. जोंपर्यंत एका मनुष्याचे विचार दुसऱ्याच्या पुढें आले नाहींत तोंपर्यंत त्याच्यासंबंधानें बोलण्याचें कारण नाहीं, परंतु जेव्हां दुसऱ्याचे विचार आपल्या पुढें येतात व आपण बोललें नाहीं तर आपलेही विचार त्याच्याच सारखे आहेत असें समजलें जाण्याचा संभव असतो, त्यावेळीं स्पष्टपणें बोलण्याची अवश्यकता उत्पन्न होते. 'होस हो' म्हणण्याच्या संवईमुळें संभाषणांत बुद्धिचापल्याची जी एक मौज असते ती नाहींशी होते. नेहमीं आपलीं मतें दुसऱ्याच्या मताशीं जुळविण्याचा यत्न करणें म्हणजे, नानाप्रकारचीं मतें व निरनिराळ्या व्यक्तींच्या विचारांनीं त्यामध्यें उत्पन्न होणारे सूक्ष्म भेद ह्यामुळें विचारसृष्टीस जें वैचित्र्य व रमणीयत्व आलें आहे त्याविषयीं अरसिकपणा दाखविणें होय.

ज्या ठिकाणीं आपला मतभेद प्रसिद्धपणें दर्शविण्यानें विशेष फायदा होण्याचा संभव नसेल त्या ठिकाणीं मौन धरण्यांतच शहाणपणा आहे; तथापि आपली मुद्रा व अंगविक्षेप ह्यांच्या साह्यानें आपला मतभेद लोकांच्या लक्षांत येईल अशी खुबी केली पाहिजे. दुसऱ्या मनुष्यांना वाईट न वाटेल अशा रीतीनें आपला मतभेद त्यांना कळविणें हें मोठ्या शहाणपणाचें काम आहे. पुष्कळ लोकांच्या अंगीं शहाणपण नसल्यामुळें, मतभेद वैमनस्याला कारण होतो.

हल्लीं मानपत्रें व त्यांबरोबर कांहीं देणग्या देण्याचा प्रघात बराच फैलावत चालला आहे. आपल्या कर्तव्याहून अधिक ज्यांनीं कांहीं केलें नाहीं किंवा आपलें कर्तव्यही ज्यांनीं चांगल्या रीतीनें बजाविलें नाहीं असे बडे कामगार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं लागले म्हणजे त्यांस लहानमोठ्या सभा करून मानपत्रें देणें ही एक नित्य व्यवहारांतीलच गोष्ट होत चालली आहे. निवृत्त्यात्मक परोपकारानें तिचा प्रतिबंध करणें जरूर आहे.

कोणत्याही चालीची प्रथमतः सुरुवात होते तेव्हां तिचे उद्देश चांगले असतात, परंतु ती गतानुगतिक लोकांच्या हातांत सांपडली म्हणजे तिची दुर्दशा होते. जर एकाद्या मनुष्यानें आपल्या अलौकिक गुणांनीं समाजाचें कल्याण केलें असेल तर त्याचा बहुमान करून आपली कृतज्ञता दर्शविणें योग्य आहे; परंतु अंगीं गुण नसतां एकाद्याचा बहुमान करणें म्हणजे ह्या स्तुत्य चालीचा दुरुपयोग करणें होय. ह्या चालीचा असा दुरुपयोग होऊं देणें इष्ट नाहीं असें बऱ्याच लोकांस वाटतें, परंतु योग्य प्रसंगीं त्यांच्याकडून स्पष्टपणें नाखुषी दर्शविली जात नाहीं. एकाद्या मनुष्याचा बहुमान करावयाचा झाला म्हणजे त्यास सोन्याचें घड्याळ, नक्षीची पेटी, मुलाम्याच्या चौकटींत बसविलेली त्याची तसबीर वगैरे कांहीं देणगी देण्याचा विचार ठरतो. ज्या मनुष्याचा असा सन्मान करणें असेल तो जर लोककल्याणाविषयीं खरी कळकळ बाळगणारा व लोकस्थिति जाणणारा असेल तर त्याला, आपल्यासाठीं आपल्या मित्रांनीं नुकसान सोसावें त्यापक्षीं आपणास असा मानच न मिळेल तर बरा, असें वाटेल. दुसरीही एक गोष्ट त्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. अशा प्रसंगीं पुष्कळ लोक जे वर्गण्यांचे आंकडे घालीत असतात ते केवळ एका प्रकारच्या जुलुमानें घालीत असतात. अशा रीतीनें आपणासाठीं आपल्या मित्रांवर जुलूम व्हावा व त्यांजकडून बाह्यात्कारीं वाह-

वा मिळवून घ्यावी अशी इच्छा शाहणा मनुष्य कधींही करणार नाहीं. ह्या कामासाठीं वर्गण्या द्याव्या लागल्यामुळें आणखी एक नुकसान होतें. मध्यम प्रतीच्या लोकांजवळ पैशाची पुंजी बेताचीच असते, तेव्हां त्यांजकडून मारून मुटकून अशा कामासाठीं वर्गण्या घेतल्या म्हणजे दुसऱ्या चांगल्या परोपकाराच्या कामांकडे त्यांजकडून व्हावी तितकी मदत नाहीं. लोकहिताकडे लक्ष देऊन अशा कामीं मदत करणें हें निवृत्त्यात्मक परोपकाराच्या दृष्टीनें इष्ट आहे.

ज्याला फारशी किंमत पडत नाहीं असें नुसतें मानपत्रच द्यावयाचें असलें किंवा सभेंत शाब्दिक ठराव करावयाचा असला तरी देखील त्यांत मन न घालण्याला अनेक कारणें असतात. अशा प्रकारच्या बहुमानाची ज्यांची खरी योग्यता असते त्या लोकांस तो पुष्कळ वेळां मिळत नाहीं व ज्यांची तशी योग्यता नसते त्यांस तो मिळतो. चार खटपटी मंडळींच्या मनांत ज्या मनुष्याला हा मान द्यावयाचा असतो त्याच्या अंगांत विशेष गुण नसले तरी लोक भिडेनें कांहीं बोलत नाहींत. अशा रीतीनें लोकमत पाहिजे तसें वाहवत जातें. बरें, जें मानपत्र द्यावयाचें त्यांत तरी त्या मनुष्याच्या गुणांचें यथार्थ वर्णन आढळेल काय ! दोषांचा तर आंत प्रवेश होणें अशक्यच; गुण मात्र एकही बाहेर न राहतां प्रत्येकाची कांहीं तरी पट व्हावयाची. अशा प्रसंगांपैकीं शेंकडा नव्याण्णव, केवळ आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविल्याबद्दल किंवा तितकेंही त्यांच्या हातून झालेलें नसतां, बहुमान करण्याचे असतात. प्रत्येक मनुष्यानें आपलें कर्तव्य करणें जरूर आहे व कोणाला प्रसिद्धपणें मान देण्याचें कांहीं कारण नाहीं. कीर्ति मिळविण्यासाठीं आपलें कर्तव्य करावें अशी इच्छा मनुष्याच्या मनांत उत्पन्न होऊं देणें चांगलें नाहीं.

परप्रशंसेपासून मनाला निवृत्त करण्याला वर सांगितलेलें कारण महत्त्वाचें आहे. मनुष्याच्या उत्पत्तीपासून आजपर्यंतचा त्याचा सामाजिक इतिहास पाहिला असतां, आजपर्यंत जें समाजाचें हित झालें आहे तें स्वार्थाच्या किंवा ज्यांत स्वार्थाचें प्राबल्य विशेष असून परार्थाची थोडी झांक मात्र आहे अशा वर्तनानें झालेलें आहे. आणि जोंपर्यंत परार्थाविषयींचे उन्नत विचार मनुष्याच्या वर्तनाला वळण लावण्याइतके प्रबल झाले नाहींत तोंपर्यंत परार्थाचा ज्यांच्याशीं बराच संबंध आहे असे स्वार्थमिश्रित मनोविकार नाहींसे होणें चांगलें नाहीं. कीर्ति, मोठेपणा, प्रतिष्ठा ह्यांच्याच इच्छेनें आजपर्यंत मनुष्य चांगलीं कामें करण्यास प्रवृत्त झाला आहे. कर्तव्याची चाड किंवा

भूतदया ह्यांचा त्याच्या मनावर तितका परिणाम होत नाहीं. आपलें कर्तव्य करावयाचें असलें तरी तें केल्यानें आपली प्रशंसा होईल हा एक विचार मनुष्याच्या हातून तें करविण्याला कारण होत असतो; मग केवळ परोपकार करावयाचा असतां त्यानें कीर्तीची इच्छा केल्यास फारसें आश्चर्य नाहीं. एका हातानें केलेला परोपकार दुसऱ्या हातास कळूं देऊं नये असेही थोर विचार क्वचित् आढळून आले आहेत; परंतु जगांत जिकडेतिकडे अन्याय आणि लबाडी यांचेंच साम्राज्य असल्यामुळें, कोणत्याही हेतूनें न्यायाचें वर्तन करणारा मनुष्य आढळला, म्हणजे त्याची प्रशंसा करावी अशी बुद्धि आजपर्यंत होत आली आहे. परंतु ही स्थिति बदलण्याविषयीं यत्न केला पाहिजे. मनुष्यजातीची नीतिमत्ता दिवसेंदिवस वाढत चालली आहे ही गोष्ट निर्विवाद आहे, व ती जितकी वाढेल तितकी वाढविण्याविषयीं यत्न करणें जरूर आहे. मनुष्याच्या उन्नतपदवीला कमीपणा आणणाऱ्या कीर्ति, मोठेपणा, प्रतिष्ठा इत्यादि मनोविकारांच्या ऐवजीं कर्तव्यबुद्धि, भूतदया, निरपेक्ष परार्थबुद्धि इत्यादि श्रेष्ठ मनोविकार उत्पन्न झाले पाहिजेत. जसजसें ह्या मनोविकारांचें प्राबल्य होत जाईल तसतशी लोकांनीं आपली वाहवा करावी ही मनुष्याची इच्छा कमी होत जाईल; आणि ज्यांना मान द्यावयाचा त्यांना त्याची किंमत वाटत नाहींशी झाली म्हणजे तो देण्याचीही इच्छा लोकांना होणार नाहीं. मनुष्यजातीच्या कल्याणाविषयीं दूरवर विचार केला असतां अनेक प्रसंगीं परप्रशंसेच्या इच्छेचें संयमन करणें व विशेषतः ज्या ठिकाणीं तिच्याविषयीं फारच आतुरता दिसून येईल त्या ठिकाणीं तर अवश्य तसें करणें फार जरूर आहे.

# प्रवृत्त्यात्मक परोपकार

## प्रकरण ७

### विवाहित स्त्रीपुरुषांचे परस्परांवर उपकार

ऐतिहासिक कालापासून मनुष्यजातीचा जो लिहिलेला इतिहास आढळतो त्यांत अत्यंत शोचनीय गोष्ट म्हटली म्हणजे पुरुषजातीचें स्त्रीजातीशीं वर्तन ही होय. ऐतिहासिक कालाच्या पूर्वीचा इतिहास जर उपलब्ध असता तर त्यासंबंधानें ह्याहूनही शोचनीय स्थिति दिसून आली असती. ह्यापेक्षांही भयंकर गोष्टी मनुष्याच्या इतिहासांत शेंकडो आहेत. मनुष्यभक्षकपणा, लढाईत सांपडलेल्या लोकांस नानाप्रकारचे हाल करून मारण्याची चाल, देवांना आणि भुतांना जिवंत प्राण्यांचे किंवा जिवंत माणसांचे बळी देण्याची चाल, इत्यादि प्रकार अंगावर शहारे आणणारे आहेत. परंतु हे प्रकार क्वचित् होणारे असून त्यांचे परिणामही त्या त्या काळापुरते व त्या त्या व्यक्तीवर होणारे असतात. स्त्रीजातीला जनावरांप्रमाणें वागविण्याच्या चालीची गोष्ट अगदीं निराळी आहे. एक तर ही चाल सर्वव्यापी होती असें दिसून येतें, व शिवाय तिचे परिणामही चिरकालिक आहेत. ह्याकरितां ह्या चालीला अत्यंत शोचनीय गोष्ट असें वर म्हटलें आहे. सुधारलेल्या, अर्धवट सुधारलेल्या, व ज्या लोकांत सुधारणेचा फारच थोडा प्रवेश झाला आहे अशा लोकांची स्थिति पाहिली, व ह्या प्रत्येक स्थितींत स्त्रियांना कोणत्या प्रकारच्या दास्यांत रहावें लागत आहे व त्यांच्यावर कसकसे जुलूम होत आहेत हा विचार मनांत आणिला, म्हणजे हजारों वर्षेपर्यंत रानांत भटकत राहणाऱ्या लोकांमध्यें स्त्रियांची किती हृदयद्रावक स्थिति असेल ह्याचा थोडासा अजमास करितां येईल. एकंदरींत आजपर्यंत स्त्रीजातीनें जें दुःख भोगिलें आहे व जें अजूनही तिच्या कपाळचें सुटण्याचा रंग दिसत नाहीं त्याची कल्पना करणें कठिण आहे.

व्यक्तीव्यक्तींत जसा जीवनार्थकलह चाललेला असतो तसाच तो व्यक्तिसमुदायांतही असतो. रानटी लोकांच्या अनेक जातींमध्यें हल्लींही मोठमोठालीं रणें माजलेलीं आढळून येतात. पूर्वीं ज्यावेळीं पृथ्वीवर सर्वच लोक रानटी होते त्यावेळीं तर सर्व जग युद्धमय होतें. "बळी तो कान पिळी" हें त्या वेळचें मुख्य वर्तनतत्त्व होतें. हल्लींही तें अगदीं नाहींसें झालें आहे

असें नाहीं, तरी त्याचें भयंकर स्वरूप बऱ्याच अंशानें कमी झालें आहे. ह्या तत्त्वास अनुसरून बलवान् लोकांनीं दुर्बलांस पादाक्रांत करून आपले दास करावे अशी जिकडेतिकडे स्थिति होती. शत्रूला पाहिजे तशा क्रूरपणानें वागविण्याची संवय मनुष्यांना होऊन तिचा परिणाम त्यांच्या इतर वर्तनावरही होऊं लागला. जातींतल्या जातींतही प्रबलांनीं दुर्बलांना पाहिजे त्या रीतीनें वागवावें व त्यांवर पाहिजे तसा जुलूम करावा. मनुष्याच्या मनांत स्वार्थावांचून दुसरे विचार येण्याला अवकाशच नव्हता. अशा स्थितींत स्त्रियांनाही आपल्या स्वाभाविक दुर्बलतेचा परिणाम भोगावा लागे. स्त्रियांना किती वाईट रीतीनें वागवावें ह्याला कांहीं सीमा नव्हती. स्त्रीला अतिशय निर्दयपणानें व क्रूरपणानें वागविल्यानें आपणास तिच्यापासून व्हावा तितका फायदा न होतां उलट त्रास होतो असा विचार मनांत येऊन पुरुषाचा क्रूरपणा थोडासा कमी झाला तर झाला. अज्ञानावस्थेंत दूरचे परिणाम मनांत येणें अशक्यच असतें व राग येण्याला थोडें कारण पुरतें. ह्यामुळें वरील विचाराचाही उपयोग फार थोडा होणार. स्त्रियांना अतिशय वाईट रीतीनें वागविल्यामुळें त्या अपत्यसंगोपनाच्या कामाला अयोग्य होऊन दिवसेंदिवस एकाद्या जातींतील लोकांची संख्या कमीकमी व्हावी व कालान्तरानें ती जाति समूळ नष्ट व्हावी, असेंही होणें शक्य आहे. आणि बहुतकरून ह्या कारणामुळें अनेक रानटी लोकांच्या टोळ्यांचें निर्मूलन होऊन, ज्या टोळ्यांतील लोकांत स्त्रियांस कमी क्रूरतेनें वागविण्याची चाल असेल त्यांच्या जीवनास उत्तेजन मिळालें असेल.

ज्या स्त्रियांना फार प्राचीन काळापासून आजपर्यंत पुरुषांकडून अतिशय क्रूरपणाची वागणूक मिळाली आहे व ज्यांना अद्यापि मिळत आहे, त्यांच्या अंगीं म्हणजे पुरुषांपेक्षां अधिक असे कांहीं विशेष गुण होते किंवा आहेत असें नाहीं. त्यांचेही स्वभाव परिस्थितीला अनुरूप असेच बनलेले होते व आहेत. पूर्वीं एका ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें क्रिया व प्रतिक्रिया ह्यांचें पंचमहाभूतात्मकसृष्टींत जितकें महत्त्व आहे तितकेंच तें मानसिक किंवा विचारसृष्टींतही आहे. पुरुषांच्या ह्या आचरणाचा परिणाम प्रतिक्रियेनें स्त्रियांवरही होतो. दोघांचेही स्वभाव सारखेच क्रूर बनतात. जिला नवऱ्याकडून अतिशय क्रूरपणाची वागणूक मिळते तिचें आपल्या मुलांशीं वर्तनही तितक्याच क्रूरतेचें असतें. उत्तर अमेरिकेंतील कित्येक रानटी लोकां-

च्या टोळ्यांत, लढाईत पकडून आणलेल्या लोकांचे हालहाल करण्यांत पुरुषांपेक्षां स्त्रियाच अधिक पटाईत आहेत असें आढळून आलें आहे. ह्यासंबंधानें ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट इतकीच कीं, ज्या व्यक्तींच्या किंवा व्यक्तिसमुदायांच्या अंगीं मनुष्याच्या अमर्याद स्वार्थाला प्रतिबंध करण्याचें सामर्थ्य नव्हतें त्यांजवर शक्य होते तितके दुष्परिणाम झाले आहेत. ह्या सर्वसामान्य परिणामाचाच एक मोठा भाग स्त्रीजातीच्या वांट्यास आला आहे. सर्व प्रकारचीं श्रमाचीं, त्रासाचीं व जिकिरीचीं कामें करणें, पुरुषांच्या सुखांकरितां पाहिजे तितकें दुःख सोसणें, पुरुषांची तृप्ति होईपर्यंत आपण उपाशीं राहणें व उरेल पुरेल त्यांत आपला निर्वाह करणें, हा स्त्रियांचा कर्तव्यक्रम होऊन बसला आहे.

टोळ्याटोळ्यांतील व राष्ट्राराष्ट्रांतील लढाया कमी होऊन जसजसा शांततेचा अनुभव लोकांस मिळत गेला, तसतसा स्त्रीजातीला हितावह असा पुरुषजातीच्या मनांत थोडथोडा विचार येऊं लागला. आपल्या जुन्या ग्रंथांतून कांहीं ठिकाणीं स्त्रीजातीचा गौरव करणारे व इतर बऱ्याच ठिकाणीं स्त्रीजातीचें हीनत्व ध्वनित करणारे असे जे लेख दिसून येतात त्यांचें कारण असें दिसतें कीं, ते ग्रंथ लिहिले त्यावेळीं स्त्रीजातीच्या संबंधानें पूर्वीच्या प्रतिकूल ग्रहांचा मनावर दाब असतांनाच नवीन अनुकूल विचारांचाही प्रादुर्भाव होऊं लागला होता. असा विचारांत फरक झाल्यापासून पुरुषजातीचें स्त्रीजातीशीं वर्तन दिवसेंदिवस सुधारत चाललें आहे. स्त्रियांना कांहीं हक्क म्हणून आहेत अशा प्रकारचे विचार आतां लोकांचे मनांत येऊं लागले आहेत व त्या विचारांना अनुकूल अशा प्रकारचे मनोविकारही त्यांच्यांत उत्पन्न होऊं लागले आहेत.

पुरुषांच्या स्त्रियांना वागविण्याच्या पद्धतींत जी अतोनात सुधारणा झाली आहे ती पूर्वीच्या वर्तनाचें क्रूरत्व मनांत येऊन ज्ञानतः झाली आहे असें नाहीं. परिस्थिति बदलल्यामुळें हळूहळू मनुष्याचा स्वभावही बदलत चालला व इतर गोष्टींत जशी त्याची क्रूरता कमी होत गेली तशीच स्त्रियांच्या संबंधानेंही कमी झाली. पूर्वीच्या रीतीभातींत थोडथोडा फरक पडत जाऊन नवीन चाली बसत गेल्या. स्त्रियांना क्रूरतेनें वागविणें हा अन्याय आहे असें मनांत आणून लोकांनीं आपल्या त्या संबंधाच्या जुन्या चाली टाकिल्या व नव्या घेतल्या, असा प्रकार झालेला नाहीं. स्त्रियांना पुरुषांकडून जे हल्लीं

नानाप्रकारचे हक्क मिळालेले आहेत त्यांचीं दोन मुख्य कारणें आहेत:–निकट संबंधाच्या स्त्रियांविषयीं पुरुषांच्या मनांत साहजिक प्रीति असते हें एक, व सामाजिक रूढींच्या धोरणानें वागण्याची मनुष्यांची प्रवृत्ति असते हें दुसरें. पुष्कळ ठिकाणीं पुरुष स्त्रियांस ममतेनें वागवीत असले तरी त्यांच्या हक्कांच्या संबंधानें कोणत्याही नीतितत्त्वाचा त्यांनीं स्पष्टपणें अंगीकार केलेला नाहीं व त्यांचें वर्तन नीतिविचारांचा परिणाम नसून वर दर्शविलेल्या अन्य कारणांमुळें घडून आलेलें आहे.

प्रबल आणि दुर्बल ह्यांच्यामधील भेद व त्याचे दुष्परिणाम कमी करण्याचा यत्न करणें हा परोपकाराचा उद्देश आहे असें पूर्वीं अनेक वेळां दर्शविलें आहे. सर्वांना व्यक्तिस्वातंत्र्य मिळावें ह्यासाठीं न्यायतत्त्वांच्या दृष्टीनें प्रत्येक व्यक्तीला जीं बंधनें उत्पन्न झालीं आहेत, त्यांनीं हें कार्य व्हावें तितकें होत नाहीं. ज्या ठिकाणीं न्यायाची मर्यादा संपते तेथून परोपकारास आरंभ होतो. आपापल्या धंद्यांत आपापल्या शक्तींचा पूर्ण उपयोग करण्याची सवलत न्यायानें सर्वांस दिल्यानंतर, धंद्याचें तेज व धंदा करणाराचें कौशल्य ह्यांपासून निरनिराळ्या व्यक्तींस जी फलप्राप्ति होणार तिचें वैषम्य कमी करणें हें काम परोपकाराडे येतें. स्त्रीजाति आणि पुरुषजाति हे जे मानवीसृष्टीचे दोन मुख्य भाग त्यांच्यामध्यें हें वैषम्य सृष्टिक्रमाला अनुसरून चिरकालिक स्वाभाविक-परिणामांमुळें उत्पन्न झालें आहे, तें कमी करणें हें परोपकाराचें पहिलें काम आहे. मानसिकसामर्थ्याचा प्रश्न एका बाजूस ठेविला असतां, शारीरिक सामर्थ्यांत स्त्रिया पुरुषांची बरोबरी करूं शकणार नाहींत ह्याविषयीं मतभेद होण्याचा संभव नाहीं. ह्या दुर्बलतेमुळें त्यांचे अनेक तोटे झाले आहेत. विशेषत: स्त्रीजातीवर जें पुरुषजातीस राज्य करावयास मिळालें व हल्लींही मिळत आहे, त्याच्या अनेक कारणांपैकीं स्त्रियांचें शारीरिक दौर्बल्य हें एक मुख्य कारण आहे. प्रजोत्पादन आणि बालसंगोपान हीं दोन्ही महत्त्वाचीं कामें स्त्रियांवरच पडल्यामुळें, त्यांचें जीवनकलहाच्या झटापटींत आणखी मागें पाऊल पडलें हेंही निर्विवादच आहे. ह्या दोन गोष्टींकडे लक्ष देण्यांत त्यांच्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग गेल्यामुळें त्यांच्या अंगच्या शक्तींचा उपयोग करण्यास त्यांस अवकाशच मिळत नाहीं. आतां, आपल्या कुटुंबाच्या चरितार्थाचीं साधनें मुख्यत्वेंकरून पुरुषास बाहेरून श्रम करून आणावीं लागतात ही गोष्ट जरी खोटी नाहीं, तरी वर्षानुवर्ष दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपल्या

मुलांकडे सतत लक्ष पुरविण्याची जी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी स्त्रीवर पडत असते, तीमुळें घर हेंच तिचें जग होऊन जातें व तिला आत्मोन्नतीच्या सर्व विचारांना रजा देणें भाग पडतें हेंही खोटें नाहीं. ह्याकरितां, स्त्रीपुरुषांच्या आयुष्यक्रमांत अशा प्रकारचा फरक पडल्यामुळें उभयतांच्या स्थितींत जो भेद पडणें अपरिहार्य झालें आहे त्याचे व पूर्वी दर्शविलेल्या इतर कारणांचे स्त्रीजातीवरील अनिष्ट परिणाम कमी करण्यास पुरुषवर्गानें झटलें पाहिजे.

पुरुषांच्या हातून आजपर्यंतही अशा प्रकारचे प्रयत्न झालेले आहेत. सुधारलेल्या लोकांमध्यें पुरुषांनीं स्त्रियांशीं कोणत्या रीतीनें वागावें ह्याविषयीं ज्या सामान्य रूढि आढळून येतात त्या आपोआप कशातरी उत्पन्न झालेल्या नाहींत. स्त्रियांच्या स्थितीविषयीं पुरुषांच्या मनांत दया उत्पन्न होऊन त्यांच्या स्थितींत सुधारणा करण्याविषयीं त्यांजकडून नकळत यत्न झाल्यामुळें त्या रूढींना तें स्वरूप प्राप्त झालें आहे. अलीकडे स्त्रीजातीवर उपकार करण्याची बुद्धि पुरुषजातीच्या मनांत उत्पन्न होत आहे व तिला अनुसरून आपलें वर्तन ठेवण्याचा त्यांचा नेहमीं यत्न असतो.

कोणत्याही प्रकारच्या आचरणाची दिशा ठरविण्याला तत्संबंधी विचार व मनोविकार कारणभूत होत असतात. जे विचार व मनोविकार सामान्यत: स्त्रीजाति व पुरुषजाति ह्यांच्यामधील संबंध ठरविण्यास अवश्यक आहेत, त्यांचा एक मुख्य भाग विवाहित स्त्रीपुरुषांमधील संबंधाविषयींचे विचार व मनोविकार हा होय. ह्यामुळें वैवाहिक संबंधांत स्त्रीपुरुषांमधील स्वाभाविक वैषम्य कमी करण्यासाठीं मनुष्यानें यत्न करण्याची जितकी अवश्यकता उत्पन्न होते तितकी दुसऱ्या कोणत्याही संबंधांत उत्पन्न होत नाहीं.

ज्यांच्यामध्यें स्वयंवराची चाल आहे त्या लोकांत विवाह झाल्यानंतर कांहीं काळपर्यंत पुरुषाचें स्त्रीशीं वर्तन चांगल्या रीतीचें असतें. शुद्ध जनावरासारखेच जे लोक असतील त्यांची गोष्ट निराळी, परंतु विवाहपाशानें आपणास बद्ध करून घेणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या मनांत आपल्या स्त्रीविषयीं प्रेम आणि तिच्या हक्कांसंबंधीं कल्पना कांहीं काळपर्यंत तरी जागृत राहतात. स्त्रीची दुर्बलता तिच्याविषयीं दया उत्पन्न करण्यालाच कारण होते, व ह्या दयेमुळें आपल्या स्त्रीकडे अधिकाधिकच पुरुषाचें मन ओढतें. असें झाल्यानें तिच्या दुर्बलतेमुळें होणाऱ्या परिणामांपासून तिचें रक्षण करण्याकडे पुरुषाची स्वाभाविक प्रवृत्ति होते. परंतु लग्नानंतर कांहीं काळपर्यंत

दिसून येणारा हा परिणाम बहुतेक लोकांमध्यें सदोदित टिकत नाहीं. पूर्वजांपासून अनुवंशिक संस्कारानें प्राप्त झालेली स्वार्थबुद्धि सुधारलेल्या मनुष्यांत जरी बरीच कमी झाली आहे तरी ती अगदींच नाहींशी झालेली नाहीं. कांहीं काळपर्यंत बाह्य कारणांमुळें जरी ती अदृश्य झाली, तरी तीं कारणें नाहींशी झाल्याबरोबर किंवा त्यांचा जोर कमी झाल्याबरोबर ती पूर्ववत् आपलें स्वरूप प्रकट करिते. विवाहापूर्वीं स्त्रीच्या प्राप्तीसाठीं पुरुषाला अत्युत्कट इच्छा झालेली असते, व तो तिच्या सौंदर्याला आणि गुणांना लुब्ध होऊन तिच्याशीं विवाह करण्यास तयार होतो. परंतु कांहीं काळानें त्याच्या त्या मनोविकारांना दुर्बलता येऊन तो तिच्याशीं तितक्या प्रेमानें वागत नाहींसा होतो, व पुष्कळ वेळां सामाजिक रूढींना अनुसरून ज्या प्रकारची वागवणूक स्त्रियांना देणें अवश्य आहे त्या प्रकारचीही वागवणूक त्याच्या हातून तिला मिळेनाशी होते. अशा प्रकारच्या वर्तनाला कधींकधीं बाह्यात्कारीं तरी कांहीं कारणें असतात परंतु कधींकधीं तींही नसतात.

ज्यांच्यांत स्वयंवराची चाल नसून आपल्या लोकांप्रमाणें आईबापांनीं मुलांमुलींचीं लग्नें करण्याची चाल आहे त्या लोकांतही पुरुषांचें स्त्रियांशीं वर्तन बहुतेक वरच्यासारखेंच असतें. स्वयंवरांत विवाहकालीं व त्यानंतर कांहीं काळपर्यंत स्त्रीपुरुषांची परस्परांवर जी विलक्षण आसक्ति दिसून येते ती लहानपणीं लग्नें झालेल्या वधूवरांत आढळणें शक्य नाहीं. बाकी ज्या मानानें लोकांत स्वार्थदृष्टि असेल व त्यांच्या रीतिभाति ज्या प्रकारच्या असतील त्या मानानें स्त्रियांना बरीवाईट वागवणूक मिळावयाची. पुष्कळ प्रसंगीं स्वार्थाची जास्त उचल होऊन रूढीनें जे हक्क स्त्रियांस दिले असतात ते देखील त्यांस मिळणें कठिण पडतें.

असें होण्याचें कारण परोपकारात्मक नीतितत्त्वांचा मनुष्याच्या मनावर अद्यापि म्हणण्यासारखा परिणाम झाला नाहीं हें होय. सामान्यतः स्त्रीजातीविषयीं कळवळा मनांत बाळगून पुरुषजातीनें जो स्वहितत्याग करावयाचा, किंवा विशेषतः पुरुषानें आपल्या विवाहित स्त्रीसाठीं जो स्वहितत्याग करावयाचा, त्याचा मूळपाया कायम झाल्यावांचून वरील इमारत स्थिर होण्याचा संभव नाहीं. हल्लीं स्त्रीपुरुषांमधील सामान्य संबंध व विवाहित स्त्रीपुरुषांमधील विशेष संबंध निश्चित करणारे वर्तनाचे जे नियम चोहोंकडे आढळून येतात त्यांचा उगम उभयतांच्या सोईमध्यें व रूढींमध्यें आहे असा सर्वत्र

420

समज आहे. हा समज बदलून, त्यांचा उगम परोपकाराच्या तत्त्वांत आहे ही गोष्ट लोकांच्या लक्षांत येणें जरूर आहे. न्याय व परोपकार ह्या दोहोंच्या संमेलनानें मानवनीतिशास्त्र बनलें आहे. ह्या नीतिशास्त्राचे सिद्धांत व त्यांचे उद्देश जोंपर्यंत लोकांच्या मनावर पूर्णपणें ठसले नाहींत तोंपर्यंत केवळ सोईसाठीं व रूढीसाठीं पाळल्या जाणाऱ्या वर्तनाच्या नियमांचें उल्लंघन मनुष्याच्या हातून होण्याचा बराच संभव आहे. सृष्टिक्रमाला अनुसरून स्त्रीपुरुषांमध्यें जें न्यूनाधिक्य स्वाभाविक रीतीनें उत्पन्न झालें आहे, तें करवेल तितकें कमी करण्याची अवश्यकता परोपकारात्मक नीतितत्त्वांमुळें उत्पन्न होते ही गोष्ट पुरुषांनीं आपल्या मनांत ठसविली पाहिजे; व तिला अनुकूल असे मनोविकार उत्पन्न करण्याविषयीं झटलें पाहिजे.

प्रजोत्पादनाचा काळ हा स्त्रियांच्या आयुष्यांतील फार महत्त्वाचा भाग होय. ह्या अवकाशांत मोठ्या जबाबदारीच्या व ज्यांचे परिणाम स्त्रीला जन्मभर सोसावे लागतील अशा गोष्टी घडून येत असतात. या गोष्टींकडे पुरुषांनीं विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. नेहमीं शरीराला स्वास्थ्य नसावें व कधींकधीं तर अगदीं अंथरुणावर पडून राहण्याचा प्रसंग यावा अशी त्यांची स्थिति असल्यामुळें त्यांच्या मनालाही वारंवार असमाधान उत्पन्न होतें. प्रजोत्पादन व बालसंगोपन हीं जीं मोठ्या जोखमीचीं कामें त्यांच्यावर पडलीं आहेत त्यांचा हा परिणाम आहे हें लक्षांत आणून, पुरुषानें विशेष ममताळूपणाचें वर्तन ठेवणें जरूर आहे. स्त्रियांच्या ह्या स्थितींत आणखी एक गोष्ट पुष्कळ वेळां घडून येते, व तिचें कारण लक्षांत न आल्यामुळें पुरुषांचें स्त्रीवरील प्रेम कमी होण्याचा संभव असतो. गरोदर--स्थितींत मुलांच्या पोषणाकडे व त्यानंतर तीं चालतीं बोलतीं होततोंपर्यंत त्यांच्या संगोपनाकडे स्त्रीच्या सामर्थ्याचा इतका व्यय होतो कीं, त्यानंतर केव्हां केव्हां स्त्रियांच्या मानसिक शक्ति बऱ्याच कमी होतात. हा काल सुरू होण्याच्या पूर्वींची स्त्रीची बुद्धि व चलाखी पाहून तिच्या व आपल्या भावी स्थितीविषयीं मनोराज्य करणाऱ्या मनुष्यास अनेक वेळां निराशेचा प्रसंग येतो. बुद्धिमान् व विद्वान् पुरुषास आपल्या स्त्रीनें मदत करावी, आपले अनेक विषयांवरील विचार समजण्याची व आपणाशीं त्या विषयावर वादविवाद करण्याची तिच्या अंगांत योग्यता यावी, व विचारसृष्टींतील एकमेकांच्या सुखदुःखाचें उभयतांनीं वांटेकरी व्हावें, असें वाटणें साहजिक आहे. ह्या त्याच्या आशेचा भंग झाला

म्हणजे आपल्या स्त्रीविषयीं तो निष्काळजी होतो व त्यांच्या संसारसुखाचा भंग होतो. परंतु स्त्रीच्या बुद्धिसामर्थ्यांत जो फरक पडतो त्याचें योग्य कारण लक्षांत आणून पुरुषानें स्वाभाविक रीतीनें घडून येणाऱ्या गोष्टीसाठीं आपल्या गरीब बिचाऱ्या स्त्रीला प्रायश्चित्त भोगावयास लावूं नये. अशा प्रकारचा परिणाम घडून आल्याबद्दल वाईट वाटणें साहजिक आहे. परंतु त्याविषयीं उतावीळपणा दाखवून वर्तनांत बदल करणें बरोबर होणार नाहीं. अशा प्रसंगीं तिच्याविषयीं उलट दया उत्पन्न झाली पाहिजे. कारण, आपल्या नवऱ्याचे आपणाविषयींचे मनोरथ पूर्ण झाले नाहींत व आपणालाही एका वरिष्ठ प्रकारच्या सुखाला मुकावें लागलें असे विचार मनांत येऊन स्त्रीला दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं.

पुरुषानें आपल्या विवाहित स्त्रीसाठीं जो स्वहिताचा किंवा स्वसुखाचा त्याग करावयाचा तो म्हणजे अमर्याद आहे असें नाहीं. उत्क्रमणाच्या ज्या पायरीला मनुष्यस्वभाव पोंचला आहे ती पायरी पूर्ण उत्क्रांतीच्या बरीच खालीं असल्यामुळें मनुष्यस्वभावांत पुष्कळ उणेपणा राहिलेला आहे. त्यामुळें एकपक्षीं परोपकाराच्या दृष्टीनें आपल्या स्त्रीसाठीं ज्या गोष्टींकडे लक्ष देणें जरूर आहे त्यांकडे त्याचें दुर्लक्ष होतें, व अन्य पक्षीं ज्या प्रकारचे हक्क स्त्रीला प्राप्त होणें इष्ट नाहीं व ज्या गोष्टींकडे पुरुषानें लक्ष देण्याचें कारण नाहीं ते हक्क मिळविण्यासाठीं व त्या गोष्टी पुरुषांकडून करविण्यासाठीं स्त्रीकडून यत्न होतो व पुरुषाकडून त्यास अडथळा होत नाहीं. कधींकधीं स्त्रीच्या स्वाभाविक दौर्बल्याचे परिणाम नाहींसे करण्यासाठीं जितक्या गोष्टी पुरुषानें करणें जरूर आहे त्याहून अधिक गोष्टी त्याजकडून करविल्या जातात.

खऱ्या लग्नकालापासून स्त्रीला एक मूल होईपर्यंत जो काळ जातो त्या काळांत विवाहित स्त्रीपुरुषांच्या परस्परांमधील वर्तनाला कायमचें स्वरूप येत असतें. आरंभीं प्रेमातिशयामुळें स्त्रीच्या मनाप्रमाणें वागण्याचा पुरुषाचा क्रम सुरू होतो, व नंतर लवकरच पहिल्या गर्भारपणाचा काळ आल्यानंतर त्यास तिच्या स्थितीकडे लक्ष देऊन तसें वागावेंसें वाटतें. गर्भारपणामुळें स्वभावतः शारीरिक व्याधि उत्पन्न होत असतात व पहिल्या खेपेस अपरिचितपणामुळें त्यांचें भय वाटत असतें. अशा वेळीं आपल्या स्त्रीच्या इच्छेविरुद्ध वागलें असतां तिच्या शरीरावरही वाईट परिणाम होण्याचा संभव आहे असें मनांत येऊन तिच्या मागण्या जरी वाजवीहून अधिक असल्या तरी पुरुषाच्यानें

कै. म. म. ब. वा. पोतदार

त्या नाकारवत नाहींत. अशा प्रकारच्या वर्तनाला एकदां सुरवात होऊन तें पुष्कळ दिवसपर्यंत चालू राहिलें म्हणजे उभयतांचा तसा स्वभावच बनत जातो. एकदां पुरुषाच्या मनावर स्त्रीचा दाब अशा रीतीनें बसून गेला म्हणजे तो काढून टाकण्याचें सामर्थ्य पुष्कळ लोकांच्या अंगांत नसतें. पुरुष गरीब स्वभावाचा व स्त्री नीच स्वभावाची असा जोडा जमल्यावर तर हे परिणाम फारच भयंकर स्थितीस जाऊन पोहोंचतात. पुरुषानें स्त्रीचा दास बनून रहावें आणि स्त्रीनें त्याला पाहिजे त्या ठिकाणीं पाहिजे तसा वांकवावा अशीं उदाहरणें चोहोंकडे बरींच आढळून येतात.

अशा स्थितींत पुरुषानें कोणत्या प्रकारचें वर्तन करावें हें सांगणें कठिण आहे. ह्या प्रश्नाचें उत्तर प्रत्येक व्यक्तीच्या संबंधानें अनेक गोष्टींचा विचार करून निरनिराळें द्यावें लागेल. पुरुषानें स्त्रीला गुलाम करून तिच्यावर आपलें साम्राज्य स्थापित करावें किंवा निदान पुरुषाचें ढळढळीत वर्चस्व स्त्रीवर असावें ही स्थिति तर अनिष्ट आहेच, पण ह्या स्थितीचा व्युत्क्रम होणें त्याहूनही अनिष्ट आहे. कारण, सामान्यतः स्त्रीच्या स्वभावांत सध्यां तरी सत्यासत्यविवेचकबुद्धीचा अंश कमी दिसून येतो व तात्कालिक मनोविकारांच्या उकळीवर त्यांचें आचरण बरेंच अवलंबून असतें. स्त्रियांच्या स्थितीचा विचार करून ज्या सवलती त्यांना देणें योग्य आहे तितक्या दिल्यानंतर जर एकादी स्त्री आपल्या नवऱ्याकडून अधिक सवलती मिळविण्याविषयीं यत्न करूं लागेल, तर त्या तिच्या यत्नांविषयीं पुरुषानें आपली नाखुषी दर्शविली पाहिजे. स्त्रीच्या गर्भारपणांत किंवा दुखण्याबाहण्याचे प्रसंगीं असें करण्यापासून वाईट परिणाम होण्याचा संभव आहे, ह्यासाठीं ते प्रसंग टाळून इतर प्रसंगीं आपल्या हक्कांचें संरक्षण करण्याकरितां पुरुषानें जपणें जरूर आहे. तसें केल्यापासून उभयतांचेंही जीवित अधिक सुखावह होईल. पुरुषाच्या अंगच्या ज्या गुणांमुळें स्त्रीचें मन पुरुषाकडे ओढतें व त्यांच्यामधील प्रेम कायम होत जातें त्यांत त्याचें श्रेष्ठ मानसिकसामर्थ्य हा एक आहे. पुरुषावर आपलें मानसिक वर्चस्व स्थापन करण्याचे स्त्रीचे प्रयत्न चालले असतांना पुरुषानें जर आपलें मानसिकदौर्बल्य व्यक्त केलें तर त्याचे परिणाम उभयतांमधील प्रेमांत कमतरता येणें व वैवाहिक आणि सांसारिक सुखांत व्यत्यय येणें हे होतात. अरेरावी करणाऱ्या व स्त्रियांना वाईट रीतीनें वागविणाऱ्या नवऱ्यांवर स्त्रियांची जितकी प्रीति आढळून येते तितकी त्यांना ममतेनें वागविणाऱ्या व त्यांच्या

स्त्रीजेंत राहणाऱ्या नवऱ्यांवर नसतें असें पुष्कळ वेळां आढळून येतें. हें मनांत आणून स्त्रियांचे अंकित होऊन राहण्याची आपणांवर पाळी येणार नाहीं अशा विषयीं पुरुषांनीं खबरदारी घेतली पाहिजे.

स्त्रीपुरुषांमधील संबंधाविषयींच्या प्रश्नांची उत्तरें नेहमीं त्या त्या काळापुरतीं व त्या त्या लोकांना लागू पडणारीं अशींच देतां येतील. कारण, समाजव्यवस्था सुयंत्र चालण्याला ज्या गुणांची आवश्यकता आहे त्या गुणांची जशी मनुष्यस्वभावांत अद्यापि उणीव आहे, तशी गृहव्यवस्था सुयंत्र चालण्याला अत्यावश्यक अशा गुणांचीही अद्यापि उणीवच आहे. सध्यां सर्व लोकांना सामान्य अशा कांहीं गोष्टी सांगतां येतील. उभयतांमध्यें परस्परांच्या सुखदुःखाचे वांटेकरी होण्याची इच्छा व परस्परांविषयीं उपकारबुद्धि हे गुण असणें अवश्य आहे. ह्या गुणांचा जर दोघांपैकीं एकांत अभाव असेल तर त्यांच्या गृहसुखाचा विघात होईल व तो कशानेंही भरून निघणार नाहीं. पुरुषाची स्त्रीविषयीं जी उपकारबुद्धि तिच्या संबंधानें एवढें म्हणतां येईल कीं, ती वाजवीहून कमी होण्यापेक्षां अधिक झालेली पुरवेल.

विवाहित स्त्रीपुरुषांमध्यें उभयतांच्याही मनांत उपकारबुद्धि असणें अवश्य आहे असें पूर्वीं सांगितलेंच आहे. पुरुषानें स्त्रीवर उपकार करण्याचे प्रसंग ठळक ठळक असून फार थोडे असतात; परंतु स्त्रीनें पुरुषावर उपकार करण्याचे प्रसंग फार येतात व ते अगदीं क्षुल्लक गोष्टींच्या संबंधानें असतात. स्त्रीला पुरुषाच्या अंगच्या स्वाभाविक उणिवा भरून काढावयाच्या नसतात, तरी पुरुषापासून जो तिला फायदा मिळतो व तिच्याकरितां पुरुषाला जो स्वहितत्याग करावा लागतो त्याचा मोबदला पुरुषाला मिळणें अवश्य आहे. हा मोबदला स्त्रीनें पुरुषाला गृहसुख देणें हा होय. हें गृहसुख पुरुषाला देण्यासाठीं स्त्रीला नेहमीं स्वसुखनिरपेक्षबुद्धीनें वागावें लागतें.

संसारकृत्यासाठीं लागणारा पैसा पुरुषाला बाहेरून श्रम करून आणावा लागतो ही गोष्ट स्त्रीनें विसरतां कामा नये. व ह्या उपकाराची फेडही तिनें केली पाहिजे. पुरुषानें ही जबाबदारी आपल्या अंगावर घ्यावी व स्त्रीनें गृहकृत्य संभाळावें. हा श्रमविभाग स्वाभाविकपणेंच उत्पन्न होतो. न्यायाच्या दृष्टीनेंच हीं उभयतांचीं कर्तव्यें ठरतात. तथापि न्यायाच्या दृष्टीनें योग्य असें गृहकृत्य संभाळून स्त्रीला आपल्या नवऱ्याविषयीं उपकारबुद्धि दर्शविण्याला बारीक सारीक गोष्टींत पुष्कळ सवड असते. खरें गृहसुख ह्या लहानसहान

क्षुल्लक गोष्टींवरच फार अवलंबून असतें. एकीकडे रानटी व अर्धवट सुधारले-ल्या लोकांत जर स्त्रियांच्या हक्कांविषयीं व स्वातंत्र्याविषयीं अत्यंत बेपर्वा असे नवरे आढळून आले, तर दुसरीकडे सुधारलेल्या लोकांत फाजील स्वातंत्र्या-चा उपभोग घेणाऱ्या व पुरुषांच्या सुखाविषयीं अत्यंत निष्काळजी अशा बायका दिसून येतात. पुरुषांच्याच हातून होण्यासारखीं अशीं श्रमाचीं व जबाबदारीचीं पुष्कळ कामें रानटी व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें स्त्रियांनाच करावीं लागतात; परंतु सुधारलेल्या लोकांत न्या-यानें स्त्रियांकडे आलेलें गृहकृत्याचें कामही त्यांच्या हातून बरोबर होत नाहीं. पुष्कळ बायका नटण्यामुरडण्यांत व शेजारणीशीं निरर्थक गप्पा मारण्यांत बहुतेक वेळ घालवून गृहकृत्याची हयगय करितात. गृहव्यवस्था सुयंत्र चालली तर संसार म्हणजे स्वर्ग होऊन जातो. पण घरांत जिकडे ति-कडे अव्यवस्था झाली म्हणजे गृहवासाला नरकवासाचें स्वरूप येतें. स्त्री गृह-कृत्यांमध्यें हयगय करणारी असली म्हणजे घरांत नेहमीं असमाधान व धुस-फूस दृष्टीस पडावयाची. श्रीमंत लोकांच्या बायकांपैकीं पुष्कळांना कादंबऱ्या वाचण्याचा, गाड्यांतून वगैरे चैनीनें फिरण्याचा, मैत्रिणीच्या भेटी घेऊन त्यां-च्याशीं गप्पा मारीत बसण्याचा व कशिदे वगैरे काढण्याचा इतका नाद अ-सतो कीं, सैंपाकघरांत जाण्याचा व चाकरलोक वगैरे आपापलीं कामें बरोबर करितात कीं नाहीं हें पाहण्याचा फारसा प्रसंगच त्यांस येत नाहीं. गृहव्यव-स्था ठेवणें हें तर न्यायाच्या दृष्टीनें स्त्रीचें कर्तव्य आहे, व गृहकृत्यासंबंधी बारीकसारीक गोष्टींत आपल्या नवऱ्यास सुख देण्याविषयीं झटणें हें परोपका-राच्या दृष्टीनें तिचें कर्तव्य होऊन राहतें. ह्याशिवाय आपल्या नवऱ्याच्या आ-शा, इच्छा व काळज्या ह्यांच्या संबंधानें स्त्रीनें कळकळ दाखविली पाहिजे, व त्या समजून घेण्याकरितां यत्न करून त्याच्या अत्यंत प्रिय व्यवसायांत त्यास उत्तेजन दिलें पाहिजे. पुष्कळ स्त्रियांकडून हें कांहीं अंशीं स्वाभाविक रीतीनें केलें जातें. तथापि नवऱ्यांचा फुरसतीचा वेळ करमणुकींत घालविण्यासाठीं स्त्रियांकडून जितका व्हावा तितका यत्न होत नाहीं. युरोपियन लोकांत लग्ना-पूर्वी मुलींचा गाणें आणि वाद्यें वाजविणें ह्यांत कितीतरी वेळ जात असतो, पण लग्नानंतर आपल्या नवऱ्याच्या करमणुकीसाठीं फारच थोड्या बायका ह्या कलांचा उपयोग करितात. असें होण्याचें कारण नवऱ्याविषयीं जितकी उप-कारबुद्धि स्त्रीच्या मनांत असली पाहिजे तितकी असत नाहीं हें होय.

तथापि एकंदरींत पाश्चात्य लोकांना ज्या श्रेष्ठ गृहसुखाचा अनुभव मिळतो तो आपल्या लोकांस मिळत नाहीं. आतां तिकडे म्हणजे सर्व लोक स्वर्गसुखाचा अनुभव घेतात व आपले इकडे सर्वत्र नरकवास आहे अशी गोष्ट नाहीं. परंतु साधारण मानानें सभ्य व कुलीन घराण्यांतील लोकांना तिकडे जें गृहसुख मिळतें त्यापेक्षां त्याच स्थितींतील इकडील लोकांना फार कमी मिळतें. तिकडील पुरुषांचा फुरसतीचा वेळ बहुधा कुटुंबांतील स्त्रियांच्या समागमांत जातो. फिरावयास किंवा खेळावयास जावयाचें झालें अथवा सभांना किंवा मेळ्यांना जाणें झालें तरी स्त्रियांना बरोबर घेऊन जाण्याचा तिकडे संप्रदाय आहे. तिकडील स्त्रिया सुशिक्षित असल्यामुळें त्यांना आपल्या नवऱ्यांबरोबर नानाप्रकारच्या विषयांवर संभाषण करितां येतें, व नवऱ्याला करमणुकासाठीं आपल्या घरांतून बाहेर पडण्याची अवश्यकता वाटत नाहीं. कुटुंबांतील सर्व मनुष्यांनीं एकत्र जमून आनंदानें गोष्टी करीत बसण्याचे प्रसंग त्या लोकांना हरहमेश येत असतात. एकंदर कुटुंबांतील मनुष्यांच्या समागमांत त्या लोकांचा जितका वेळ जातो त्याचा फारच थोडा अंश आमच्या लोकांचा जात असेल. दोन दोन मुलें झालीं तरी स्त्रीपुरुषांमधील संकोच कमी होत नाहीं. पुरुष घरांत असले तर त्यांनीं एका दिवाणखान्यांत व स्त्रियांनी दुसऱ्या दिवाणखान्यांत बसलें पाहिजे. पुष्कळ लोक घरीं करमणुकीचें साधन नाहीं म्हणून मित्रांकडे जाऊन खेळत किंवा गप्पा मारीत बसतात. कुटुंबांतील सर्व मनुष्यांनीं एकत्र जमून आनंदानें संभाषण करीत बसण्याचे प्रसंग तर आपलेकडे येतच नाहींत असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्त्रिया सुशिक्षित नसल्यामुळें गृहकृत्यांतील गोष्टींशिवाय त्यांच्या जवळ संभाषणाला दुसरे विषयच नसतात. स्त्रियांचें पुरुषांविषयीं प्रेम व त्यांना खूष ठेवण्याची इच्छा हे गुण आपल्या स्त्रियांमध्यें त्यांच्यापेक्षां थोडेसे अधिकच आहेत असें म्हटलें तरी चालेल; परंतु आमच्या कित्येक असमंजसपणाच्या चालींमुळें व स्त्रियांच्या अशिक्षितपणामुळें नवऱ्यांना घरीं जितकें सुख मिळावें तितकें मिळत नाहीं. स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराबरोबर आमच्या पुरुषांना गृहसुखाचा अनुभव जास्त मिळूं लागेल अशीं चिन्हें दिसत आहेत. पुरुषांचें मन घराकडे लागून राहील व करमणुकीसाठीं त्यास घराच्या बाहेर पडावें लागणार नाहीं अशाविषयीं स्त्रीनें विशेष काळजी घेतली असतां तीपासून उभयतांचेंही गृहसुख वाढेल.

परोपकाराच्या दृष्टीनें विवाहित स्त्रीपुरुषांच्या कर्तव्यांसंबंधी हा वेळपर्यंत विवेचन झालें, आतां त्यांविषयीं एक महत्त्वाची गोष्ट सांगितली पाहिजे. कोणत्याही प्रकारचें आचरण मनापासून व स्वाभाविक रीतीनें झालें असतां तें करणारास व त्याचा परिणाम ज्याच्यावर होतो त्यासही मोठा आनंद होतो; परंतु तेंच नाखुषीनें व मोठ्या यत्नानें झाल्यास उभयतांसही त्यापासून असमाधानच होतें. ह्याकरितां विवाहित स्त्रीपुरुषांनीं आपापली कर्तव्यें करण्यास स्वसंतोषानें तयार झालें पाहिजे, व आपला स्वभावच तसा बनेल अशाविषयीं त्यांनीं यत्न केला पाहिजे.

प्रथमतः अनेक गोष्टी मनुष्याच्या हातून दयेनें व परोपकारानें होत असतात, परंतु त्या तशाच होत राहिल्या म्हणजे त्यांना हक्काचें स्वरूप येतें व त्यांविषयींचे पूर्वींचे विचार नष्ट होतात ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. मेहेरबानीनें दिलेल्या सवलतींना कालान्तरानें हक्काचें स्वरूप आलें म्हणजे उपकर्ता व उपकृत ह्या उभयतांमधील उपकारबुद्धि व कृतज्ञताबुद्धि ह्यांमुळें उत्पन्न होणाऱ्या सुखोत्पादक मनोवृत्ति नाहींशा होतात, व त्यांशीं विरुद्ध अशा दुसऱ्या अनिष्ट मनोविकारांचा उभयतांमध्येंही प्रादुर्भाव होतो. आपले हक्क मिळविण्यासाठीं किंवा कायम राखण्यासाठीं एका बाजूकडून स्वार्थदृष्टीनें प्रयत्न सुरू होतो व दुसऱ्या बाजूकडून नाइलाजानें व नाखुषीनें ते दिले जातात.

ह्यासाठीं स्त्रीपुरुषांच्या सामाजिक संबंधांत व त्याचप्रमाणें वैवाहिकसंबंधांतही न्याय आणि परोपकार ह्या दोन कल्पना जितक्या भिन्न ठेवितां येतील तितक्या ठेवणें इष्ट आहे. न्यायाच्या दृष्टीनें उभयतांचीं कर्तव्यें कोणतीं व परोपकाराच्या दृष्टीनें कर्तव्यें कोणतीं हें डोळ्यांपुढें स्पष्ट राहिल्यानें परोपकाराच्या क्रियांना हक्काचें स्वरूप येणार नाहीं, व सुखोत्पादक मनोविकार उत्पन्न करण्याचें त्यांचें सामर्थ्य नष्ट होणार नाहीं.

वैवाहिकसंबंधांतील उपकाराचें अत्युन्नत स्वरूप म्हटलें म्हणजे विवाहित स्त्रीपुरुषांपैकीं प्रत्येकानें दुसऱ्याला त्याच्या हक्कांचा पूर्णपणें उपभोग घेऊं देण्यासाठीं अत्यंत तत्परता दाखविणें हें होय. जोंपर्यंत प्रत्येकाकडून आपापल्या हक्कांस जपण्याचे व दुसऱ्याच्या हक्कांस आणवेल तितका अडथळा आणण्याचे प्रयत्न सुरू असतील, तोंपर्यंत खरें वैवाहिकसुख मिळणें अशक्य आहे. ज्यावेळीं उभयतांमध्येंही दुसऱ्याकडून उपकार करून घेण्याच्या इच्छेपेक्षां स्वतः

दुसऱ्यावर उपकार करण्याची इच्छा अधिक दिसून येईल, त्यावेळीं स्त्रीपुरुषांना वैवाहिकसुखाचा पूर्ण अनुभव येईल.

---

# प्रकरण ८

## मातापितरांचे मुलांवर उपकार

सामान्यतः विचार केला असतां आईबापांचें मुलांशीं जें वर्तन असतें त्यांत जितका परोपकार दिसून येतो तितका दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या वर्तनांत दिसून येत नाहीं. आईबाप व मुलें ह्यांजमधील संबंधांत आईबापांची स्वार्थबुद्धि मुळींच दिसून येत नाहीं असें नाहीं. कधींकधीं अपत्यहितापेक्षां स्वहिताचेंच प्राबल्य त्यांच्या वर्तनांत अधिक दिसून येतें. अपत्यप्रेमांत देखील स्वार्थाचा बराच अंश असूं शकतो व तो असला म्हणजे मुलांना परिणामीं हितावह काय आहे, हा विचार न करितां आपणाला तात्कालिक सुख कशानें होईल, ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन आईबापांचें वर्तन होत असतें. अशा गोष्टी जरी केव्हांकेव्हां घडून आल्या तरी एकंदरींत मातपितरांची आपल्या मुलांविषयीं उपकारबुद्धि बहुतेक जागृत असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणून ह्या उपकारबुद्धीच्या अवश्यकतेविषयीं त्यांच्या मनावर ठसा उमटविण्याचा यत्न न करितां तिच्या उपयोगांत त्यांच्या हातून ज्या चुक्या होण्याचा संभव आहे त्यांजकडे विशेष लक्ष देणें जरूर आहे.

अविचाराच्या उपकारबुद्धीच्या जागीं विचाराच्या उपकारबुद्धीची योजना केली पाहिजे. जे लोक आपल्या मुलांच्या खाण्यापिण्याकडे व लत्ताकपड्याकडे पाहिजे तितका खर्च करितात व त्यांच्या शारीरिक सुखासाठीं कितीतरी काळजी घेतात, परंतु त्यांच्या मनाला योग्य प्रकारचें शिक्षण देण्याविषयीं व वळण लावण्याविषयीं स्वतः यत्न न करितां परस्पर शिक्षकांकडून तें काम करवितात, त्यांजकडून अपत्यशिक्षणाच्या कामांत बरीच हयगय होते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आपल्या लोकांची मुलांच्या शिक्षणाच्या संबंधानें वर सांगितल्याप्रमाणेंच स्थिति असून त्यांच्या खाण्यापिण्याकडेही द्यावें तितकें लक्ष दिलें जात नाहीं. केवळ गरिबीमुळें जेथें तसा परिणाम होत असेल तेथें इलाज नाहीं. परंतु विवाहादिकार्यांत शक्तीबाहेर पैसा खर्चिल्यामुळें व दागदागि-

त्यांत अडवून ठेविल्यामुळे ज्यांस स्वतःच्या खाण्यापिण्यासंबंधी हाल काढावे लागतात असे थोडे लोक नाहींत. अविभक्तकुटुंबव्यवस्थेमुळें सर्व कुटुंबाचा भार अंगावर पडल्यामुळे ज्यांना स्वतःसाठीं व आपल्या मुलांसाठीं जरूर तितका पैसा खर्च करण्यास सांपडत नाहीं असेही लोक बरेच असतात. ह्या सर्व लोकांनीं मुलांच्या संबंधाचें आपलें कर्तव्य स्मरून वरील प्रकारचे खर्च थोडे कमी केले तर चालण्यासारखें आहे. समाजाच्या व आप्तांच्या संबंधाच्या कर्तव्यांपेक्षां स्वतःच्या संततीच्या संबंधाचीं कर्तव्यें अधिक महत्त्वाचीं आहेत हें सांगावयास नको.

एकंदर लोकसमुदायांत विचाराची जितकी महर्घता आढळून येते तितकी दुसऱ्या कशाचीही येत नाहीं. जगांतील शेंकडा नव्याण्णव लोक आपल्या आजापणजांच्या विचारांवर विश्वास ठेवून चालणारे निपजतात. ह्या गोष्टीवरून जग, त्यांतील पदार्थ व त्यांचे संबंध ह्यांविषयीं त्यांच्या मनाची स्थिति कशी असते ह्याची कल्पना करितां येईल, व वरील सत्य सिद्ध करण्यासाठीं आणखी प्रमाण शोधून काढण्याची अवश्यकता राहाणार नाहीं. बहुतेक सर्व लोक गतानुगतिक असून अंगवळणीं पडलेल्या मार्गानें डोळे मिटून सरळ जाणारे असतात. त्यांतील खांचखळगे व खड्डे त्यांस आपोआप तर दिसत नाहींतच, परंतु ते दाखविले असतांही डोळे उघडून हें काय आहे तें पहावें अशी त्यांस बुद्धि होत नाहीं. कोणत्याही गोष्टीच्या खरेखोटेपणाविषयीं व बरेवाईटपणाविषयीं आपल्या जबाबदारीवर स्वतंत्रपणें विचार करण्याचें त्यांस एका प्रकारचें भयच वाटत असतें. नवीन विचारांच्या संबंधानें इतर सर्व गोष्टींत जें त्यांचें औदासीन्य दिसून येतें तेंच आपल्या मुलांच्या संबंधाच्या वर्तनांतही स्पष्ट दिसत असतें. मुलांच्या खाण्यापिण्यासंबंधानें व लत्त्याकपड्यासंबंधानें काळजी घेतली, व सरकारी किंवा खासगी शाळांत त्यांस फी देऊन पाठविलें किंवा तशी सवड नसेल तर त्यांस शिकविण्याकरितां घरीं पगारदार शिक्षक ठेविले, म्हणजे आपली मुलांच्यासंबंधाची कर्तव्यमर्यादा संपली असा लोकांचा साधारण समज आहे.

परंतु परोपकाराच्या दृष्टीनें आईबापांच्या कर्तव्यांचा विचार केला असतां त्याची मर्यादा अधिक वाढविली पाहिजे. मानसिक शिक्षणाचे कांहीं भाग शिक्षकांवर सोंपविले असतां चालतील व सोईसाठीं तसें करणें जरूरही आहे; परंतु कित्येक भागांकडे आईबापांनीं स्वतः लक्ष पुरविलें पाहिजे. बुद्धि-

विषयक शिक्षणाचा पुढला भाग शिक्षकांवरच सोंपविण्यापासून फायदा आहे, परंतु त्या संबंधाचा आरंभींचा भाग व नितिशिक्षणाला अंगभूत असें जें मनोविकारांचें शिक्षण तें, हीं आईबापांनीं आपल्या हातांत घेतलीं पाहिजेत. ह्या कामांत इतरांनीं त्यांना मदत केली तरी चालेल, परंतु त्यांची जागा इतरांनीं घेऊन चालावयाचें नाहीं. हातांवर खेळविण्याच्या स्थितींत मूल असलें तरी त्याच्या बुद्धीचे व्यापार चाललेले असतात, व आपणास उत्तेजन मिळावें म्हणून तें आईच्या तोंडाकडे पाहत असतें व हातांत कांहीं पदार्थ असला तर तो आईला दाखविण्यासाठीं तिच्या तोंडाकडे करीत असतें. त्यांना बोलतां चालतां येऊं लागलें म्हणजे ज्या नवीन गोष्टी त्यांचे नजरेस पडतात त्यांचें आपल्या बुद्धीनें ग्रहण करून आपण काढिलेलीं अनुमानें बरोबर आहेत कीं नाहींत हें ताडून पाहण्याकरितां तीं आपणावर प्रीति करणाऱ्या मनुष्यांस व विशेषत: मातापितरांस "हें असेंच ना?" "तें तसेंच ना?" अशा प्रकारचे प्रश्न विचारीत असतात. असें करण्यांत आपल्या बुद्धिविषयक व्यापारांस उत्तेजन मिळावें असा त्यांचा हेतु असतो. लहान मुलांची ही इच्छा तृप्त करण्याचें काम इतरांपेक्षां आईबापांकडून विशेष झालें पाहिजे; व नानाप्रकारचे प्रश्न करून नवीन माहिती मिळविण्याची जी अतोनात इच्छा लहान मुलांमध्यें दिसून येते ती तृप्त करून खऱ्या शिक्षणाचा पाया आईबापांनींच घातला पाहिजे. शिक्षणपद्धतीचें स्वाभाविक स्वरूप हेंच होय. अपत्यवात्सल्यामुळें आपल्या मुलांची पदार्थांचें अवलोकन करण्याची व नंतर त्याच्या संबंधानें विचार करण्याची शक्ति पाहून आईबापांस जितकें कौतुक वाटण्याचा संभव आहे तितकें इतरांस वाटणार नाहीं. ह्यासाठीं मुलांच्या बुद्धिविकासाला मदत करण्याचें काम आईबापांच्या हातून जितकें चांगलें होईल तितकें दुसऱ्या कोणाच्याही हातून होणार नाहीं. नानाप्रकारचे प्रश्न करून ज्ञानप्राप्तीची जी अत्युत्कट इच्छा लहान मुलें दर्शवीत असतात ती तृप्त करण्यास अंगीं सहनशीलता पाहिजे. उपकारबुद्धीमुळें शांतपणानें त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास आईबापांस कंटाळा येणार नाहीं. तीं वेळोवेळीं त्यांना समजण्यासारख्या नवीन गोष्टींकडे व विषयांकडे त्यांचें लक्ष वळवून त्यांच्या मनांत अधिकाधिक जिज्ञासा उत्पन्न करण्याविषयीं प्रयत्न करितील. आतां कोणी असें म्हणतील कीं, बापाला बाहेरच्या कामानें थकूनभागून आल्यामुळें व आईला गृहकृत्याच्या दगदगीमुळें हें कर्तव्य करण्याला वेळ सांपडणार नाहीं.

परंतु फार वेळ मिळाला नाहीं तरी रोज नियमानें थोडेंथोडें लक्ष दिल्यानें, मुलांना योग्य मार्गाला लावितां येईल व त्यांच्यामध्यें आपोआप सुधारणा होत जाईल. सुशिक्षित आईबापांना आपल्या मुलांची बुद्धि कसकशी वाढत जाते, ह्याचें लक्षपूर्वक अवलोकन करणें ही एक करमणूकच वाटेल.

मुलांच्या लहान वयांत व तीं प्रौढदशेस येतपर्यंत त्यांच्या आचरणाला योग्य वळण लावण्याची आईबापांची जबाबदारी मुलांच्या बुद्धिविषयक शिक्षणाच्या जबाबदारीहून अधिक आहे. मुलांना घरासारखी नीतिशिक्षणाची दुसरी शाळा नाहीं. आईबापांचें मुलांशीं वर्तन जर असावें तसें असेल, तर मुलांच्या मनांत त्यांच्याविषयीं जें प्रेम व जी पूज्यबुद्धि उत्पन्न होईल त्यांच्या योगानें आईबापांना आपल्या इच्छेप्रमाणें त्यांच्या मनोविकारांना वळण देतां येईल. आईबापांना आपल्या मुलांच्या मनावर एकप्रकारचा जादूसारखा परिणाम करितां येतो, व त्याचा नेहमीं चांगल्या कामाकडे उपयोग करणें हें आपलें कर्तव्य आहे असें शहाण्या मातापितरांस वाटत असतें. आईबाप व मुलें ह्यांच्यामध्यें असा संबंध उत्पन्न झाला पाहिजे कीं अमुकएक प्रकारचें वर्तन आपल्या आईबापांस आवडत नाहीं असें त्यांच्या मुद्रेवरून दिसल्याबरोबर मुलांचें पाऊल जागच्याजागीं थांबलें पाहिजे. अशा प्रकारचा संबंध उत्पन्न झाला म्हणजे मुलांच्या चांगल्या वर्तनाबद्दल पसंती व वाईट वर्तनाबद्दल नाखुषी दर्शविल्यानें काम होणार आहे. शारीरिक शिक्षा व धाक ह्यांचा उपयोग करण्याचा फारसा प्रसंगच येणार नाहीं. इतक्या पायरीस जाऊन पोंचणें हें जरी सध्यांच्या स्थितींत बहुतेकांच्या आहाराबाहेर आहे, तरी आरंभापासून हा कित्ता डोळ्यांपुढें ठेवून वर्तन केलें असतां, मुलांना नीतिशिक्षण देण्याचें काम कंटाळवाणें न होतां आनंददायक होईल. परंतु मुलांच्या स्वभावाच्या धोरणानें व वेळोवेळीं येणाऱ्या अडचणींच्या मानानें आपला वर्तनक्रम ठरविण्यास मनुष्याच्या अंगीं कल्पकपणा मात्र असला पाहिजे.

आईबापांचीं कर्तव्यें त्यांच्या हातून चांगल्या रीतीनें तडीस जाण्यास किती जरी अडचणी असल्या तरी त्यांत शरीरसंगोपनाप्रमाणेंच त्यांच्या मनःसंगोपनाचाही समावेश होतो ह्यांत संशय नाहीं. मुलांना जगांत राहण्यास योग्य असें करणें जरूर असेल तर एका प्रकारची योग्यता त्यांच्या अंगीं आणून देणें हें आईबापांचें कर्तव्य समजलें जाऊन, दुसऱ्या प्रकारची योग्यता त्यांच्या अंगीं आणण्याची त्यांजवर जबाबदारी नसावी हें युक्तीला धरून नाहीं.

कित्येक गोष्टींत आईबापांचे मुलांवर उपकार व्हावे त्यापेक्षां फारच कमी होतात, परंतु दुसऱ्या कित्येक गोष्टींत ते वाजवीपेक्षां फाजील होतात; म्हणजे मुलांच्या चिरकालिक सुखाकडे लक्ष न देतां त्यांच्या तात्कालिक सुखाकडे नजर देऊन आईबापें त्यांचे फाजील लाड करितात. मुलांना लाड करून बिघडून टाकण्याची ही तऱ्हा चोहोंकडे आढळून येते व ती तिरस्कारास्पद समजली जाते.

मुलांचें शिक्षण अशा प्रकारचें असलें पाहिजे कीं, ती प्रौढवयांत आल्यानंतर स्वतःच्या जबाबदारीवर जगांतील सर्व व्यवहार करण्याची त्यांच्या अंगीं योग्यता यावी. हें ध्यानांत ठेवून, मुलांचा आयुष्यक्रम पुढील आयुष्यक्रमाशीं कांहीं तरी साम्य पावेल अशा प्रकारचा केला पाहिजे. म्हणजे उद्योग आणि विश्रांति किंवा सुखोपभोग ह्यांच्यामध्यें पुढें उत्पन्न होणारें प्रमाण जरी ठेवितां आलें नाहीं तरी कांहीं तरी प्रमाण राखिलें पाहिजे. आतां, पूर्ववयांत मुलांच्या शरीरांची व मनांची वाढ होत असतें हें लक्षांत ठेवून जो भेद ठेवणें जरूर दिसेल तो ठेविला पाहिजे. आपण मुलांच्या शरीरासाठीं व मनासाठीं जें अन्न देतों त्याचा कांहीं भाग पोषणाकडे व कांहीं वृद्धीकडे जात असतो; ह्याकरितां आपणांकडून त्यांस जें अन्न मिळेल त्यापेक्षां त्यांजकडून दोनही प्रकारचें काम कमी होईल. तथापि उद्योग आणि त्याचें फळ ह्यांच्यामधील जो स्वाभाविक संबंध प्रौढवयांतील व्यवहारांत सर्वत्र आढळून येतो व ज्यावर जगाची रहाटी अवलंबून आहे, तो संबंध मुलांच्याही व्यवसायांत लहानपणापासून ठेववेल तितका ठेवण्याविषयीं यत्न करणें जरूर आहे. एकसारख्या त्यांच्या इंद्रियसुखाच्या इच्छा तृप्त करीत न बसतां इंद्रियसुखाचे मानानें उपयुक्त व्यवसायही त्यांच्या हातून घडतील अशाविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. मुलांचे पोरकट लाड करण्याचें सोडून दिल्याशिवाय मुलांना अशा प्रकारचें वळण लावतां यावयाचें नाहीं.

उद्योग आणि सुखोपभोग ह्यांच्यामधील योग्य प्रमाण नाहींसें झाल्यानें सुखोपभोगाची इच्छा वाढून त्यासाठीं उद्योग करण्याची इच्छा कमीकमी होत जाते व ह्याचा परिणाम प्रौढवयांत मनुष्यास भोगावा लागतो. लहानपणांत लागलेल्या संवयी प्रौढवयांत अधिकाधिकच वाढत जातात, हा परिणाम गरीबापासून तों श्रीमंतापर्यंत सर्वत्र सारखा दिसून येतो. दिवसेंदिवस सुखोपभोगाचीं साधनें अधिकाधिक उपलब्ध होत असल्यामुळें पैसे-

वाल्या लोकांचीं मुलें अशा प्रकारच्या संवईनीं बिघडण्याचा अधिक संभव असतो. कित्येक सुखोपभोगाचे प्रकार असे आहेत कीं ते प्रौढवयाकरितांच राखून ठेवणें बरें, परंतु श्रीमंतांच्या मुलांना लहानपणींच त्यांची इतकी गोडी लागते कीं, प्रौढवयांत आपल्या ऐषआरामापुरतें मिळविण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें तीं पूर्वीचा पैसा उधळीत बसतात. मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था विचारपूर्वक केली तर आपल्या सभोंवतीं जगांत ज्या गोष्टी स्वाभाविकपणें घडत असतात व जे सुंदर सृष्टपदार्थ दिसत असतात, त्यांमधून मुलांची करमणूक करून देण्याला पुष्कळ पदार्थांचा उपयोग करून घेतां येण्यासारखा असतो. मनोरंजनाकरितां करमणुकीच्या कृत्रिम साधनांची योजना करण्याची अवश्यकता नाहीं. शहाणपणाची उपकारबुद्धि मनांत वागविणाऱ्या आईबापांनीं करमणुकीच्या व सुखोपभोगाच्या नैसर्गिक साधनांचा उपयोग करून, मूर्ख व फाजील लाड करणारीं आईबापें जगांतील खरी जबाबदरी अंगावर पडण्यापूर्वींच अतिसुखोपभोगानें आपल्या मुलांचीं मनें विटवून टाकितात, तसें न करण्याविषयीं जपावें.

पुष्कळ आईबापांच्या मनांत आपल्या मुलांविषयीं उपकारबुद्धि असावी तितकी असून एका गोष्टींत कमीपणा झाल्यामुळें अनेक वेळां फार वाईट परिणाम घडतात. पुष्कळ मुलें असलीं म्हणजे निरानिराळ्या मुलांवर आपली माया कशी वांटून द्यावयाची व कोणाकडे लक्ष द्यावयाचें ह्याचा सुमार कित्येक आईबापांस राहत नाहीं व त्यामुळें कुटुंबांत असंतोष उत्पन्न होतो. ह्या असंतोषापासून किती अनिष्ट परिणाम घडतात ह्याची बहुतेकांना बरोबर कल्पना होत नाहीं.

आईबापांची सर्व मुलांवर सारखी प्रीति नसणें हें स्वाभाविकच आहे. ज्यांच्यामध्यें सर्वांशीं साम्य आहे असे कोणतेही दोन पदार्थ किंवा एका पदार्थाचे दोन भाग सांपडणार नाहींत. त्याचप्रमाणें एकासारखे एक असे विचार किंवा मनोविकारही आढळावयाचे नाहींत. मनुष्यापुढें चार पदार्थ आणून ठेविले असतां सर्वांविषयीं सारखी आवड उत्पन्न होणें जसें शक्य नाहीं, तसेंच चार मुलें असलीं तर त्या सर्वांवर सारखें प्रेम राहणें शक्य नाहीं. हळूहळू त्यांजवरच्या प्रेमांत लक्षांत न येण्यासारख्या कारणांनीं फरक उत्पन्न होतो, आणि कित्येक अधिक आवडूं लागतात व कित्येक कमी आवडूं लागतात. उपजल्यापासून देखील कित्येक मुलांविषयी आईच्या मनांत अधिक

प्रीति उत्पन्न होते व कित्येकांविषयीं कमी उत्पन्न होते. आणि निरनिराळ्या मुलांविषयीं कमी अधिक प्रेम मनांत असलें म्हणजे त्यांच्याशीं वर्तन करण्यांतही फरक होतो व प्रतिक्रियेनें मुलांच्या मनांत मातापितरांविषयीं जें प्रेम उत्पन्न व्हावयाचें त्यांतही फरक पडतो.

परोपकाराविषयींच्याही स्वाभाविकपणें उत्पन्न होणाऱ्या बुद्धीला श्रेष्ठ विचारांच्या साह्यानें स्वाधीन ठेवून तिला योग्य वळण देणें किती अवश्यक आहे हें ह्या ठिकाणीं दिसून येतें. न्याय व परोपकार ह्या दोहोंच्याही दृष्टीनें आईबापांची सर्व मुलांशीं जितकी सारखी वागणूक असेल तितकी असणें जरूर आहे, म्हणजे आईबापांच्या काळजीचा व मायेचा अंश सर्वांस सारखाच मिळाला पाहिजे. शरीरसंगोपन आणि मनःसंगोपन हीं जीं मुलांच्या संबंधानें आईबापांचीं कर्तव्यें त्यांबद्दल सर्व मुलांचा आईबापांवर सारखा हक्क असावा हा सरळ न्याय कोणालाही नाकबूल करितां यावयाचा नाहीं. न्यायाची सीमा उल्लंघून परोपकाराच्या क्षेत्रांत पाऊल टाकल्यानंतरही जे फायदे आईबापांना आपल्या मुलांस वांटून देणें असतील त्यांचेही वांटे सर्वांना सारखे मिळावे हें सयुक्तिक दिसतें.

ह्यासंबंधाच्या स्वाभाविक मनोवृत्तींवर विचाराचा पूर्ण अंमल चालविणें फार अगत्याचें आहे. कारण, कुटुंबांतील मनुष्यांमध्यें आवडनावड सुरू झाली म्हणजे अतिशय वाईट परिणाम घडून येतात. पुष्कळ गोष्टींत ज्यांच्या मनाचा थोरपणा दिसून येतो अशीं आईबापें देखील आपल्या नावडत्या मुलांना वाईट रीतीनें वागवितात, व क्षुल्लक अपराधांबद्दल त्यांना फार कडक शिक्षा करितात; आणि त्यांच्याच भावांबहिणींशीं त्यांची वागणूक अगदीं निराळ्या प्रकारची असते. आईबापांनीं झिडकारिल्यामुळें मुलांचे दिवस नेहमीं दुःखांत आणि उदासपणांत जावे ही क्षुल्लक गोष्ट नव्हे. परंतु ह्या प्रत्यक्ष परिणामांशिवाय आणखी फार वाईट अप्रत्यक्ष परिणाम होत असतात. मुलांच्या मनांजी खिन्नता उत्पन्न होते तिच्या योगानें त्यांचें धैर्य खचून जातें, व पुष्कळ वेळां त्यांची बुद्धि देखील मंदावते; त्यांच्या वर्तनाला वाईट वळण लागतें, व त्यांच्या स्वभावांत खुनशीपणा, द्वेषबुद्धि व मत्सर ह्या दोषांचें बीजारोपण होऊन ते चांगले वाढीस लागतात; आणि मुलांशीं मायाळूपणाचें व त्यांच्या मनांत आपणाविषयीं प्रीति उत्पन्न करण्यासारखें असें आईबापांचें वर्तन असलें म्हणजे त्यांचा मुलांवर जो दाब असतो तो असल्या पक्षपाती वर्तनानें नाहींसा होतो.

परोपकाराच्या दृष्टीनें आईबापांचीं आपल्या मुलांच्या संबंधानें अनेक कर्तव्यें आहेत, परंतु त्यांत त्यांच्याशीं वर्तन करितांना स्वाभाविकपणें उत्पन्न होणारा भेद नाहींसा करून सर्वांवर समदृष्टि ठेवणें ह्याच्या इतकीं महत्त्वाचीं दुसरीं थोडींच असतील.

आईबापांच्या परोपकाराच्या अव्यवस्थितपणाचा आणखी एक प्रकार सांगावयाचा आहे. ह्या प्रकारांत एका गोष्टींत वाजवीहून कितीतरी अधिक उपकार होत असतो, आणि इतर गोष्टींत वाजवीहून फार कमी होतो. कांहीं लोक असे आढळतात कीं, त्यांना आपल्या मुलांबद्दल फारशी प्रीति किंवा काळजी असत नाहीं, व त्यांच्यासंबंधानें आपणांस कर्तव्य म्हणून कांहीं करावयाचें आहे असा विचारही त्यांना फारसा त्रास देत नाहीं. आपोआप तीं जशीं वाढतील तशीं वाढतील व त्यांच्या शरीराची आणि मनाची स्थिति जशी होईल तशी होईल. असे लोक कधींकधीं अतोनात श्रम करून अधाशी-पणानें विपुल संपत्ति मिळवितात व ती त्यांच्या पाठीमागें त्यांच्या मुलांस मिळते. ही पैसा मिळविण्याची इच्छा सर्वांशीं किंवा बहुतांशीं तरी आपल्या मुलांची चांगली तरतूद करून ठेवावी अशा बुद्धीनें झाली असते असें नाहीं. संपत्तीपासून मान व इतर व्यावहारिक फायदे मिळत असतात त्यांच्यासाठींच मुख्यत्वेंकरून स्वार्थाच्या दृष्टीनें असे मनुष्य पैसा मिळविण्यास प्रवृत्त होतात. पुष्कळ संपत्ति मिळाल्यावर ती आपल्या मुलांस ठेविल्यानें श्रमावांचून व काळजीवांचून त्यांना आपला चरितार्थ चालवितां येईल हा विचार कधीं-कधीं त्यांच्या मनांत येणें स्वाभाविक आहे. स्वार्थासाठीं संपत्ति मिळविली असली तरी ती आपल्या मुलांसच देण्याची बुद्धि मनुष्याला बहुतकरून होत असते. हा जो वर सांगितलेल्या लोकांकडून मुलांवर उपकार होत असतो त्याची दिशा चुकलेली असते.

हल्लींच्या सामाजिक व्यवस्थेत संपत्तीची वांटणी अशा कांहीं चमत्का-रिक तऱ्हेनें झालेली आहे कीं, कांहीं थोड्या व्यक्तींजवळ कुबेराला लाजवि-ण्यासारखी संपत्ति जमली आहे, त्याहून कांहीं अधिक लोक मध्यम प्रकारच्या स्थितींत आहेत, व बाकीचे सर्व दरिद्रावस्थेंत आहेत. मनुष्यजातीच्या उत्क्र-मणावस्थेच्या मानानें ही स्थिति जरी सध्यांच्या काळाला योग्य व अवश्य असली तरी तिला संक्रमणास्थिति असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्राचीनकाळीं राजकीय हक्क आणि राजकीय सत्ता ह्यांची जी वांटणी झाली होती तीही

अशाच प्रकारची होती, परंतु राजकीय बाबतींत मनुष्यामनुष्यामधील भेद दिवसेंदिवस कमी होत आहे हें स्पष्ट दिसत आहे. त्याचप्रमाणें संपत्तीच्या वांटणीच्या संबंधानेंही हल्लीं दिसून येणारें मनुष्यांमधील वैषम्य पुढें येणाऱ्या काळांत दिवसेंदिवस कमी होत जाईल असा अजमास वाटतो. "बळी तो कान पिळी" हें ज्यांच्या वर्तनाचें प्रधान तत्त्व होतें अशा लोकांपासून हल्लींचा सुधारलेला मनुष्यसमाज उत्पन्न झाला आहे, व तो कांहीं अंशीं त्याच तत्त्वावर अवलंबून असणाऱ्या एका प्रकारच्या औद्योगिक स्थितींतून जात आहे. ह्या औद्योगिक उत्क्रान्तीची इमारत कराराच्या पायावर बांधलेली आहे. मनुष्यांचे सर्व प्रकारचे औद्योगिक व्यवहार परस्परांमध्यें करार होऊन होत असतात. हे करार करितांना प्रत्येक मनुष्य आपला होईल तितका फायदा करून घेत असतो. "बळी तो कान पिळी" ह्या तत्त्वाचा जो अंश हल्लींच्या औद्योगिक स्थितींत दिसून येतो तो येथेंच. ह्या तत्त्वाचा इतका अंमल अजून लोकांवर आहे ह्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. कारण, मनुष्यस्वभावांत वदल होऊन त्याच्या विचारांत फेरफार होण्याला युगांचीं युगें लागत असतात. हल्लींच्या औद्योगिक स्थितीमुळें संपत्तीच्या वांटणींत जें वैषम्य उत्पन्न झालें आहे तें कित्येक लोकांना इतकें असह्य झालें आहे कीं, ही स्थिति एकदम नाहींशी करण्याकरितां त्यांनीं सोशिआलिझम्, काम्यूनिझम् वगैरे पंथ काढिले आहेत आणि त्यांस मधूनमधून यशही येतें व अजूनही येईल. सोशिआलिझम्, काम्यूनिझम् वगैरे पंथांचे मूळचे उद्देश जरी चांगले असले तरी सृष्टींतील फेरफार जसे कालगतीनें हळूहळू उत्क्रांत होत असतात तसे प्रयत्न करण्याचा त्यांचा हेतु नसल्यामुळें, थोडा वेळ थोड्या व्यक्तींवर जरी त्यांनीं कांहीं परिणाम केला तरी प्रचंड समाजावर फारसा परिणाम होत नाहीं. हल्लींच्या औद्योगिक स्थितींतच थोडथोडा भेद पडत जाऊन कालांतरानें तिला हल्लींच्याहून बरेंच भिन्नस्वरूप प्राप्त होईल, व सामाजिक स्थितींत आणि मनुष्यस्वभावांतही इष्ट फरक पडत जाऊन संपत्तीच्या वांटणींत हल्लीं आढळून येणारें वैषम्य पुढें फार कमी होईल. तथापि संपत्तीची वांटणी अगदीं सारखी होणें मात्र संभवनीय दिसत नाहीं. दिवसेंदिवस अपरिमित द्रव्य मिळविण्याची शक्यता ही कमीकमी होत जाईल व मनुष्याला तितकी इच्छाही राहणार नाहीं. ही इच्छा कमी होण्याचें एक कारण मुलांविषयीं खऱ्या परोपकारबुद्धीमुळें त्यांस फार द्रव्य ठेवूं नये असें लोकांस वाटूं लागेल हें होय.

श्रम केल्यावांचून आपला चरितार्थ जगांत चालेल अशी आशा असणें व ती परिपूर्ण होणें ह्यापासून मुलांच्या विचारांवर व त्यांच्या वर्तनावर फार अनिष्ट परिणाम होतात. ज्या मनुष्याच्या आयुष्यक्रमांत सुखोपभोग आणि उद्योग ह्यांच्यामध्यें कार्यकारणत्वाचा संबंध राहत नाहीं व ज्याला उद्योगावांचून पाहिजे तितकीं सुखोपभोग घेण्याचीं साधनें अनुकूल असतात, त्याचें जीवित व्हावें तितकें जोमदार होत नाहीं. मानवी सृष्टींत, व इतर प्राण्यांच्या शरीरावर उत्पन्न होणारे उवा, पिसा, गोचिड्या इत्यादि प्राणी शिवाय करून बाकीच्या प्राणिसृष्टींत, जीवनाचें मुख्य तत्त्व म्हटलें म्हणजे उद्योग होय. उद्योगानें शरीराचें पोषण व वृद्धि व्हावी अशा प्रकारचीच त्यांची घटना आहे. हें सृष्टींतील स्वाभाविक जीवनतत्त्व एका बाजूस राहून ज्यावेळीं कृत्रिम उपायांनीं जरूर तितक्या चलनवलनादि व्यापारांशिवाय शरीरपोषण होऊं लागतें त्यावेळीं त्या प्राण्यावर अनिष्ट परिणाम घडूं लागतात. त्याच्या अवयवांची तरतरी नाहींशी होते, शरीर स्थूल होतें व बुद्धीला मांद्य येतें. अशी स्थिति पिढ्यानुपिढ्या कायम राहिल्यास त्या प्राण्याला अत्यंत अवनतस्थिति प्राप्त होईल. गरीब मजूर शरीरानें मजबूत व धडधाकड व श्रीमंत लोक फिके आणि रोगट असें पुष्कळ वेळां आढळून येतें ह्याचें कारण हेंच होय. आपणांस पुढें पुष्कळ संपत्ति मिळणार आहे ह्या आशेमुळें उत्पन्न झालेल्या शारीरिक व मानसिक अवनतीचीं उदाहरणें चोहोंकडे पाहिजे तितकीं आढळतात, व लोकांच्या खासगी संभाषणांत त्यांचा वारंवार उल्लेखही होत असतो.

आपल्या मुलांस त्यांच्या स्वतःच्या उद्योगानें चरितार्थ चालविण्याची अडचण पडूं नये अशा रीतीनें त्यांस धंद्यास लावून देणें एवढेंच आईबापांचें कर्तव्य आहे. वाजवीपेक्षां अधिक परोपकारबुद्धीनें ह्याहून त्यांची अधिक तरतूद केल्यास वर जो एक वाईट परिणाम दर्शविला आहे त्याहून निराळा आणखी एक अनिष्ट परिणाम घडत असतो. आईबापांविषयीं प्रेम, पूज्यबुद्धि व भक्ति हे श्रेष्ठ मनोधर्म मुलांमध्यें उत्पन्न होणें जरूर आहे, परंतु त्यांशी अगदीं विरुद्ध अशा विचारांस व मनोविकारांस त्यांच्या मनांत अवकाश सांपडतो. बापाच्या मरणानें विपुल संपत्ति, मोठी सत्ता किंवा दोन्हीही मिळण्याचा संभव असल्यास, मुलांच्या मनांत बापाविषयीं कोणत्या प्रकारचे विचार येत असतात ह्याची कल्पना इंग्लंडांतील राजा पांचवा हेन्री व त्याचा मरणोन्मुख झालेला बाप ह्यांच्यामध्यें जो संवाद झाला त्यावरून करितां येण्या-

सारखी आहे. बापाच्या शेवटल्या दुखण्यांत त्याच्या अंतकालापूर्वींच पांचव्या हेन्रीनें राज्यपद बळकाविलें होतें. तसें करण्याचें कारण बापानें विचारिलें तेव्हां हेन्रीनें उत्तर दिलें, "माझ्याशीं बोलण्याची शक्ति येण्यापुरते तुम्ही बरे व्हाल असें मला कधीं वाटलें नाहीं." त्यावर बापानें प्रत्युत्तर केलें "अशा प्रकारचा विचार तुझ्या मनांत येण्याला तुझी राज्यतृष्णाच कारण झाली." वरील प्रकारांत कितीही तथ्य असो, पण आईबाप आणि मुलें ह्यांच्यामध्यें कसे प्रकार घडून येण्याचा संभव असतो ह्याचा ह्या गोष्टीवरून चांगला बोध होईल. आणखी एक उदाहरण देण्यासारखें आहे. इंग्लंडांत कित्येक पिढ्यांनीं जन्मास येणाऱ्या वारसांच्या नांवानें इस्टेट करून ठेवितां येते. तसें केलें म्हणजे मधल्या पिढ्यांचे जे वारस असतील त्यांना ती इस्टेट विकण्याचा वगैरे हक्क नसतो. त्यांनीं तिचें उत्पन्न मात्र खावें. उदाहरणार्थ, नातवाचे नांवानें इस्टेट करून ठेविलेली असली तर ती मुलाला विकतां किंवा गहाण टाकितां यावयाची नाहीं. ज्यावेळीं नातवाचे हातांत जाईल त्यावेळीं तिचें तो पाहिजे तें करूं शकेल. अशा रीतीनें अखेरीस ज्या वारसाचे हातांत ती इस्टेट जावयाची असेल त्याच्या मनांत मध्यंतरींच्या वारसांविषयीं मत्सर, द्वेषबुद्धि वगैरे दुष्ट मनोविकार उत्पन्न होतात ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. ह्या वरील उदाहरणांप्रमाणेंच अतोनात पैसा मिळवून ठेवणाऱ्या मनुष्याची स्थिति होते. बापाच्या मरणानें आपल्या हातांत संपत्ति येईल व त्याच्या दाबांत राहण्याचा त्रास चुकेल हे विचार मनांत आले म्हणजे बापाच्या मरणाविषयींची भयंकर इच्छा अप्रत्यक्ष रीतीनें तरी मुलांच्या मनांत उत्पन्न होते. मुलांकरितां अपरिमित द्रव्य मिळवून ठेवणें म्हणजे एका प्रकारें घरांतल्याघरांत आपणाला शत्रु उत्पन्न करून ठेवण्यासारखेंच आहे. आतां पितृप्रेमाचा अंमल मुलांच्या मनावर विशेष होऊन बहुतकरून तीं आपल्या अमंगल इच्छा पूर्ण करण्यासाठीं साधनांच्या योजनेस लागणार नाहींत ही गोष्ट खरी, तथापि असल्या विचारांनीं त्यांच्या मनावर अनीतिकारक अनिष्ट परिणाम झाल्यावांचून राहणार नाहींत.

मुलांसाठीं पुष्कळ पैसा मिळवून ठेवण्याची ही चाल सर्व प्रकारांनीं अपकारक आहे. तिच्या योगानें मुलांच्या अंगीं लहानपणापासून निरुद्योगीपणा व निष्काळजीपणा हे दोष उत्पन्न होऊन संपत्तीचा ताबा हातांत आल्यावर ते दृढ होतात व त्याच्या आयुष्यक्रमांत अव्यवस्थितपणा उत्पन्न होतो. ह्याशिवाय आईबापांविषयीं त्यांच्या मनांत दुष्ट विचार येतात हें पूर्वीं सांगि-

तलेंच आहे. आणखी एक अशा रीतीनें पैसा मिळविणाऱ्या मनुष्याचेंही नुकसान होत असतें. एकसारखें उद्योगांत मन गढून जाऊन पैशाकडे सर्व दृष्टि लागलेली असल्यामुळें अशा मनुष्याचें मन आकुंचित होऊन इतर मानसिक सुखांच्या उपभोगाला अयोग्य होऊन जातें, व त्याचा परिणाम त्याच्या शरीरावरही घडून त्याची शक्ति लवकर क्षीण होत जाऊन तो अकालीं मृत्युमुखीं पडतो. शिवाय, संपत्तीच्या लोभानें मनुष्य निर्दयपणाच्या चढाओढीस प्रवृत्त होतो व ह्या त्याच्या आचरणानें "जीवनकलहामुळें होणाऱ्या चढाओढीची मर्यादा" ह्या प्रकरणांत दर्शविल्याप्रमाणें धंद्यांच्या संबंधानें ज्यांचा त्याच्याशीं संबंध येतो त्यांचें व समाजाचें नुकसान होतें.

वरील विवेचनावरून असें स्पष्ट दिसतें कीं, स्वतःच्या, इतर लोकांच्या आणि समाजाच्या हिताकडे व हक्कांकडे लक्ष दिलें असतां व मुलांविषयींही योग्य परोपकारबुद्धीनें वागावयाचें मनांत आणिलें असतां मनुष्यानें आपल्या मुलांसाठीं त्यांस श्रम करण्याची अवश्यकता लागणार नाहीं, इतकें द्रव्य संपादन करून ठेवणें चांगलें नाहीं.

---

## प्रकरण ९

### मुलांचे आईबापांवर उपकार

आईबापांची मुलांच्या संबंधानें जशीं कर्तव्यें आहेत तशींच मुलांचींही आईबापांच्या संबंधानें आहेत. हीं कर्तव्यें कांहीं न्यायाच्या व कांहीं परोपकाराच्या दृष्टीनें उत्पन्न झालीं आहेत. मुलांचीं आईबापांविषयीं जीं स्वाभाविक कर्तव्यें आहेत त्यांविषयीं त्यांच्या मनांत विचार येऊं लागण्याला तीं बरींच मोठीं झालीं पाहिजेत. आपल्या आज्ञेप्रमाणें वागण्याची आवश्यकता मात्र आईबाप लहानपणापासून मुलांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करीत असतात, व त्यांसंबंधानें मुलांवर त्यांची सक्ति चाललेली असते. आणि कांहीं थोड्या प्रसंगीं जरी मुलें आईबापांची आज्ञा पाळीत नाहींत, तरी बहुतेक प्रसंगीं हें कर्तव्य त्यांच्याकडून बऱ्याच चांगल्या रीतीनें बजाविलें जातें. मुलांच्या ह्या कर्तव्याचा उगम अनियंत्रित अधिकारापासून आहे असा सामान्य-लोकसमज आहे. मुलांच्या ह्या आईबापांच्या मधील संबंधाचा विचार

केला असतां हें कर्तव्य स्वाभाविक रीतीनें उत्पन्न होतें ही कल्पना लोकांच्या मनांत येत नाहीं.

मुलें बरींच मोठीं झाल्याशिवाय स्वतःच्या कर्तव्याचे विचार त्यांच्या मनांत येत नाहींत ही गोष्ट जरी बहुत अंशीं खरी आहे, तरी केव्हांकेव्हां पंधरापासून वीस वर्षांच्या वयांतच मुलांच्या मनांत आईबापांविषयीं भक्ति व कळावळा उत्पन्न होऊन त्यांनीं त्यांस आपण होऊन मदत करूं लागावें अशीं उदाहरणें घडून येतात. हीं उदाहरणें मुख्यत्वेंकरून गरीबीनें निर्वाह करणाऱ्या कुटुंबांत घडतात, व विशेषतः आईवर पडणारें ओझें कमी करण्याकरितां तिचीं कांहीं कामें करून तिला हातभार लावण्याच्या संबंधाचीं असतात. अशा प्रकारें मुलांच्या हातून वर्तन घडत असतांना कदाचित् त्यांच्या मनांत असा विचार येत असेल कीं, आपण जी आईबापांस मदत करीत आहों ती आपलें पोषण करण्याकरितां त्यांनीं आपणांविषयीं जी काळजी वाहिली तिच्या मानानें कांहींच नव्हे. परंतु बहुधा मुलांच्या हातून जें अशा प्रकारचें स्तुत्य वर्तन घडतें तें उपकाराची फेड करण्याच्या इच्छेनें घडत नसून प्रीतीमुळें व दयेमुळें उत्पन्न होणाऱ्या मनोविकारांच्या प्रेरणेनें घडतें.

परंतु बहुतेक मुलांची स्थिति फार शोचनीय असते. तीं वयांत येण्याच्या बेताचीं झालीं तरी देखील आईबापांनीं केलेल्या उपकारांचें स्मरण होऊन त्यांबद्दल कृतज्ञताबुद्धि त्यांचे मनांत उत्पन्न होत नाहीं. मुलांची खाण्यापिण्याच्या संबंधानें काळजी घेणें, त्यांना लत्ताकपडा पुरविणें आणि त्यांना शिक्षण देणें हीं कामें आईबापांनीं केलींच पाहिजेत, त्यांबद्दल त्यांचे उपकार मानण्याचें कांहीं कारण नाहीं, असाच पुष्कळ मुलांचा समज असतो, व त्याप्रमाणें त्यांचें वर्तनही दिसून येतें. त्यांना पाहिजे असतील ते पदार्थ आईबापांनीं कांहीं विशेष कारणानें किंवा सामर्थ्य नसल्यामुळें दिले नाहींत तर त्यांवर तीं चरफडतात देखील. जणू काय ते पदार्थ आईबापांपासून घेण्याचा त्यांचा हक्कच आहे ! मुलानें हट्ट केल्यामुळें किंवा आपल्या इच्छेविरुद्ध कांहीं काम केल्यामुळें त्याला उपदेश करण्याचा बापाला प्रसंग आला असतां, मुलांचें जें वर्तन दिसून येतें त्यावरून त्याच्या मनांत कृतज्ञताबुद्धीचा कसा अभाव असतो हें चांगलें समजतें; आईबापांना मुलांसाठीं अनेक प्रकारचे कितीतरी कष्ट काढावे लागतात हें स्मरून, त्यांच्या उपकारांची फेड करणें एकीकडेच राहिलें, परंतु निदान ज्यांत वावगें नाहीं अशा ज्या त्यांच्या इच्छा असतील

त्यांप्रमाणें त्यांनीं वागणें तरी जरूर आहे, असा उपदेश मुलें बहुतकरून नि-मूटपणीं ऐकून घेतात. परंतु ह्या उपदेशापासून त्यांच्या मनांत व्हावे तसे म-नोविकार उत्पन्न होत नाहींत. आईबापें मुलांसाठीं फार कष्ट सोसतात ही गोष्ट त्यांच्यानें नाकबूल तर करवत नाहींच; परंतु कष्ट सोसले तरी त्यांनीं विशेष कांहीं केलें नाहीं, मुलांकरितां त्यांनीं सर्व कांहीं केलें पाहिजे व मुलांनीं त्या-चा मोबदला देण्याचें कांहीं कारण नाहीं असा मुलांचा समज सर्वत्र दिसून येतो.

मनुष्याच्या प्राथमिक स्थितींत आईबाप व मुलें ह्यांच्यामध्यें असाच संबंध होता खरा. मनुष्येतर प्राणिसृष्टींत तर नेहमीं पूर्वींची पिढी आणि नवी पिढी ह्यांच्यामध्यें असाच संबंध असतो. कितीही त्रास पडला तरी न कंटा-ळतां, मुके प्राणीही आपल्या पिलांचें तीं स्वतंत्र रीतीनें आपला चरितार्थ चालविण्यास समर्थ होतपर्यंत मोठ्या काळजीनें संगोपन करितात. परंतु पि-लांना आपल्या आईबापांनीं आपणाकरितां काय केलें आहे हें जाणण्याची शक्ति नसल्यामुळें, उलट त्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत कृतज्ञताबुद्धि उत्पन्न होत नाहीं. मनुष्येतर जीवसृष्टींत दिसून येणारा हा आईबाप आणि मुलें ह्यांच्यामधील संबंध मानवी सृष्टींतही बराच कायम राहिला आहे. ज्या व-यांत आपला व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ स्वतंत्रपणें चालविण्याचें सामर्थ्य मनुष्याच्या अंगांत आलें पाहिजे, त्या वयांत देखील पुष्कळ तरुण लोक आ-ईबापांवर अवलंबून राहणारे दिसून येतात. आणि त्यांना जें पाहिजे असतें, तें त्यांजकडून न मिळालें तर ते अपमानकारक शब्दांनीं त्यांचें ताडन करण्या-सही मागेंपुढें पाहत नाहींत. आईबापांचे मुलांवर होणारे अनंत उपकार व त्यामुळें उत्पन्न होणारीं मुलांचीं आईबापांच्या संबंधानें कर्तव्यें ह्यांविषयीं अ-नेक धर्मांच्या व मतांच्या अतिप्राचीन पुस्तकांतून उल्लेख आढळतात हें खरें आहे. आनी नांवाच्या एका ईजिप्त देशांतील विद्वानानें ह्या विषयाच्या संबं-धानें आपलें विचार पुढें लिहिल्याप्रमाणें प्रदर्शित केले आहेत:—

" तुला शाळेंत घातलें होतें आणि ज्यावेळीं तुझा पंतोजी तुला रोज नियमानें विद्या शिकवीत असे त्यावेळीं तुझी आई आपल्या घराहून तुझ्या-साठीं अन्नपाणी आणून देत असे. आतां तूं वयांत आला आहेस, तुझें लग्न झालें आहे व तूं आपणासाठीं घर बांधिलें आहेस. परंतु आईनें जे तुझ्या-साठीं दुःखकारक कष्ट केले आहेत व रात्रंदिवस काळजी वाहिली आहे त्यां-

चा तूं आपल्या मनांत कधींही विसर पाडूं नको. ती असंतुष्ट न होईल अशा विषयीं तूं फार जपत जा. नाहींतर ती तुझें अनिष्ट व्हावें म्हणून हात जोडून ईश्वराची प्रार्थना करील व तो तिची प्रार्थना ऐकेल."

तथापि विचारदृष्ट्या जरी वरील मतांची सत्यता सर्वांनीं कबूल केली असली व नीतिग्रंथांतून त्यांचे पोवाडे गाइले असले, तरी मनुष्याच्या आचरणावर त्यांचा फारसा परिणाम आजपर्यंत झालेला नाहीं व हल्लींही ह्या विचारांचें महत्त्व लोकांस तितकें वाटत नाहीं. आईबापांविषयीं आपलें कर्तव्य म्हणून कांहीं आहे व तें करण्याचा आपण होईल तितका यत्न केला पाहिजे ही गोष्ट मनुष्यें जरी समजत असलीं तरी तीं अजून उमजूं लागलीं नाहींत.

उपकारदृष्ट्या आईबापांच्या संबंधानें जीं मनुष्याचीं कर्तव्यें आहेत त्यांविषयीं हल्लीं लोकांत प्रसृत असलेली कल्पना फार आकुंचित आहे. केवळ पशुवृत्तीनें वागणाऱ्या लोकांची गोष्ट सोडून दिली असतां, मातापितरांना चरिर्थाची वाण पडूं न देणें व शारिरिक संकटांपासून त्यांचें संरक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे असें लोकांस वाटत असतें. परंतु बारीकसारीक गोष्टींच्या संबंधानें त्यांजकडे लक्ष देणें, त्यांच्याशीं प्रेमानें वागणें व त्यांना खुष करण्याकरितां यत्न करणें ह्या गोष्टीचेंही तितकेंच अगत्य आहे; तथापि तसें कोणास फारसें वाटत नाहीं. आईबापांच्या केवळ शारीरिक सुखाकडेच लक्ष देऊन मुलांचें कर्तव्य संपत नाहीं; त्यांच्या मानसिक सुखाकडेही त्यांनीं लक्ष पुरविलें पाहिजे. लहानपणीं मुलांना रंजविण्याकरितां व सुख देण्याकरितां आईबाप ज्या तऱ्हेचे प्रयत्न करितात त्या तऱ्हेचे प्रयत्न मुलांनीं आईबापांच्या वृद्धापकाळीं त्यांस रंजविण्याकरितां केले पाहिजेत.

ह्या गोष्टीच्या संबंधानें मनुष्यस्वभावांत जितका कमीपणा राहिला आहे तितका फारच थोड्या गोष्टींच्यासंबंधानें राहिला असेल. अनेक जातींच्या रानटी लोकांत म्हाताऱ्या मनुष्यांना त्यांच्या वृद्धापकाळीं अन्नपाण्यावांचून मरण्याची जशी पुष्कळ वेळां पाळी येते, तशी सुधारलेल्या लोकांत येत नाहीं हें खरें, तथापि तरुण मुलांनीं त्यांच्या मानसिक सुखाकडे द्यावें तितकें लक्ष न दिल्यामुळें खेद होऊन झिजत जाणारीं वृद्ध मातापितरें सुधारलेल्या लोकांतही पाहिजे तितकीं सांपडतील. एका पाठीमागून एक मुलांनीं व मुलींनीं लग्न करून आपापले संसार थाटावे आणि वृद्ध मातापितरांस किंवा त्यांपैकीं जें एकटें राहील त्यास एकांतवासाच्या दुःखांत सोडून द्यावें अशी पुष्कळांची

स्थिति होते. शारीरिक चपलतेवर अवलंबून असणाऱ्या सुखांचा उपभोग घेण्याला अंगीं शक्ति नसल्यामुळें व मित्रमंडळीच्या संभाषणापासून होणारीं शांततेचीं सुखेंही दुर्मिळ झाल्यामुळें त्यांचा आयुष्यक्रम अगदीं नीरस व कंटाळवाणा होऊन जातो. केव्हांकेव्हां एकादें मूल समाचारास येतें, परंतु ही भेट केवळ मनाची समजूत करण्याकरितां असते. वृद्ध आईबापांस कधींकधीं तरी भेटावयास गेलें पाहिजे, नाहींतर आपला अगदींच कृतघ्नपणा दिसून येईल अशा प्रकारचे विचार आईबापांविषयीं मायेचा कांहीं लेश पोटांत असला तर मनुष्याच्या अंतःकरणाला टोंचीत असतात, व हें टोंचणें बंद व्हावें म्हणून कधींकधीं त्यांना भेटावयास जाण्याची बुद्धि त्यांस होत असते. पण त्यांच्या वृद्धापकाळाचे दिवस आनंदांत व सुखोपभोगांत जावे ह्यासाठीं ज्या प्रकारची काळजी दाखविली पाहिजे त्या प्रकारची काळजी फारच थोड्या मुलांकडून दाखविली जाते. सुव्यवस्थित समाजांत ज्या मनुष्यानें आपलें आयुष्य प्रामाणिकपणानें आपलें कर्तव्य करण्यांत घालविलें असेल, त्याचे शेवटले दिवस आनंदांत जाऊन पूर्ववयांतील सदाचरणाचें फळ त्याला उत्तरवयांत मिळेल अशी व्यवस्था होणें जरूर आहे.

ह्या प्रकरणांत सांगितलेलीं कर्तव्यें तरुण लोकांच्या मनांवर ठसविण्याची फार अवश्यकता आहे; व हें काम कोणीं करावें तें सांगणें कठिण आहे. वृद्ध मनुष्यांकडून हा प्रयत्न होणें इष्ट नाहीं. कारण त्यांना अशा प्रयत्नापासून प्रत्यक्ष फायदा असल्यामुळें, स्वार्थासाठीं ते तसें करण्यास प्रवृत्त झाले असा त्यांच्याविषयीं संशय घेण्यास जागा राहील. तरुणांकडून हें काम चांगलें होण्याचा संभव नाहीं; त्यांच्याकडून ह्यासंबंधाचीं कर्तव्यें चांगल्या रीतीनें बजाविलीं जात नाहींत, व एवढ्यावरूनच ह्या विषयाच्यासंबंधानें त्यांच्या विचारांत व मनोविकारांत कमीपणा आहे हें सिद्ध होतें. सदाचरण व नीति ह्यांवर व्याख्यानें देणारे धर्मोपदेशक वगैरे ह्या विषयाकडे फारसें लक्षच देत नाहींत व त्यांनीं लक्ष दिलें तरी त्याचा फारसा उपयोग होत नाहीं.

मनुष्यांना सदाचरणाचा मार्ग दाखविण्याचें काम ज्यांवर सोंपविलेलें आहे त्यांनीं तरुणांच्या मनावर आईबापांच्या संबंधाचीं त्यांचीं कर्तव्यें जर चांगल्या रीतीनें ठसविलीं नाहींत, तर त्या तरुणांच्या आईबापांचें जितकें नुकसान होतें तितकेंच किंवा त्याहून अधिकही त्या तरुणांचें स्वतःचें होतें. आईबापांचे मुलांवर हक्क काय आहेत हें त्यांच्या मनावर चांगलें न ठसल्या-

मुळें त्यांना पाठीमागून पश्चात्ताप करण्याचा मात्र प्रसंग येतो. हा पश्चात्ताप अशा वेळीं होतो कीं, त्यापासून उपयोग करून घेण्याला सवड राहत नाहीं. हीं तरुण मनुष्यें स्वतः वृद्ध झालीं आणि त्यांच्या मुलांकडून त्यांची हयगय होऊं लागली म्हणजे, मुलांनीं आईबापांकडे लक्ष देणें किती जरूर आहे व तें त्यांनीं दिलें नाहीं तर त्यांची काय स्थिति होते, हें अनुभवानें त्यांस समजूं लागतें व आपणही आपल्या आईबापांना त्यांच्या वृद्धापकाळीं विनाकारण दुःख दिलें असा त्यांस पश्चात्ताप होतो.

---

# प्रकरण ९

## अजाऱ्यांची शुश्रूषा

ह्यापूर्वींच्या तीनही प्रकरणांत ज्या एका विषयाचा विचार करणें अवश्य होतें त्याचा समावेश ह्या भागांत केला आहे. विवाहित स्त्रीपुरुषें, मातापितरें आणि मुलें ह्या सर्वांचेंही परोपकाराच्या दृष्टीनें परस्परांविषयीं कर्तव्य पाहिलें असतां, कुटुंबांतील कोणी मनुष्य स्वाभाविक रीतीनें किंवा अपघातानें आजारी पडलें असतां बाकीच्या मनुष्यांनीं त्याची विशेष काळजी घेणें अवश्य आहे. दुखणाईत पडणें ही सृष्टिक्रमांतील साधारण गोष्ट आहे, व कोणासही दुखणें आलें असतां त्यानें तें सोसण्यास व कुटुंबांतील इतर मनुष्यांनीं त्याची शुश्रूषा करण्यास नेहमीं तयार असलें पाहिजे. पुष्कळ वेळां घराला रुग्णालयाचें ( इस्पितळाचें ) स्वरूप येतें व घरांतील मनुष्यांना रुग्णालयांतील चाकरांचें काम करावें लागतें.

कुटुंबांतील मनुष्याखेरीज इतर कोणी मनुष्य अजारी पडलें असतां किंवा अपघातानें दुखावलें असतां, स्वतःला अपाय होण्याची भीति असली तरी देखील त्याची सेवाचाकरी करणें परोपकाराच्या दृष्टीनें योग्य होईल कीं नाहीं ह्याविषयीं कितीही संशय असला तरी, कुटुंबांतील एखाद्या मनुष्यावर तसा प्रसंग आला असतां इतर मनुष्यांनीं अशा रीतीनें त्याची शुश्रूषा करणें योग्य आहे ह्याविषयीं कोणालाही संशय नसेल. मनुष्यजातीची परंपरा कायम राखण्याकरितां पुरुषानें आपल्या स्त्रीचें संरक्षण करणें जरूर आहे हें कोणीही कबूल करील. कारण, आईचें संरक्षण चांगल्या रीतीनें झालें नाहीं तर त्याचा परिणाम तिच्यापासून होणाऱ्या संततीवर होणार. ज्या कारणानें

के. म. म. व. वा. पोतदार

स्त्रीचें संरक्षण करणें हें पुरुषाचें नेहमींचें कर्तव्य होऊन राहिलें आहे, त्याच कारणानें ती आजारी पडली असतां त्यानें तिच्याविषयीं काळजी घेणें जरूर आहे. त्याचप्रमाणें कुटुंबाच्या संरक्षणासाठीं त्यांतील कर्त्या पुरुषाची दुखण्याबाहण्यांत चांगली शुश्रूषा करणें हें त्याच्या स्त्रीचें कर्तव्य होऊन राहतें. मुलें आजारी असलीं तर त्यांच्याकडे आईबापांनीं लक्ष पुरविणें हें तर त्यांचें कर्तव्य उघडच दिसतें. कारण, मुलें प्रौढदशेस येतपर्यंत हरएक रीतीनें त्यांचें संगोपन करणें हें आईबापांचें सामान्य कर्तव्य आहे, त्यांत ह्या विशेष गोष्टीचा समावेश होतोच. ज्यांचीं मुलें करतींसवरतीं झालीं आहेत अशीं आईबापें आजारी पडली असतां मात्र, मनुष्यजातीची परंपरा कायम राखण्याकरितां मुलांनीं त्यांस मदत करावी असें म्हणतां येणार नाहीं. ह्या ठिकाणीं आवश्यकता उत्पन्न होते तिचें कारण अशा प्रकारच्या कृत्यांपासून एकंदर होणारी सुखवृद्धि होय. आईबापांच्या उपकारांची फेड करणें हेंही अंशतः कारण आहे असें म्हटलें असतां हरकत नाहीं.

स्पर्शजन्य रोगाचा मनुष्यास विकार झाला असतां त्याची चाकरी करणें म्हणजे स्वतःला त्या रोगास किंवा प्रसंगीं मरणासही पात्र करून घेणें होय. अशी भीति असली तरी देखील अशा प्रकारचीं कर्तव्यें बजाविलीं पाहिजेत. सामान्य सृष्टिक्रमावरून आपणांस हा धडा घेतां येण्यासारखा आहे. एका प्राण्याच्या जीवाकरितां दुसऱ्या प्राण्याला आपला जीव खर्ची घालावा लागतो अशीं अनेक उदाहरणें जीवसृष्टींत दिसून येतात. प्रजेची उत्पत्ति आणि जनकाचें प्राणोत्क्रमण ह्या दोन्ही क्रिया ज्यांमध्यें एकाकाळींच होतात अशा खालच्या प्रतीच्या प्राण्यांत सुद्धां व विशेषतः माद्यांच्या अंगीं अशा प्रकारची उपजतबुद्धि आढळून येते कीं, त्या अनेक प्रसंगीं आपला जीव धोक्यांत घालून आपल्या पिलांचें संरक्षण करण्यासाठीं धांवतात. ज्यांच्या अंगीं जीवनसामर्थ्य अधिक असेल त्यांनीं जगावें व ज्यांच्या अंगीं तें कमी असेल त्यांनीं मरावें ह्या सृष्टिनियमामुळें प्राण्यांच्या अंगीं अशा प्रकारची प्रवृत्ति उत्पन्न झाली आहे. मनुष्येतरप्राण्यांत देखील जर पिलासाठीं आपला जीव धोक्यांत घालण्यास मादी तयार होते, तर मूल आजारी असतांना त्याच्या आईनें जीवाची पर्वा न करितां त्याची शुश्रूषा करणें योग्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. केव्हांकेव्हां एक विचार मात्र मध्यें आडवा येण्याचा संभव आहे तो हा कीं, खरोखर जीव खर्ची पडला असतां कुटुंबांतील इतर मनुष्यांच्या

संबंधानें आपलीं कर्तव्यें आपणास करितां येणार नाहींत. बापानें देखील प्रसंगीं आपला जीव धोक्यांत घालून आपल्या मुलांचें रक्षण करण्यासाठीं कां झटूं नये ह्यास कांहीं कारण नाहीं. वरच्याप्रमाणेंच केव्हांकेव्हां ह्या ठिकाणीं देखील एक अडचण उत्पन्न होण्याचा संभव आहे. ज्या मुलांकरितां आपला जीव खर्चीं घालावयाचा, त्याशिवाय कुटुंबांतील इतर मनुष्यांच्या चरितार्थासाठीं श्रम करण्याची सर्व जबाबदारी ह्या मनुष्यावरच असेल, तर स्वतःच्या प्राणाचा नाश झाला असतां कुटुंबांतील सर्व मनुष्यांस उपाशीं मरण्याची पाळी येईल हा विचार त्याच्या मनांत येणें योग्य आहे.

कुटुंबांतील एक किंवा अनेक मनुष्यें अजारी पडलीं असतां, इतर मनुष्यांनीं आपल्या जीवाला अपाय होईल अशा रीतीनें त्यांची चाकरी न करण्याला आणखी कांहीं महत्त्वाचीं कारणें आहेत कीं काय व असल्यास तीं कोणतीं तें पाहूं. उपकार करणें झालें तरी त्यांत दूरदर्शीपणानें हिताहिताचा विचार करणें जरूर आहे. अशा शहाणपणाच्या उपकारदृष्टीनें पाहिलें असतां कमी उपयोगी व्यक्तींच्या संरक्षणासाठीं अधिक उपयुक्त व्यक्तींच्या जीवांची आहुति पडावी हें इष्ट नाहीं. आप्तमित्रांच्या आजारीपणांत स्वतःच्या जीवाची पर्वा न करितां त्यांची चाकरी केल्यामुळें, ज्यांच्या शरीरावर व मनावर जन्माचे वाईट परिणाम झाले आहेत अशीं उदाहरणें प्रत्येकाच्या डोळ्यांपुढें थोडीं तरी असतील. केव्हां केव्हां कित्येक आप्त अशा प्रकारचे आढळून येतात कीं, त्यांची कितीहो चाकरी केली तरी तिच्याबद्दल त्यांना कांहींच उपकार वाटत नाहींत. एकाद्या ठिकाणीं वर्षानुवर्षे नवऱ्याचें आजारीपण काढतां काढतां स्वतः आजारी पडून त्याचे आधीं मरून गेलेली बायको आढळून येते. दुसऱ्या ठिकाणीं, अनेक वर्षेपर्यंत आपल्या आईच्या आंथरुणाजवळ बसून रात्रंदिवस कष्ट काढिल्यानंतर, त्यांतून तिची सुटका होते न होते तोंच आतेच्या किंवा मावशीच्या आंथरुणापाशीं बसून, त्याच प्रकारची चाकरी करण्याचा जिच्यावर प्रसंग आला आहे अशी मुलगी दिसून येते. अशा प्रकारें तिच्या आयुष्याचे बरेच दिवस आजाऱ्यांच्या संन्निध गेल्यामुळें श्रमानें आणि त्रासानें तिचें मस्तक फिरून जाण्यापर्यंत पाळी आली आहे असें आढळतें. तिसऱ्या एका ठिकाणीं, बायकोला वेड लागलें असल्यामुळें तिला घरांत कोंडून ठेवून ती भलतेंच कांहीं करील म्हणून एकसारखें तिच्याकडे लक्ष पुरविण्यानें एका मनुष्याचे वृद्धापकाळाचे दिवस मोठ्या कष्टांत आणि हालांत जात आहेत असें दिसून

येत आहे. अशा प्रकारच्या उदाहरणांत आत्मयज्ञाची पुष्कळ जरूर आहे हें खरें, तथापि दुखणाइताचें जीवित सुसह करण्याकरितां जे उपाय करावयाचे त्यांनीं आपलें जीवित नष्ट होणार नाहीं, इतका सुमार चाकरी करणाऱ्या मनुष्यांनीं पाहणें जरूर आहे. दुखणाइताचें दुःख कमी करणें व स्वतःला दुःख करून घेणें ह्या दोहोंमध्यें तोडजोड केली पाहिजे.

विशेषतः जीं मनुष्यें आजारीपणांत एकसारखी पिरपिर करून कुटुंबांतील दुसऱ्या माणसाकडून वाजवीपेक्षां अधिक चाकरी करून घेऊं पाहतात, त्यांच्याकडे तर अगदीं बेतावेतानें लक्ष दिलें असतां पुरे आहे. कधींकधीं तर एकटें आजारी मनुष्य घरांतील सर्व माणसांना आपल्या मागें लावून ठेवितें आणि त्याजकडून काम करून घेऊन कृतज्ञता दाखवावयाची तीबद्दल त्याचें एकसारखें चरफडणें मात्र चाललें असतें. आजारी माणसांचा हा जुलूम चालूं देतां कामा नये. आजारी मनुष्यांच्या स्वार्थाला आळा घालण्याकरितां व कुटुंबांतील इतर मनुष्यांच्या सुखासाठीं, त्यांच्या भलत्याच मागण्यांना साफ नकार मिळाला पाहिजे. आपणासाठीं दुसऱ्यांना किती त्रास द्यावयाचा ह्याचा अजारी मनुष्यांनीं विचार केला पाहिजे. ह्या माणसांना शारीरिक अजार असतात एवढेंच नव्हे, तर नीतिविषयक मानसिक अजारही असतात. त्यांचे शारीरिक दोष काढून टाकण्यासाठीं जसे उपचार करावयाचे तसेच मानसिक दोषांचा प्रतिकार करण्यासाठीं देखील उपचार करणें अवश्य आहे. जे म्हातारे नवरे तरुण बायकांशीं लग्न करून त्यांना लवकरच आपलें दाईपण करावयास लावितात, त्यांना इतर मनुष्यांनीं त्यांच्या संबंधाचीं आपलीं कर्तव्यें करून दाखविण्याची फारशी जरूर नाहीं; परंतु त्यांचीं इतर मनुष्यांच्या संबंधानें काय कर्तव्यें आहेत हें दाखविण्यासाठीं मात्र त्यांच्या डोळ्यांत अंजन घातलें पाहिजे. मनुष्य अजारी असला म्हणजे त्याला स्वतःला परोपकाराच्या दृष्टीनें कांहींच कर्तव्यें करावयाचीं नसतात असें नाहीं; आणि हीं जर त्याच्या डोळ्यांपुढें नेहमीं उभीं राहतील तर आपल्या फायद्याकरितां दुसऱ्यांनीं आपणांला इजा करून घ्यावी असें त्याच्या कधींही मनांत येणार नाहीं.

परोपकाराच्या ह्या प्रकाराचा विस्तृतरीतीनें विचार करावयाचा म्हटला म्हणजे, ज्याचा कुटुंबाशीं संबंध नाहीं असें मनुष्य अजारी पडलें असतां त्यास किती मदत करणें जरूर आहे हेंही पाहिलें पाहिजे. ह्यासंबंधानें कांहीं निश्चित मत देतां येत नाहीं. प्रत्येक प्रसंगाचा स्वतंत्रपणें विचार करावा ला-

गेल व तो अजारी पडलेल्या मनुष्याचें वर्तन आणि स्थिति ह्यांवर अवलंबून राहील. ह्यासंबंधानें सर्वव्यापी सिद्धांत सांगणें जरी कठिण आहे तरी प्रत्येक प्रसंगाचा विचार करितांना कोणत्या गोष्टींकडे विशेष लक्ष पुरविणें जरूर आहे ह्याविषयीं कांहीं ठळक सूचना करितां येतील.

मनुष्य अजारी पडलें असतां त्याच्याविषयीं काळजी घेण्याची जबाबदारी प्रधानत्वेंकरून कुटुंबांतील मनुष्यांवर पडली पाहिजे, व समाजांतील इतर मनुष्यांवर तिचा अंश आलाच तर तो फार थोडा येईल हें कोणीही कबूल करील. ज्या तिऱ्हाईत मनुष्य ला अजारीपणांत मदतीची अवश्यकता लागेल व ज्याच्या अंगीं तिची पात्रता असेल, त्याला अप्रत्यक्ष रीतीनें कांहीं मदत केली म्हणजे पुरे आहे. जेव्हां एकाद्या मनुष्याचे कोणीच आप्त नसतील किंवा आप्तांच्या ऐवजींही त्याची काळजी घेण्यास दुसरें कोणी नसेल त्यावेळीं मात्र तिऱ्हाईत मनुष्यांनीं परोपकारदृष्टीनें त्याजकडे जरूर तितकें लक्ष देणें अवश्य आहे.

अशा प्रकारें लक्ष देण्याची मर्यादा ठरविणें ती, त्या मनुष्याचा स्वभाव व त्याचें पूर्वीचें आचरण ह्यांनीं अशा उपकारास त्यानें आपणास कितपत पात्र करून घेतलें आहे ह्याचा विचार करून ठरविली पाहिजे. जर एकाद्या मनुष्यानें पाहिजे तितकीं साधनें अनुकूल असतांही, आपल्या अजारीपणासाठीं किंवा म्हातारपणासाठीं कांहींएक तरतूद करून ठेविली नसेल, तर त्याला अजारीपणांत जी मदत करावयाची ती, अशा प्रकारची तरतूद ज्यानें करून ठेविली असेल त्याला करण्याच्या मदतीपेक्षां फार कमी असली पाहिजे हें सांगण्याची जरूर नाहीं. दुःखितांची स्थिति प्रत्यक्ष पाहिल्यानें कळवळा येऊन, दूरदर्शी व उधळ्या ह्या दोघांसही सारखीच मदत करावी अशी मनाची प्रवृत्ति होईल तर न्यायाच्या विचारांनीं तिचें संयमन केलें पाहिजे. सद्वर्तन व दुर्वर्तन ह्यांजकडेही असेंच लक्ष देणें अवश्य आहे. सदाचारी आणि दुराचारी मनुष्यांना जितकें त्यांच्या आचरणाला अनुरूप असें फळ मिळेल तितकें मिळवून देण्याविषयीं सर्व मनुष्यांनीं यत्न केले पाहिजेत. ज्यांना कवडीचीही किंमत नाहीं अशा व ज्यांचा कांहींतरी उपयोग आहे अशा दोनही प्रकारच्या लोकांस जर अजारीपणांत सारखीच मदत मिळाली तर वर दर्शविलेला अत्यावश्यक भेद राहणार नाहीं. ह्यानंतर मनुष्याच्या अंगच्या इतर गुणांचा व कर्तबगारीचा आणि त्यांपासून समाजाला किती फा-

यदा आहे ह्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. ज्यांचा समाजाला उपयोग नाहीं किंवा उलट ज्यांपासून समाजाला उपद्रव आहे, अशा लोकांस जी मदत करावयाची तिच्याहून किती तरी अधिक मदत, ज्यांच्या विद्वत्तेपासून किंवा कौशल्यापासून समाजाला बराच फायदा होण्याचा संभव असेल अशा लोकांस केली पाहिजे.

उपकारांचें फळ ज्या अजारी लोकांना मिळावयाचें त्यांच्या आचरणाचा व स्थितीचा विचार केल्यानंतर उपकार करणारांचें आरोग्य आणि स्थिति ह्यांचाही विचार केला पाहिजे. जीं मनुष्यें निरोगी व सशक्त असतील व अजारी मनुष्याच्या संसर्गानें आणि त्याची चाकरी करण्याच्या त्रासानें ज्यांच्यावर चिरकालिक वाईट परिणाम होण्याचा संभव नसेल अशा मनुष्यांनीं तिऱ्हाईत अजाऱ्यांकडे लक्ष द्यावें; परंतु जीं मनुष्यें अशक्त असून ज्यांच्या पोषकशक्ति बऱ्याच क्षीण झाल्या असतील अशा मनुष्यांनीं हा उपकार करण्याच्या भरीस पडूं नये. सारासारदृष्टीनें परोपकाराचा विचार केला असतां अशा प्रकारचा भेद करणें अवश्य आहे. आजारी मनुष्याच्या संसर्गानें अजारी पडण्याचा प्रसंग आला असतां जे त्यांतून लवकर बरे होण्याचा संभव असेल अशा मनुष्यांनीं इतरांपेक्षां अजारी मनुष्याकडे अधिक लक्ष पुरविलें पाहिजे. सांसर्गिक रोगांचा देखील उतारवयांत शक्ति क्षीण झाल्या असतां जितका परिणाम होतो तितका पूर्ववयांत होत नाहीं; व विशेषतः उतारवयांतील माणसाच्या मनांत तसें भय असलें म्हणजे तर ते परिणाम हटकूनच होतात. प्रत्येक मनुष्यानें योग्यमर्यादेच्या आंत स्वार्थबुद्धि ठेविलीच पाहिजे. ह्या स्वार्थाच्या दृष्टीनें वरील परोपकारबुद्धीचें आकुंचन करणें जसें अवश्य आहे, तसेंच परार्थाच्या दृष्टीनेंही केव्हांकेव्हां परोपकारापासून मन निवृत्त करावें लागतें. अजाऱ्यांची चाकरी करण्यानें थकवा येऊन किंवा संसर्गानें आपण अजारी पडलों असतां, आपल्या कुटुंबांतील इतर मनुष्यांना कोणत्या प्रकारचा त्रास होण्याचा संभव आहे हा विचार अवश्य केला पाहिजे. हा त्रास अनेक प्रकारें होण्याचा संभव आहे. सांसर्गिक रोगानें ग्रस्त झालेल्या तिऱ्हाईत मनुष्याला मदत करण्यानें अजारी पडून घरीं आलेलें मनुष्य आपणावरच संकट आणून घेतें असें नाहीं, तर घरांतील इतर मनुष्यांवरही संकट आणितें. कारण त्याची चाकरी करून घरांतील आणखी माणसेंही त्या दुखण्यांत पडण्याचा किंवा मरण्याचाही संभव असतो.

शिवाय त्याची चाकरी करण्यांत घरच्या इतर मनुष्यांना होणारा त्रास व त्यामुळें त्यांच्या मनावर होणारे परिणाम, त्याचप्रमाणें त्याचें दुःख पाहून इतरांस होणारें दुःख, व कदाचित् तें मेल्यास त्यामळें त्याच्या कित्येक आप्तांस होणारें दुःख आणि कित्येकांचें होणारें जन्माचें नुकसान ह्या सर्व गोष्टी आहेतच. मरणाचा भयंकर प्रसंग टळला तरी, कांहीं काळपर्यंत त्या मनुष्याला आपलीं नेहमींचीं कर्तव्यें करण्यास शक्ति राहत नाहीं; व कधींकधीं मनुष्य जन्माचें दुबळें होऊन राहतें. ह्या सर्व परिणामांचा एकंदरीनें विचार केला असतां असें दिसून येतें कीं, ज्या मनुष्याचा व आपला कोणत्याही प्रकारचा आप्तपणा नाहीं त्याला आजारीपणांत परोपकाराच्या दृष्टीनें जी मदत करावयाची ती आपणावर फारसें संकट न येईल असें धोरण ठेवून करावी, व ज्यांच्या पाठीमागें कुटुंबाचा बराच पसारा आहे व ज्यांना मोठाल्या जबाबदारीचीं कामें करावयाचीं आहेत त्यांनीं तितकीही करूं नये.

वरील विचारांच्या धोरणानें वागावयाचें म्हटलें तर ज्यांनीं अशा प्रकारची मदत करण्यास पुढें सरसावूं नये असे पुष्कळ लोक ही मदत करितात व त्यांना कांहीं इजा होत नाहीं, ही नेहमीं डोळ्यांपुढें घडणारी गोष्ट विसरतां कामा नये. वैद्यकीचा धंदा करणारे लोक नानाप्रकारच्या रोग्यांजवळ दररोज इतका वेळ घालवीत असतां, त्यांस बहुतकरून कांहीं होत नाहीं. आतां पुष्कळ प्रसंगीं ते पूर्वीं कांहीं रोगमारक उपाय करून ठेवीत असतील; पण तरी देखील हा गोष्ट मोठ्या आश्चर्याची आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं दररोज तेंच तेंच काम करण्याची संवय झाल्यामुळें त्यांच्या मनाची भीति अगदीं नाहींशी होते व ह्यामुळें त्यांस कांहीं होत नाहीं असें दिसतें. असें म्हटलें तरी धंद्याची सुरुवात करितांना कांहीं काळपर्यंत पूर्वींची संवय नसून, त्यांच्यावर कसे परिणाम होत नाहींत हें समजणें कठिण आहे. रुग्णालयांतून रोग्याची चाकरी करणाऱ्या बाया असतात त्या देखील रोगांना दाद न देणाऱ्या अशा बनतात. ह्यावरून रोगग्रस्तांविषयीं कळवळा उत्पन्न होऊन ज्यांना त्यांची शुश्रूषा करणें हा आपला धंदा करावा असें वाटतें, त्यांना आपला जीव धोक्यांत घालावा लागतो ही गोष्ट तर खरीच, परंतु आपणाला पहिल्यानें जितका बाऊ वाटतो तितका वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. आणि ज्याठिकाणीं सांसर्गिक रोगांचा संबंध नसतो त्याठिकाणीं अशा प्रकारचा धंदा करून शरीरप्रकृति चांगली राहण्यास कांहीं हरकत नाहीं.

रोगग्रस्तांची शुश्रूषा करण्यासाठीं आत्मयज्ञ करण्यास तयार होणारीं मनुष्यें अतिशय कोमल अंतःकरणाचीं असतात व रोग्यांचें दुःख पाहून विलक्षण प्रकारच्या दयेनें तीं तसें करण्यास प्रवृत्त होतात. ह्या मनोधर्माचें पृथक्करण करणें फार कठिण आहे. विशेषतः स्त्रियांमध्यें हा मनोधर्म फार आढळून येतो. ही अंतःकरणाची प्रवृत्ति असून, शिवाय आईची मुलांविषयीं ज्या प्रकारची स्वाभाविक बुद्धि असते तशी असल्यावर अनाथ रोग्यांची चाकरी करणें हें एक मनाला आनंद देणारेंच काम होऊन जातें. आईची अतिलहान मुलांवरील प्रीति तरी विशेषतः त्यांच्या अत्यंत दीनावस्थेमुळें उत्पन्न झालेली असते. ह्या दोन मनोधर्मांना अनुकूल अशा आचरणानें होणारें समाधान त्याच्यापासून होणाऱ्या दुःखापेक्षां व त्रासापेक्षां त्यांस अधिक वाटतें, व ह्यामुळें त्यांच्या हातून अशा प्रकारचें वर्तन घडतें. ह्या परोपकारापासून होणाऱ्या सुखाचा अनुभव घेण्याची इच्छा तर सामान्य मनुष्यास व्हावयाची नाहींच, परंतु त्यानें अशा मनुष्यांकडे पाहून आश्चर्य करीत रहावें.

ज्यांचा कुटुंबाशीं कांहीं संबंध नसतो अशा लोकांची स्वाभाविकपणें येणाऱ्या आजारांत चाकरी करण्याला जरी अनेक गोष्टींच्या विचारानें मन कचरण्याचा संभव आहे, तरी अपघातामुळें इजा होऊन ज्यांचें दाईपण करण्याची अवश्यकता उत्पन्न होते त्यांना मदत करण्याला तसें मन कचरण्याचें कांहीं कारण नाहीं. गाड्यांच्या टकरा झाल्यामुळें, बऱ्याच उंचावरून पडल्यामुळें किंवा उधळलेल्या घोड्यांच्या किंवा रेड्यांच्या तडाक्यांत सांपडल्यामुळें, दुखापत होण्याचे अनेक प्रसंग आलेले बहुतेकांच्या पाहण्यांत असतील. अशा प्रसंगीं, प्रत्येकानें आपणाकडून होण्यासारखी असेल तितकी मदत करणें अवश्य आहे. ज्यांच्या अंगीं रानटी स्थितींतील निर्दयपणाचा बराच अंश शिल्लक राहिला असेल, तेच अशा वेळीं अगदीं उदासीन राहूं शकतील. परोपकाराचा अगदीं ढोबळ रीतीनें विचार करणाऱ्या लोकांना देखील जरी अपघातानें दुखापत झालेल्या लोकांस मदत करण्याची अवश्यकता दिसून आलेली आहे, तरी अशा प्रसंगीं दुःखितांना चांगल्या रीतीनें उपयोग व्हावा ह्यासाठीं ज्या प्रकारचें ज्ञान व कौशल्य संपादन करण्याची जरूर आहे, ती मिळविण्यासाठीं आजपर्यंत सुधारलेल्या लोकांतही सांगण्यासारखे प्रयत्न झालेले नाहींत. अशा प्रकारचे यत्न करण्याची अवश्यकता अलीकडेच पाश्चात्य लोकांत कोठें थोडीशी वाटूं लागली आहे. आजपर्यंतची स्थिति म्हटली म्हणजे, एकाद्या म-

नुष्यास जखम लागली असतां अथवा त्याचा हातपाय तुटला किंवा ठेंचला असतां, जे शेंकडो लोक त्याला मदत करण्याच्या इच्छेनें त्याच्या सभोंवतीं जमतात व त्याच्यासाठीं हळहळत असतात, त्यांना त्या प्रसंगीं काय करावें ह्याची कांहींएक माहिती नसते. उलट, अज्ञानानें ते जे कांहीं भलभलतेच उपाय करितात त्यांच्या योगानें स्वाभाविक रीतीनें जे परिणाम घडावयाचे त्यांहूनही भयंकर परिणाम घडून येतात; व मदत करण्याचे इच्छेचा परिणाम अपाय करणें हा होतो. कारण, उपाय करण्याचे मार्ग फार थोडे असतात, परंतु अपाय करण्याचे असंख्य असतात, ह्यामुळें गैरमाहीत मनुष्याच्या हातून अपाय होण्याचाच विशेष संभव असतो.

ह्यासाठीं हा विशेष प्रकारचा परोपकार प्रसंग येईल तेव्हां आपल्या हातून घडावा अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें दूरदर्शीपणानें शस्त्रवैद्याच्या कलेचें व वैद्यशास्त्रांतील ह्या प्रकरणाच्या स्थूल तत्त्वांचें ज्ञान संपादन केलें पाहिजे. अपघात घडल्यापासून कुशल शस्त्रवैद्याची मदत मिळेपर्यंत मध्यंतरीं जो बराच वेळ लागतो त्या वेळांत दुखापत झालेल्या मनुष्यांची कशी व्यवस्था ठेवावी ही माहिती होण्यापुरतें ज्ञान असलें म्हणजे पुरे. अपघातानें दुखावलेल्या लोकांस ताबडतोब कोणते उपचार करावे ह्याविषयींच्या ज्ञानाचा लोकांत प्रसार करण्यासाठीं व अनुभवानें हें ज्ञान लोकांस प्रत्यक्ष शिकविण्यासाठीं, पाश्चात्य लोकांनीं मोठमोठाल्या मंडळ्या स्थापन केल्या आहेत व ह्या मंडळ्यांच्या आश्रयाखालीं फिरतीं इस्पितळें ठेवून लोकांस शिक्षण देण्याचा क्रम चाललेला आहे. ह्या मंडळ्यांचे लोकांवर अनंत उपकार आहेत असें म्हटलें पाहिजे. दुर्दैवानें ह्या ज्ञानाचा व कौशल्याचा उपयोग करण्याचा वेळ आला म्हणजे तो व्हावा तितका होत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. घाबरल्यामुळें किंवा अनेक उपायांपैकीं कोणता योजावा ह्याचा निश्चय लवकर न करितां आल्यामुळें शिकून निरुपयोग होतो. अनुभवी व वापरलेल्या लोकांचीही केव्हांकेव्हां तशी स्थिति होण्याचा संभव आहे; मग ज्यांना म्हणण्यासारखा अनुभव नसेल अशांची तशी स्थिति झाल्यास आश्चर्य नाहीं. तथापि अशा प्रकारचे यत्न करणें निरुपयोगी आहे असें समजूं नये; उलट, ते विशेष काळजीपूर्वक होऊन, लोकांना जास्त अनुभव दिला जावा व साधेल तर अशा प्रकारच्या ज्ञानाचा सामान्य लोकशिक्षणांतही प्रवेश व्हावा ह्याविषयीं खटपट होणें जरूर आहे.

# प्रकरण ११

## जुलमानें व संकटानें गांजलेल्यांस मदत

नीतिविषयक कल्पना मनांत येऊन त्यांवर विचार करण्याची ज्याची योग्यता असेल, त्या प्रत्येक मनुष्यास अनेक कारणांनीं, जुलमानें ग्रस्त झालेल्या लोकांस मदत करावी असें वाटतें; आणि विशेषतः ज्यांच्यावर जुलूम होतो ते जुलूम करणारांहून दुर्बल असले म्हणजे तर त्यांच्याविषयीं फारच दया उत्पन्न होते. ज्यांच्यावर जुलूम होत असेल त्यांचीं शारीरिक किंवा मानसिक दुःखें प्रत्यक्ष पाहून अथवा ऐकून, मनुष्याचें मन एकदम कळवळून जातें; जुलूम करणाराविषयीं तिरस्कारबुद्धि उत्पन्न होते; व्यक्तिविषयक हक्कांची पायमली झाल्यामुळें न्यायदेवतेचा अंगांत संचार होतो; आणि त्या मनुष्याची दूरच्या परिणामांकडे लवकर दृष्टि पोंचण्यासारखी असेल तर, समाजसंस्थेच्या सामान्य तत्त्वांचें उल्लंघन झाल्याबद्दल त्याला फार राग येतो. जुलमानें त्रासलेल्या लोकांविषयीं विचार मनांत आला असतां इतके मनोविकार एकदम उत्पन्न होतात. सुधारणेच्या केवळ बाह्यांगांचेंच प्रदर्शन करणाऱ्या लोकांची गोष्ट निराळी, परंतु तिच्या अंतरंगाचा ज्याच्या मनावर पूर्ण परिणाम झाला आहे तो मनुष्य जुलमानें ग्रस्त झालेल्या लोकांस मदत करण्यासाठीं अशा प्रकारचे प्रयत्न करील कीं, त्यांचे योगानें त्याला स्वतःला धोक्यांत पडावें लागलें तरी त्याचीं तो पर्वा करणार नाहीं.

अर्धवट सुधारलेल्या लोकांचे देश काबीज करण्याकरितां व रानटी लोकांशीं लढून त्यांना हांकून लावण्याकरितां पगार देऊन ठेवलेल्या सैन्यांतील शिपायांनीं दाखविलेल्या शौर्याची किंमत, एखाद्या जनावरानें आपल्या भक्ष्यस्थानीं पडणाऱ्या दुर्बल प्राण्यावर झडप घालून त्याला आपल्या हस्तगत करण्यांत जें शौर्य दाखवावें, त्याच्या इतकी समजली पाहिजे. जो मनुष्य आत्मसंरक्षणाकरितां किंवा आपल्या देशावर परचक्र आलें असतां त्याच्या संरक्षणाकरितां जीवावर उदार होऊन लढतो, त्याचें शौर्य मात्र प्रशंसनीय व अनुकरणीय समजलें पाहिजे. पहिल्या प्रकारचा पराक्रम करण्यास मनुष्य प्रत्यक्ष स्वार्थामुळें उद्युक्त होतो;परंतु त्या स्वार्थांत मनुष्यजातीला कमीपणा आणणारें कांहीं नसून तो उलट भूषणावहच आहे. दुसऱ्या प्रकारच्या पराक्रमांत अप्रत्यक्षस्वार्थ आहे. आपल्या राष्ट्राला पराधीनता न यावी ह्यासाठीं

झटण्यात प्रत्येक मनुष्याचें हित आहेच. ह्या प्रत्यक्षस्वार्थाच्या कल्पनेबरोबर आणखी आपल्या देशबांधवांवर उपकार करण्याचाही विचार असण्याचा संभव आहे. वरील प्रकारांत स्वार्थाचा थोडाबहुत तरी अंश असणारच, परंतु दुर्बलाचें प्रबलापासून रक्षण करण्यासाठीं त्याच्या सामर्थ्याला न भितां आपला जीव धोक्यांत घालून जो आपली पराकाष्ठा करितो त्याच्या त्या वर्तनांत मात्र स्वार्थाचा लेशही नसतो. दुर्बलांना मदत करण्यासाठीं अशा रीतीनें दाखविलेलें धैर्य अत्यंत श्रेष्ठ प्रतीचें होय, कारण त्याचे उत्पादक मनोविकार मनुष्यस्वभावाच्या अत्युन्नतस्वरूपापासून उत्पन्न होणारे असतात.

परोपकाराच्या ह्या प्रकाराचें महत्त्व धर्मपुस्तकांतून व नीतिशास्त्रावरील ग्रंथांतून कितीही लिहिलेलें असलें तरी त्याचा मनुष्याच्या मनावर फारच थोडा परिणाम झालेला आहे. सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांत दुर्बलांचें जुलुमापासून रक्षण करण्यासाठीं ज्यांनीं आपले जीवही धोक्यांत घातले आहेत, असे उदारात्मे आजपर्यंत पुष्कळ झाले असतील; परंतु निरनिराळ्या समाजांतील लोकांची साधारण मानानें स्थिति पाहिली असतां, परोपकाराच्या ह्या तत्त्वाचा म्हणण्यासारखा अंमल ज्यावर बसला आहे असा समाज सांपडणें कठिण आहे. ख्रिस्ती मिशनरी ख्रिस्ती धर्माच्या सामर्थ्याविषयीं मोठी प्रौढी गात असतात, परंतु ख्रिस्ती धर्माच्या नानापंथांच्या लोकांनीं परस्परांवर जितका जुलूम केला आहे तितका जगांत दुसऱ्या कोणत्याही धर्मासाठीं झाला नसेल. ह्या आपापसांतील जुलुमाशिवाय, ख्रिस्ती राष्ट्रांनीं एकामागून एक पाहिजे तितके देश काबीज करून तेथील लोकांवर हवे तसे जुलूम केले आहेत, व अजूनही ख्रिस्ती राष्ट्रें पादाक्रांत केलेल्या राष्ट्रांतील लोकांवर थोडाबहुत तरी जुलूम करीत आहेत. आतां ख्रिस्ती लोकांत हल्लींच्या स्थितींत न्यायी व परोपकारशील व्यक्ति अधिक आढळतात ही गोष्ट खरी, परंतु त्याचें कारण ख्रिस्ती धर्म नसून त्यांची मानसिक उन्नति हें आहे. गरिबांवर जुलूम करणारे कर्दनकाळ पुरुष पाहिल्याबरोबर त्यांचा द्वेष आला पाहिजे; परंतु लहानपणापासून ह्या गोष्टी नेहमीं डोळ्यांपुढें असल्यामुळें त्यांचा इतका तिटकारा येत नाहींसा होतो. शाळेंत जाणाऱ्या मुलांमध्यें देखील जुलुमी वर्तनाचे प्रकार दिसून येतात. मोठ्या व दांडग्या मुलांनीं लहान मुलांस पाहिजे तितका त्रास द्यावा व त्याबद्दल कोणीं अवाक्षरही काढूं नये असा प्रकार सर्वत्र आढळून येतो. धार्मिक लोकांच्या देखरेखीखालीं चाल-

लेल्या बोर्डिंग शाळांतही हाच प्रकार आढळतो. फार काय, ह्या शाळांवरील धर्माचें अवडंबर माजविणारे अधिकारी देखील त्या गोष्टी त्यांना समजल्या तरी त्यांजकडे कानाडोळा करितात. कधीं कधीं तर मुलांनीं केलेल्या जुलमामुळें भयंकर अपघातही घडतात. थोड्या वर्षांपूर्वी अशा अपघातानें एक मुलगा मरण पावल्याबद्दल एका बिशपानें दुःख प्रदर्शित करून त्याविषयीं पुढें फारसें कांहीं केलें नाहीं. इतर धर्मांच्या लोकांचीं राज्यें काबीज करून ख्रिस्ती लोकांना जुलुमाचीं नवीन क्षेत्रें मोकळीं करून देण्यासाठीं मोठमोठालीं सैन्यें ठेवून सर्व जगावर स्वाऱ्या करणाऱ्या लोकांच्या राष्ट्रीय नीतीला शोभेल अशीच सामाजिक नीतिही ह्या लोकांत आढळून येते.

लहानापासून तों थोरापर्यंत व रानटी लोकांपासून तों सुधारणेची घमेंड मारणाऱ्या लोकांपर्यंत परोपकाराच्या ज्या प्रकाराची मोठी उणीव भासत आहे, त्याची अवश्यकता लोकांचे मनावर ठसविण्याचें काम उत्क्रान्तनीतितत्त्वांच्या मदतीनें केलें पाहिजे. प्रबलांच्या जुलमापासून दुर्बलांचें संरक्षण करण्यासाठीं स्वतःला इजा झाली तरी सोसणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे हे मनांत ठेवून वागणाऱ्या लोकांचें कोणत्याही समाजांत प्राबल्य झाल्याशिवाय मनुष्यस्वभावाला व मनुष्याच्या सामाजिक स्थितीला अत्युन्नतस्वरूप प्राप्त होणें शक्य नाहीं.

मनुष्यांनीं दुष्ट स्वभावानें एकमेकांस त्रास दिल्यामुळें झालेल्या किंवा होणाऱ्या दुःखांचें निवारण करण्यासाठीं, व त्याचप्रमाणें पंचमहाभूतात्मक सृष्टींतील अनंत घडामोडी ज्या शक्तींच्या योगानें चालल्या आहेत त्यांच्या भयंकर स्वरूपांचे मनुष्याच्या जुलमापेक्षांही घातक परिणाम टाळण्यासाठीं, प्रत्येक मनुष्यानें आपलें किती नुकसान करून घेण्यास तयार झालें पाहिजे ह्या गोष्टीचा विचार करण्यापूर्वी ह्या प्रत्येक प्रकारचे अनर्थ टाळण्यासाठीं ज्या धैर्याची अवश्यकता असते त्याविषयीं चार शब्द लिहिणें जरूर आहे. ह्या धैर्याची दुसऱ्या प्रकारच्या गोष्टींतच विशेष जरूर लागते. कारण, मनुष्याला कांहीं तरी करुणा येण्याचा संभव आहे, परंतु सृष्टींतील शक्तींच्या पुढें दयामाया वगैरे कांहींएक चालावयाचें नाहीं.

धैर्य ह्या गुणाच्या संबंधानें सामान्य लोकांची कल्पना चमत्कारिक असते. देशकालवर्तमानाचा विचार न करितां, मनुष्यांच्या अंगीं धीटपणा दिसून आला कीं, त्यांची सर्व प्रसंगीं सारखीच वाखाणणी करीत सुटावें व

त्याचा अभाव दिसून आला म्हणजे त्यांची निंदा करावी असा त्यांच्या मनाचा कल असतो. अशा प्रकारच्या अविचाराच्या प्रवृत्तींचें कधींच समर्थन करितां येणार नाहीं. सर्वस्वी नाहीं तरी बहुत अंशानें, ह्या गुणाचा मनुष्याच्या अंगांत उदय होऊन त्याची वृद्धि होण्याला कारण त्याचा स्वतःचा जगांतील अनुभव होय. संकटांशीं टक्कर देऊन त्यांतून निभावून जाण्याचें आपलें सामर्थ्य प्रत्येक मनुष्य वेळोवेळीं कसास लावून पाहत असतो व अशा अनेक प्रसंगीं त्याला जसा अनुभव येईल त्याप्रमाणें त्याचा स्वभाव भितरा किंवा धीट बनत असतो. क्रूर प्राण्यांशीं किंवा सृष्टींतील उग्र शक्तींशीं लढतांना ज्या मनुष्याला अनेक प्रसंगीं अपयश आलें असेल व त्याचे दुःखदायक परिणाम भोगावे लागले असतील, त्याच्यावर पुन्हा तसा प्रसंग आला असतां त्यानें पुढें पाऊल टाकण्यास कचरणें हें स्वाभाविक आहे. पण अशा प्रत्येक वेळीं यशच येत गेलें तर मनुष्याला धैर्याचीं कामें करण्याला भीति वाटेनाशी होते व केव्हां केव्हां अविचाराचीं धाडसें करण्याचीही फाजील उत्सुकता अंगांत उत्पन्न होते. नवीननवीन धैर्याचीं कामें हातून तडीस गेलीं म्हणजे अधिकाधिक समाधान व्हावें व आणखी पराक्रम करून दाखविण्याची संधि आली असतां ती साधण्याविषयीं पराकाष्ठेची उत्कंठा व्हावी अशी मनुष्याची स्थिति होऊन जाते. ह्यावरून असें दिसतें कीं, भितरेपणा आणि धैर्य हे स्वाभाविकपणें उत्पन्न होणारे मनुष्यस्वभावाचे धर्म आहेत. शारीरिक-सामर्थ्य, नीतिविषयक विचारांचें आणि मनोविकारांचें प्राबल्य, आणि बुद्धिचापल्य ह्या गुणांची ज्या मानानें कमतरता असेल, त्या मानानें मनुष्याचे अंगीं भितरेपणा उत्पन्न होईल व ज्या मानानें ह्या गुणांचें आधिक्य असेल त्या मानानें त्याचे अंगीं धैर्य येईल. कोणतेंही बिकट काम अंगावर घेण्यापूर्वी तें करण्याला कोणत्या प्रकारच्या अडचणी येण्याचा संभव आहे व त्यांतून निभावून जाण्याचें आपल्या अंगीं पूर्ण सामर्थ्य आहे कीं नाहीं ह्याचा अजमास करणें फार कठिण असतें व हा अजमास चुकला तर प्राणाशीं गांठ येण्याचा संभव असतो. उदाहरणासाठीं आल्प्स पर्वतावर चढून तेथील माहिती मिळविण्याचें अचाट काम करावयाचें आहे अशी कल्पना करूं. जर एकादा मनुष्य शरीरानें इतका अशक्त असला, कीं दोनतीन हजार फूट चढून गेल्याबरोबर त्याला पुढें पाऊल टाकण्याची शक्ति उरण्याचा संभव नसला किंवा त्याच्या हातांत खडकाला किंवा झाडांच्या मुळांना गच्च धरून

आपलें शरीर बराच वेळ सांवरून धरण्याचें सामर्थ्य नसलें; किंवा त्याची दृष्टि मंद असल्यामुळें आपल्या डोळ्यांपुढची जमीन तिच्यावर पाय नीट ठरेल अशा प्रकारची आहे कीं नाहीं हें धड ओळखतां येत नसलें; किंवा खोल दरीकडे पाहिल्याबरोबर त्याला घेरी येण्याची संवय असली; किंवा कठिण प्रसंग आला असतां त्यांतून पार पडून जाण्याला त्याच्या अंगीं प्रसंगावधान मुळींच नसलें; तर त्या मनुष्यानें असल्या अचाट कामाला हात घालण्याचा विचार स्वप्नांत सुद्धां आणूं नये. वर सांगितलेल्या शारीरिक किंवा मानसिक दोषांपैकीं एक जरी अंगीं असला तरी, तो बाकीच्या सर्व गुणांना निरुपयोगी करून टाकून त्या मनुष्याचा नाश करण्यास पुरे होईल. असल्या मनुष्यानें असलें काम हातांत घेणें हें धैर्य नसून मूर्खपणाचें धाडस आहे. परंतु ज्या मनुष्याचे हातपाय सशक्त असून सूक्ष्म हवेंत श्वासोच्छ्वासाला योग्य अशीं ज्याचीं फुप्फुसें असतील व ज्याचीं इंद्रियें तीक्ष्ण असून डोकें शांत व स्वच्छ असेल व प्रसंगीं न घाबरतां युक्तीनें सुटून जाण्याचें ज्याच्या अंगीं सामर्थ्य असेल, त्यानें असलें जोखमीचें काम अंगावर घेण्यास हरकत नाहीं. ह्या गुणांचा 'धैर्य' हा स्वाभाविक परिणाम आहे.

मनुष्याच्या अंगीं आतां सांगितलेले गुणदोष ज्या प्रमाणानें असतील त्या प्रमाणानें त्याचें वर्तन कमीअधिक धैर्याचें किंवा भितरेपणाचें असेल. आणि कोणाच्याही धैर्याच्या किंवा भितरेपणाच्या वर्तनावर टीका करितांना ह्या गुणदोषांचा विचार केला पाहिजे. बहुत प्रसंगीं भितरेपणानें ध्वनित होणाऱ्या दोषांबद्दल मनुष्याविषयीं दया वाटावी व धैर्यानें ध्वनित होणाऱ्या गुणांबद्दल त्याजविषयीं सन्मानबुद्धि उत्पन्न व्हावी; ह्यापेक्षां अधिक तिरस्कार किंवा स्तुति करण्याचें कारण नाहीं. बहुत प्रसंगीं असें म्हणण्याचें कारण, कित्येक थोड्या प्रसंगीं दोषांमुळें किंवा गुणांमुळें साहजिक रीतीनें जो भितरेपणा किंवा धीटपणा उत्पन्न व्हावा त्याहून बराच अधिक दाखविला जातो. असें झालें असतां पहिल्याविषयीं तिटकारा व दुसऱ्याविषयीं वाखाणणी करणें जरूर आहे. परंतु बाजवीहून अधिक दाखविलेलें धैर्य 'अविचाराचें धाडस' मात्र नसावें.

साधारण मानानें कोणत्याही मनुष्याला एकादें धैर्याचें कृत्य करण्याविषयीं संमति देतांना किंवा एकादें कृत्य स्वतः हातीं घेतांना, त्या कृत्याचें महत्त्व व करणाराच्या अंगचें तें करण्याचें सामर्थ्य ह्यांचा अजमास पाहिला पाहिजे. सामर्थ्याचा अजमास करितांना अनेक गोष्टींचा विचार करणें जरूर

आहे. मनुष्याच्या वयाच्या मानानें त्याचें धैर्य कमीअधिक होत असतें. भरज्वानींत असतांना जीं धैर्याचीं कामें मनुष्य करूं शकेल तीं त्याच्यानें लहानपणीं किंवा म्हातारपणीं व्हावयाचीं नाहींत. त्याचप्रमाणें मनुष्याची शरीरप्रकृति नेहमीं सारखी राहात नाहीं. केव्हांकेव्हां मनुष्याच्या अंगीं अशी तरतरी दिसत असते कीं, धैर्याचीं कामें करण्यास त्यास उमेद वाटावी; परंतु दुसऱ्या कांहीं प्रसंगीं सांगण्यासारखा आजार नसतां त्याच्या शरीरांत तो जोम दिसत नाहीं. आतां मनुष्याच्या मनाच्या स्थितीचाही विचार करणें अवश्य आहे. कारण, जर का एकादी गोष्ट लक्षांत येण्याला किंवा एकादी कृति हातून घडण्याला क्षणाचा विलंब लागला तर प्राणाशीं गांठ येऊन पडावयाची, अशी स्थिति असते. ह्या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर प्रत्येक मनुष्यांत कांहीं शारीरिक किंवा मानसिक विशेष असेल तर तोही पाहिला पाहिजे. काळिजाचा विकार मनुष्याला असला तर त्यामुळें देखील भितरेपणा उत्पन्न होतो.

ह्या विशेष गोष्टींचा विचार केला नाहीं तरी संकटाचीं कामें व त्यांतून पार पडण्याचें सामर्थ्य ह्या दोहोंमधील संबंधाचें कांहीं तरी तारतम्य पाहून मनुष्यानें तीं कामें अंगावर घेतलीं पाहिजेत, असा साधारण लोकसमज आहे. हें तारतम्य न पाहतां अचाट काम अंगावर घेण्याच्या स्वभावाला 'धाडसी' असें म्हणण्याची चाल आहे. "पुढचामागचा विचार करणें ह्यांत अधिक शौर्य आहे" असें युद्धप्रसंगाच्या संबंधानें म्हणण्याची चाल आहे व त्याचा अर्थ इतकाच कीं, शत्रूशीं सामना करणें जर फारच धोक्याचें असेल तर त्या भानगडींत न पडणें हा शहाणपणा आहे. इतर संकटाच्या कामांत देखील हें वर्तनतत्त्व लागू पडण्यासारखें आहे. आहाराबाहेरचें काम कोणीं अंगावर घेतलें असतां त्याबद्दल नापसंतीच दर्शविली पाहिजे. विशेष कारण नसतां आपला जीव धोक्यांत घालणारे कित्येक मूर्ख लोक असतात व त्यांची अज्ञानलोकांकडून फार वाहवा केली जाते. सामान्य लोकांकडून ज्या गोष्टी धैर्याच्या म्हणून समजल्या जातात त्यांतील बऱ्याच केवळ मूर्खपणाच्या असतात. वास्तविक अशा गोष्टी अशा शौर्याच्या दर्शक नसून पुढील परिणामांच्या अज्ञानाच्या दर्शक असतात. चांगला हेतु असला तरी निष्काळजीपणानें जीवावर उदार होणें चांगलें नाहीं.

ज्यांच्यापुढें दयामाया कांहीं चालावयाची नाहीं, अशा सृष्टींतील शक्तींच्या प्रभावामुळें जे लोक संकटांत पडले असतील त्यांस परोपकारबुद्धीनें

सोडविण्याकरितां यत्न करितांना वर दिलेल्या गोष्टींचा विचार करून, शिवाय पुढें दर्शविल्याप्रमाणें हा यत्न करणाऱ्याच्या जीवाला अपाय झाला असतां त्यापासून अप्रत्यक्ष परिणाम काय घडण्यासारखे आहेत, हा देखील विचार होणें अवश्य आहे.

एवढा वेळ सामान्य विचार झाला. आतां एकदोन विशेष प्रसंगांचीं उदाहरणें घेऊं. एक मनुष्य पाण्यांत बुडत आहे, त्याला वांचविण्यासाठीं परोपकाराच्या दृष्टीनें जवळच्या मनुष्यांचें काय कर्तव्य आहे तें पाहूं. ह्या ठिकाणीं जवळ असलेल्या मनुष्यांच्या अंगच्या धैर्याचा व त्यांच्या स्थितीचा विचार केला असतां कित्येकांनीं प्रवाहांत उडी घालणें योग्य होईल, कित्येकांनीं घालावी कीं नाहीं हें निश्चितपणें सांगतां येणार नाहीं, व कित्येकांनीं ह्या प्रयत्नांत न पडणें योग्य होईल.

जर एकादा मनुष्य चांगला पोहणारा असला व त्याच्या अंगीं जरूर तितकें सामर्थ्य असलें, तर त्यानें जवळच बुडत असलेल्या मनुष्यास वांचविण्याचा प्रयत्न न करणें हें निर्दयपणाचें किंवा त्याहूनही वाईट वर्तन समजलें पाहिजे व त्याबद्दल त्याला दोष दिला पाहिजे. ज्या मनुष्याच्या अंगांत स्वतःवर फारसें संकट आणून न घेतां दुसऱ्याचा जीव वांचविण्याचें सामर्थ्य असेल, त्यानें त्याचा उपयोग न केल्यास मनुष्यवधाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्याजवर ठेवण्यास हरकत नाहीं. त्याच्या संबंधानें कायती एकच सबब सांगतां येईल, ती ही कीं, बुडत असलेला मनुष्य भलत्याच रीतीनें सोडविणाऱ्या मनुष्यास धरूं गेला असतां दोघांच्याही जीवावर येऊन बेतेल; परंतु सोडविणाऱ्या मनुष्यानें बुडत असलेल्या मनुष्याच्या पाठीकडून जाऊन त्याला धरिलें असतां तसें होण्याचा संभव नाहीं.

परंतु ज्या मनुष्याच्या अंगांत प्रसंगाला अवश्य इतकें बळ किंवा पोहण्याचें कसब नसेल अथवा दोन्हीं नसतील त्याच्याविषयीं काय मत द्यावें? मनुष्य तितका बळकट नसला तर त्याच्यानें फार वेळपर्यंत पाण्यांत टिकाव धरवत नाहीं; किंवा बळकट असला तरी संवईनें पोहण्यांत चांगला वाकबगार झालेला असल्याशिवाय त्याच्यानें हें काम निभावणार नाहीं. कदाचित् त्या मनुष्याच्या अंगांत शेंपन्नास हात पोहून जाण्याचें सामर्थ्य असेल व बुडणारा मनुष्य त्याहूनही अधिक अंतरावर असेल, अथवा हा प्रसंग समुद्रांत असल्यास लाटांचा जोर इतका भयंकर असूं शकेल कीं त्यांच्या सपाट्यांतून स्वतः सुटून

जाण्याचीच पंचाईत, मग बुडणाराला वांचविण्याची गोष्ट दूरच राहिली. अशी वस्तुस्थिति असेल तर अविचाराच्या परोपकारबुद्धीनें मनुष्य धाडस करण्यास तयार होवो; परंतु मागेंपुढें पाहून परोपकाराचा विचार केला असतां अशा प्रसंगीं मनुष्यानें पुढें पाय न घालणें हेंच योग्य आहे. ह्या ठिकाणीं अविचारयुक्त परार्थाला विचारयुक्त स्वार्थानें प्रतिबंध केला पाहिजे. कारण, एक जीव वांचविण्याचा निरर्थक यत्न करण्यांत दोन जीवांचा नाश व्हावा हें सर्वथा अयोग्य होय.

दुसऱ्याही कित्येक गोष्टींचा विचार करणें अवश्य आहे. ज्या मनुष्याला बायकामुलें व जवळचे नातलग नसतील, म्हणजे ज्याच्या मरणानें म्हणण्यासारखें दुःख कोणाला होण्याचा संभव नसेल, त्यानें ज्याच्या अंगावर कुटुंबाच्या संबंधाच्या अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या आहेत असा मनुष्य ज्या ठिकाणीं पुढें सरसावणार नाहीं, त्या ठिकाणीं थोडेंबहुत धाडस करणें योग्य होईल. अशा ठिकाणीं परोपकारबुद्धिच एकाला पुढें जाण्यास व दुसऱ्याला मागें राहण्यास सांगते. आत्मसंरक्षणाची बुद्धि प्रत्येक मनुष्याच्या अंगीं स्वाभाविकपणें उत्पन्न झालेली आहेच, परंतु तिचा कांहीं संबंध नसतां, आपणावर अवलंबून राहणाऱ्या मनुष्यांच्या संबंधानें आपल्या कर्तव्यांविषयीं विचार मनांत येऊन, संकटांत पडलेल्या मनुष्यास सोडविण्यासाठीं पुढें टाकण्यास तयार झालेलें पाऊल जागच्याजागीं राहण्याचा संभव आहे.

ह्यावरून असें ध्यानांत येईल कीं, ह्यासंबंधानें खात्रीपूर्वक असें सांगतां यावयाचें नाहीं. कुशल पोहणाराच्या संबंधानें वर दिलेल्या उदाहरणाप्रमाणें जेथें कर्तव्याची चाड उघडउघड दिसत असेल ते प्रसंग सोडून बाकी प्रत्येक ठिकाणीं त्या त्या वेळेपुरता व त्या त्या व्यक्तीपुरता निराळा विचार केला पाहिजे. हा विचार करितांना पूर्वीं सांगितलेल्या सर्व गोष्टी लक्षांत आणून आणखी ज्या मनुष्याचा जीव वांचवावयाचा तो मनुष्य किती किंमतीचा आहे हें पाहिलें पाहिजे. कारण, ज्याचें वर्तन फार थोरपणाचें असेल किंवा ज्याचेपासून समाजाला फार उपयोग होण्यासारखा असेल अशा मनुष्याच्या जीवाकरितां जितका यत्न करणें योग्य आहे तितका दुष्ट व दुराचारी मनुष्यासाठीं करण्याची जरूरी नाहीं.

एकादा मनुष्य बुडत असला तर त्याला वांचविण्याचा प्रयत्न करण्याच्या संबंधानें उद्भवणारे प्रश्न कठिण असतातच, परंतु त्याहूनही कठिण

प्रश्न आगींत सांपडून मरणाऱ्या मनुष्याला सोडविण्याच्या संबंधानें उत्पन्न होतात. पहिल्या प्रसंगीं बुडणाऱ्याचा जीव वांचवावयास जाणाऱ्या मनुष्याचें सामर्थ्य, चातुर्य व चपलता ह्यांचा पुष्कळ उपयोग होण्याचा संभव असतो आणि पाणी जरी केव्हांकेव्हां संथ असतें व केव्हांकेव्हां त्यांत भयंकर लाटा उत्पन्न होतात, तरी त्याचा त्याला त्या वेळापुरता चांगला अजमास करितां येतो. परंतु ह्या प्रसंगीं ज्या महाभूताशीं गांठ असते त्याच्या घातकशक्तीचा जोर फार भयंकर असून तेथें सामर्थ्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. व पूर्वी कोणत्याही प्रकारची अटकळ करितां येत नाहीं.

धाडसी मनुष्यांनीं स्वतःच्या जीवाची पर्वा न करितां आगीच्या डोंबांत शिरून, आपल्या आप्तांचे व अगदीं तिऱ्हाईत मनुष्यांचे देखील जीव वांचविल्यांचीं उदाहरणें वारंवार आपल्या ऐकण्यांत व वाचण्यांत येतात; व त्याचप्रमाणें असे प्रयत्न करण्याकरितां आगींत शिरून भस्म झालेल्या हृदयद्रावक हकीकती पुष्कळवेळां घडून येतात. असल्या प्रसंगीं एकाद्याला आगींत शिरण्याविषयीं आपण सल्ला द्यावा काय? एका प्राण्याचा जीव वांचण्याचा फारसा संभव नसतां दुसऱ्या प्राण्यानें आपल्या जीवाची आहुति द्यावी, इतकी आत्मत्यागाची पराकाष्ठा व्हावी असा परोपकाराच्या तत्त्वांचा उद्देश आहे काय? ह्या प्रश्नांचीं समर्पक उत्तरें देतां येत नाहींत. प्रसंगाचें स्वरूप, धाडस करणाऱ्याचा ज्याच्यासाठीं धाडस करावयाचें त्याच्याशीं संबंध, व ह्या संबंधामुळें व परस्परप्रेमामुळें उत्पन्न होणाऱ्या मनोविकारांचें प्राबल्य इतक्या गोष्टींचा विचार करून निश्चय केला पाहिजे. कित्येकवेळां मनुष्य स्वार्थत्याग करण्यास पूर्णपणें तयार झाला असला तरी त्यानें काय करावें हें सांगणें फार कठिण असतें. एकाद्या मनुष्यानें आगीच्या ज्वाळांत शिरून एका खोलींतून एका मुलाला बाहेर काढिलें असतां, त्याला घेऊनच माडीवर जाऊन तेथल्या दुसऱ्या खोलींतील आणखी एका मुलाला त्याच खेपेस घेऊन यावें कीं काय, ह्याचा निश्चय करणें फार कठिण आहे. असें केलें असतां कदाचित् परत येण्याचे पूर्वीं जिन्यानें पेट घेतला तर सर्वजण जळून जावयाचीं. बरें, एका मुलाला बाहेर सुरक्षितस्थळीं ठेवून मग परत यावें तर तोंपर्यंत दुसरें मूल जळून जावयाचें. ज्यावेळीं सर्वच गोष्टींचा असा घोंटाळा असेल त्यावेळीं कांहींच निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. आगीचे बहुतेक प्रसंग भानगडीचेच असतात. अशा गुंतागुंतीच्या प्रकरणांत नीतिशास्त्राला मुग्ध रहावें लागतें.

ज्यावेळीं आगींत उडी घालणाऱ्या मनुष्याच्या जीवाविषयींच प्रश्न नसून त्याच्या नाशानें दुसरीं अनेक मनुष्यें विपत्तींत पडण्याचा संभव असेल त्या-वेळीं अशा कृत्यांपासून मनुष्यानें पराङ्मुख व्हावें असाच नीतिशास्त्राचा सल्ला मिळेल.

अशा प्रकारच्या धैर्याची प्रशंसा करण्याची मनुष्याची प्रवृत्ति फार प्राचीन काळपासून आढळून येते व ती तशीच कायम ठेवणें मनुष्यजाती-च्या हिताचें आहे. ज्या मनुष्याचे परोपकारविषयक मनोविकार इतके प्रबळ असतात कीं तो दुसऱ्याचा जीव वांचण्याची फारशी आशा नसतांही त्याच्या-साठीं शेवटचा यत्न करण्याकरितां आपल्या जीवास मुकतो, त्या मनुष्याच्या मनाचा थोरपणा कांहीं विलक्षण समजला पाहिजे; व ह्या एका गुणानें म-नुष्यजातींत आढळून येणाऱ्या नानाविध लज्जास्पद दोषांवर कांहीं अंशीं पांघरूण पडतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. असले श्रेष्ठ प्रतीचे गुण कांहीं मनुष्यांत कधींकधीं आढळून येतात ह्यामुळें मनुष्यजातीला कधींतरी उन्नता-वस्था येईल अशा आशेला जागा राहते. अशा उदार अंतःकरणाच्या मनु-ष्याच्या मरणानें मोठें नुकसान होतें ही गोष्ट खरी, कारण तो जिवंत राहील तर त्याच्या संततीवर आणि इतर मनुष्यांवरही त्याच्या गुणांचा थोडाबहुत परिणाम होईल; परंतु स्वार्थाला लाजविणारें असें जें परार्थाचें उत्कृष्ट उदाह-रण तो घालून देतो त्यानें हें नुकसान भरून येतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ह्या प्रकरणांत ज्या प्रश्नांचा विचार केला आहे त्यांच्यासंबंधानें वर्त-न करितांना मध्यवर्तिपणाचें अवलंबन करणेंच बहुत प्रसंगीं योग्य होईल. मृत्यूशीं जुगार खेळतांना, त्याच्या फांशांत कांहीं लबाडी आहे कीं काय अशी शंका येण्यासारखा परिणाम बहुधा नेहमीं घडत असतो. "स्वतःवर जितकी प्रीति करतोस तितकी आपल्या शेजाऱ्यावर कर" हें अत्युन्नत नी-तितत्त्व घेतलें तरी प्रत्येक मनुष्यानें दुसऱ्याच्या जीवाची किंमत आपल्या जीवाहून अधिक मानावी असें त्यांतून निष्पन्न होत नाहीं. ह्यावरून असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, ज्यावेळीं संकटांत पडलेल्या मनुष्याचा जीव वांचण्याचा बराच संभव असेल त्या वेळीं त्याला मदत करणें योग्य आहे; परंतु ह्यापेक्षां अधिक करण्याविषयीं परोपकाराच्या तत्त्वांचा आग्रह नाहीं.

---

# प्रकरण १२

## आप्तमित्रांस पैशाची मदत

समाजघटनेंत जसजसा फेरफार पडत जातो तसतसे मनुष्याच्या कर्तव्याविषयीं विचारही बदलत जातात. प्राचीनकाळीं कुटुंब हा समाजाचा अतिलहान घटकावयव समजला जात असे, व कुटुंबानें करावयाचीं म्हणून कांहीं कर्तव्यें असत. ही व्यवस्था हळूहळू नाहींशी होऊन प्रत्येक वयांत आलेला मनुष्य समाजाचा अतिलहान घटक समजला जावा, अशी व्यवस्था अलीकडच्या काळांत सुरू झाली आहे व कुटुंबाच्या कर्तव्याची कल्पना नाहींशी होऊन व्यक्तीच्या कर्तव्याची कल्पना उत्पन्न झाली आहे. आस्ट्रेलियांतील मूळच्या रहिवासी लोकांत हल्लींही कुटुंबाला जबाबदार धरण्याची व्यवस्था आढळून येते. एका मनुष्यानें खून केला असला तर त्याचे दूरदूरचे नातलग सुद्धां त्याबद्दल जबाबदार धरिले जातात व ते सर्व शिक्षेस पात्र समजले जातात. सर्व युरोपखंडभर प्राचीनकाळीं अशीच स्थिति होती. कुटुंबांतील किंवा टोळींतील एका मनुष्यानें कांहीं अपराध करावा व सर्व लोकांनीं त्याबद्दल शिक्षा भोगावी ही स्थिति आपल्या हल्लींच्या विचारांना फार चमत्कारिक वाटेल, परंतु त्यावेळीं तिच्याबद्दल कोणास कांहीं वाटत नसे. आतां प्रत्येक मनुष्य आपल्या स्वतःच्या आचरणाबद्दल मात्र जबाबदार आहे. अतिनिकटसंबंधाचा मनुष्य असला तरी त्याला दुसऱ्याच्या वर्तनाबद्दल कोणत्याही प्रकारची इजा सोसावी लागत नाहीं.

एका दृष्टीनें पूर्वींची कौटुंबिक समाजव्यवस्था हल्लींच्या व्यक्तिघटित समाजव्यवस्थेपेक्षां फार श्रेष्ठ होती असें वाटतें, कारण त्या व्यवस्थेंत मनुष्याला स्वाभाविकपणेंच परार्थाचें वर्तन करणें भाग पडत होतें; परंतु दुसऱ्या दृष्टीनें हल्लींच्या व्यवस्थेहून ती पुष्कळ कमी प्रतीची होती असें म्हणावें लागतें. कारण त्या स्थितींत कुटुंबाच्या किंवा टोळीच्या बाहेरच्या मनुष्यांबद्दल पूर्ण उदासीनता किंवा शत्रुभावही असे. हल्लींच्या व्यवस्थेनें कुटुंबांतील मनुष्यांच्या परस्परांविषयींच्या कर्तव्याची मर्यादा जरी पूर्वींच्या व्यवस्थेपेक्षां बरीच आकुंचित होते, तरी देशबांधव ह्या नात्यानें मनुष्यांची परस्परांविषयीं जीं कर्तव्यें आहेत त्यांची मर्यादा पूर्वीपेक्षां फारच विस्तृत होते. पूर्वींच्या स्थितींत राष्ट्रांविषयीं हल्लींच्याइतकी उदात्त कल्पना येणें शक्यच नव्हतें, व मनुष्य-

जातीचे प्राणी ह्या नात्यामुळें उत्पन्न होणाऱ्या कर्तव्यांचे विचार त्यांच्या मनांत थोडे तरी येणें शक्य होतें कीं नाहीं याबद्दल शंकाच वाटते. प्रत्येक व्यक्तीनें आपल्या स्वभावाचें व त्या स्वभावानुरूप वर्तनाचें फळ भोगिलें पाहिजे हें सर्व प्राणिसृष्टींतील नीतीचें आदितत्त्व आहे. पूर्वींच्या व्यवस्थेंत ह्या तत्त्वाचें उल्लंघन केलें जात होतें; कारण मनुष्याच्या वर्तनाचे परिणाम जितके त्याच्यावर तितकेच त्याच्या नातलगावर लादले जात होते. परंतु हल्लींच्या व्यवस्थेंत त्या नियमाचें उल्लंघन होत नाहीं, एवढीच गोष्ट व्यक्तिविषयकनीतीच्या दृष्टीनें नवीन व्यवस्थेचा श्रेष्ठपणा सिद्ध करण्यास पुरे आहे. राष्ट्रविषयक व समाजविषयक नीतीच्या दृष्टीनेंही हल्लींच्या व्यवस्थेपासून इष्ट परिणाम घडून आले आहेत असें आतां ध्वनित केलेंच आहे. तेव्हां सर्व प्रकारांनीं पूर्वींच्या व्यवस्थेहून हल्लींची व्यवस्थाच श्रेष्ठ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वरील मताची सत्यता कबूल केली म्हणजे आप्तांना मदत करण्याचे संबंधानें मनुष्याचीं कर्तव्यें ठरवितांना ह्या मताच्या धोरणानें विचार करण्यास ठीक पडेल. सामान्यतः नीतितत्त्वांचा मुख्य हेतु मनुष्यजातीची परंपरा कायम राखणें हा होय. हा हेतु गृहीत धरून त्याच्या कसोटीवर नीतितत्त्वाची कमी-अधिक योग्यता ठरवावयाची असते. आतां मनुष्यजातीची परंपरा कायम राखण्याला पहिली अवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे आईबापांनीं आपल्या मुलांचें संगोपन करणें ही होय. तेव्हां आईबापांचीं मुलांच्या संबंधाचीं कर्तव्यें तर मुख्य गृहीत गोष्टीपासून प्रत्यक्षरीतीनेंच सिद्ध होतात. मुलाचें संगोपन करण्यांत आईबापांचे त्यांवर अनेक उपकार होत असतात व ते फेडण्याची अवश्यकता उत्पन्न झाल्यामुळें आईबापांना मदत करणें हें मुलांचें कर्तव्य होऊन राहतें. परंतु इतर आप्तांचा असा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हक्क उत्पन्न होत नाहीं. एका आईबापांच्या पोटीं जन्म झाल्यामुळें जो बहीणभावंडांचा संबंध उत्पन्न होतो त्याचें नीतीच्या दृष्टीनें कांहीं महत्त्व नाहीं. लहानपणीं एके ठिकाणीं राहिल्यामुळें व एकमेकांशीं खेळल्यामुळें जो संबंध परस्परांमध्यें उत्पन्न होतो त्याचें नीतीच्या दृष्टीनें थोडेसें महत्त्व आहे असें म्हटलें असतां चालेल. बहीणभावंडांची परस्परांवर जितकी प्रीति असते तितकी दूरच्या नातलगांवर किंवा परक्या मनुष्यांवर असत नाहीं. परस्परांमध्यें ज्या मानानें प्रेमबंधन उत्पन्न झालेलें असेल त्या मानानेंच परस्परांना मदत करण्याची अवश्यकता उत्पन्न होते. आप्त हे मनुष्याचे स्वाभाविक मित्र होत

असें म्हणण्याची चाल आहे व ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थही आहे. अशा तऱ्हेच्या मित्रांत बहीणभावंडांचा पहिला नंबर समजला पाहिजे हें सांगावयास नकोच. परंतु त्यांच्यासंबधानें कर्तव्याची मर्यादा नात्यावरून न ठरवितां परस्परांच्या सुखदुःखाचे विभागी होण्याची इच्छा ज्या प्रमाणानें त्यांच्यांत उत्पन्न झाली असेल त्याचा विचार करून ठरविली पाहिजे. एकमेकांच्या वर्तनावरून ही इच्छा सहज समजण्यासारखी आहे.

ह्यासंबंधानें पुष्कळ लोकांचा मतभेद होण्याचा संभव आहे, ह्यासाठीं परोपकाराच्या दृष्टीनें बहीणभावंडांनीं एकमेकांस पैशाची मदत किती करावी ह्या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वीं ह्या मताचा स्पष्टपणें उल्लेख करणें अवश्य वाटलें. बहिणभावंडांच्या कर्तव्याबद्दल लोकांत घातक समज आहेत व ते दूर करण्यासाठीं ह्या मताचें होईल तितकें स्पष्टीकरण करणें अवश्य आहे. केवळ एका आईबापांच्या पोटीं जन्म घेतला ह्या संबंधाकरितां एकानें दुसऱ्यावर हक्क सांगणें व तो दुसऱ्यानें कबूल करणें ह्यापासून बरेच वाईट परिणाम घडत असतात. विशेषतः बहिणींनीं भावांना मदत करण्याचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां तर हे परिणाम होण्याचा फारच संभव असतो. स्त्रियांना स्वाभाविकपणें जगांतील व्यवहारांची फारशी माहिती नसते. आपलें कार्य साधून घेण्याकरितां भाऊ ज्या गोष्टी सांगत असतो त्याचा खरेखोटेपणा किंवा संभवता समजण्याला जरूर लागणारें ज्ञान तिला नसतें. स्त्रियांचा स्वभाव जात्याच मायाळू असल्यामुळें भावाची अडचण पाहून तिला विशेष कळवळा येतो व भावाचा आपणावर हक्क आहे अशी तिची सामान्य समजूतही असतेच. इतक्या सर्व गोष्टी एकत्र झाल्यामुळें व भावाची भीड न तुटल्यामुळें त्याच्या इच्छेप्रमाणें करण्यास ती कबूल होते. भावांवर उपकार करण्याकरितां त्यांना उसनवार, कर्जाऊ किंवा गहाणावर पैसे देऊन फसलेल्या बहिणी प्रत्येकाच्या माहितींत कांहीं तरी असतील. कित्येक वेळां तर भावावर विश्वास ठेवून त्याच्या अडचणी दूर करण्यासाठीं आपला सर्व पैसा त्याला दिल्यामुळें, बहिणीला स्वतःला गरिबी काढण्याचा प्रसंग यावा किंवा तिनें अन्नासहि मोताद व्हावें अशा गोष्टी घडून येतात. जो भाऊ आपल्या स्वतःच्या फायद्याकरितां आपल्या बहिणीची मालमत्ता धोक्यांत घालूं इच्छितो त्याचे विचार बंधुत्वाला शोभण्यासारखे नाहींत असें म्हटलें पाहिजे. बहिणीला बुडवावें अशी इच्छा नसतांना भावाला धंद्यांत अपयश आल्यामुळें जर ती बुडाली,

तर त्याला दोष देणें बरोबर नाहीं असें कित्येक म्हणतील, परंतु त्यांत फारसा अर्थ नाहीं. यशापयशाचा ज्याठिकाणीं अनिश्चितपणा असेल त्याठिकाणीं दुसऱ्याच्या पैशानें धाडस करणें बरोबर नाहीं. लोकांच्या ठेवींचा पैसा आपल्या उपयोगाकरितां वापरणारे सावकारही अशाच प्रकारच्या सबबी सांगतात, पण त्या कोणी ऐकत नाहीं व हें सावकारांचें वर्तन कायद्याच्या दृष्टीनें गुन्ह्याचें समजलें जातें. त्याचप्रमाणें पुढील फायद्याच्या आशेवर जो भाऊ आपल्या बहिणीचा पैसा धोक्यांत घालितो तो एका प्रकारचा गुन्हेगारच होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. बहिणीनें असें करूं इच्छिणाऱ्या भावाला ‘ भाऊ ’ समजण्याचें कांहीं कारण नाहीं. सारांश, बहिणींनीं होतां होईल तों असल्या भानगडींत न पडणें हें बरें.

परंतु बहिणीनें भावाला अशा प्रकारची मदत करण्याचा प्रसंग नसून, एका भावानें दुसऱ्या भावाला किंवा बहिणीला मदत करण्याचा प्रसंग आला असतां त्यानें कोणत्या प्रकारचें वर्तन करावें ? ह्या प्रश्नाचें उत्तर पूर्वीपेक्षां निराळें दिलें पाहिजे. तो मनुष्य जर बराच सधन असेल व त्याला जगांतील व्यवहारांची माहिती असेल, तर आपल्या भावानें किंवा बहिणीनें ज्या धंद्यांत तो पैसा घालण्याचें योजिलें असेल त्यांत नफातोटा होण्याचा कितपत संभव आहे व आपल्या भावाच्या किंवा बहिणीच्या अंगीं तो धंदा करण्याचें सामर्थ्य कितपत आहे इत्यादि गोष्टींचा विचार करून, पैसा बुडण्याचें फारसें भय नसल्यास व प्रसंगीं त्या पैशाला बूड आली असतां ती सोसण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य आहे अशी त्याची खात्री असल्यास, जरूर तो पैसा त्यांस देण्यास हरकत नाहीं. विशेषतः, अडचणीचे वेळीं अशा प्रकारची मदत करावयाची असल्यास, संकटांत असलेल्या मनुष्याविषयीं स्वाभाविकरीतीनें उत्पन्न होणाऱ्या दयेची बंधुप्रीतींत आणखी भर पडेल. तथापि अशा प्रसंगीं देखील फायद्याचा किंवा पैसा बुडणार नाहीं अशाविषयींचा निश्चितपणा नसला म्हणजे पैसा मागणारानें व देणारानें चांगला विचार करावा. [illegible] नवीन अचाट कल्पना काढून तींत कितपत यश येतें हें पाहण्याकरितां काढिलेल्या कंपन्यांचें दिवाळें निघण्याचा बराच संभव असतो. अशा किंवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं बूड येण्याचा बराच संभव असेल अशा धंद्यांत पडलेल्या मनुष्यानें आपल्या अडचणीसाठीं देखील दुसऱ्याचे पैसे काढून त्याचें नुकसान करणें चांगलें नाहीं. अगदीं परकी मनुष्यांशीं देखील

जर अशा प्रकारचें वर्तन करणें जरूर आहे, तर प्रत्यक्ष भावाशीं संबंध असतां अधिकच जपलें पाहिजे.

बहीणभावंडांनीं परस्परांस किती मदत करावी हें ठरवितांना एका विशेषप्रसंगाचा विचार केला पाहिजे. कधींकधीं कांहीं मुलें करतीसंवरतीं झालेलीं असतां व कांहीं मुलें अज्ञानदशेंत असतां त्यांचा बाप मरण पावतो. अशा स्थितींत अज्ञानदशेंत असणारीं मुलें वयांत येतपर्यंत त्यांच्या विद्याभ्यासासाठीं जरूर तो खर्च करणें हें त्यांच्या प्रौढ भावंडांचें कर्तव्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि स्वतःच्या कुटुंबाचा चरितार्थ साधारण रीतीनें चालवून जर भावंडांकडे लक्ष देण्यास सवड असेल तरच हें कर्तव्य उत्पन्न होतें. मुलें वयांत येतपर्यंत त्यांना कशाचीही वाण पडूं नये अशी तजवीज करून ठेवणें हें आईबापांचें कर्तव्य आहे. हें जर त्यांच्या हातून झालें नाहीं तर त्यांच्या प्रौढ मुलांनीं त्यांस थोडाबहुत हातभार लाविला पाहिजे. परंतु स्वतःच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष होऊन हें काम होणें चांगलें नाहीं. जर प्रौढ मुलांच्या शिक्षणासाठीं आईबापांनीं बराच पैसा खर्च केला असेल, तर आपल्या अज्ञान भावंडांच्या शिक्षणासाठीं पैसा लावून त्यांनीं आईबापांचें उतराई झालें पाहिजे. बहीणभावंडांच्या कर्तव्याविषयीं आपल्या लोकांच्या समजुती फारच चमत्कारिक आहेत. प्रासंगिकनीतीच्या दृष्टीनें विचार केला तरी, आपल्या शक्तीप्रमाणें अज्ञान भावंडांस तीं वयांत येतपर्यंत पोसणें व त्यांच्या शिक्षणास मदत करणें ह्यापेक्षां कर्तव्याची मर्यादा कधींही अधिक होणार नाहीं.

ज्यांचा नात्याचा संबंध ह्याहूनही दूरचा असेल किंवा ज्यांचा तसा मुळींच संबंध नसेल, त्यांना पैशाच्या संबंधानें मदत करण्याचा विचार करितांना देखील एका वंशांत जन्मास येणें ह्यापेक्षां परस्परांच्या संघट्टनानें उत्पन्न झालेला संबंध अधिक महत्त्वाचा समजला पाहिजे. ह्या दृष्टीनें पुष्कळ दिवसांची मैत्री असल्या कारणानें ज्याशीं विशेष प्रेमाचा संबंध जडला असेल अशा मित्राचा, फारसा ज्यांच्याशीं आपला संबंध नाहीं व ज्यांचें वर्तन आपणास आवडत नाहीं अशा नातलग पेक्षां, आपणावर अधिक हक्क आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपला आप्त किंवा मित्र अडचणींत सांपडला असतां व ती अडचण मनुष्याच्या शक्तीबाहेरच्या कारणांनीं अकल्पित प्राप्त झाली असतां, तातून त्याला सोडविण्यासाठीं पैशाची मदत करण्यापूर्वीं, त्या मनुष्याच्या

गुणांचा व त्याच्यापासून लोकांना होणाऱ्या फायद्याचाही विचार करणें अवश्य आहे. ज्यावेळीं पैशाची मदत करावयाची ती अडचणींतून सुटका करण्यासाठीं नसून नवीन एखाद्या जोखमाच्या कामांत घालण्यासाठीं असेल त्या वेळीं शांतपणें पुढचामागचा विचार करून मग योग्य दिसल्यास उपकार करण्यास प्रवृत्त व्हावें. ज्या मनुष्याला पैसा उसना द्यावयाचा त्याची योग्यता व प्रामाणिकपणा ही असावीं तशीं आहेत असें गृहीत घेतलें तरी त्याच्या अंगचें सामर्थ्य, त्याचें धंद्याविषयीं ज्ञान व त्याची करामत ह्यांचा विचार केला पाहिजे. आणि हा सर्व विचार केल्यानंतरही त्या धंद्यांत त्याला अपयश आलें असतां काय परिणाम होतील तें पाहिलें पाहिजे. परोपकाराचा विचार करितांना स्वार्थाचाही विचार होणें जरूर आहे. आपणाला जो स्वहितत्याग करावा लागणार तो आपल्या सामर्थ्याहून अधिक असल्यास, दुसऱ्याच्या मनाला वाईट वाटण्याचा संभव असला तरी साफ नकाराचें उत्तर देणें बरें. अशा वेळीं सर्व गोष्टींचा शांतपणें विचार करून त्याप्रमाणें वागणें फार कठिण असतें.

आप्तांना व मित्रांना मदत करण्याचा आणखी एक प्रकार आहे. त्यांत अप्रत्यक्ष रीतीनें मनुष्याला आपल्या पैशाला व मालमत्तेला मुकण्याचा प्रसंग येतो. पूर्वीं सांगितलेल्या प्रकारांत रोख पैसा द्यावयाचा असतो व ह्या प्रकारांत दुसऱ्या मनुष्याला पैसा देण्याचें सामर्थ्य झालें नाहीं तर तो देण्याबद्दल हमी द्यावयाची असते. ह्या जामीनगतीच्या प्रसंगांत मनाचा निश्चय करणें फार कठिण असतें. पूर्वीं सांगितलेल्या अडचणींच्या प्रसंगीं, मनुष्यास पांचशें रुपये देण्याचीच जरूर असली व आपणास शंभर रुपये देण्याचीच सवड असली तर आपण तितकेंच देऊं शकतो. परंतु ह्या जामीनगतीच्या कामांत तोडजोडीला जागा नसते. होय किंवा नाहीं ह्यावांचून तिसरें उत्तर देतां येत नाहीं, व जामीनगतीच्या रकमाही बहुतकरून फार मोठ्या असतात. एका मनुष्यानें पैसा कर्ज काढावा व तो त्याच्यानें फिटला नाहीं तर दुसऱ्यानें तो फेडण्याचें कबूल करावें, हा जामिनाचा प्रकार आशिक्षित लोकांत आढळून येतो व त्याबद्दल निश्चय करणें सोपें आहे. शाहण्या मनुष्यानें अशा रीतीनें जामीन राहण्यापेक्षां आपणच त्याला तो पैसा कर्जाऊ द्यावा, हा उत्तम मार्ग. व जर तसा पैसा आज देण्याची शक्ति व इच्छा नसेल तर पुढचा नीटपणें विचार न करिता जामीन राहणें म्हणजे आजचें

के. भ. स. व. वा. पौलवाच
ग्रंथ संग्रह

रण उद्यांवर ढकलणें होय. अशा तऱ्हेचें वर्तन बहुधा अगदीं अविचारी लोकांकडून मात्र होत असतें. परंतु एकादी मोठ्या जबाबदारीची जागा कोणास द्यावयाची असल्यास, त्याच्या हातून कोणत्याही प्रकारची अफरातफर होणार नाहीं अशाबद्दल जबाबदारीच्या भानानें मोठमोठाल्या रकमांचे जामीन घेतल्याशिवाय त्याला ती जागा द्यावयाची नाहीं असा जो सरकारचा व कांहीं व्यापारी मंडळ्यांचा नियम आहे, त्या नियमाला अनुसरून जामीन राहण्याचा प्रसंग आला असतां मात्र मोठी पंचाईत पडते. एक पक्षीं आपल्या मित्राला किंवा आप्ताला चांगली नोकरी मिळविण्याची संधि आली असतां, आपण जामीन राहण्याचें नाकारल्यास जर ती जाण्याचा संभव असेल तर त्याच्या जन्माचें नुकसान करणें हें निर्दयपणाचें असें वाटतें; पण अन्यपक्षीं जामीन राहून प्रसंगीं आपणच आपल्या नाशाची तयारी करून ठेवणे हेंही मूर्खपणाचें किंवा त्याहूनही वाईट असें वाटतें. साधारण मानानें आढळून येतें त्यापेक्षां बरीच अधिक चाणाक्षता माणसाच्या अंगीं असल्याशिवाय त्याला दुसऱ्या माणसांची पारख बरोबर रीतीनें करितां येणार नाहीं, व मनुष्यांची खरी पारख झाल्याशिवाय त्याच्या वर्तणुकीबद्दल खात्री देणें धोक्याचें आहे: मनुष्याचें बाह्यांग आणि अंतरंग ह्यांच्यामध्यें कधींकधीं जमिनअस्मानाचें अंतर असतें व तें ओळखून काढण्याला मनुष्याला फारच सावधगिरी राखावी लागते; परंतु ती राखणें बहुतेकांना साधत नाहीं. लोकांस खुष करण्यासारखें वर्तन ठेविल्यानें व नेहमीं गोडगोड बोलल्यानें मनुष्याच्या मनांत तसें करणाराविषयीं विश्वास उत्पन्न होतो व त्याच्याकडे मनुष्याचें मन ओढतें, परंतु दुसऱ्याच्या मनाला सुख होईल कीं दुःख होईल हा विचार न करितां बेधडक आपणास योग्य वाटेल तें बोलणारा मनुष्य लोकांस अप्रिय वाटतो. वास्तविक दुसऱ्या प्रकारचें वर्तनच प्रामाणिकपणाचें असतें, परंतु पुष्कळ लोक पहिल्या प्रकारच्या वर्तनाला प्रामाणिकपणाचें लक्षण समजून अखेरीस फसतात.

ह्या, व ह्या भागांत सांगितलेल्या पूर्वीच्या प्रसंगींही उपकारापासून मनाला निवृत्त करण्याला मुख्य कारण आपणावर अवलंबून राहणाऱ्या आपल्या कुटुंबांतील मनुष्यांच्या हक्कांबद्दलचा विचार होय. मनुष्यानें पाहिजे तर परोपकारासाठीं अमर्याद औदार्य दाखवून स्वतःविषयीं हवें तितकें बेपर्वा राहावें, परंतु ज्या मनुष्यांबद्दल तो जबाबदार असेल त्यांच्याविषयीं बेपर्वा

होणें कधीं योग्य होणार नाहीं. ह्याठिकाणीं सारासारविचार करावयाचा म्हटला म्हणजे आज एका मनुष्याचा किती फायदा होत आहे व पुढें किती मनुष्यांचें किती नुकसान होणार आहे हें पाहिलें पाहिजे. ह्या दृष्टीनें पुष्कळ प्रसंगीं कोणाची भीडमुरवत न धरितां त्या भानगडींत न पडणें ह्यांतच खरा परोपकार होईल.

अलीकडे ह्या अडचणी दूर करण्याचें एक नवें उत्कृष्ट साधन कित्येक ठिकाणीं उत्पन्न झालें आहे. दरसाल कांहीं रकम भरली म्हणजे अनेक प्रकारचे विमे उतरून देणाऱ्या मंडळ्या ज्याप्रमाणें चोहोंकडे स्थापन झाल्या आहेत, त्याचप्रमाणें ज्या रकमेचा जामीन पाहिजे असेल त्या रकमेच्या मानानें दरसाल कांहीं शेंकडावळ घेऊन जामीन राहणाऱ्या मंडळ्या कांहीं ठिकाणीं स्थापन झाल्या आहेत. अशा प्रकारची सोय होत असल्यावर शाहणा व न्यायी मनुष्य आपल्या मित्रांस विनाकारण त्रास देणार नाहीं. आणि अशी सवड असतांही जर कोणी मनुष्य आपली भीड खर्चूं लागेल तर तो मित्रत्वाला पात्र नाहीं असें समजून त्यास एकदम नकाराचा जबाब सांगण्यास संकोच करण्याचें कांहीं कारण नाहीं.

ह्या वेळपर्यंत आप्तमित्रांना पैशाची मदत करण्याचे कामीं दूरदर्शीपणाच्या ज्या विचारांची अवश्यकता दाखविली ते विचार जगाचा साधारण अनुभव ज्यास आहे त्याचे मनांत येण्यासारखे आहेत; परंतु आणखी एक विचार सहज लक्षांत येण्याजोगा नाहीं, तोही सांगणें अवश्य आहे. आप्तमित्रांच्या कल्याणासाठीं त्यांना कर्जाऊ रकमा देणें जसें कधींकधीं इष्ट असतें त्याचप्रमाणें त्यांच्या कल्याणाची इच्छा करावयाची असल्यास त्यांनीं मागितलेल्या रकमा त्यांस न देणें इष्ट असतें. अशा प्रसंगीं कर्जाऊ रकमा न देण्याला जीं दुसरीं कारणें सांगितलीं आहेत त्यांतच आणखी कर्ज मागणाराचें कल्याण करण्याविषयींच्या इच्छेची भर पडते.

कारण, पुष्कळ लोकांना यशाची अशा बाजवीहून अधिक असते व त्यामुळें त्यांचा सर्वस्वी नाश होण्याचा संभव असतो. अशा लोकांना शुद्धीवर आणण्याची फार अवश्यकता असते. कर्जाऊ रकमा मागणाऱ्या बहुतेक लोकांना त्यांच्याच कल्याणासाठीं त्या न देणें बरें; कारण, बहुतकरून ज्याच्या अंगीं पैसा मिळविण्याचें सामर्थ्य नसतें त्यांनाच तो उसना मागण्याचा प्रसंग येतो. कर्जाऊ पैसा देणें झाल्यास ज्यांच्या अंगीं तो कमविण्याचें साम-

र्थ्य असेल त्यांनाच तो देणें रास्त होईल असें साधारणमानानें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्यांना पैसा मिळविण्याचें सामर्थ्य नसतें ते कर्जामुळें अधिकाधिक संकटांत मात्र पडत जातात, म्हणून अशा लोकांना कर्ज न देणें म्हणजे त्यांचें संकटापासून रक्षण करणें होय.

कर्जाऊ पैसे काढून त्यांवर व्यापारधंदे किंवा कारखाने चालविणाऱ्या मनुष्यांची स्थिति फार शोचनीय असते. एकाच्या पैशाची मुदत सरली म्हणजे दुसऱ्याचा काढून त्याला द्यावा व त्यानें तगादा लाविला म्हणजे तिसऱ्याकडे जावें अशी त्यांची नेहमीं स्थिति असते. प्रामाणिक मनुष्याचा तर काळजीनें अर्धा जीव होत असतो. आपलें नीट चाललें नाहीं तर इतके लोक आपणासाठीं विनाकारण बुडतील हा विचार रात्रंदिवस त्याच्या मनांत घोळत असतो. अशा लोकांच्या तोंडून दुःखाचे व काळजीचे उद्गार अनेक प्रसंगीं निघत असतात. ह्या सर्व गोष्टी मनांत आणून पुष्कळ प्रसंगीं दुसऱ्याला तात्कालिक सुख देण्याची इच्छा न करितां त्याच्या चिरकालिक सुखाकडे लक्ष देऊन त्यानें मागितलेला पैसा न देणें हेंच उत्तम होय.

---

# प्रकरण १३

## गरीबांस मदत

परोपकार ह्या शब्दाचा बऱ्याच लोकांच्या मनांत जो अर्थ येतो त्याचा ह्या प्रकरणांत विचार करावयाचा आहे. गरीबांस मदत करणें एवढाच काय तो परोपकाराचा अर्थ आहे अशी जरी समजूत नसली तरी परोपकाराचा मुख्य भाग तोच आहे अशी बहुतेकांची समजूत आहे. परोपकार करावयाचा म्हणजे मागचापुढचा विचार न करितां दीनावस्थेंत असणाऱ्या मनुष्यांस औदार्यानें पाहिजे तितकें द्यावयाचें अशी कल्पना पुष्कळ लोकांच्या मनांत येते. पैसा किंवा पैशानें विकत मिळणारे पदार्थ अनाथांस देऊन त्यांना आपली कळकळ दाखविण्याचा प्रचार लोकांच्या इतका अंगवळणीं पडला आहे कीं, अशिक्षित लोकांच्या व विशेषतः दीनावस्थेंत असणाऱ्या मनुष्यांच्या मनांत दुसऱ्या रीतीनें गरीबांवर दया करणें शक्य असेल असें येतच नाहीं.

ह्या परोपकाराचा प्रकार अनेकांपैकीं एक आहे असें ह्या पुस्तकांत जीं अनेक प्रकरणें दिलीं आहेत त्यांवरून सहज ध्यानांत येईल. गरीबांस मदत करण्याच्या तीन तऱ्हा हल्लीं प्रचारांत आहेत. कित्येक देशांत गरीबांना मदत करण्यासाठीं लोकांवर निराळा कर बसविलेला असतो, किंवा देशाच्या एकंदर उत्पन्नांतून कांहीं भाग गरीबांना देण्यासाठीं निराळा काढिलेला असतो. ह्या पैशाची व्यवस्था सरकारमार्फतच होते. दुसरी तऱ्हा खासगी मंडळ्यांची. अनाथांवर उपकार करण्याकरितां परोपकारी लोकांनीं पुष्कळ ठिकाणीं मोठमोठ्या मंडळ्या स्थापन केल्या आहेत. लोकांनीं आपल्या इच्छेप्रमाणें दिलेल्या वर्गण्यांची व्यवस्था ह्या मंडळ्याकडून केली जाते. श्रीमंतलोक अशा मंडळ्यांना कांहीं विशेष कामाकरितां मोठमोठाल्या देणग्याही देतात. प्रत्येक मनुष्यानें खासगी रीतीनें गरीबांना मदत करणें ही तिसरी तऱ्हा होय. अशा रीतीची मदत कांहीं प्रसंगीं दरिद्रावस्थेंत असणाऱ्या व ज्यांच्या संबंधानें पूर्ण माहिती आहे अशा आप्तमित्रांस किंवा ओळखीच्या मनुष्यांस केली जाते; कधींकधीं ओळखीच्या गृहस्थांकडून मिळविलेल्या माहितीवरून अनोळखी मनुष्यांस केली जाते; व केव्हांकेव्हां तर अगदीं गैरमाहीत भिकाऱ्यांस केली जाते. ह्या तीन प्रकारांचा वर दिलेल्या अनुक्रमानें विचार करूं.

लोकांवर कर बसवून त्याचें उत्पन्न गरीबांना वांटून देण्याचे संबंधानें ह्या पुस्तकाच्या पूर्वींच्या भागांत बराच ऊहापोह झालेला आहे. ह्यासाठीं, सरकारानें ह्या भानगडींत पडणें म्हणजे आपल्या कर्तव्यसीमेचें उल्लंघन करणें होय, एवढें ह्या ठिकाणीं सांगितलें असतां पुरे आहे. कित्येक देशांतील कांहीं पूर्वापार वहिवाटीमुळें अशा प्रकारच्या करांत कांहीं न्यायाचा अंश असूं शकेल, आणि अशा गोष्टींचा इतक्यांतच निराळा विचार केला जाईल; हा अपवाद सोडून दिला असतां गरीबांच्या फायद्यासाठीं लोकांवर कर बसविणें ह्या गोष्टीचा सरकारच्या कर्तव्यांत अंतर्भाव करितां येणार नाहीं. आपल्या अमलाखालीं राहणाऱ्या व्यक्तींचें व व्यक्तिसमुदायांचें देशांतल्या देशांत उपस्थित होणाऱ्या धामधुमीपासून व परचक्रापासून संरक्षण करणें, म्हणजे समाजाच्या अस्तित्वाला अत्यावश्य असेल त्याहून अधिक त्रास कोणाचा कोणाला न होतां सर्वांना आपपले व्यवहार चालवितां येतील अशी व्यवस्था करणें, हें सरकारचें मुख्य कर्तव्य आहे असें पूर्वीं सांगितलेंच आहे. सरकारचें आणखी एकच कर्तव्य आहे, तें जमिनीच्या व्यवस्थेसंबंधी आहे. सर-

कारानें आपल्या ताब्यांतील जमिनीच्या उपयोगाबद्दल अशा प्रकारचे नियम केले पाहिजेत कीं, त्यांचे योगानें जमिनींच्या सामायिक मालकीचा उपयोग करणारा जो समाज त्याच्या हिताला कोणत्याही रीतीनें धक्का पोंचू नये. हीं सरकारचीं कर्तव्यें कबूल केलीं असतां, प्रजेपैकीं एका वर्गांतील लोकांना मदत करण्याकरितां दुसऱ्या वर्गांतील लोकांवर कर बसाविणें म्हणजे मर्यादेच्या बाहेर जाणें असून, दुसऱ्या वर्गांतील लोकांच्या हक्कांना विनाकारण विघ्न आणणें होय, हें सहजच दिसून येईल.

ह्या सिद्धांताला अपवादक अशा कांहीं गोष्टी आहेत व त्यांचा इतक्यांतच विचार केला जाईल असें वर म्हटलें आहे. ह्या गोष्टी युरोपखंडांतील कित्येक देशांतल्या जमिनीच्या वहिवाटीसंबंधानें होत. दहाव्या व अकराव्या शतकांत इंग्लंड, फ्रान्स, वगैरे देशांत जमिनीचे मालक निराळे असून जमिनींत खपणारे गुलामांसारखे लोक ज्यांना "सर्फ्स" असें म्हणत त्यांचीही जमिनीवर थोडीशी सत्ता असे. आपल्या इकडे खोत आणि कुळें यांची जशी व्यवस्था आहे त्या धर्तीवर कांहींशी ती व्यवस्था होती. जमिनीच्या प्रत्यक्ष भागावर खपणाऱ्या गुलामांचा त्या जमिनीशीं कायमचा संबंध असे, व तिच्या उत्पन्नाच्या कांहीं भागावर त्यांचा हक्क असे. पूर्वींच्या मालकानें जमीन विकली म्हणजे तिच्याबरोबर ते गुलाम सुद्धां नव्या मालकाच्या ताब्यांत जात. नंतर ही गुलामांची व्यवस्था नाहींशी करण्यांत आली व त्यांचा जमिनीवरचा हक्क साफ काढून घेण्यांत आला. ह्याचा मोबदला त्यांस मिळावा म्हणून पुढें कांहीं काळानें एक कायदा करण्यांत आला, व त्या कायद्यानें एक निराळा कर बसविला जाऊन तो गरीब लोकांत वांटून देण्याची सुरुवात झाली. ह्या गरीब लोकांत पूर्वीं जमिनींत खपणाऱ्या लोकांच्या वंशजांचा बराच भरणा होता. ह्या रीतीनें त्या लोकांस जागच्याजागीं राहण्यास उत्तेजन मिळालें, व त्यांचा जमिनीवरचा हक्क जरी नाहींसा झाला तरी पैशाच्या रूपानें त्यांस थोडा मोबदला मिळूं लागला.

ह्या कायद्याला " गरीबांना मदत करण्यासाठीं कायदा " असें नांव दिलें होतें. पूर्वींच्या कायद्यांत सुधारणा करून तयार केलेला कायदा हल्लींही अमलांत आहेच. हा कायदा अंशतः न्यायतत्त्वांना अनुसरून आहे. व त्याच्या अन्वयें पूर्वींच्या सर्फ्स लोकांच्या वंशजांस जो पैसा वांटला जातो त्याला केवळ परोपकार ह्या सदरांत घालणें योग्य नाहीं. कुळांकडून जमिनीवरचा त्यांचा

हक्क साफ काढून घेऊन सर्व मालकी जमीनदारांना देण्याच्या व्यवस्थेनें अन्याय झाला होता तो अन्याय दूर होऊन गरीबांचे हक्क त्यांना परत मिळावे व व्यक्तिस्वातंत्र्याला तर कोणत्याही प्रकारची अडचण येऊं नये, ह्यासाठीं ही अशी अप्रत्यक्षरीतीची नवी व्यवस्था करण्यांत आली. कुळांना जमीनदारांच्या जुलमाखालीं राहण्यावांचून गत्यंतर नसलें म्हणजे उभयतांमध्यें जो द्वेष उत्पन्न होतो त्याच्या योगानें देशाचें फार नुकसान होतें. असला जमीनदारांचा व कुळांचा संबंध नाहींसा झाल्यामुळें इंग्लंड देशाचा फार फायदा झाला.

सरकारच्या देखरेखीखालीं चालणाऱ्या ह्या व्यवस्थेंत न्यायाचा अंश आहे खरा, तथापि तींत अन्यायाचाही अंश शिरल्यामुळें घोंटाळा झाला आहे. आरंभीं जरी ह्या कायदेशीर मदतीकरितां फक्त जमीनदारांकडूनच कर घेतला जात असे, तरी पुढें हा निर्बंध कायम राहिला नाहीं व जमीनदारांशिवाय इतर मनुष्यांवरही त्याचा बोजा पडूं लागला आणि त्यामुळें ह्या व्यवस्थेला एका वर्गाच्या फायद्यासाठीं दुसऱ्या वर्गावर कर बसविण्याचें स्वरूप आलें.

आणखी एक अन्याय ह्या व्यवस्थेंत शिरला आहे व तो शिरणें अपरिहार्यच होतें. जमीनदार आणि जमिनींत खपणारे लोक ह्यांचा संबंध ज्यावेळीं नाहींसा झाला व जमिनीचा सर्व हक्क जमीनदाराकडे गेला त्यावेळीं ते मजूरलोक ( सर्फ्स ) सर्व देशभर पसरले, व त्यांनीं चोऱ्या, मारामाऱ्या, लुटालुटी वगैरे करून आपला निर्वाह करावा अशी सुरुवात केली. ही स्थिति ज्यावेळीं दुःसह होऊं लागली, त्यावेळीं मजूरलोकांनीं आपले मुलूख सोडून जाऊं नये असा कायदा करण्यांत आला; व ज्यांना काम करण्याची शक्ति नव्हती त्यांना त्याच मुलुखांतील लोकांपासून कर घेऊन मदत देण्याची सुरवात झाली. पुढें जो "पुअर रेट्स" म्हणून गरीबांसाठीं कर सुरू झाला त्याचा हा मूळपाया. आरंभीं ज्यांना काम करण्याची शक्ति नव्हती त्या लोकांना मात्र मदत केली जात असे. पण वास्तविक हक्क म्हटला म्हणजे पूर्वीं ज्या सर्फ्स लोकांचा जमिनीशीं संबंध होता त्यांचे वंशजांचा मात्र होता. ह्या सर्फ्स लोकांचा जमिनीपासून संबंध सुटून फार वर्षें होऊन गेलीं होतीं ह्यामुळें व सर्व देशभर चोहोंकडे हे लोक असल्यामुळें त्यांचे हक्क ठरविणें हें काम असंभवनीयच होतें. पुढें पुअर रेट्सच्या वेळीं तर सर्वच घोंटाळा झाला. ज्याप्रमाणें जमीनदारांवरच तो कर बसविणें योग्य असून तो इतरांवरही बसला गेला, त्याचप्रमाणें त्याचा फायदाही पाहिजे त्या लोकांस मिळूं लागला.

म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें एका वर्गाच्या फायद्यासाठीं दुसऱ्या वर्गावर कर बसविणें असेंच त्याला स्वरूप आलें.

उपकारांना हक्कांचें स्वरूप आलें म्हणजे उपकर्ता आणि उपकृत ह्या दोघांमध्येंही अनिष्ट मनोविकारांचा उद्भव होतो हें पूर्वीं सांगितलेंच आहे. कोणत्याही राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या जमिनीवरील हक्काची व्यवस्था जर दुसऱ्या रीतीनें करितां येईल तर परोपकाराच्या कामांचा सरकारापासून संबंध अगदीं तोडून टाकणें फार चांगलें होईल. हल्लीं ज्याठिकाणीं सरकाराकडे परोपकाराचीं कामें आहेत तेथें त्या व्यवस्थेचे किती वाईट परिणाम होतात तें पाहूं.

कोणत्याही देशांतील जमिनीची मालकी त्या देशांत राहणाऱ्या सर्व लोकांकडे असली पाहिजे. समुद्र, सरोवर, किंवा नदी ह्यांना हटवून श्रमानें तयार केलेली जमीन असल्यास तिच्यावर मात्र सर्व लोकांची सत्ता असणार नाहीं. देशांतील सर्व लोकांचा तेथील जमिनीवर जो हक्क पोंचतो तो हल्लीं ज्या लागवडीच्या स्थितींत ती जमीन असेल त्या स्थितींत पोंचत नाहीं; तर लागवड करण्यापूर्वी त्या जमिनीची जी स्वाभाविक स्थिति होती त्या स्थितींत पोंचतो. ह्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्याला त्याच्या वांट्याच्या जमिनीपासून ती स्वाभाविकस्थितींत असती तर जें उत्पन्न झालें असतें तें मिळणें न्यायाचें आहे. कित्येक लोकांचें असें म्हणणें असतें कीं, कोणत्याही देशांतील लोकांचा निर्वाह तेथील जमिनीच्या उत्पन्नावर झाला पाहिजे, व मनुष्य श्रम करो किंवा न करो त्याला एकंदर जमिनीच्या उत्पन्नांतून निर्वाहाचें साधन मिळालें पाहिजे. परंतु ह्या म्हणण्यांत फारसा जीव नाहीं. जमिनींत खपलें तरच तिच्यापासून उत्पन्न होतें आणि ह्यासाठीं जो खपणार नाहीं त्याचा उपन्नावर हक्कही राहणार नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें स्वाभाविकस्थितींत जमिनीपासून जें उत्पन्न होण्यासारखें असेल त्यावर त्याचा हक्क राहील. परंतु हल्लींच्या स्थितींत लोकसंख्या अतिशय वाढल्यामुळें त्याचा फारच थोडा अंश प्रत्येकाच्या वांट्यास येईल व त्यानें त्याच्या निर्वाहाला मदत होणार नाहीं.

गरीब लोक तरुण व सशक्त असतात तेव्हां समाजासाठीं श्रम करितात, ह्यासाठीं ते वृद्ध किंवा शक्तिहीन झाले तर समाजानें त्यांचें संरक्षण करणें उचित आहे असा कांहीं लोकांचा समज आहे. सोशिआलिस्ट लोकांच्या

मताप्रमाणें जेथें व्यवस्था चाललेली असेल, म्हणजे श्रम आणि त्यांचा मोबदला ह्यांजमधील संबंध जेथें कृत्रिम उपायांनीं ठरविले जात असतील, तेथें अशी व्यवस्था असणें न्यायास अनुसरून होईल; परंतु मनुष्यसमाजाची हल्लीं जी स्थिति आढळून येते तींत प्रत्येक मनुष्याला चढाओढीनें त्याच्या श्रमांची जी किंमत ठरेल ती मिळत असते, व अशा रीतीनें श्रमांचा योग्य मोबदला घेतल्यावर त्या मनुष्याचा समाजावर कोणत्याही प्रकारचा हक्क राहत नाहीं. वृद्धपणासाठीं व अशक्तपणासाठीं तदतूद करून ठेवावयाची असल्यास, अंगांत सामर्थ्य असतें त्या वेळीं मिळणाऱ्या मजुरींतून शिलक टाकावी. आणखी ह्या लोकांस असें एक उत्तर देतां येण्यासारखें आहे कीं, हल्लीं मिळणारा श्रमांचा मोबदला त्यांच्या योग्यतेहून कमी असेल तर त्याचें कारण मुख्यत्वेंकरून उद्योगी लोकांकडून अप्रत्यक्ष रीतीनें निरुद्योगी लोकांच्या पोषणाला मिळणारी मदत होय. कारण, जे लोक श्रम करीत नाहींत त्यांना निर्वाहाच्या साधनांचा पुरवठा झाल्यानें श्रम करणाऱ्या लोकांना त्यांची वाण पडते. निरुद्योगी लोकांना पोसण्यांत ज्या वेळीं समाजाच्या शक्तीचा अपव्यय होतो त्या वेळीं त्याचा परिणाम खाऊनपिऊन सुखी असणाऱ्या मनुष्यांवर होत नाहीं, तर ज्यांची नेहमीं हातातोंडाशीं गांठ असते अशा मनुष्यांवरच होतो. निर्वाहाच्या साधनांचा एकंदर जो पुरवठा असतो त्यांतून निरुद्योगी लोकांना पोसण्यासाठीं कांहीं अंश निघून जातो, मध्यमस्थितींतले लोक आपणांस जरूर तो अंश काढून घेतात, व उरलेला गरीबांच्या वांट्यास येतो. हा निरुद्योगी लोकांकडे जाणारा अंश जर त्यांजकडे जाऊं दिला नाहीं तर तो गरीब मजुरांकडे जाईल व त्यांना म्हातारपणासाठीं आपली कांहीं तजवीज करितां येईल.

गरीबांच्या वतीनें भांडणाऱ्या आणखी कित्येक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत जात आहे व ह्या अधिक लोकांना काम मिळत नाहीं हा त्यांचा दोष नसल्यामुळें त्यांना निर्वाहाची सोय करून देणें जरूर आहे. ह्यावर पहिलें उत्तर हें कीं, जितकी जितकी ह्या लोकांच्या निर्वाहाची सोय करावी तितकी तितकी लोकसंख्येची वाढ अधिक अधिकच होत जाईल. ह्यासंबंधानें दुसरें उत्तर असें देतां येईल कीं, कोणत्याही राष्ट्रांतील लोकांकडून होणाऱ्या कामांची एकंदर बेरीज जर नेहमीं कायम राहणारी असेल, तरच ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ आहे असें म्हणतां येईल. परंतु राष्ट्रांतील लोकांकडून होणारें एकंदर काम लोकसंख्येबरोबर वाढवितां येईल

व अधिक वाढणाऱ्या लोकांचा निर्वाह अधिक वाढणाऱ्या कामावर होऊं शकेल. कांहीं लोकांनीं आळशी रहावें व त्यांना पोसण्याकरितां दुसऱ्यांनीं वाजवीहून अधिक काम करावें ह्या म्हणण्यांत कांहींच जीव नाहीं.

कित्येक लोकांकडून गरीबांना मदत करण्याची आणखी एक युक्ति सुचविली जाते. प्रत्येक समाजांत रोगी, अशक्त, दुर्दैवी आणि म्हातारे असे कांहीं लोक असणारच, व ह्या लोकांच्या मतानें, त्यांना समाजानें मदत करणें, योग्य आहे. ही मदत सरकारच्या पैशांतून सरकारानें नेमलेल्या अधिकाऱ्यांकडून पूर्ण चौकशी होऊन व्हावी; म्हणजे प्रत्येक दीनावस्थेंत असलेल्या मनुष्याच्या स्थितीबद्दल विश्वसनीय माहिती मिळवून त्याला मदत किती करावयाची हें त्या अधिकाऱ्यांनीं विचारपूर्वक ठरवावें. ही व्यवस्था सुचविणारे लोक सरकारी अधिकाऱ्यांचा प्रामाणिकपणा गृहीत घेतात, परंतु अनेक पिढ्यांचा अनुभव अगदीं निराळा आहे. बहुधा पगारदार नोकरांचा उद्देश जितके कमी श्रम पडतील तितके पाडण्याचा यत्न करून आपला पगार पदरांत टाकावा असा असतो. असे लोक गरीबांच्या स्वभावाचा, वर्तनाचा, आणि स्थितीचा बारकाईनें शोध करण्यास योग्य आहेत असें समजणें चुकीचें होईल. त्याचप्रमाणें लोकांनीं खासगी रीतीनें आपल्या पैशाची व्यवस्था लावण्यापेक्षां ती सरकारमार्फतच नेमिलेल्या अधिकाऱ्यांकडून अधिक समाधानकारक रीतीनें होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. सरकारी नोकरांच्या वर्तनासंबंधी सरकारी रीतानें ठेविलेले सरकारी दप्तरांतील गुप्तलेख व ह्या विषयावर लिहिलेलीं पुस्तकें पाहिलीं असतां असें आढळून येईल कीं, परोपकाराचीं कामें सरकारावर सोंपविण्याच्या व्यवस्थेनें आजपर्यंत लांचलुचपतीचे आणि पैशाच्या दुरुपयोगाचे नवे प्रकार निघून त्यांस कितीतरी उत्तेजन मिळालें आहे.

पुष्कळ लोक मोठ्या माराकुटीनें आपल्या व आपल्या कुटुंबाच्या निर्वाहापुरता रोजमुरा मिळवूं शकतात. अशा लोकांवर जबर कर बसविणें म्हणजे त्यांना निर्दयपणानें व अन्यायानें वागविणें असून, त्यापासून एकंदर समाजावरही वाईट परिणाम होतात हें विसरतां कामा नये. उद्योगी व प्रामाणिकपणें वागणाऱ्या मजुरांनाही धंद्याला तेजी नसल्यामुळें केव्हां केव्हां काम मिळेनासें होतें, व कधीं कधीं आजारामुळें त्यांच्यानें काम करवत नाहीं. अशा स्थितींत देखील ह्या लोकांकडून गरीबांसाठीं बसविलेला कर चोपून

घेतल्याचीं हजारों उदाहरणें घडून येतात. ह्या लोकांजवळ हा कर देण्याला पैसा नसेल तर त्यांची जिनगी जप्त करून व तिचा लिलांव करून, निरुद्योगी लोकांना पोसण्याकरितां कराची रक्कम उभारली जाते. केव्हांकेव्हां तर ह्यापेक्षांहि निर्दयपणाचे प्रकार घडून येतात. एखादा मनुष्य आपल्या गांवापासून दूर कोठें तरी उद्योगधंद्याच्या संबंधानें गेलेला असतो. तेथें तो कसेंतरी करून निर्वाह करीत असतो. व तो हा कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या तावडींत सांपडल्यामुळें जवळ जें असेल नसेल त्यास मुकतो, व मग तेथें राहण्याची सोय नाहींशी झाल्यामुळें तो मुलूख सोडून परत आपल्या गांवीं येतो. तेथें तो ह्या कराची व्यवस्था करण्याचें सोंपविलेल्या अधिकाऱ्याकडे दाद लावून त्याजकडून आपल्या बायकांपोरांस तिकडून आणण्यासाठीं मदत मिळवितो, व तें सर्व कुटुंब त्या ठिकाणीं ह्या कराच्या पैशांतून पोसलें जातें. अशा रीतीनें ह्या कराचा परिणाम कधींकधीं उद्योगानें पोट भरणाऱ्या लोकांना त्यांच्या उद्योगावरून काढून त्यांना घरीं धर्माच्या पैशानें पोसावें असा होतो.

सरकारच्या देखरेखीखालीं गरीबांना मदत करण्याचें काम दोन कारणांनीं वाजवीपेक्षां फाजील खर्चाचें आहे, हें देखील ध्यानांत ठेवणें जरूर आहे. पहिलें कारण, पैशाची वांटणी करण्याच्या कामांत होणारी अव्यवस्था. ही अव्यवस्था होणें अपरिहार्य असतें व त्यामुळें पुष्कळ नासधूस होते. हें काम ज्यांच्यावर सोंपविलेलें असतें त्यांचें स्वतःचें हिताहित ह्या कामाच्या बरेवाईटपणावर अवलंबून नसल्यामुळें त्यांच्या हातून काळजीपूर्वक वर्तन घडत नाहीं. ज्या लोकांना मदत देण्याची मुळींच अवश्यकता नसते त्यांना ती दिली जाते, ज्यांचें थोड्या मदतीनें काम भागण्यासारखें असतें त्यांना अधिक मदत केली जाते, व ज्यांना विशेष जरूर असते त्यांना फार थोडी मदत मिळते किंवा प्रसंगीं मुळींच मिळत नाहीं. दुसरें कारण, हा कर वसूल करून त्याची व्यवस्था लावण्याचे कामांतील अडचणी. ह्या व्यवस्थेसाठीं एक निराळेंच खातें सरकाराला ठेवावें लागतें. ह्या खात्यांत कर वसूल करणारे कामगार, ज्यांना काम करण्याचें सामर्थ्य नाहीं अशा गरीबांना मदत करणारे कामगार, गरीबांकडून काम करून घेण्यासाठीं स्थापन केलेल्या गृहांवर देखरेख करणारे अधिकारी, आणि ह्या सर्वांच्या हाताखालीं काम करणारे नोकर इतक्यांची नेमणूक करावी लागते. एवढ्या लोकांना प-

गार देण्याखालींच वसूल झालेल्या कराचा बराच भाग गडप होऊन जातो. आयर्लंडांत कित्येक ठिकाणीं हा खर्च उत्पन्नाच्या दोनतृतीयांशांवर जातो, व इंग्लंडांत कित्येक ठिकाणीं एकतृतीयांशाहून अधिक असतो.

कायद्याच्या नजरेनें घडवून आणिलेला परोपकार न्यायतत्त्वांना अनुसरून नाहीं हें पूर्वीं सिद्ध केलेंच आहे. तें लक्षांत आणिलें असतां, अन्यायाच्या उपायांपासून मनुष्यजातीचें कल्याण होण्याचा संभव नाहीं हें सत्य इतर गोष्टींत जसें दिसून येतें तसेंच परोपकाराच्या गोष्टींतही दिसून येतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सरकारमार्फत जुलुमानें लोकांकडून कर वसूल करून घेऊन त्यांतून गरीबांना मदत करणें हें जितकें अनिष्ट आहे, तितकें खासगी मंडळ्या स्थापून त्यांच्या मार्फत लोकांनीं आपखुषीनें दिलेल्या वर्गण्यांनीं फंड जमवून गरीबांस मदत करण्याचे प्रयत्न करणें अनिष्ट नाहीं. तितकें अनिष्ट नाहीं येवढेंच कायतें; परंतु ह्या व्यवस्थेपासून देखील वाईट परिणाम होतात व कित्येक गोष्टींत वरच्यापेक्षांही वाईट होतात. कारण जुलुमामुळें होणारे दुष्परिणाम जरी ह्या व्यवस्थेनें नाहींसे झाले, तरी मुखत्यारमार्फत पैशाची वांटणी करण्याचा प्रकार तसाच कायम राहतो व त्यामुळें होणारा अन्याय दूर होत नाहीं. सरकारमार्फत कर बसवून व्यवस्था करावयाची असतां जितके मोठमोठे कामगार व हाताखालचे नोकर ठेवावे लागतील तितके जरी ह्या खासगी मंडळ्यांच्या व्यवस्थेसाठीं ठेवावे लागले नाहींत, तरी ह्या मंडळ्यांचा कारभार देखील थोडाबहुत त्याच धोरणावर चालवावा लागतो. शिवाय उपकर्ता आणि उपकृत ह्यांचा प्रत्यक्ष संबंध येत नाहीं. प्रत्यक्षपरोपकाराच्या स्वाभाविकक्रियांनीं ज्याप्रमाणें उभयतांच्याही मनावर श्रेष्ठ प्रतीचे नीतिसंस्कार होतात, त्याप्रमाणें ह्या मुखत्यारमार्फत केलेल्या परोपकारानें होत नाहींत. उलट, कित्येक अनीतिकारक प्रचारांना मात्र अवकाश सांपडतो. ह्या व्यवस्थेंत किती प्रकारचे घोंटाळे होत असतात ते पहा.

सरकारच्या देखरेखीखालीं गरीबांसाठीं जमविलेल्या कराच्या पैशाची वांटणी होतांना, विशेषेंकरून पूर्वींच्या व्यवस्थेंत तरी, ज्याप्रमाणें चांगल्या वर्तणुकीच्या व काटकसरीनें खर्च करणाऱ्या विपन्नावस्थेंतील लोकांना मदत न मिळतां, दुराचारी व उधळ्या लोकांनाच ती मिळत असे, त्याप्रमाणेंच बहुतेक परोपकारासाठीं स्थापन केलेल्या मंडळ्यांची स्थिति असते. मदत दे-

ण्याला योग्य असे जे लोक असतात ते भिडस्तपणामुळें मदत मागावयास न जातां विपत्तींतच राहून आपलें दुःख निमूटपणें सहन करितात; परंतु जे मदतीला पात्र नसतात ते निर्लज्जपणें ती मागावयास जातात व त्यांना ती मिळतेही. सन १८८५।८६ सालीं म्यान्शनहौस फंडाचे पैसे बहुतेक आळशी, उधळ्ये व दारूबाज लोकांना मदत करण्याचे कामीं खर्च झाले असें शोधाअंतीं दिसून आलें होतें. आपल्या शेजाऱ्यास मदत मिळाली मग आपणांसच कां मदत मिळूं नये अशी कित्येक लोक तक्रार करीत व कित्येक तर हक्कानें मदत मागत. एकदां एके ठिकाणीं मदत मागावयास ज्या लोकांनीं अर्ज केले होते त्यांना काम देऊं केलें, त्यावेळीं एकपंचमांशाहून कमी लोक कसेबसे तरी काम करण्यास लायक व कबूल आहेत असें दिसून आलें. ह्यावरून असें अनुमान काढितां येतें कीं, बहुतकरून जे लोक निकामी राहतात त्यांना काम तरी करितां येत नसतें किंवा काम करण्याची त्यांची इच्छा तरी नसते. ह्या लोकांच्या स्थितीविषयीं पुष्कळांना मोठा कळवळा येत असतो, व ह्याचा सर्व दोष ते समाजाच्या माथीं मारीत असतात; परंतु ह्या लोकांपैकीं बहुतेक अगदीं निरुपयोगी असून त्यांना तीच स्थिति योग्य असते हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. दुसरी एक गोष्ट ह्यावरून सिद्ध होतें ती ही कीं, निरुद्योगी लोकांना निसर्गदेवतेच्या कोपानें योग्य शिक्षा मिळून त्यांचे डोळे उघडण्याचा संभव असतो, तो ह्या परोपकारी मंडळ्यांच्या प्रयत्नांनीं नाहींसा होतो.

ज्यांना मदत मिळविण्यासाठीं दुसऱ्यापुढें जाऊन तोंड वेंगाडण्यास शरम वाटते अशीं सुशील गरीब मनुष्यें एका बाजूला राहून, जे वेळेपुरतें सोंग आणून त्याची चांगली बतावणी करितात त्यांची दाद लागल्यामुळें ढोंगीपणास उत्तेजन मिळतें; व मदत मिळण्याशीं मनुष्याच्या धार्मिकपणाचा संबंध असल्यास तर त्याचा कळसच होऊन जातो. धार्मिक पुरुष आणि श्रद्धाळु भोळसर बाया लबाड लोकांच्या ढोंगी ईश्वरभक्तीला व धर्माच्या आवेशाला भुलून जातात व त्यांच्या गोड भाषणानें खुष होऊन त्यांना उदार देणग्या देऊन त्यांच्या आशीर्वादानें तृप्त होतात. ह्या रीतीनें सत्याला शिक्षा व ढोंगाला बक्षीस मिळतें. ह्याचा परिणाम लोकांना अनीतीचें वर्तन करण्यास उत्तेजन देणें असा होतो हें सांगावयास नकोच.

ख्रिस्ती धर्माच्या अनेक पंथांत, गरीबांना मदत करितांना, त्यामध्यें आपल्या धर्ममताचा प्रसार करण्यासाठीं जी चढाओढ चाललेली असते तीमुळें

आणखी वाईट परिणाम होतात. निरनिराळ्या पंथाच्या मिशनरी लोकांच्या मंडळ्या आपापल्या कळपांत लोकांना ओढण्यासाठीं वर्गण्या गोळा कारितात व गरीब लोकांना न्याहाऱ्या आणि जेवणें देऊन त्यांचीं मनें वळविण्याविषयीं प्रयत्न करितात. एका मिशन-मंडळानें एका प्रकारचीं टिकिटें काढिलीं होतीं. हीं टिकिटें ज्या गरीब लोकांना मदत द्यावयाची असेल त्यांमध्यें वांटावयाचीं. त्यांनीं तीं देवळांतील सायंकाळची प्रार्थना आटोपल्यानंतर मंडळीनें नेमिलेल्या अधिकाऱ्याजवळ नेऊन द्यावयाचीं व तेथें टिकिटाच्या किंमतीप्रमाणें पैसे त्यांच्या पदरांत पडावयाचे. ह्या मंडळीचें अर्धें उत्पन्न अशा प्रकारचीं टिकिटें वांटण्यांत जात होतें. हीं टिकिटें वांटण्याकरितां मंडळीनें नेमिलेले लोक असत व ते कधींकधीं हीं टिकिटें सभ्य व स्वतंत्र विचार करणाऱ्या लोकांच्याही गळ्यांत बांधण्याचा यत्न करीत. जे लोक टिकिटें घेतील ते अर्थात् ह्या मंडळीचे ओशाळे होणार, व त्या मंडळीच्या धर्ममतांचा आपल्या मनावर थोडाबहुत परिणाम झाला आहे असें त्यांस दाखवावें लागणार. लोकांनीं ढोंग करून आपल्या मतांचा स्वीकार करावा ह्यासाठीं त्यांस भिकेची चटक लावून देण्याचा यत्न ह्या मंडळ्यांकडून होत असे. एक गरीब पण नीटनेटकेपणानें राहणारी बाई, टिकिटें वांटणारे लोक नेहमीं बदमाष मनुष्यांना टिकिटें देतात असें पाहून म्हणाली: “ मला त्या टिकिटांची मुळींच गरज नाहीं; पण निरुद्योगी, निष्काळजी आणि दारूबाज अशा लोकांना तीं सर्व मिळतात व उद्योगी गरीब माणसांना मिळत नाहींत हें पाहिलें म्हणजे फार वाईट वाटतें. ” अशानें सद्गुणी लोकांचा हिरमोड होऊन दुर्गुणी लोकांना उत्तेजन मिळतें एवढेंच नव्हें, तर लोकांना लांच देऊन मूर्खपणाच्या समजुती त्यांच्या गळ्यांत बांधिल्या जातात. कारण, नानापंथांचे लोक आपापल्या मतांचा प्रसार करण्यासाठीं झटत असतात तीं सर्व मतें खरीं असण्याचा संभव नाहीं. अनेक मतांतून खरें कोणते हें सर्वानुमतें ठरणें अशक्य असल्यामुळें व प्रत्येकानें आपापल्या मताच्या प्रसारासाठीं यत्न करणें न्याय्य असल्यामुळें असत्याचा प्रसार होणें अपरिहार्य आहे; परंतु लांचाच्या साधनानें असा प्रसार व्हावा व ढोंगीपणास उत्तेजन मिळावें हें इष्ट नाहीं.

आणखी एक वाईट परिणाम लक्षांत ठेवण्यासारखा आहे. बरेच लबाड लोक अशा प्रकारच्या मंडळ्या काढून पैसा उपटण्याचा धंदा करीत असतात. हे लोक कांहीं तरी एकादी नवी टूम काढतात; तिच्याबद्दल वाचणारांचें मन

ओढून घेण्यासारखी हृदयद्रावक हकीकत लिहून चोहोंकडे हस्तपत्रकें वांटतात व लोकांच्या घरीं जाऊन त्यांना वर्गण्या देण्याविषयीं आग्रह करण्याकरितां व भीड घालण्याकरितां हुषार लोक ठिकठिकाणीं पाठवितात. आणि हें सर्व करण्याचा उद्देश इतकाच कीं, आपणांला चिटणीस, खजिनदार, हिशेबतपासनीस, व्यवस्थापक इत्यादि मोठमोठ्या पगाराच्या जागा पटकावितां याव्या. इतर धंद्यांत कोठें डाळ शिजेनाशी झाली म्हणजे हे लोक एकदां हा धंदा करून पाहतात. मग जर दैववशात् ही संस्था उभारण्यांत त्यांस यश आलें तर ती केवळ ह्या लोकांच्या फायद्याकरितां चालविली जाते. परंतु नेहमीं अशा प्रकारच्या यत्नांना यश येतेंच असें नाहीं. ज्याप्रमाणें कित्येक व्यापाराच्या मंडळ्या गर्भांतच किंवा उपजतांक्षणींच मरतात, त्याप्रमाणें परोपकारासाठीं स्थापिलेल्या कित्येक मंडळ्यांचीही तशीच स्थिति होते. तशी स्थिति झाली तरी कांहीं दिवसपर्यंत वर्गण्या जमवून त्यांवर चैन करण्याचे कामीं त्यांचा उपयोग होतो. निरनिराळ्या लोकांस पुढें करून नव्यानव्या मंडळ्या काढाव्या व लोकांकडून वर्गण्या जमवून त्यांवर चैन करावी, असा धंदा करणाऱ्या लबाड लोकांच्या टोळ्या कित्येक ठिकाणीं आहेत.

एवढ्यानेंच आटोपलें नाहीं, ह्या मंडळ्यांना वर्गण्यांच्या व देणग्यांच्या रूपानें पैसा पुरविणाऱ्या लोकांचे हेतु शुद्ध असत नाहींत. पुष्कळवेळां पैसा देणारांच्या मनांत परोपकारबुद्धीपेक्षां प्रतिष्ठेची इच्छाच विशेष असते. ह्या मंडळ्यांचे कावेबाज उत्पादक आरंभीं बड्या बड्या श्रीमंत लोकांना ज्यावेळीं वर्गण्यासाठीं पत्रें लिहितात त्यावेळीं त्यांना अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे मान स्वीकारण्याविषयीं विनंति करण्यास चुकत नाहींत. शुद्ध अंतःकरणाच्या लोकांनीं चांगल्या हेतूंनीं स्थापिलेल्या संस्थांना सुद्धां मोठमोठाल्या वर्गण्या व देणग्या मिळतात, त्या पुष्कळ अंशीं लोकांत आपली औदार्याच्या संबंधानें ख्याति व्हावी व सन्मानाच्या आणि अधिकाराच्या जागा आपणांस मिळाव्या, ह्या उद्देशानें दिलेल्या असतात. केव्हां केव्हां ह्यापेक्षांही नीच हेतूंनीं परोपकाराचीं कामें करण्यास मनुष्य तयार होतो. एखाद्या मनुष्यानें नुकताच आपला धंदा सुरू केला असला व त्यासाठीं त्याला बड्याबड्या माणसांच्या ओळखी करून घ्यावयाच्या असल्या तर तो एखाद्या परोपकाराच्या मंडळींत फार झटून काम करितो. असें केलें म्हणजे सहजच त्याची व्यवस्थापक मंडळीच्या सभासदांत नेमणूक होते. अशा मंडळीचा अध्यक्ष बहुतकरून कोणी

तरी मोठा सरदार असावयाचा व कांहीं बडेबडे लोकही व्यवस्थापक मंडळींत असावयाचेच. ह्या लोकांशीं अनायासें परिचय घडतो व त्यांच्या मार्फत दुसऱ्याही पाहिजे तितक्या ओळखी करून घेतां येतात. कित्येक लोकांचे धंदे जरी चांगले चाललेले असले व त्यांना ह्या ओळखींपासून म्हणण्यासारखा जरी कांहीं उपयोग नसला, तरी बड्याबड्या लोकांत फिरण्याची व त्यांच्याशीं येईल तितका संबंध आणण्याची त्यांना इतकी हौस असते कीं, ती तृप्त करण्याकरितांच त्यांना असल्या मंडळ्यांत विशेष मन घालून काम करावेंसें वाटतें. दरवर्षी मंडळीच्या रिपोर्टांत मोठमोठ्या सरदारांच्या व बड्याबड्या लोकांच्या नांवाशेजारीं आपलें नांव छापलें जाईल हा विचार मनांत आला म्हणजे त्यांना व त्यांच्या बायकामुलांना मोठा आनंद होतो. आपल्या मेहनतीमुळें गरीबांवर उपकार होत आहेत ह्या विचारापेक्षां, श्रीमंत लोकांशीं आपला परिचय होतो हा विचार त्यांच्या मनांत अधिक घोळत असतो.

पोरक्या पोरांना मदत करण्यासाठीं, व्यापारांत बुडालेल्या अथवा म्हातारपणामुळें ज्यांच्यानें धंदा होत नाहीं अशा लोकांस मदत करण्यासाठीं, किंवा अशाच कांहीं परोपकाराच्या विशेष कामासाठीं स्थापिलेल्या मंडळ्यांपासूनही वरच्यासारखेच परिणाम होतात. ज्या लोकांना मदतीची फारशी जरूर नसते त्यांना त्यांच्या मित्रांच्या वशिल्यानें बरीच मदत मिळते; परंतु ज्यांना मदतीची विशेष अवश्यकता असते त्यांचा वशिला लावणारा कोणी नसतो व त्यामुळें त्यांची दादच लागत नाहीं. ज्यांना मदत द्यावयाची त्यांची निवड करण्याचा तरी बराच त्रास आहे व त्या कामांत लांचलुचपतीलाही बरीच सवड असते. व्यवस्थापकांच्या घरोघर जाऊन भीडमुरवत खर्चून मतें मिळविणें व व्यवस्थापकांनीं एकमेकांच्या मतांचें उसनें फेडणें इत्यादि प्रकारही चालतात. मंडळी उभी करून ती चालू ठेवण्याकरितां एकंदर श्रमाचा व पैशाचा जो व्यय होतो तो न झाला तर आणखी कितीतरी लोकांना मदत होण्यासारखी असते.

पुष्कळ लोकांना इस्पितळें आणि फुकट औषधें देण्याचे दवाखाने ह्या संस्थांचा परोपकाराचे कामीं उपयोग अगदीं निर्विवाद आहे असें वाटतें, परंतु त्यांची ही स्थिति इतर संस्थांहून भिन्न नाहीं. लंडन शहरांत राहणाऱ्या लोकांपैकीं शेंकडा तीस लोक ह्या संस्थांचा उपयोग करून घेतात. लंडन शहरांतील लोकसंख्येचा एकतृतीयांश खरोखरच इतक्या दीन स्थितीस येऊन

पोंचला नाहीं. ज्यांना वैद्याची फी व औषधाची किंमत देण्याचें सामर्थ्य आहे असे लोकही ह्या संस्थांकडून आपलें फुकट काम करून घेतात असें ह्यावरून सिद्ध होतें. आजारीपणांत फुकट मदत देण्याचा परिणाम लोकांना भीक मागण्यास उत्तेजन देणें असा होतो. पहिल्यानें लोक फक्त फुकट औषधें घेऊं लागतात. मग ती संवय झाली म्हणजे आजारीपणांत इस्पितळांतच जाऊन राहातात; त्यावेळीं अन्नही फुकट मिळूं लागतें. मग तेथून बाहेर पडलें म्हणजे पैशाचीही मदत लोकांकडे किंवा मंडळ्यांकडे जाऊन मागण्याची त्यांना बुद्धि होते. सन १८३० पासून १८६९ पर्यंत मधल्या ४० वर्षांत लंडन शहरांत लोकसंख्येची जितकी वाढ झाली त्याच्या पांचपट वाढ उपचारांसाठीं इस्पितळांत जाऊन राहणाऱ्या रोग्यांची झाली आणि तेथील रोगराई तर एकंदरींत कमीच होत आहे, निदान वाढत तरी नाहीं. ह्यावरून निघणारें अनुमान स्पष्टच आहे. सुखाची किंमत दिल्यावांचून त्याची प्राप्ति करून घेण्याची इच्छा मनुष्यांत अद्यापि फार आहे. फुकट काम करून घेण्यासाठीं नीच स्वभावाचे सुखवस्तु लोक धर्मार्थ दवाखान्याचा इतका उपयोग करून घेतात कीं खऱ्या लोकांचा त्या ठिकाणीं प्रवेशच होणें कठिण पडतें. चांगले खाऊनपिऊन सुखी व चैनीनें राहणारे लोक गरीबांचीं सोंगें घेऊन फुकट औषधें मिळविण्याचा प्रयत्न करितात. एका इस्पितळांतील बाहेर राहून औषध घेऊन जाणाऱ्या लोकांपैकीं शेंकडा वीस लोकांनीं आपले खोटे पत्ते लिहून दिले होते असें तपासाअंतीं आढळून आलें. असें करण्याचें कारण आपण फुकट औषधें आणतों हें कोणाला समजूं नये अशी लोकांची इच्छा. ह्या संस्थांचा उपयोग करून घेण्यासाठीं इतके लोक जातात कीं डाक्टरांना त्या सर्वांकडे चांगलें लक्ष देण्याला सवड मिळणें अशक्य होतें. केव्हां केव्हां तर प्रत्येक रोग्याच्या वांटणीस सरासरीनें एकेक मिनिटच येतें. ह्यावरून उघड दिसतें कीं, ज्या लोकांना ह्या संस्थांचा उपयोग व्हावा अशी मूळची इच्छा असते त्या लोकांना तो फारच थोडा होतो. पुष्कळ वेळां ह्या ठिकाणीं मिळालेली मदत केवळ नांवाची असते. अशानें सर्वांचीच फसवणूक होते. रोगाची परीक्षा करून औषधाची योजना बहुधा बिनपगारी डाक्टरांकडून केली जाते. प्रत्येक धर्मार्थ चालविलेल्या दवाखान्यांस बहुतकरून फुकट काम करणाऱ्या डाक्टरांची मदत असते. ह्यांपैकीं कांहींना सरासरीनें तीन तास आणि वीस मिनिटांत ३१८ रोगी तपासून त्यांना औषधें लिहून देण्याचें काम उरकावें लाग-

तें. ह्या लोकांचा आणखी खासगी धंदा चाललेला असतोच. स्वतःच्या निर्वाहासाठीं बरेंच काम करावें लागत असून फुकट कामासाठीं इतका त्रास पडल्यामुळें पुष्कळ डाक्टरांवर फार वाईट परिणाम होतात. स्वतःचें काम फारसें नसलें तरी देखील एवढ्या कामानेंच मनुष्य थकून व कंटाळून जाईल. फुकट काम करणाऱ्या बऱ्याच डाक्टरांची स्थिति फुकट काम करण्यासारखी नसते, व त्यांस त्यांच्या कामाबद्दल पगार मिळेल तर त्याची त्यांना फार आवश्यकता असते. आणि फुकट काम करून घेणाऱ्यांचे अंगीं फी देण्याचें सामर्थ्य असतेंही. लंडन शहरांत दरसाल सहा लक्ष पौंड इस्पितळांसाठीं खर्च होतात व शिवाय ह्या कामासाठीं उपयोगांत आलेल्या इमारती व जमिनी ह्यांचें वार्षिक उत्पन्न धरिलें असतां जवळजवळ दहा लक्ष पौंडांची रकम दरसाल ह्या कामीं खर्चिली जाते आणि ह्या सर्व खटाटोपासून निष्पन्न काय होतें तें पाहिलें तर बऱ्याच लोकांची नीति बिघडते, ज्या लोकांना मदत मिळावी अशी मूळची इच्छा असते त्या लोकांना ती न मिळतां भलत्याच लोकांना मिळते, आणि पुष्कळ गरीब डाक्टरांना मोबदल्यावांचून फार त्रासदायक काम करावें लागतें.

लोकांनीं स्वसंतोषानें दिलेल्या वर्गण्यांवर व देणग्यांवर चाललेल्या आतां सांगितलेल्या अनेक प्रकारच्या मंडळ्यांचा व संस्थांचा एकंदर अनुभव पाहिला म्हणजे असें दिसून येतें कीं, त्यांच्यापासून जरी परोपकाराचीं चांगलीं कामें होत असलीं तरी ह्या उपकाराबरोबर बरेच दुर्लक्ष न करण्यासारखे अपकारही होत असतात, व केव्हांकेव्हां उपकारापेक्षांही अपकारच फार होतात. ह्या सर्व अनुभवावरून एक अप्रिय परंतु सत्य अशी गोष्ट लक्षांत येते ती ही कीं, परोपकाराचीं कामें घडवून आणण्याकरितां ज्या सामाजिक उपायांची व साधनांची योजना केली जाते त्यांमुळें पुष्कळ शक्तीचा दुरुपयोग होऊन मूळचे उद्देश बहुतकरून एका बाजूस राहतात व भलतेच परिणाम होऊं लागतात. असें होणें परिहार्य असो किंवा अपरिहार्य असो; सध्यां अशी स्थिति आढळून येते ही गोष्ट खरी. परोपकार घडवून आणण्याच्या कामांत जितकाजितका अप्रत्यक्षपणा अधिक असेल तितकातितका मूळचे उद्देश तडीस जाण्याचा संभव कमी असतो.

गरीबांना मदत करण्यासाठीं स्थापिलेल्या मंडळ्यांच्या संबंधानें हें जें मत दिलें आहे, त्यावरून सामान्यतः परोपकाराच्या हेतूनें उभारलेल्या सर्व

प्रकारच्या संस्थांविषयीं गैरसमज होण्याचा संभव आहे. गरीबांना मदत करण्याचें काम व्यक्तीवर सोंपविलें असतां कमी खर्चानें चांगलें होण्यासारखें आहे असें पुढें दाखविलें आहे. जीं परोपकाराचीं कामें प्रत्यक्ष रीतीनें चांगलीं होण्यासारखीं असतील त्यांच्यासाठीं अप्रत्यक्ष रीतीनें काम करणाऱ्या संस्था उभारणें इष्ट नाहीं; परंतु जीं कामें संघशक्तीवांचून होण्यासारखीं नसतील त्यांच्यासाठीं संस्थांची जरूर आहे. उदाहरणार्थ, लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार करण्याचें परोपकाराचें काम करणें झाल्यास, तें मोठ्या प्रमाणावर मंडळ्या स्थापन करूनच केलें पाहिजे. त्या कामासाठीं विशेष प्रकारचीं मनुष्यें तयार केलीं पाहिजेत व त्यांच्यावर तें काम सोंपविलें पाहिजे. आतां, अप्रत्यक्ष रीतीच्या परोपकारांत पैशाचा दुरुपयोग होण्याचा थोडाबहुत संभव असतो खरा, परंतु त्यासंबंधानें घेववेल तितकी काळजी घेणें ह्यावांचून दुसरा इलाज नाहीं.

ह्या प्रकरणांत एवढा वेळपर्यंत जें प्रतिपादन झालें त्यांत व पूर्वींच्या कित्येक प्रकरणांतही पुष्कळ ठिकाणीं असें ध्वनित केलें आहे कीं, विपत्तींत पडलेल्या मनुष्यांस मदत करण्याचे जे प्रकार आहेत ते सर्व उपकर्ता आणि उपकृत ह्या दोघांचा प्रत्यक्ष संबंध होऊन घडून आले तरच मूळ हेतु चांगल्या रीतीनें तडीस जाऊन उभयतांवरही इष्ट परिणाम होतात. दयेच्या अंगीं ज्याप्रमाणें दया करणारा व ज्यावर दया करावयाची तो ह्या दोघांसही अवर्णनीय सुखाचा अनुभव देण्याची शक्ति आहे, त्याचप्रमाणें परोपकाराच्या अंगींही आहे. परंतु परोपकार करणारा व करून घेणारा ह्या दोघांचा प्रत्यक्षसंबंध आल्याशिवाय हा परिणाम होत नाहीं. आतां एवढें खरें कीं, व्यक्तीच्या हातून होणारा परोपकारही कित्येक प्रसंगीं वाजवीपेक्षा फार कमी असेल, दुसऱ्या कित्येक प्रसंगीं वाजवीहून अधिक होईल व आणखी कांहीं प्रसंगीं ज्या ठिकाणीं जरूर नसेल त्या ठिकाणीं केला जाईल. प्रथमतः ह्या प्रकारच्या परोपकारांत ज्या उणीवा राहण्याचा संभव आहे त्यांचा विचार करूं.

भिकाऱ्यांना पैपैसा देऊन त्यांच्या आळसाला आणि दुराचाराला उत्तेजन देण्याचा प्रकार सर्व लोकांच्या नेहमींच्या परिचयांतला आहे व निष्काळजीपणानें बहुतेकांच्या हातून तो घडत असतो. हा परोपकार करितांना निरनिराळ्या लोकांच्या मनांत निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळे हेतु असतात. कित्येकांचीं मनें इतकीं हलकीं असतात कीं, दीनावस्थेचा देखावा त्यांना

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

दुःसह होतो; व मनुष्य खरोखर त्या स्थितींत असो किंवा त्यानें ढोंग केलेलें असो त्या चौकशीस ते न लागतां त्याला कांहींतरी देऊन लवकर त्याच्या दृष्टीआड होतात; कित्येकांना असें वाटत असतें कीं, अनाथांस धर्म केल्यानें आपल्या हातून घडोघडीं जीं लहानमोठीं पातकें घडत असतात त्यांचें क्षालन होतें; इहलोकीं विपत्तींत असलेल्या लोकांस असा धर्म केला असतां त्याच्या अनेकपटीनें परलोकीं आपणास प्राप्ति होते, अशी कित्येकांची समजूत असते; व कित्येकांना अशा रीतीनें धर्म करणें चांगलें नसून त्यापासून उपकार न घडतां अपकारच घडतो असें खात्रीपूर्वक वाटत असतांही, पुढें बडबड करीत असलेल्या भिकाऱ्याची चौकशी करून त्याची खरी स्थिति काय आहे ह्याचा तपास लावण्याला जरूर तितका त्रास करण्याची इच्छा नसल्यामुळें, कशी-तरी कटकट वारण्याच्या हेतूनें ते त्याच्या अंगावर पैसादोनपैसे फेंकून मोकळे होतात. वरील कोणत्याही हेतूनें हें कार्य घडून येत असलें तरी त्याचा परि-णाम नेहमीं एकच होतो. तो कोणता म्हणाल, तर आळसाला आणि व्यस-नाला उत्तेजन देणें. ह्या मूर्खपणाच्या परोपकाराच्या चालीमुळें फार वाईट परिणाम होतात हें निःसंशय आहे, आणि ह्यामुळें परोपकाराचें काम व्यक्तीवर सोंपविलें असतां जे पुष्कळ फायदे आहेत म्हणून अनेक वेळां सांगण्यांत आलें आहे ते तितके होणार नाहींत हें कबूल केलें पाहिजे.

रस्त्यांतून हिंडणाऱ्या भिकाऱ्यांना पैपैसा देण्याला ज्या हेतूंनीं लोक प्रवृत्त होतात त्याच हेतूंनीं आणखी एक प्रकारच्या भिकाऱ्यांना पैसे देण्या-विषयीं लोकांना इच्छा होते. पुष्कळ लबाड लोक कोणी आपलें घर जळालें म्हणून, कोणी बायकापोरें दुष्काळांत सांपडलीं म्हणून, कोणी आईबाप मेले म्हणून वगैरे अनेक कारणांनीं संभावितपणाची भिक्षा मागत फिरतात. ते कांहीं सामान्य लोकांच्या सह्यांचीं बनावट सर्टि-फिकिटें तयार करितात व कांहीं लोकांनीं वर्गण्यांचे आंकडे घातलेली एक यादी बनवितात, आणि लोकांच्या भेटी घेऊन त्यांना तें भेंडोळें दाखवून कोणाकडून चार आणे, कोणाकडून आठ आणे ह्याप्रमाणें साधेल तें उपट-तात. अशा लोकांच्या लबाड्या पुष्कळ वेळां बाहेरही येतात, परंतु मूर्ख व निष्काळजी लोकांचा चोहोंकडे इतका भरणा आहे कीं, फसविणारा भेटल्या-वर फसलें जाणाऱ्या लोकांना तोटा नाहीं. पुष्कळ भोळसर लोकांचा लबाड लोकांच्या बोलण्यावर विश्वास पटतो आणि त्यांत खरें खोटें काय आहे

याचा तपास न करितां ते त्यांस पैसे देतात. हे पैसे देतांना पुष्कळांस असें वाटत असतें कीं, त्या लोकांवर दया करण्यांत आपण मोठें सत्कृत्य करीत आहों; परंतु लबाड लोकांची लबाडी बाहेर काढण्याविषयीं यत्न करावयाचा तो न करितां उलट तिला उत्तेजन दिल्यामुळें हें दुष्कृत्य होतें, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. ह्या मूर्खपणाच्या परोपकारावर अनेक संभावित चोरांचा आणि लुटारू लोकांचा चरितार्थ चाललेला आहे. मनुष्याच्या ह्या अविचारीपणामुळें व्यक्तीवर सोंपविलेल्या परोपकारापासून जे उत्कृष्ट परिणाम व्हावयाचे ते बरेच कमी होतात.

व्यक्तीच्या परोपकाराविरुद्ध दुसरा एक असा आक्षेप आणण्यांत येत असतो कीं, विपन्नावस्थेंतील लोकांना मदत करण्याचें जर सर्वांना भाग पाडिलें नाहीं व ज्याच्या त्याच्या अंतःकरणाच्या प्रवृत्तीवर सोंपविलें, तर ह्या कामाचा सर्व बोजा, जे फारथोडे लोक दयाशील व परोपकारी असे आढळून येतात, त्यांच्यावर मात्र पडेल व बाकीचे लोक तिकडे ढुंकून देखील पाहणार नाहींत. कोणत्याही समाजांत कठोर अंतःकरणाचे किंवा दीनावस्थेंतील मनुष्याची दया आली तरी तिच्यासाठीं आपणाला चट्टा लावून न घेणारे असेच मनुष्य फार असतात. दुसऱ्याच्या दुःखानें कळवळणारे व त्याच्यासाठीं झीज सोसण्यास तयार होणारे मनुष्य फार विरळा. ह्या व्यवस्थेचा परिणाम असा होईल कीं, गरीबाची दाद लागावी तितकी लागणार नाहीं किंवा दयार्द्र अंतःकरणाच्या लोकांना शक्तीबाहेर आत्मयज्ञ करावा लागेल. ह्या आक्षेपांत बराच अर्थ आहे, परंतु प्रथमदर्शनीं तो जितका जोरदार दिसतो तितका तो नाहीं. इतर पुष्कळ गोष्टींप्रमाणेंच ह्या गोष्टींतही नवीन कारणांपासून होणाऱ्या कार्याचा अजमास करितांना चुकी होते. कारण एका गोष्टींत मात्र बदल होईल व दुसऱ्या गोष्टी तशाच कायम राहतील असें गृहीत धरिलें जातें. कोणत्याही प्रकारच्या आचरणाला कायद्याचें बंधन नसलें तर लोकमताचें बंधन उत्पन्न होतें हें विसरतां कामा नये. शपथेवर जर खोटें बोललेलें नसेल तर कायद्याच्या दृष्टीनें तो शिक्षेस योग्य असा गुन्हा होत नाहीं; परंतु खोटें बोलणाऱ्या मनुष्याची समाजांत इतकी नाचक्की होते कीं, त्याची किंमत फार कमी समजली जाऊन जेथेंतेथें त्यास मान खालीं घालावी लागते. ही समाजाकडून होणारी शिक्षा सामान्यत्वेंकरून लोकांच्या खरेपणाच्या वर्तनाला कारण होते. पुष्कळ सामाजिक आचार पाळिले गेले नाहींत तरी त्यांसाठीं

कांहीं ठराविक प्रायश्चित्त घेण्याची जरूर नसते; तथापि नीतीच्या किंवा कायद्याच्या दृष्टीनें आपणाकडून दोषास्पद वर्तन होऊं नये ह्यासाठीं लोक जी काळजी घेतात तीपेक्षां अधिक असल्या आचारांच्यासंबंधानें घेत असतात. पुष्कळ लोकांच्या मनाची स्थिति फार चमत्कारिक असते. त्यांच्या हातून पापाचरण घडलें तरी त्याबद्दल त्यांच्या मनाला फारशी तळमळ लागत नाहीं. परंतु समाजांत जे कित्येक रूढाचार म्हणून ठरलेले असतात त्यांचें उल्लंघन करावयाचें झालें तर मात्र त्यांचें धाबें अगदीं दणाणून जातें. रूढीविरुद्ध वर्तन केल्यानें समाजाचा जो रोष होतो त्याला लोक फार भीत असतात. ह्यावरून असें म्हणतां येईल कीं, ज्या ठिकाणीं सरकारमार्फत लोकांवर कर बसवून गरीबांना मदत करण्याची व्यवस्था चालते त्या ठिकाणीं ती बंद होऊन तें काम व्यक्तिमात्राच्या खुषीवर सोंपविल्यानें जर हळूहळू लोकमतांत बदल होत जाऊन ह्यासंबंधानें इष्ट असे विचार रूढ होऊन जाण्याचा संभव असेल, तर वरील आक्षेपास अवकाश राहाणार नाहीं. सक्तीच्या परोपकाराचा कायदा कोणत्याही देशांत चालू राहण्याला तरी तेथील लोकांत परोपकारबुद्धि असलीच पाहिजे. तिलाच थोडेंसें निराळें स्वरूप मिळालें म्हणजे झालें. सरकारांतून गरीबांना मदत मिळेनाशी झाली म्हणजे लोकांना खासगी रीतीनें त्यांची कांहीं तरी व्यवस्था लावणें भाग पडेल व प्रथमतः जरी विशेष कळकळ बाळगणाऱ्या लोकांवर फार ओझें पडलें तरी दिवसेंदिवस अधिकाधिक लोक तो भार आपले अंगावर घेऊं लागतील व ह्यासंबंधानें कर्तव्याची कल्पना लोकांचे मनांत येऊं लागेल. कांहीं काळानें हें लोकमत इतकें दृढ होऊन जाईल कीं, ह्या सर्व लोकांच्या सामान्यकर्तव्याचा आपल्या वांटणीचा भाग न केल्यानें लोकांत जी प्रतिकूल टीका होईल ती सहन करणें मनुष्यांस फार कठिण वाटूं लागेल, व कठोर अंतःकरणाचे मनुष्य देखील लोकापवादासाठीं आपल्या वांट्याचें परोपकाराचें काम करूं लागतील. ज्या लोकांकडून हें काम होणार नाहीं अशी विशेष भीति, त्यांच्याकडून तें अशा रीतीनें होऊं लागेल व ज्यांना त्याची कळकळ असेल त्यांना त्यापासून खऱ्या सुखाचा अनुभव येऊन परोपकाराला स्वाभाविकस्वरूप प्राप्त होईल.

व्यक्तीच्या परोपकाराच्या व्यवस्थेंत आणखी एक अडचण आहे. संसारकृत्यांत गढून गेलेल्या मनुष्याच्या पाठीमागें इतके व्यवसाय असतात कीं, त्या सर्वांकडे द्यावें तितकें लक्ष देण्यालाच अवकाश नसतो. मग त्यानें हीं कामें

करण्यास वेळ कोठून काढावा ? खासगीपरोपकाराचें काम योग्य रीतीनें करावयाचें म्हटलें म्हणजे ज्यावर उपकार करावयाचा त्याजविषयीं विश्वसनीय माहिती मिळविली पाहिजे. हें काम फुरसतीचें आहे व ही फुरसत ज्यांना नसेल त्यांनीं आपल्या सामर्थ्याप्रमाणें एकदम देणगी द्यावी व तिचा उपयोग करण्याचें काम दुसऱ्यांवर सोंपवावें हेंच उत्तम असें कित्येकांचें म्हणणें आहे. ह्या म्हणण्यांत सुद्धां बराच अर्थ आहे हें कबूल केलें पाहिजे. परंतु बहुत प्रसंगीं एकाच्या पैशाचा उपयोग दुसऱ्याकडून योग्य तितक्या काळजीनें होत नाहीं ही पूर्वी सिद्ध केलेली गोष्ट ध्यानांत आणिली, व ज्यांना पाहिजे तितका वेळ रिकामा असतो अशा लोकांपेक्षां दहा कामें करणारे मनुष्यच त्यांतल्यात्यांत अकराव्या कामाला कसा तरी लवकर वेळ काढूं शकतात हा जगांतला नेहमींचा अनुभव पाहिला, म्हणजे ह्या अडचणीला तितकें महत्त्व द्यावें असें वाटत नाहीं. उद्योगी लोकांनींच वेळांतवेळ करून आपणाकडे आश्रय मागावयास आलेल्या अनाथांस त्यांची पूर्ण चौकशी करून त्यांच्या जरूरीच्या व योग्यतेच्या मानानें व आपल्या सामर्थ्याप्रमाणें मदत करण्याचा यत्न करावा. कधींकधीं अशा परोपकारच्या आचरणानें एका प्रकारचा अनुभव मिळेल व त्याचा व्यवहारांत उपयोगही करितां येईल.

कितीही शंका घेण्याला जागा असली व कितीही अडचणी येण्यासारख्या असल्या तरी एकंदरींत अनाथांना मदत करण्याचें काम व्यक्तींवर सोंपविणें हेंच त्या परोपकाराचें स्वाभाविक स्वरूप आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्यक्तींच्या हातून हें काम अधिक विचारपूर्वक व काळजीपूर्वक होऊं शकेल आणि ह्या कामाची सर्व जबाबदारी लोकांवर येऊन पडली असतां जरूरीचे मानानें परोपकाराचें काम व्यक्तीस चांगलें साधेल. विशेषतः गरीबीचें सोंग करून फसवाफसवी करण्याचा प्रकार जो चोहोंकडे आढळून येतो तो बहुतेक नाहींसा होईल आणि त्यामुळें परोपकाराची अवश्यकताही कमी होईल.

खासगी रीतीनें अनाथांस मदत करण्याची परोपकारपद्धति खासगी मंडळ्यांच्या व राष्ट्रीय पद्धतींहून श्रेष्ठ आहे असें सामान्यरीतीनें स्थापित केल्यावर खासगी परोपकाराच्या एका विशेष प्रकाराकडे वळूं. हा प्रकार वरच्यापेक्षांहि थोडासा अधिक स्वाभाविक आहे व त्याचें आचरणही थोड्याबहुत अंशानें लोकांचे हातून घडत आहे. ह्या प्रकाराकडे लोकांचें विशेष लक्ष वळविणें अवश्य आहे.

मनुष्याला जगांत जे नानाप्रकारचे व्यवहार करावे लागतात त्यांच्या योगानें त्याचा अनेक लोकांशीं संबध येतो व त्यांजविषयीं थोडीबहुत माहिती त्याला अनायासें होते. ह्या साधारण ओळखीच्या लोकांचा वर्ग फार मोठा असतो, परंतु विशेष दळणवळण पडल्यामुळें ज्यांच्याविषयीं त्याला बरीच माहिती असते व ज्यांचा त्याजवर एका प्रकारचा हक्क उत्पन्न झालेला असतो अशा लोकांचा एक लहानसा वर्ग असतो. ह्या वर्गांतलि लोकांपैकीं कित्येकांना आजारीपणामुळें, काम न मिळाल्यामुळें, आप्तांच्या मरणामुळें किंवा दुसऱ्या एकाद्या अकल्पित संकटामुळें मदत करण्याची अवश्यकता उत्पन्न झाल्यास तें काम ह्या मनुष्याच्या हातून जितकें प्रसंगास योग्य असें होऊं शकेल तितकें दुसऱ्याच्या हातून होणार नाहीं. ज्याच्या अंगीं परोपकार करण्याचें सामर्थ्य असेल त्यानें कामधंद्याचे निमित्तानें विशेष संबंध जडलेल्या लोकांची ह्या संबंधानें प्रथम काळजी घेणें जरूर आहे.

प्राचीनकाळीं जेव्हां समाजाची घटना भिन्न होती व मनुष्याचे व्यवहार हल्लींप्रमाणें करारानें ठरविलेल्या देवघेवींवर न चालतां आश्रिताच्या नात्याचा नेहमीं कायमचा संबंध राहून चालत असत, त्यावेळीं प्रत्येक कुटुंबनायकावर आपल्या आश्रितांच्या कल्याणाकडे लक्ष पुरविण्याची जबाबदारी असे. कुटुंब म्हटलें म्हणजे त्यांत नात्याच्या संबंधाचीं अनेक मनुष्यें असून त्यांच्या अधिकाराच्या संबंधानें पायऱ्या ठरलेल्या असत व प्रत्येक कुटुंबाशीं कायमचा संबंध जडलेले असे गुलाम असत. एकेक कुटुंब म्हणजे निरनिराळें स्वतंत्र संस्थान अशी बहुतेक स्थिति होती. ह्या कुटुंबव्यवस्थेंत प्रत्येक मनुष्याला कुटुंबांतील मुख्यकर्त्या पुरुषाचा हुकूम विनतक्रार पाळावा लागत असे व निर्वाहासाठीं तो जें देईल त्यावर संतुष्ट रहावें लागत असे हें खरें, तथापि बहुतकरून जरूरीच्या पदार्थांची कधीं कोणाला वाण पडत नसे. परतंत्रतेच्या दृष्टीनें त्यांची स्थिति पाळींव जनावरांप्रमाणें होती व गरजा भागविण्याच्या संबंधानेंही बहुतेक त्यांच्याच स्थितीशीं साम्य होतें. मोठमोठालीं कुटुंबें किंवा टोळ्या करून राहण्याच्या पूर्वीच्या पद्धतींत व तिच्यापासूनच उत्पन्न झालेल्या जमीनदार व कुळें ह्यांच्या पद्धतींत (जिला युरोपांत फ्यूडल–सिस्टिम असें नांव पडलें होतें) मनुष्याच्या दर्जाचें महत्त्व असे, व आश्रितांना जरी स्वातंत्र्य नसे तरी त्यांच्या पोटापाण्याची तजवीज सरासरीच्या मानानें बरीच होत असे. त्यांच्या जेवणाखाणाची व राहण्याची व्यवस्था प्रत्येक कुटुंबाच्या

देखरेखीखालीं प्रत्यक्ष होत असे किंवा त्यांना जमिनीच्या उत्पन्नाचा नियमित अंश दिला जात असे व त्यांतून ती व्यवस्था होण्यासारखी असे. त्यांजवर धन्याचा पूर्ण ताबा असल्यामुळें त्यांची इतर काळजी घेणेंही त्याला भाग पडे.

ही व्यवस्था बदलत जसजशी मजुरी देऊन काम करून घेण्याची रीति अंमलांत येऊं लागली तसतसा हा आश्रितभाव नष्ट होऊं लागला व ह्यामुळें जरी खालच्या वर्गांना स्वातंत्र्याचे फायदे मिळूं लागले तरी ताबेदारीपासून जे कित्येक फायदे असतात ते त्यांस मिळतनासे झाले. आतां गरीब मजुरांवर अंमल करणारा कोणी नाहीं ही गोष्ट खरी. परंतु त्याच्यासाठीं काळजी घेणाराही कोणी नाहींसा झाला आहे. हल्लींच्या ज्या तत्त्वावर जगांतील व्यवहार चालले आहेत त्याचा रोंख चाकरी व पगार ह्यांचा बसेल तितका मेळ बसविण्याकडे आहे. झालेल्या कामाचा मोबदला मजुरीच्या रूपानें दिला म्हणजे धनी आणि चाकर ह्यांचा एकमेकांवर कांहींएक हक्क राहत नाहीं. न्यायाच्या दृष्टीचीं कर्तव्यें आटोपलीं म्हणजे सर्व कर्तव्यें संपलीं असा मनुष्याचा समज होऊन जातो. सेव्यसेवकभावाची पूर्वीची कल्पना नाहींशी झाली आहे व तिच्या जागीं जो नवीन संबंध उत्पन्न व्हावयाचा त्याचा म्हणण्यासारखा परिणाम अद्यापि लोकांचे मनावर झाला नाहीं. नवीन संबंधापैकीं न्यायाच्या भागाचा म्हणजे मजुरीच्या देवघेवीचा मात्र पूर्ण अंमल बसला आहे; परंतु परोपकाराच्या भागाचा अजून बसावयाचा आहे.

जुन्या व्यवस्थेंतील सेव्यसेवकांमधल्या इष्टसंबंधाचें परोपकाराच्या तत्त्वांनीं पुनरुज्जीवन होणें जरूर आहे. पूर्वीच्या एका पक्षाकडील जुलमी सत्तेला व दुसऱ्या पक्षाकडील शोचनीय पारतंत्र्याला अवकाश न देतां, आश्रितांविषयीं जी काळजी घेतली जात असे ती कायम राखण्याचा यत्न केला पाहिजे. धनी आणि चाकर किंवा वरिष्ठ आणि त्यांच्या हाताखालीं काम करणारे लोक ह्यांजमधल्या पूर्वीच्या कायदेशीर बंधनाचा प्रवेश होऊं न देतां त्यांजमध्यें दया आणि कृतज्ञता ह्यांचें दृढबंधन उत्पन्न करणें शक्य आहे. हें बंधन अगदींच नवीन अस्तित्वांत आणावयाचें आहे असें नाहीं. त्याचा थोडासा परिणाम हल्लींच्या स्थितींतही दृष्टोत्पत्तीस येतो. थोडासा दयेचा अंकुर ज्यांच्या हृदयांत असतो त्या लोकांना आपल्या घरांत राहणाऱ्या चाकरमाणसांची त्यांच्या आजारीपणांत काळजी घेणें हें कर्तव्य वाटतें. नेहमीं घरांत

राहणारीं नसून कामधंद्याच्या निमित्तानें ज्यांचा वारंवार संबंध येतो अशा चाकरमाणसांना सुद्धां पुष्कळ लोकांकडून मदत होते. बारीकसारीक जिन्नस दारोदार नेऊन विकणारे लोक, हमाल, न्हावी, धोबी वगैरे मनुष्यांना अडचणीच्या प्रसंगीं, त्यांजकडून काम करून घेणाऱ्या लोकांपासून बराच उपयोग होतो. सध्यां ही स्थिति अनियमितपणें कांहीं लोकांत मात्र आढळून येते ती सार्वत्रिक करण्याविषयीं यत्न करणें हेंच आतां कर्तव्य आहे. जितकाजितका हा प्रकार वृद्धिंगत होत जाईल तितकींतितकीं गरीबांना मदत करण्याचीं कृत्रिमसाधनें कमी केलीं पाहिजेत. ज्या दयेच्या कळवळ्यानें अनाथास मदत करण्याचीं कृत्रिम साधनें अस्तित्वांत आलीं व तीं अजून चालली आहेत त्याच कळवळ्याच्या साह्यानें हीं स्वाभाविक साधनेंही पूर्णतेस येऊं शकतील; आणि कराच्या रूपानें व वर्गण्यांच्या रूपानें प्रत्येक मनुष्याकडून जाणारा पैसा जर त्याच्याच जवळ राहिला तर त्याला आपलीं वर सांगितलेलीं कर्तव्यें चांगल्या रीतीनें बजावितां येतील. कदाचित् ह्या कामांकडे हल्लीं जितका एकंदर पैसा खर्च होतो तितका पुढें होणार नाहीं, तरी जरूरीचे मानानें योग्य तितका होईल.

पूर्वींच्या पारतंत्र्याच्या स्थितींतून हल्लींच्या स्वातंत्र्याच्या स्थितीचें उत्क्रमण होत असतां मध्यंतरींच्या संक्रमणावस्थेंत वरच्या वर्गांतील व खालच्या वर्गांतील लोकांचा जो निकटसंबंध नाहींसा झाला आहे त्याचें पुनरुज्जीवन करणें व परोपकाराला त्याचें स्वाभाविक स्वरूप देऊन उपकर्ता आणि उपकृत ह्यांचा प्रत्यक्षसंबंध आणणें ह्या गोष्टींशिवाय व्यक्तिकृत परोपकारापासून आणखी एक इष्टकार्य होईल. उपकार करणाऱ्या मनुष्यांना ज्यांवर उपकार करावयाचा त्यांची पूर्ण माहिती असल्यामुळें कोणत्या प्रकारच्या मदतीची किती अवश्यकता आहे हें बरोबर समजेल आणि त्यांच्या योग्यतेप्रमाणें तितकी पूर्ण किंवा अंशतः मदत करितां येईल. ज्या वेळीं ही जबाबदारी अप्रत्यक्षरीतीनें सरकारी अधिकाऱ्यांवर किंवा परोपकारी मंडळ्यांनीं नेमिलेल्या कामगारांवर न पडतां प्रत्यक्ष ज्याची त्यावरच पडेल त्या वेळीं प्रत्येक मनुष्याजवळ अशा कामाकडे लावण्याला बेताचाच पैसा असल्यामुळें पूर्ण चौकशीनें योग्य ठिकाणींच त्याचा व्यय करावा अशी त्याला इच्छा होईल व ज्यांवर उपकार करावयाचा त्यांवर त्याची देखरेख राहील. अशा रीतीनें योग्य मनुष्यांची निवड होऊन त्यांना मदत मिळत जाईल व अयोग्य मनुष्यांना मिळणारी मदत बरीच कमी होईल.

गरीबांची विपत्ति दूर करण्यासाठीं योजिलेल्या उपायांमुळें—मग ते उपाय कोणत्याही प्रकारचे असोत—जे वाईट परिणाम होतात त्यांचा आतां विचार केला पाहिजे. श्रम केल्यावांचून मनुष्यास जें सुख प्राप्त होतें त्यानें त्याच्या अंगीं थोडीबहुत तरी शिथिलता येते. योग्य मनुष्यांना वारंवार फुकट मदत केली तर त्यांच्याही अंगची योग्यता कमी होईल. मग ज्यांच्या अंगीं मूळचीच योग्यता कमी असेल त्यांना मदत केल्यानें ती आणखी कमी होईल ह्याबद्दल संशय नको. हा परिणाम उपकृतांवर नेहमीं होत असतो व त्यांची संतति त्यांजपेक्षांही कमी योग्यतेची निपजून समाजावर आणखी बोजा मात्र बसतो. तेव्हां संतत्युत्पादनाला मदत होणार नाहीं अशा रीतीनें मूर्ख व नीच लोकांस पैशाची मदत कशी करितां येईल ह्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

मूर्ख व नीच लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व प्रत्येक पिढीचे लोक आपल्या अविचाराच्या परोपकारानें ह्या वर्गाच्या लोकांत आणखी भर टाकितात व पुढील पिढीच्या पाठीशीं अधिकाधिक त्रास लावून ठेवितात. हा प्रकार लक्षांत आणून ह्या लोकांची संख्या कमी कशी करितां येईल हा विचार केला पाहिजे. ज्या अविचाराच्या परोपकारामुळें ह्या वर्गाच्या लोकांत भर पडते तो एकदम नाहींसा होणें अशक्य आहे. सध्यां एवढेंच पहावयाचें कीं चक्रवाढव्याजानें होणारी ही वाढ कांहीं अंशांनीं तरी कमी व्हावी. अशा धोरणानें परोपकाराला नवीन वळण देतांना पुढील गोष्ट नेहमीं लक्षांत बाळगिली पाहिजे. अधिक योग्यतेच्या मनुष्यांवर वाईट परिणाम होतील अशा रीतीनें कमी योग्यतेच्या मनुष्यांना मदत होऊं नये. निदान कमी योग्यतेच्या मनुष्यांवर उपकार करितांना त्यापासून अधिक योग्यतेच्या मनुष्यांवर होणारे वाईट परिणाम जितके कमी होतील तितके करण्याविषयीं यत्न केला पाहिजे.

सध्यांच्या स्थितींत ह्या दिशेनें फारसें कांहीं होण्यासारखें नाहीं. कायद्याच्या जुलमी व्यवस्थेनें व खासगी मंडळ्यांच्या आपखुषीच्या प्रयत्नांनीं मूर्ख व नीच लोकांना मदत मिळून त्यांची संख्या अतिशयच वाढली आहे व सृष्टिक्रमानें होणाऱ्या तिच्या वाढीला प्रतिबंध करणें बहुतेक अशक्यच आहे. ह्या साधनांच्या अभावीं ज्यांचें अस्तित्व अशक्य झालें असतें असे लोक जेमतेम कसेतरी जीव धरून राहतात व आपल्या संततीचा बोजा समाजावर पाडितात. ज्यांना निर्वाहापुरतें काम करवत नाहीं त्यांना मदत करणाऱ्या नव्यानव्या संस्था अस्तित्वांत येत आहेत व ह्या प्रश्नाचें स्वरूप अधिकाधिक

बिकट करीत आहेत. अदूरदर्शीपणाचे व निष्काळजीपणाचे दुष्परिणाम दूर करण्यासाठीं जो जो नवीन प्रयत्न होतो तो तो अदूरदर्शी व निष्काळजी मनुष्यांची संख्या वाढविण्यास कारण होतो. सरकारांतून, परोपकारी मंडळ्यांकडून, किंवा खासगीरीतीनें मदत करावयाची झाली तरी, ज्यांस मदत करावयाची तीं मनुष्यें आपल्या संततीनें भिकाऱ्यांच्या वर्गांत भर घालणार नाहींत अशी व्यवस्था करणें कठिण आहे.

अधिक योग्यतेच्या प्राण्यांनीं म्हणजे ज्यांच्या अंगीं आपला चरितार्थ चालविण्याचें सामर्थ्य असेल त्यांनीं जगावें, व कमी योग्यतेच्या प्राण्यांनीं म्हणजे ज्यांच्या अंगीं आपला चरितार्थ चालविण्याचें सामर्थ्य नसेल त्यांनीं मरावें, हा मनुष्येतरप्राणिसृष्टींत कडकपणें अंमलांत येणारा नियम जर मनुष्यजातींतसुद्धां तितक्याच कडकपणानें अमलांत आला, तर ज्या लोकांविषयीं आपणास मोठा प्रश्न पडला आहे ते थोड्याच काळांत मृत्युपंथास जातील. परंतु ह्या तत्त्वाच्या भयंकरस्वरूपाचा प्रभाव आमचे हल्लींचे विचार डोक्यांत असतांना आमच्यानें पाहवणार नाहीं. ह्या तत्त्वाचा कडकपणा थोडासा कमी करून कमी योग्यतेच्या मनुष्यांस जगण्यापुरती मदत दिली तरी म्हणण्यासारखा वाईट परिणाम होणार नाहीं; परंतु ह्या मनुष्यांनीं पाठीमागें संतति ठेवतां कामा नये. अनाथ लोकांपासून, त्यांच्या शोचनीय स्थितीचा अनुभव घेण्याला व समाजावर ओझें घालण्याला, आणखी प्रजा उत्पन्न होणार नाहीं अशी खात्री असेल तर पुढील लाभासाठीं त्यांची विपत्ति दूर करण्यापुरता परोपकार करण्यास हरकत नाहीं. परंतु ही खात्री कशी व्हावी? सरकारच्या कायद्यानें किंवा आपसांत ठराव करून दुबेल, रोगी, आंधळे, पांगळे आणि मूर्ख अशा लोकांना मदत करणें झाल्यास ते अविवाहित असतील तरच करावी असा नियम केला तर त्याचा परिणाम एवढाच होईल कीं, हल्लीं ज्या ठिकाणीं औरस संतति दिसून येते त्या ठिकाणीं पुढें अनौरस संतति दिसून येईल व त्यामुळें पूर्वींच्या स्थितीहूनही वाईट स्थिति प्राप्त होईल. कारण त्या अनौरस संततीचें संगोपन औरस संततीपेक्षां साहजिकच अधिक हयगयीनें होईल आणि तीं पूर्वींपेक्षां सर्व प्रकारांनीं कमी योग्यतेचीं माणसें निपजतील. असें होण्याचा संभव नसता तर हल्लीं जो पैसा ह्या लोकांसाठीं खर्च होत आहे त्यापेक्षां कमी पैशांत, त्यांच्याकडून होण्यासारखें असेल तें काम करून घेण्याच्या संस्था स्थापून, त्यांना मदत करण्याची व्यवस्था करितां आली

असती; परंतु मनुष्यसमाज इतका विस्तीर्ण आहे व त्याचे विचार इतके दुर्बल आहेत कीं, त्याला अशा प्रकारचे वळण लावण्याचें काम करूं इच्छिणाराची निराशा झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्या अडचणींतून बाहेर पडण्याला मार्गच नाहीं असें दिसतें.

जर कदाचित् एकादा मार्ग असला तर त्याचा उपयोग मनुष्यजातीनें पुष्कळ विपत्ति सोसण्याला व डोळ्यांनीं पाहण्याला तयार झाल्याशिवाय खचित होणार नाहीं. अविचारामुळें उत्पन्न झालेल्या संस्थांनीं, दुर्बल व प्रस्तुतच्या सामाजिक स्थितींत ज्यांचा निभाव लागणार नाहीं अशीं लक्षावधि मनुष्यें आस्तित्वांत आणिलीं आहेत. व ती स्वतःविपत्ति भोगीत असून इतरांच्याही विपत्तीला कारण होत आहेत. हा दुर्बल मनुष्यांचा प्रचंडसमुदाय दिवसेंदिवस कमी व्हावा ह्यासाठीं यत्न करणें असेल तर, त्या मनुष्यांना बरेंच दुःख दिल्यावांचून व तें पाहण्याला तयार झाल्यावांचून गत्यंतर नाहीं. जो अपराध झाला आहे त्याबद्दल शिक्षा भोगिली पाहिजे. दुर्बल मनुष्यांनीं विपत्ति भोगणें हाच-दुर्बलता नाहींशी करून टाकण्याला उपाय आहे. सरकारा किंवा खासगी मंडळ्यांनीं कृत्रिम उपायांनीं ही विपत्ति नाहींशी करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आपलें दुःख विसरण्यासाठीं मनुष्यानें अफू खाण्यासारखें आहे. अफूचा अंमल असेल तेथपर्यंत जरी क्षणभर दुःखाचा विसर पडला तरी तें अंमल सरल्याबरोबर पुन्हां जसें द्विगुणित होऊन येतें, त्याचप्रमाणें ही विपत्ति कमी झाली असा कांहींवेळ भास झाला तरी तिचें स्वरूप अधिकाधिकच उग्र होत जातें. ह्यासाठीं कृत्रिम उपायांनीं हल्लीं असलेली विपत्ति न वाढवितां तिचे स्वाभाविक परिणाम होऊं देणें व ते कठोरमनानें पाहणें हाच विचाराचा व सरळ मार्ग दिसतो. अफूचें व्यसन लागलेल्या मनुष्याला तें सोडून पुन्हां पूर्वस्थितीवर येणें जितकें कठिण पडतें तितकेंच अविचाराच्या परोपकाराचें व्यसन लागलेल्या समाजाला त्यांतून बाहेर पडणें कठिण जाईल. सरकारच्या किंवा खासगी मंडळ्यांच्या अप्रत्यक्ष परोपकाराच्या व स्वावलंबनाच्या स्थितीकडे येण्याचा मार्ग दुःखद आहे खरा, तथापि व्यसनाच्या स्थितींतून स्वाभाविक स्थितीकडे जाण्याचा तोच मार्ग आहे.

# प्रकरण १४

## सामाजिक परोपकार

प्रत्येक मनुष्यानें इतर मनुष्यांशीं दळणवळण ठेविलेंच पाहिजे असा त्याच्यावर इतरांचा कांहीं हक्क आहे काय? कोणाच्या हक्कांच्या आड न येतां त्याला अगदीं एकांतवासांत किंवा फक्त कुटुंबांतील मनुष्यांच्या मात्र सहवासांत राहतां येईल काय? किंवा इतर मनुष्यांमध्यें स्नेहाचे आणि ओळखीदेखीचे संबंध वाढवून परस्परांमध्यें आदरातिथ्य व पाहुणचार चालू ठेवण्याची जबाबदारी त्याजवर आहे? प्रवृत्त्यात्मक परोपकाराच्या दृष्टीनें ह्या संबंधाचीं कांहीं ठराविक कर्तव्यें आहेत काय? व असल्यास तीं योग्य रीतीनें बजाविण्याचा मार्ग कोणता?

ह्या प्रश्नांचीं निश्चयात्मक उत्तरें देतां येणें शक्य नाहीं. एवढें मात्र म्हणतां येईल कीं, प्रत्येक मनुष्यानें थोडेंबहुत तरी सामाजिक दळणवळण ठेवणें अवश्य आहे; कारण, त्याच्या अभावीं एकंदर समाजाच्या सुखांत कमतरता होईल. एकांतवासांत राहणाऱ्या किंवा कुटुंबांतील मनुष्यांशिवाय इतरांविषयीं अगदीं उदासीन असणाऱ्या लोकांचा जर एक समाज असेल तर त्या समाजाचें आणि त्यांतील व्यक्तीचें जीवित, हल्लींच्या विशेष सामाजिक दळणवळण ठेवणाऱ्या लोकांस तरी, अगदीं नीरस वाटेल. अनेक मनुष्यांचें परस्परांशीं संघट्टन झाल्यानें एकमेकांचे विचार कळण्यास साधन होतें व नानाप्रकारच्या मनोवृत्तींना अवकाश सांपडतो आणि त्यामुळें सर्वांच्या सुखांत भर पडते. अशा प्रकारचें संघट्टन होण्याला अनेक मनुष्यांनीं एकत्र जमण्याचे योग वारंवार येणें अवश्य असतें. ह्याकरितां मनुष्याच्या सुखाची वृद्धि करणारे मनुष्यांचे मेळे जमविण्याला उत्तेजन देणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे.

दुसऱ्या अनेक कर्तव्यांहून हें कर्तव्य कमी महत्त्वाचें आहे हें उघड आहे. आणि म्हणून, हें कर्तव्य बजाविल्यामुळें दुसऱ्या कर्तव्यांत जर विघ्न येण्याचा संभव नसेल तरच ह्या कर्तव्याकडे लक्ष द्यावें. ज्या मनुष्याजवळ कुटुंबांतील मनुष्यांच्या संरक्षणासाठीं, न्यायाचीं कर्तव्यें करण्यासाठीं व संकटांत पडलेल्या योग्य मनुष्यांना मदत करण्याचीं परोपकाराचीं कर्तव्यें करण्यासाठीं पुरेसा पैसा नसेल, त्यानें मंडळीच्या आदरातिथ्यांत व पाहुणचारांत

पुष्कळ पैसा खर्चिणें हें नीतीच्या दृष्टीनें योग्य होणार नाहीं. अशा मनुष्यांनीं पैसा खर्चिल्यावांचून ज्या प्रकारचें दळणवळण ठेवतां येईल त्या प्रकारचेंच ठेवावें असा निवृत्त्यात्मक परोपकाराच्या तत्त्वांचा उद्देश आहे. पुष्कळ वेळां अशा सामाजिक संबंधापासूनच विशेष उपयोग होतो.

परोपकाराच्या दृष्टीनें मनुष्यांना एकमेकांमध्यें सामाजिक दळणवळण ठेविण्याची जी अवश्यकता उत्पन्न होते, ती तशा संबंधापासून दुःखापेक्षां सुखच अधिक उत्पन्न होत असेल तर होते. कळसूत्रीबाहुल्याप्रमाणें मनुष्यांनीं एकत्र जमावें व परस्परांच्या तोंडाकडे टकमक पाहत राहून संभाषणादि सुखोत्पादक व्यवहार केल्याशिवाय परत जावें, अशा प्रकारचे संबंध घडवून आणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. गिरण्यांतील यंत्रांप्रमाणें मनुष्यांनीं फिरत रहावें असा परोपकाराच्या तत्त्वांचा उद्देश नाहीं. मनुष्यें एकत्र जमविणें हें ब-याच खर्चाचें व त्रासाचें काम असतें. ह्या खर्चाच्या आणि त्रासाच्या मानानें एकत्र जमणाऱ्या मनुष्यांच्या सहवासापासून परस्परांना सुख झालें पाहिजे.

ह्या ठिकाणीं असेंही सांगितलें पाहिजे कीं, ज्या प्रकारच्या सहवासापासून चित्तवृत्ति आनंदित होत नाहींत त्या प्रकारचा सहवास घडवून आणणारे लोकांत जे अनेक प्रकार चालू असतात ते बंद करण्याकरितां प्रत्येक मनुष्यानें झटणें हें परोपकाराच्या दृष्टीनें त्याचें कर्तव्य आहे. हल्लीं मेजवान्या देण्याघेण्याचे अनेक प्रकार निरनिराळ्या लोकांत आढळून येतात, त्यांपासून व्हावी तितकी सुखोत्पत्ति न होतां यजमानास विनाकारण खर्च व त्रास सोसावा लागतो आणि मेजवान्यांस येणाऱ्या त्याच्या मित्रांची व ओळखीच्या मनुष्यांची निराशा होते. असें होण्याचीं कारणें आपलें वैभव लोकांना दाखविण्याची हौस व समाजांतील रूढ प्रचारांच्या धोरणानें वागण्याची इच्छा हीं होत. ह्या मेजवान्या देण्याची जेव्हां मनुष्यास बुद्धि होते तेव्हां मित्रमंडळीच्या सहवासानें आपणास व इतरांस सुख व्हावें हा त्याचा उद्देश नसून आपणावरचें एकदां ओझें उतरून टाकावें असा उद्देश असतो. वारंवार मेजवान्या देणें हें खर्चाचें काम असल्यामुळें, व कांहीं विशेष थाटमाट केल्याशिवाय मित्रांना बोलाविणें आपल्या योग्यतेला कमीपणा आणणारें वाटल्यामुळें, एकदांच ओळखीच्या सर्व लोकांस बोलावून मनुष्य त्यांची समजूत करितो. थोडी आणि परिचित मंडळी जर एकत्र जमलेली असली तर त्या सर्वांना आपापले विचार मोकळ्या मनानें प्रदर्शित करण्यास कांहीं संकोच वाटत

नाहीं, व घरच्याप्रमाणें तेथें ज्याला त्याला आपल्या आवडीप्रमाणें वागतां येतें. असल्या लहानलहान मेळ्यांपासून जी सुखोत्पत्ति व ज्ञानप्राप्ति होईल ती मोठमोठे समाज जमविल्यानें होणार नाहीं. पुष्कळ मनुष्यें एकत्र जमलीं म्हणजे सर्वांनीं एकमेकांना त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणें मान द्यावा, व एकाद्या दरबाराच्या किंवा समारंभाच्या प्रसंगाप्रमाणें थोड्याच मनुष्यांनीं नाटकीथाटाचीं नियमित भाषणें करून, जेवणाखाणाची किंवा फराळाची जी व्यवस्था असेल ती निमूटपणें उरकून आपापल्या घरीं जावें, अशीच बहुतेक स्थिति होते. अशा मेळ्यांपासून इष्टहेतु तडीस जात नाहींत म्हणून बरेच वर्षांपूर्वी इंग्लंडांत कित्येक लोकांनीं लहान मेळ्यांची सुरुवात केली. अशा मेळ्यांचे वेळीं कांहीं थाटमाट न होतां घरची नेहमींची जी व्यवस्था असते तीच रहावी, व निवडक मित्रमंडळीस आपण आपल्या घरींच आहों असें वाटून संभाषणादिकांचा लाभ परस्परांस मिळावा असा मूळचा उद्देश होता. परंतु कोणताही नवीन प्रकार सुरू झाला म्हणजे तो रूढियंत्राच्या सपाट्यांत सांपडतो व मूळचा उद्देश एका बाजूस राहून त्याला भलतेंच काहीं तरी स्वरूप येतें. इंग्लंडांतील वरील प्रकाराची पुढें तीच स्थिति झाली आणि दोनतीन मित्रांच्या ऐवजीं एका खोलींत मावतील इतके लोक जमूं लागले व वेळाचा आणि पैशाचा फुकट व्यय होऊं लागला.

सारांश, फारसा खटाटोप न करितां व दिखाऊपणाकडे लक्ष न देतां मूळहेतूवर पूर्ण लक्ष देऊन ज्या प्रकारचे मेळे, समाज व मंडळ्या चालविणें शक्य असेल त्यांना मदत देऊन, सुखोत्पादनासाठीं यत्न करीत असतां ज्यांपासून सुखापेक्षां दुःखाचीच प्राप्ति अधिक होते त्या प्रचारांना नेहमीं अडथळा करणें, हें परोपकाराच्या दृष्टीनें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

वर ज्या गोष्टींचा विचार केला आहे त्यांचा परोपकारांत अंतर्भाव करावा कीं नाहीं ह्याबद्दल पुष्कळांस संशय वाटेल, परंतु त्यांसारख्याच दुसऱ्या कांहीं गोष्टी आहेत त्यांबद्दल तसा संशय येणार नाहीं. एवढा वेळपर्यंत ज्या संबंधाचा विचार केला तो बहुतकरून बरोबरीच्या मनुष्यांमध्यें घडून येतो व एकमेकांच्या उपकारांची फेड त्यांजकडून होत असल्यामुळें कोणी कोणाचा ऋणी असत नाहीं; परंतु आतां ज्या संबंधाचा विचार करावयाचा आहे तो वरच्या प्रतीच्या व खालच्या प्रतीच्या लोकांमध्यें होत असतो व

त्यांत एका बाजूला दया व दुसऱ्या बाजूला कृतज्ञता असे मनोधर्म उत्पन्न होत असतात.

जमीनदारांनीं आपल्या कुळांना कधींकधीं मेजवान्या देण्याचा प्रघात फार प्राचीन काळापासून सर्व ठिकाणीं आहे. पुष्कळ श्रीमंत लोकही गरीबांना कधींकधीं मिष्टान्नभोजनें घालीत असतात. इंग्लंडांतील पुष्कळ बडे लोक आपापल्या खेड्यांतील सर्व गरीब लोकांस अशीं जेवणें घालितात. ह्या प्रकारच्या परोपकाराला अलीकडे पुष्कळ ठिकाणीं नवीन स्वरूप आलें आहे. जवळपासच्या गरीब लोकांना कधींकधीं एकाद्या रमणीय स्थळीं घेऊन जावें व तेथें त्यांस भोजन, फराळ वगैरे घालून सर्वांनीं कांहीं काळ आनंदांत घालविल्यावर त्यांस परत आपापल्या ठिकाणीं पोंचवावें, असा क्रम कित्येक ठिकाणच्या परोपकारी गृहस्थांनीं सुरू केला आहे. त्याचप्रमाणें नेहमीं शहरांत राहून कंटाळलेल्या मजुरांना सुटीच्या दिवशीं वनभोजनें घालणें, गरिबांच्या मुलांना मेजवान्या देणें, शाळेंतील मुलांच्या करमणुकीसाठीं कांहीं खेळ करविणें किंवा त्यांस मेवामिठाई वांटणें, इत्यादि प्रकारही अलीकडल्या काळांत सुरू झाले आहेत. गरीबांना अतिशय थोड्या किंमतीस पुस्तकें विकणें, वाचनालयांतून गरीबांची फुकट वाचण्याची सोय करणें, त्यांच्या करमणुकीकरितां हौसेनें गाणाऱ्या लोकांकडून कधींकधीं जलशे करविणें इत्यादि परोपकाराचे प्रकारही नवीनच आहेत. एकंदरींत हे सर्व प्रकार प्रशंसनीय आहेत. त्यांपासून तात्कालिक सुख तर होतेंच, परंतु विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा फायदा म्हटला म्हणजे श्रीमंत आणि गरीब ह्या दोन वर्गांतील लोकांमध्यें जो प्रेमभाव उत्पन्न होतो तो होय. घनपदार्थांच्या अस्तित्वाला ज्याप्रमाणें त्यांच्या घटकावयवांचें ( परमाणूंचें ) परस्परांवर आकर्षण असावें लागतें व तें नसलें तर परमाणु विस्कलित होऊन पडतात, त्याचप्रमाणें समाजाच्या अस्तित्वाला त्यांतील मनुष्यांचें परस्परांवर आकर्षण असलें पाहिजे. हें आकर्षण उत्पन्न होण्याला आतां सांगितलेल्या परोपकाराच्या कृत्यांनीं फार मदत होते. उपकार करणाऱ्यांच्या मनांतील दया व ज्यांच्यावर उपकार केले जातात त्यांच्या मनांतील कृतज्ञता हे दोन्ही मनोधर्म उभयवर्गांतील लोकांमध्यें जें बंधन उत्पन्न करितात त्याचा परिणाम फार चांगला होतो. मागील प्रकरणांत सांगितलेले परोपकाराचे वाईट परिणाम ह्या परोपकारांनीं होत नहींत. कारण, ह्यांचा उद्देश ज्या मनुष्यांचें अस्तित्व शक्य नाहीं त्यांचें अस्तित्व शक्य कर-

घ्यावा नसून ज्यांचें अस्तित्व शक्य आहे त्यांच्या सुखांत कधींकधीं थोडी भर घालावी एवढाच आहे. हे परोपकाराचे प्रकार देखील रूढ होऊं देणें चांगलें नाहीं. कारण, एका वर्गांतील लोकांना तो आपणावर बोजा आहे असें वाटूं लागेल व दुसऱ्या वर्गांतील लोकांना तो आपला हक्क आहे असें वाटूं लागेल; आणि त्यामुळें दया व कृतज्ञता ह्यांच्या योगानें उत्पन्न होणारें बंधन शिथिल होईल. ह्यासंबंधानें आणखी एक गोष्ट होणें इष्ट नाहीं. कांहीं धर्मांच्या निरनिराळ्या पंथांचे लोक आपल्या धर्ममताच्या प्रसारासाठीं गरीबांवर अशा प्रकारचे उपकार करण्याला प्रवृत्त होत असतात. ह्यासंबंधानें मागील प्रकरणांत बराच विस्तार केला आहे तेव्हां येथें आणखी करण्याचें कारण नाहीं. एकदोन गोष्टींच्या संबंधानें जरी सावधगिरी राखणें जरूर आहे, तरी बरोबरीच्या लोकांमध्यें दळणवळण घडवून आणण्याच्या प्रसंगांविषयीं जितकें जपणें अवश्य आहे तितकें येथें जपण्याचें कारण नाहीं. वरील विवेचनावरून इतकें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, श्रीमंत आणि गरीब ह्या दोन वर्गांतील लोकांमध्यें संघट्टन होण्याचे जितके प्रसंग येतील तितके आणण्याला उत्तेजन देणें हें प्रवृत्त्यात्मक परोपकाराच्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे.

गरिबांना विद्यादान करून त्याच्या द्वारें नवीन करमणुकीचे मार्ग त्यांना मोकळे करून देण्याचे प्रयत्न वरील प्रयत्नांइतकेच किंवा त्यांहूनही प्रशंसनीय आहेत. आपल्या देशांत प्राचीनकालीं शिक्षण आणि अध्यापन ह्यांतच जन्म घालविणारे अनेक लोक होऊन गेले, व ते केवळ परोपकारबुद्धीनें एका विशेष वर्गांतील विद्यार्थ्यांस शिकवून पूर्वींची विद्या कायम राखून तिचा विस्तार होण्याला मदत करीत असत. त्या वेळच्या यत्नांचा विशेष रोख निरनिराळ्या विषयांत पारंगत असे पंडित तयार करण्याकडे असे, परंतु सर्वप्रकारच्या लोकांत विद्येचा प्रसार करावा ह्यासाठीं आपल्या देशांत कधीं यत्न झाले असावे असें वाटत नाहीं. गेल्या तीनचारशें वर्षांत इकडे जी संतमंडळी उत्पन्न झाली तिचे प्रयत्न सर्व प्रकारच्या लोकांत ज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं झाले. परंतु त्या मंडळीचें सर्व लक्ष पारमार्थिकज्ञान व भक्ति ह्यांजकडे असल्यामुळें गरिबांना व्यावहारिकज्ञानाचा फायदा झाला नाहीं. युरोपांत ह्यासंबंधानें पुष्कळ यत्न झाले व त्यांना यशही चांगलें आलें. युरोपियन लोकांत लिहितां वाचतां न येणाऱ्या लोकांची संख्या जी अगदीं

थोडी आढळून येते तिचें एक कारण ख्रिस्ती मिशनरी लोकांचा विद्याप्रसारार्थ प्रयत्न होय. इंग्लंडांत पुष्कळ वर्षांपूर्वीं नेहमींच्या उद्योगामुळें ज्यांना शिकण्यास सवड मिळत नसे त्या लोकांत ज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं, रविवारच्या सुटीच्या दिवशीं मात्र शिकविण्याच्या शाळा सुरू करण्याचा प्रयत्न झाला. पुष्कळ मजूर व कारागीर लोक ह्या शाळांचा उपयोग करून लिहावयास व वाचावयास शिकले. पूर्वींच्या इतिहासांतील स्मरणीय मानिलेल्या अनेक नांवांपेक्षां अशा प्रकारचे यत्न करणाऱ्या अनेक लोकांचीं नांवें अधिक स्मरणीय समजलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें मिशनरी लोकांहून निराळ्या ज्या शेंकडो लोकांनीं गरीबांना विद्या देण्याचे कामीं आपलीं आयुष्यें खर्चिलीं आहेत, त्यांचे प्रयत्नही कृतज्ञतेनें स्मरण्यासारखे आहेत. आपल्या देशांत ज्याप्रमाणें एका वर्गांतील लोकांत मात्र ज्ञानाचा प्रसार करण्याची चाल होती त्याचप्रमाणें युरोपांतही होती. खालच्या वर्गांतील लोकांत ज्ञानाचा प्रसार करणें हें तिरस्करणीय काम समजलें जात असे व तें करणाराची निंदा होत असे. गरीब लोकांत विद्येचा प्रसार करण्याचे ज्यांनीं प्रथम यत्न केले त्यांचा जुन्या मताच्या लोकांकडून फार छळ होत असे. हा छळ सोसून ज्यांनीं परोपकारासाठीं आत्मयज्ञ केला त्यांचे नीतिविचार अनुकरणीय होत. ह्या लोकांपैकीं कित्येकांचे मनांत धर्मप्रसाराची इच्छा होती हें खरें, तथापि त्या इच्छेमुळें खालच्या वर्गांतील लोकांत व्यावहारिक ज्ञानाचा प्रसार झाला हेंही खोटें नाहीं. एकंदरींत विद्याप्रसाराचे कामीं युरोपांत झालेला यत्न अभिनंदनीय आहे.

व्यावहारिक ज्ञानाचे द्वारें धर्मप्रसार करण्यासाठीं इंग्लंडांत जे प्रयत्न झाले त्यांचा फायदा आपल्या देशांतील लोकांसही मिळाला आहे. धर्माच्या प्रसारासाठीं जे पाद्री लोक इकडे आले त्यांनीं तिकडील लोकांच्या पैशाच्या मदतीनें येथें विद्याप्रसाराचें काम सुरू केलें. ह्या विद्याप्रसाराबरोबरच धर्मप्रसाराचेंही थोडेंसें काम त्या लोकांनीं केलें व त्या दृष्टीनें आपल्या लोकांचें नुकसानच झालें; तथापि विद्याप्रसारामुळें आजपर्यंत झालेला व पुढें होणारा फायदा नुकसानाच्या शेंकडोपटीनें आहे व ह्यासाठीं त्या लोकांचे आभार मानिले पाहिजेत.

आणखी एका रीतीनें लोकांत ज्ञानाचा प्रसार करण्याचें काम अलीकडे होऊं लागलें आहे. शहरांतून व खेड्यापाड्यांतून देखील अशिक्षित लोकां-

ना अनेक विषयांची थोडीबहुत तरी माहिती व्हावी ह्यासाठीं त्यांना व्याख्यानें देण्याचा उद्योग पुष्कळ परोपकारी गृहस्थ करितात. कधींकधीं कारखानदार लोक आपल्या मजुरांना कराराप्रमाणें मजुरी वगैरे देऊन शिवाय त्यांना अशा प्रकारच्या व्याख्यानांचा फायदा देतात. एक कारखानदार स्पेन्सर साहेबांचा मित्र होता त्याचे कारखान्यांत हजाराहून अधिक लोक काम करीत असत. तो कारखानदार ह्या मजूर लोकांस करमणुकीसाठीं अनेक ठिकाणीं घेऊन जाई, केव्हां केव्हां चहासाठीं किंवा फराळासाठीं बोलावी, व कधीं कधीं पदार्थविज्ञानशास्त्रांतील कांहीं सोप्या गोष्टी मनोरंजक प्रयोगांच्या साह्यानें त्यांच्या मनावर ठसाव्या ह्यासाठीं त्यांस सुबोध व्याख्यानें देवविण्याची व्यवस्था करी. एकाद्या कारखानदाराकडून त्याच्या स्वतःच्या कारखान्यांतील मजुरांस अशाप्रकारें ज्ञानप्राप्ति करून देण्यासाठीं प्रयत्न होवो, किंवा दुसऱ्या एकाद्या मनुष्याकडून जे लोक ऐकावयास जमतील त्या लोकांस फायदा करून देण्यासाठीं होवो, असला प्रयत्न परोपकाराच्या दृष्टीनें फारच स्तुत्य आहे. ज्या मनुष्यास जो विषय चांगला अवगत असेल त्या विषयाची लोकांस थोडक्यांत माहिती देण्याचे प्रयत्न त्या मनुष्याचे हातून झाल्यास, लोकशिक्षणाचे कामास फार मदत होईल. प्रत्येक विषय वाचून त्याबद्दल प्रत्यक्ष माहिती मिळविण्याला बरेच प्रयास पडतात व तितके करण्यास पुष्कळांना सवड नसते. अशा लोकांना माहितगार लोकांचे तोंडून जर अनेक विषयांची थोडक्यांत माहिती मिळेल, तर त्यांचे विचार प्रगल्भ होतील व लोकांत ज्ञानवृद्धि होऊन मनुष्यजातीचें पाऊल पुढें पडेल. व्यवहारांतील गोष्टींच्या संबंधानें शास्त्रीय ज्ञानाचा लोकांत प्रसार होणें फारच अगत्याचें आहे. मनुष्याच्या नेहमींच्या वर्तनाचा ज्या विषयांशीं संबंध असतो त्या विषयांचा सामान्य लोकांमध्यें ऊहापोह होण्याला साधनें नसतात. हें परोपकाराचें काम करणाऱ्या लोकांची जिकडे तिकडे फार उणीव आहे. कोणत्याही समाजांतील सुशिक्षित व समजूतदार लोक आपले राजकीय, सामाजिक व नैतिक विचार अशिक्षित लोकांना समजून देण्याविषयीं यत्न करितील तर त्या समाजाची स्थिति फार लवकर सुधारेल व आजपर्यंत असे यत्न झाले असते तर आज पुष्कळ समाजांची स्थिति हल्लींच्या स्थितीपेक्षां फार चांगली असती.

कोणतेही नवीन प्रचार सुरू झाले म्हणजे कांहीं काळानें त्यांना रूढीचें स्वरूप येतें व सवलतींना हक्कांचें स्वरूप येतें. ह्या सामान्य नियमाप्रमाणें

लोकांत सुखाची व ज्ञानाची वृद्धि करण्यासाठीं काढिलेल्या परोपकाराच्या तऱ्हांचीही तीच स्थिति होण्याचा संभव आहे. त्या स्थितींत उभयतांचे मनावर संस्कार करण्याचा जो परोपकाराचा नेहमींचा परिणाम तो होत नाहीं. तशी स्थिति न होण्याकरितां काय करावें हें सांगणें कठिण आहे.

एवढावेळपर्यंत सामाजिक परोपकारांत ज्या गोष्टींचा समावेश केला त्याबद्दल कोणी हरकत घेत नाहीं, व त्यांच्या संबंधानें जीं कर्तव्यें सांगितलीं तीं प्रत्यक्ष हातून घडलीं नाहींत तरी त्यांची तात्त्विकदृष्ट्या अवश्यकता बहुतेक लोक कबूल करितील. परंतु आतां सामाजिक परोपकाराच्या ज्या भागाचा विचार करावयाचा आहे त्याचा ह्या ठिकाणीं उल्लेख करणें योग्य नाहीं असें पुष्कळांस वाटेल, व त्यासंबंधानें जीं कर्तव्यें सांगावयाचीं आहेत तीं वास्तविक कर्तव्यें नव्हत किंवा तीं वास्तविक कर्तव्यांच्या अगदीं उलट आहेत असाही पुष्कळांचा समज असण्याचा संभव आहे. समाजाला अपायकारक असे जे सामाजिक आचारविचार लोकांत रूढ असतील ते बदलण्यासाठीं प्रयत्न करणें हा सामाजिक परोपकाराचा प्रकार अशा तऱ्हेचा आहे.

समाजांतील रूढ आचारांना अनुलक्षून वागण्याची अवश्यकता नीतितत्त्वांच्या दृष्टीनें उत्पन्न होते असें म्हणण्याविषयीं लोकांचा फारसा आग्रह नसतो, तथापि बहुतेक लोकांस तसें वागणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे असें वाटतें. हे लोक कोणत्याही बाबतींत एकाद्याचें वर्तन लोकरिवाजास सोडून झालें म्हणजे त्याची निंदा करितात. मनुष्याच्या वर्तनाचा ज्या अनेक गोष्टींशीं संबंध येतो त्या बहुतेकांच्या संबंधानें लोकरिवाज ठरलेले असतात. लोकरिवाजानें घालून दिलेल्या सामाजिक वर्तनाच्या नियमांना पुष्कळ प्रसंगीं योग्य कारणें देतां येत नाहींत हें पुष्कळ लोक कबूल करितात; कित्येकांपासून अतिशय त्रास होत असून फायदा कांहींच नसतो असेंही त्यांस वाटतें; व कित्येक तर अगदीं अविचारमूलक असल्यामुळें तिरस्करणीय आहेत असें म्हटल्यावांचून त्यांच्यानें राहवत नाहीं. तथापि अत्यंत क्षुल्लक गोष्टींत सुद्धां प्रत्येक मनुष्यानें ह्या नियमांना अनुसरून वागलें पाहिजे, असें त्यांचें मत असतें. ह्या नियमांचें उल्लंघन करणारा मनुष्य समाजाच्या रोषास पात्र व्हावा असें त्यांस वाटतें, परंतु त्या नियमांप्रमाणें वागल्यानें समाजावर वाईट परिणाम होतात कीं नाहीं व होत असल्यास ते दूर करण्याठीं यत्न करणें हें

प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे की नाहीं, ह्या प्रश्नांवर विचार करण्याचें त्यांच्या डोक्यांत शिरत नाहीं.

जो मनुष्य स्वतंत्र विचार करणारा आहे व स्वतःच्या विचाराच्या कसोटीस उतरल्याशिवाय जो कोणत्याही मताचें ग्रहण करीत नाहीं त्याला असें स्पष्ट दिसून येईल कीं, समाजांतील इतर मनुष्यांच्या संबधानें त्याचीं जीं कर्तव्यें आहेत त्यांतच आपले सामाजिक आचारविचार व रीतिभाति ह्यांना देखील कसोटी लावण्याचा प्रयत्न करून, त्या योगानें समाजांतील मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करण्यासाठीं झटणें ह्या कर्तव्याचाही समावेश होतो. परोपकाराची यथार्थकल्पना करावयाची म्हटली म्हणजे पैशाची किंवा इतर मदत देऊन दुसऱ्याचे उपयोगीं पडणें, त्याच्या दुःखानें दुःखी होणें व त्याला धीर देऊन मायेच्या शब्दांनीं त्याचें सांत्वन करणें इत्यादि तात्कालिक सुख देणाऱ्या गोष्टींचाच विचार करून भागत नाहीं; तर मनुष्याच्या मनाला आरंभीं दुःखें देणाऱ्या परंतु परिणामीं त्याचें हित करणाऱ्या अशा अनेक गोष्टी असतात त्यांचाही विचार करणें जरूर आहे ह्या दुसऱ्या प्रकारच्या परोपकाराच्या गोष्टी करणाऱ्या मनुष्यांना उपकृतांच्या हर्षयुक्त मुद्रा पाहण्याचा आनंददायक प्रसंग न येतां, त्यांच्या संतप्त मुद्रा पाहण्याचा दुःखकारक प्रसंग मात्र येतो. ह्या सामाजिक परोपकाराचे यत्न कांहीं नियमित व्यक्तींसाठीं नसून सर्व समाजासाठीं असतात. ह्यामुळें अशा प्रकारचे सामाजिक उपकार करूं जाणाऱ्या लोकांवर सर्व समाजाची इतराजी होते. अनेक कारणांनीं उत्पन्न होणाऱ्या व सर्व समाजावर करडा अंमल बसविणाऱ्या सामाजिक रीतिरिवाजांपैकीं कित्येक अनवश्यक असतात व कित्येक तर अपायकारक असतात. हे रीतिरिवाज पाळण्यांत श्रमांचा व पैशाचा जो दुरुपयोग होतो व कित्येकांचे मनुष्यावर जे वाईट परिणाम घडतात त्यामुळें मनुष्याचें जीवित किती दुःखमय होतें ह्याची कल्पना सामान्य लोकांस होणें अशक्य आहे. घातक परिणामांमुळें जे रीतिरिवाज सोडून देणें अवश्य आहे, त्यांपैकीं कित्येकांचा विचार करूं.

प्रथमतः पोषाखाच्या तऱ्हा घेऊं. ह्यासंबंधानें जे नवेनवे प्रकार नेहमीं निघत असतात व ज्यांना 'फ्याशन' असें म्हणण्याची चाल पडली आहे त्यांच्या मूर्खपणाविषयीं येथें फारसें लिहिण्याचें कारण नाहीं. युरोपियन लोकांमध्यें हें फ्याशनचें वेड अतिशय आहे व त्यांच्या स्त्रियांमध्यें तर फारच. त्या

लोकांच्या अनुकरणानें आमच्या लोकांतही हें वेड हळूहळू शिरूं लागलें आहे. ह्या फ्याशनचा वेडगळपणा पुष्कळ लोकांस दिसत असला तरी तिच्या विरुद्ध जाण्याची फारशी कोणाची छाती होत नाहीं. पूर्वीच्या पोषाखाच्या तऱ्हांना जे लोक हंसतात ते हल्लींच्या तऱ्हांमध्येंही वेडगळपणा कबूल करितात, परंतु हल्लींच्या तऱ्हा संवईनें अंगवळणीं पडल्यामुळें त्यांच्या दृष्टीला त्यांचा चमत्कारिकपणा भासत नाहीं. युरोपियन लोकांमध्यें फ्याशन इतकी वारंवार बदलते कीं, एका फ्याशनच्या नमुन्याचे केलेले कपडे फाटून गेले नाहींत तोंच दुसरी फ्याशन प्रचारांत आली म्हणून ते टाकून नवीन कपडे करावे लागतात. त्या लोकांच्या पोषाखांतील फेरफारांची माहिती करून देणारे चित्रपट पाहणें फार मनोरंजक होईल. बदलत जाणाऱ्या फ्याशनबरोबर नेहमीं नवेनवे पोषाख करण्याची अवश्यकता उत्पन्न झाल्यामुळें विनाकारण खर्च मात्र करण्याचें पुष्कळांच्या जिवावर येतें; तथापि प्रत्येक मनुष्यानें आपल्या स्वतःच्या व समाजबांधवांच्या हिताकरितां फ्याशनच्या जुलमाला अडथळा करणें योग्य आहे असें म्हटलें तर मात्र तें त्यांस रुचत नाहीं. त्या जुलमापुढें हें लोक स्वतः मान वांकवितात एवढेंच नाहीं, तर जे कोणी तसें करीत नाहींत त्यांस ते हंसतात व त्यांच्याशीं वाद घालून आपल्या आचरणाचें समर्थन करितात. ह्या लोकांच्या समजुतीप्रमाणें अशा प्रकारच्या रीतिरिवाजांना अडथळा न करितां ते निमूटपणीं पाळणें ह्यांतच सामाजिक परोपकार आहे.

मानसिकधैर्याच्या अभावामुळें पुष्कळ लोकांना समाजाविरुद्ध वर्तन करवत नाहीं. मित्रांच्या देखील रोषास पात्र व्हावें व लोकांकडून नेहमीं थट्टा करून घ्यावी हें कोणास आवडत नाहीं. परंतु ह्यासंबंधानें दोन गोष्टी लक्षांत ठेविण्यासारख्या आहेत. विचाराच्या दृष्टीनें योग्य असें वर्तन केल्यामुळें आपणाविषयीं लोकांत जी अप्रियता उत्पन्न होईल तिचे परिणाम सहन करणें हा परोपकाराचा एक मार्ग आहे, ही एक गोष्ट, व अशा प्रकारच्या वर्तनाबद्दल आरंभीं जरी गैरसमज झाला तरी तो लवकरच नाहींसा होतो ही दुसरी. जें वर्तन समाजाच्या ठराविक रिवाजाच्या विरुद्ध असलें तरी विचाराला व युक्तीला अनुसरून दिसतें, तें अज्ञानामुळें किंवा दारिद्र्यामुळें घडलेलें नसून विचारस्वातंत्र्याच्या व मानसिकसामर्थ्याच्या बळावर घडलेलें आहे, असा हळूहळू लोकांचा समज होत जातो; व तें वर्तन लोकांकडून

सहन केलें जातें इतकेंच नव्हे, तर तें करणाऱ्याविषयीं त्यांच्या मनांत सन्मानबुद्धि उत्पन्न होते. हें वर्तन लोकांच्या हिताचें आहे असें उघडपणें म्हणण्याचा धीर जरी पुष्कळांस झाला नाहीं तरी मनांतून त्यांना तसें वाटत असतें, व मनांतल्यामनांत ते त्या मनुष्याची तारीफ करीत असतात.

आज ही तऱ्हा तर उद्यां ती तऱ्हा ह्या फ्याशनच्या वेडगळपणाला प्रतिबंध करणें, ह्याशिवाय सामाजिक परोपकाराच्या दृष्टीनें पोषाखाचे संबंधानें आणखीही कांहीं कर्तव्यें आहेत. फ्याशनच्या दृष्टीनें जसा पोषाखाचा विचार करितां येतो तसाच किंमत, भपकेदारपणा इत्यादि दुसऱ्याही कांहीं गुणांच्या दृष्टीनें करितां येतो. पुष्कळ लोक पोषाखाकडे वाजवीहून अधिक लक्ष देतात ह्यासंबंधानें फारसें लिहिण्याची गरज नाहीं, कारण, लोकांकडून प्रशंसा करून घेण्याच्या हेतूनें पोषाखाचा बाह्यभाग भपकेदार करण्याकरितां पैशाचा, वेळाचा आणि श्रमांचा जो दुरुपयोग होतो त्याविषयीं लोकांत बरीच चर्चा होते. आपणाकडे लोकांचें लक्ष लागावें व त्यांनीं आपली वाखाणणी करावी म्हणून जों जों शरीर नटवावें तों तों त्याच्या उलट मात्र परिणाम होत असतो. ज्यांचें सर्व लक्ष नटण्यामुरडण्यांत गुंतलेलें असतें व त्यावांचून ह्या जगांत दुसरें कांहीं महत्त्वाचें ज्यांस दिसत नाहीं त्यांनीं वरील सत्य नेहमीं ध्यानांत बाळगावें. फाजील नटलेल्या मनुष्याविषयीं पाहणाराच्या मनांत एका प्रकारचा तिरस्कार उत्पन्न होतो. केंसांच्या, दागदागिन्यांच्या, पोषाखाच्या व इतर उपकरणांच्या रचनेवरून, तिच्यासाठीं किती प्रयास पडले असावे व इतके प्रयास करण्यांत त्या मनुष्याचा हेतु काय असावा ह्याचा पांहणारास अजमास करितां येतो. आणि लोकांनीं आपली तारीफ करावी ह्या गोष्टीवर त्याचा सर्व जीव आहे असें दिसून आलें म्हणजे, पाहणाराच्या मनांत त्याच्या उलट विचार उत्पन्न होतात. नेत्रांना जरी ती रचना आल्हाददायक वाटली तरी तिच्या मुळाशीं जो हेतु असतो तो मनुष्याला कमीपणा आणणारा आहे असें त्याला वाटल्यामुळें, एकंदरींत तो मनुष्य त्याच्या मनांतून उतरतो. लोकांकडून वाखाणणी करून घेण्याची इच्छा असणें हा चांगला गुण समजला जात नाहीं.

फार पैसा खर्च न करितां व वारंवार त्याजकडे लक्ष देण्याची अवश्यकता न ठेवितां, पोषाख जितका साधा व नीटनेटका होईल तितका केला पाहिजे. साधेपणानें व नीटनेटकेपणानें जितकें सौंदर्य येईल तितकें पुरें आहे.

आपणाला ज्या लोकांत वागावयाचें असेल त्यांचा कोणत्याही रीतीनें अपमान होणार नाहीं एवढ्या पुरती पोषाखाच्या संबंधानें काळजी घेतली पाहिजे. परंतु आपल्या पोषाखाच्या संबंधानें लोकांचीं मतें काय आहेत ह्याबद्दल विचार करून मनाला त्रास करून घेण्याचें कारण नाहीं. पोषाखाचे कामांत सुधारणा करण्याला फार कुशल मनुष्य पाहिजे. हें काम एकदम होणें कठिण आहे. सुधारणेची दिशा लक्षांत ठेवून त्या दिशेकडे जाववेल तितकें जाण्याचा यत्न करणें व कोणीं तसा यत्न केला असतां त्याचें अभिनंदन करणें ही सामाजिक परोपकाराच्या दृष्टीनें प्रत्येकाचीं कर्तव्यें आहेत.

ह्या विषयाचे संबंधानें आपल्या लोकांविषयीं थोडासा विचार करूं. पोषाखाच्या कामांत युरोपियन लोकांचें बरेंच अनुकरण होत आहे व अनुकरण होत असतांना पुष्कळवेळां चांगल्याबरोबर वाईटाचेंही अनुकरण होत असतें. ह्यासाठीं साधेपणाचा व उपयुक्तपणाचा भाग मात्र घेऊन बाकीचा टाकून देण्याविषयीं जपलें पाहिजे. ह्यासंबंधानें जरूर तितकी काळजी घेतली जात नाहीं. उपयोगापेक्षां सौंदर्याकडे अधिक लक्ष देण्याची प्रवृत्ति रानटी लोकांत फार आढळून येते व सुधारलेल्या मनुष्यांतही तिचें बरेंच प्राबल्य आहे. सौंदर्याला भुलून खर्चाच्या नव्या पोषाखाच्या तऱ्हा प्रचारांत आणिल्यानें लोकांचें फार नुकसान होतें. असल्या नव्या तऱ्हा प्रचारांत आणणें फारसें कठिण नसतें, पण त्या एकदां प्रचारांत आल्या म्हणजे त्या प्रचारांतून जाणें फार कठिण असतें. साहेबलोकांशीं विशेष संबंध ठेवणाऱ्या कित्येक लोकांत व त्यांचें पाहून तसाच पोषाख करणाऱ्या दुसऱ्या कांहीं लोकांत, त्यांच्या पोषाखांतील डामडौलाचे व निरुपयोगी भाग शिरत आहेत. शहरांत राहणारे बरेच लोक आपल्या लहान मुलांचे पोषाख थेट युरोपियनधर्तीवर करूं लागले आहेत. ही लहान मुलांच्या पोषाखाची फ्याशन वरच्या प्रतीच्या लोकांत बरीच लवकर पसरेल अशी भीति वाटते. ह्या नवीन तऱ्हांचा लोकांच्या मनावर जो फारसा परिणाम झाला नाहीं तोंच त्या पसरूं न देण्याविषयीं यत्न झाला पाहिजे.

पोषाखापेक्षां दागिन्यांकडे आमचे लोकांनीं अधिक लक्ष पुरविलें पाहिजे. मनुष्य कितीही गरीब असला तरी त्याला आपल्या स्थितींतील लोकांप्रमाणें आपले, बायकोचे व मुलांचे अंगावर दागिने घातलेच पाहिजेत. दागिन्यांचे पायीं पुष्कळ लोक भिकेस लागतात. लोकांनीं आपणांस हंसूं नये

म्हणून कर्ज काढून दागिने करावे व त्या कर्जाचें व्याज फेडितां फेडितां अखेरीस जवळ असेल नसेल तें गमवावें अशी पुष्कळांची स्थिति होते. ह्याशिवाय दागिने घालण्यासाठीं नाक व कान टोंचण्याची तऱ्हा तर केवळ रानटी स्थितींतील राहिलेला शेष आहे. ह्या चालीमुळें शरीराला कित्येक दिवस विनाकारण दुःख द्यावें लागतें. आपल्या रिवाजाहून भिन्न रिवाज पाहिला कीं त्यांत मनुष्याला पुष्कळ दोष दिसतात, परंतु स्वतःच्या रिवाजांत मात्र दिसत नाहींत. आपणाला जसे लोकांचे दोष दिसतात तसेच लोकांना आपले दिसत असतील हें मनांत आणून, ते शोधून काढून नाहींसे करण्यासाठीं झटणें हा सामाजिक परोपकार आहे व त्याची आपल्या हल्लींच्या स्थितींत फार उणीव आहे.

वस्त्रालंकारांनीं शरीरें सुशोभित करण्याच्या कामीं ज्याप्रमाणें वाजवीहून अधिक लक्ष दिलें जातें त्याचप्रमाणें इतर पदार्थांच्या सुरेखपणाकडेही मनुष्यांचें लक्ष वाजवीहून अधिक जाण्याचा संभव आहे. श्रीमंत लोकांच्या बायकांचा बहुतेक वेळ सौंदर्याचे पाठीमागें लागण्यांत जातो. सभोंवतालच्या पदार्थांना सौंदर्य आणणें हाच त्यांच्या जन्माचा मुख्य हेतु होऊन बसला आहे. नेत्रांना आल्हादकारक अशा अनेक पदार्थांच्या रचना करण्यांत कितीही पैसा, वेळ व श्रम ह्यांचा खर्च झाला तरी त्यांचें समाधान होत नाहीं.

जे अनेक हेतु मनुष्याला साध्य करून घ्यावयाचे असतात त्यांच्या धोरणानें त्याचे नेहमींचे व्यवसाय चालले असतात. ह्या अनेक हेतूंमध्यें योग्य प्रमाण राखिलें तर मनुष्याचा आयुष्यक्रम त्याला व समाजाला हितावह होईल. ' अति सर्वत्र वर्जयेत् ' ह्या लोकमान्य वर्तनतत्त्वाकडे लक्ष देऊन, कोणत्याही हेतूच्या सिद्धीसाठीं किती श्रम करावयाचे हें ठरविलें पाहिजे, व त्याचप्रमाणें अनेक हेतूंसाठीं घडणाऱ्या व्यवसायांचें परस्परांशीं प्रमाण काय असावें हें ठरविलें पाहिजे. आपल्या दृष्टीपुढें चाललेले लोकांचे व्यवसाय मनांत आणिले म्हणजे, ह्या गोष्टींकडे त्यांचें फारच थोडें लक्ष गेलेलें असावें असें दिसतें. पुष्कळ लोकांना अशा प्रकारें लक्ष देण्याची आवश्यकता आहे असें वाटत देखील नाहीं. बरेच लोक आपल्या बहुतेक शक्तीचा व्यय एका हेतूच्या सिद्धीसाठीं करितात. कोणी पैसा मिळविण्यासाठीं अतोनात श्रम करितो, कोणी आपलें सर्व लक्ष करमणुकीच्या साधनांत घालितो, कोणी विद्याभ्यासाचेच पाठीस लागतो व कोणी डोक्यांत एकादें वेड शिरलें असेल त्याच्या-

साठीं आपला सर्व जन्म घालवितो; परंतु एकाच गोष्टींत आपलें सर्व लक्ष गुंतून राहिल्यामुळें दुसऱ्या अनेक गोष्टींची आपल्या हातून हयगय होते हा विचार एकाच्याही मनांत येत नाहीं. ह्या वर्तनामुळें इतर मनुष्यांचे संबंधाचीं कर्तव्यें करण्यास तो मनुष्य असमर्थ होतो एवढेंच नव्हे, तर स्वतःच्या संबंधाचींही कर्तव्यें त्याजकडून होत नाहींत. सौंदर्याच्या पाठीस लागलेल्या मनुष्यांची विशेषेंकरून अशी स्थिति होते. आपल्या सभोंवतालचे पदार्थ सुशोभित करण्यासाठीं किती वेळ खर्चावयाचा ह्याला कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं, हा विचार पुष्कळ लोकांचे डोक्यांत शिरतच नाहीं. स्त्रियांची तर ह्यासंबंधानें कमाल आहे. त्यांची अशी समजूत झालेली असते कीं, जिकडे तिकडे सुंदर पदार्थांची मनोहर रचना करण्यांत जितकें जास्त कौशल्य दाखवितां येईल तितकें आपणांस अधिक भूषणावह आहे. त्यांच्या मनाची अशी स्थिति होऊन गेल्यामुळें आयुष्यांतील दुसऱ्या महत्त्वाच्या हेतूंकडे त्यांचें अगदीं दुर्लक्ष होतें. युरोपियन लोकांच्या स्त्रियांत हे परिणाम मर्यादेच्या बाहेर गेलेले आहेत असें ह्या विषयाचें बारकाईनें परीक्षण करणाऱ्या विचारी लोकांचें मत आहे. आपलेकडील श्रीमंतांच्या स्त्रियांची तीच स्थिति आहे. केवळ पाहण्याच्याच उपयोगाचीं नानाप्रकारचीं लोंकरीचीं, रेशमाचीं व कलाबतूची कामें करणें, घरांतील सुंदर पदार्थांची निरनिराळ्या प्रकारची प्रेक्षणीय रचना करणें, फुलें व पानें चित्रविचित्र रीतीनें लावून ठेविणें इत्यादि कलाकौशल्याच्या व्यवसायांत स्त्रियांचा बहुतेक वेळ जाऊन, अन्नपाण्याची चांगल्या रीतीनें व्यवस्था होईल अशा रीतीनें चाकरमाणसांकडे लक्ष देणें, मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था पाहणें वगैरे अत्यावश्यक गोष्टींकडे त्यांचें दुर्लक्ष होतें.*

स्वतःचें संरक्षण करणें, अपत्यांचें पालनपोषण करणें, सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्यें करणें आणि मनोरंजन करून घेणें, हे व्यावहारिकदृष्टीनें सा-

---

* ह्या ग्रंथांचा कर्ता **हर्बर्ट स्पेन्सर** याचे मनांत पुष्कळ वर्षें "दिखाऊपणाचें व्यसन" ह्या विषयावर निबंध लिहिण्याची इच्छा आहे, व त्या उद्देशानें, पदार्थांच्या उपयोगाला पहिलें स्थान देऊन त्यांच्या भपकेबाजपणाला दुसरें स्थान द्यावयाचें त्या ऐवजीं ह्या स्थितीचा व्युत्क्रम झाला असतां मनुष्याच्या जीवितावर कसे वाईट परिणाम होतात त्याचीं अनेक उदाहरणें त्यानें मिळवून ठेविलीं आहेत. (हा निबंध प्रसिद्ध झाला आहे कीं नाहीं याची माहिती नाहीं. **ब. ग. दाभोळकर**)

धावयाचे पुरुषार्थ होत व त्यांचें महत्त्व वर दिलेल्या अनुक्रमानें कमीकमी होत येतें. पूर्वीं सांगितलेल्या सौंदर्यप्रीतीला मनोरंजनाचे सदरांत घालितां येईल. मनोरंजन हा सर्वांत कमी महत्त्वाचा हेतु असल्यामुळें त्याकडे इतर हेतूंपेक्षां पुष्कळ कमी लक्ष दिलें असतां पुरें होईल. सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीनें देखील अस्थानीं शोभा आणण्याचा प्रयत्न करणें दोषास्पद आहे. सौंदर्याची तरी अति इच्छा झाली व तिच्यासाठीं अतिशय प्रयत्न झाला म्हणजे त्याचा परिणाम इच्छेच्या विरुद्ध होतो. पहिल्यानें ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, घरांतील नेहमींच्या उपयोगाचे बहुतेक पदार्थ कौशल्य खर्चून सुशोभित करण्याच्या लायकीचे नसतात. घाणेरडे कोळसे ठेवण्याच्या भांड्याला नानाप्रकारची चिरगावणी करून शृंगारिलेलें पाहिलें म्हणजे विलक्षण प्रकारची विसंगतता दिसते. * पक्वान्नांनीं भरलेलीं ताटें मेजावर आणून ठेवावयाचीं असलीं तर तीं सुशोभित करण्याकरितां वरून कृत्रिमपानांचें व फुलांचें आच्छादन घालण्यांत जो वेळ मोडतो त्याच्यापासून कार्य किती होतें तें पाहिलें म्हणजे दोहोंमध्यें चमत्कारिक विरोध दिसून येतो. कारण, एका क्षणांत वरील आच्छादन काढून टाकावें लागतें व पुढें नेत्रांना संतुष्ट करण्याचें काम ह्याच्यानें होत नाहीं. घरांतील बहुतेक पदार्थ चित्त वेधून टाकण्यासारखे सुंदरही नसावे व मनाला किळस आणण्यासारखे बेढबही नसावे. आतां सौंदर्याचे संबंधानें दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे, जे कित्येक पदार्थ केवळ शोभेसाठींच केलेले असतात ते करवतील तितके सुंदर केल्यानें व जे उपयोगाचे टिकाऊ पदार्थ असतील त्यांना उपयोगांत कमतरता न आणितां सुशोभित करण्याचा यत्न केल्यानें, सौंदर्यापासून होणारें एकंदर सुख अधिक होईल. सुंदर पदार्थांचें सौंदर्य पूर्णपणें मनांत उतरण्याला सभोंवतालचे पदार्थ अगदीं साधे असले पाहिजेत. साधेपणा आणि सौंदर्य हीं एकाशीं एक पाहिलीं म्हणजे त्यांमधला फरक चित्ताला फार आल्हादकारक होतो. एखादा उत्कृष्ट पुतळा किंवा वनश्रीची शोभा दर्शविणारें व स्वाभाविक रंग दिल्यामुळें खरोखर अरण्यच आहे कीं काय असा भास उत्पन्न करणारें एखादें नामी चित्र साध्या पदार्थांनीं भरलेल्या दिवाणखान्यांत ठेविलें असतां जितकें चित्तवेधक होईल, तितकें अनेक सुंदर पदार्थांनीं भरलेल्या दिवाणखान्यांत होणार नाहीं. अनेक प्रकारचीं नक्षीचीं व वेलबुट्टीचीं कामें, सुंदर पुतळे व तसबिरा, चिनीमातीचीं सुरेख

---

* ही माहिती युरोपियन लोकांतली आहे हें उघड आहे.

भांडीं, अनेक देशांतील मनोवेधक चिजा इत्यादि मोहकपदार्थांची ज्या स्थळीं अगदीं गर्दी होऊन गेलेली असेल त्या स्थळाचें स्वाभाविक सौंदर्य नष्ट होतें; परंतु थोडेच सुंदर पदार्थ मार्मिक रीतीनें लावून ठेविलेले असले तर तेंच स्थळ प्रेक्षणीय होऊन जातें.

मोहक पदार्थांचें लोकांच्या दृष्टीपुढें प्रदर्शन करण्याच्या अत्युत्कट इच्छेमुळें, अनवश्यक नवेनवे पदार्थ उत्पन्न करून, ते लोकांच्या दृष्टीस पडतील अशा रीतीनें कांहीं क्षुल्लक कामासाठीं उपयोगांत आणण्याची मनुष्याला संवय झालेली आहे. उदाहरणार्थ, लोणी कापून तें पावाच्या तुकड्याला लावण्यासाठीं तयार केलेली रुप्याची सुरी घेऊं. युरोपियन लोक जेवितांना हातांनीं पदार्थ उचलून तोंडांत न घालितां कांटे, सुऱ्या, चमचे ह्यांच्या साह्यानें तें काम करितात. हे पदार्थ आमच्या दृष्टीनें अगदीं निरुपयोगी आहेत, परंतु त्यांच्या दृष्टीनें ते अत्यवश्यक पदार्थांपैकीं आहेत. त्यांच्या दृष्टीनें देखील रुप्याच्या सुरीची कांहीं गरज नाहीं. पोलादाच्या सुरीनें तें काम केलें असतां, लोणी आणि पोलाद ह्यांच्यामध्यें कांहीं रसायनक्रिया होऊन एखादा विषारी पदार्थ उत्पन्न होतो अशी गोष्ट नाहीं. बहुतेक लोक पोलादाच्या सुरीनेंच हें काम नेहमीं करितात व तसें करणें अपायकारक आहे असें कोणीं कधीं सिद्ध केलें नाहीं. बरें, पोलादाच्या सुरीपेक्षां रुप्याच्या सुरीनें चांगलें काम होईल असें म्हणावें तर तेंही नाहीं. उलट, रुप्याच्या सुरीनेंच चांगलें काम होणार नाहीं. पोलादाच्या सुरीचा दुसऱ्या कामासाठींही उपयोग करितां येईल तसा रुप्याच्या सुरीचा करितां येणार नाहीं. श्रीमंत लोकांत ज्या प्रकारचे पदार्थ वापरण्याची चाल पडली आहे ते विकत घेण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य आहे हें लोकांस दाखवावें व आपणाला लोकांनीं श्रीमंत म्हणावें ह्यावांचून अशा पदार्थांचा दुसरा उपयोग नाहीं. नेहमींच्या उपयोगांत असे पुष्कळ अनवश्यक पदार्थ शिरलेले असतात. हे निरुपयोगी पदार्थ विकत घेण्यासाठीं एकदम द्यावा लागणारा पैसा व नेहमीं त्यांची घांसपुस करून काळजी घेण्यासाठीं लागणारा पैसा खर्च करण्यास लोक जे तयार होतात, ते केवळ ते पदार्थ आपल्या घरांत दिसले नाहींत तर लोकांत आपणांविषयीं टीका होईल ह्या भीतीनें होतात.

उपयोगापेक्षां सौंदर्याचें महात्म्य अधिक वाढावें व त्यामुळें कमी महत्त्वाच्या हेतूसाठीं वेळ, शक्ति व पैसा ह्यांचा व्यय होऊन अधिक महत्त्वा-

च्या हेतूकडे दुर्लक्ष व्हावें, हा प्रकार करवेल तितका कमी करण्यासाठीं यत्न करणें सामाजिक परोपकाराच्या दृष्टीनें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

समाजांतील लोकांच्या आयुष्यक्रमांतील मूर्खपणाच्या चाली सुधारण्यासाठीं यत्न करणें हा सामाजिक परोपकाराचा आणखी एक प्रकार आहे. रूढीमुळें हाडीं खिळून गेलेल्या अनेक संवयी व सामाजिक आचार प्रत्येक समाजांत दृष्टोत्पत्तीस येतात. त्यांपर्कीं कित्येकांपासून समाजाचें फार नुकसान असतें. सामान्य लोकहिताच्या दृष्टीनें अशा चालींना व आचारांना प्रतिबंध करून त्यांत योग्य फेरफार करण्यासाठीं परोपकारी गृहस्थांस ह्या संबंधाच्या कर्तव्यांची अवश्यकता वाटूं लागली आहे.

प्रेतसंस्कार व उत्तरक्रिया ह्यांमध्यें अतोनात पैसा खर्च करण्याच्या चालींत सुधारणा करण्याविषयीं कित्येक लोकांचे प्रयत्न सुरू आहेत. ह्या सामाजिक चालींपुढें मान वांकवावी लागल्यामुळें गरीब कुटुंबांवर वाईट प्रसंग गुदरतात हें आतां पुष्कळांच्या नजरेस येऊं लागलें आहे. एकाद्या मनुष्यानें आपल्या बायकोसाठीं व मुलांसाठीं जो पैसा ठेविला असेल, तो ह्या खर्चामुळें बराच कमी होतो व त्यामुळें त्यांच्या निर्वाहालाही अडचण पडते. रूढीला अनुसरून जरूर तितक्या गोष्टींचें प्रदर्शन केलें नाहीं तर, मृताविषयीं त्या मनुष्याचे मनांत प्रीति व समानबुद्धि नाहीं असा लोकांचा गैरसमज होण्याचा संभव असतो. ह्यामुळें पैसा खर्चण्याचें कितीही जिवावर आलें तरी पिशवीचें तोंड मोकळें सोडावें लागतें. कित्येक अर्धवट सुधारलेल्या लोकांत तर ह्या चालींचे फारच घातक परिणाम होतात. गोल्ड कोस्ट म्हणून एक प्रदेश आहे, तेथील गरीब लोकांना, कोणी मनुष्य मेलें म्हणजे त्याच्या मरणानें जें दुःख होतें त्यापेक्षां त्याच्या प्रेतसंस्काराला जो खर्च करावा लागतो त्याचें अधिक दुःख होतें. कित्येक कुटुंबाची ह्यामुळें अगदीं दुर्दशा होते. उत्तरकार्यासाठीं होणारा अतोनात खर्च कमी करण्याला आणखीही कारणें आहेत. मनुष्याचें जगांतील वर्तन चांगलें असो किंवा वाईट असो, त्या सर्वांसाठीं सारखाच खर्च करण्याची चाल पडून जाते. ह्यामुळें उत्तरक्रियेसाठीं होणाऱ्या खर्चावरून मृताविषयींच्या प्रीतीची किंवा सन्मानबुद्धीची कल्पना करणें बरोबर होणार नाहीं. आणि बरेच लोक जर हा खर्च कमी करूं लागले, तर त्यांचें हें वर्तन मृताविषयीं तिरस्कारबुद्धीनें झालें, अशी कोणास शंका येणार नाहीं.

आपल्या लोकांच्या कित्येक जातींत ही बरीच भास आहे. विशेषतः ज्या जातींतील लोकांस मृतांचे निमित्तानें ज्ञातिभोजनें घालणें भाग पडतें त्या जातींतील गरीब लोकांची मोठी पंचाईत होते. ह्या चालींचा धर्माशीं संबंध आहे, अशी लोकांची समजूत असल्यामुळें त्यांत इष्ट फेरफार होण्याला फार वेळ लागेल. वास्तविक धर्माच्या आडकाठीपेक्षां रूढीची आडकाठीच विशेष आहे. अत्यावश्यक धर्माचारांना म्हणण्यासारखा खर्च लागत नाहीं, पण रूढीनें घालून दिलेल्या सामाजिक आचारांनाच फार खर्च लागतो. हा भेद लोकांच्या लक्षांत आणून देण्याचा यत्न करून त्यांच्या खऱ्या हिताचा मार्ग त्यांस दाखविण्याची अवश्यकता आपल्या समाजांत फार आहे.

उत्तरकार्याच्या अशुभप्रसंगांतील खर्च कमी करण्याची जशी अवश्यकता आहे. त्याचप्रमाणें विवाहादि मंगलकार्यांतला खर्चही कमी करणें जरूर आहे. कित्येक ठिकाणच्या लोकांत हा खर्च मर्यादेच्या बाहेर गेल्यामुळें प्रत्यक्ष अनर्थकारक परिणाम तर होतातच, पण अप्रत्यक्षरीतीचा आणखी एक भयंकर परिणाम होतो. अर्धवट सुधारलेल्या कांहीं लोकांत लग्नाच्या मेजवानीचा व इतर खर्चाचा मुलीच्या बापावर इतका बोजा बसतो कीं, मुलीच्या जन्माची वार्ता ऐकल्याबरोबर त्या लोकांच्या पोटांत धस्स होतें. ह्या खर्चाच्या भीतीनें मुलींना उपजल्याबरोबरच मारून टाकण्याची चाल कित्येक लोकांत पडली आहे. आपल्या लोकांत जरी कन्यावधापर्यंत मजल येऊन ठेपली नाहीं. तरी मुलगी झाली असें समजल्याबरोबर बापाच्या मनांत अस्वस्थता उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. हुंड्याचें मान तर अलीकडेच फार वाढत चाललें आहे. नवीन सुशिक्षित लोकांकडूनही ह्या चालीला उत्तेजन मिळतें ही आश्चर्याची गोष्ट आहे. ह्या खर्चाच्या चाली श्रीमंत लोकांस तितक्या बाधक होत नाहींत, परंतु गरीबांस त्या फार जांचतात. ज्या गरीब मजुराला मोठ्या शिकस्तीनें पोटापुरतें मिळतें त्यानें लग्नासाठीं चाळीसपन्नास रुपये खर्चावयाचे म्हटलें तरी ते त्याच्या आहाराबाहेर असतात. खर्च करण्याची ऐपत असली तरी देखील वाजवीहून अधिक खर्च करणें अनिष्टच, मग ती नसेल तर त्याहून अनिष्ट. गरीब लोक अशा प्रसंगीं जें कर्ज करितात तें त्यांच्या जन्माला पुरतें. पुष्कळ मध्यमस्थितींतील लोकही ह्या कार्यांत आहाराबाहेर खर्च करून धुळीस मिळतात. श्रीमंतलोकांना पैशासंबंधानें पंचाईत पडली नाहीं तरी त्यांचे देखील इतर वेडगळ चालींमुळें फार हाल होतात.

चार दिवस लग्नाचा गोंधळ एकसारखा चाललेला असतो व विहिणींचे आणि जांवयाचे मानपान संभाळतां संभाळतां मुलीकडील मनुष्यांच्या नाकीं नव येतात. नवीन शिकलेले लोक देखील ह्या मूर्खपणाच्या चालींचे दास होऊन राहतात.

लग्नानंतर ज्ञातिभोजनें किंवा मोठमोठाल्या समाराधना घालण्याची चाल बऱ्याच लोकांत आहे. ज्या लोकांची व आपली फारशी ओळखही नाहीं व ज्यांचा आपला फारसा संबंध येण्याचा संभव नाहीं, अशा लोकांस भोजनास बोलावून आपणास कोणत्या प्रकारचा आनंद होणार? इष्टमित्रास भोजन दिल्यानें परस्परांमधील स्नेह वाढण्याचा संभव असतो व त्या दृष्टीनें तें इष्ट आहे. त्याचप्रमाणें ज्या गरीब लोकांना कधीं मिष्टान्न मिळत नाहीं त्यांना चांगलें भोजन घातलें तर तो एक परोपकार तरी होईल. परंतु सरसकट ज्ञातिभोजन घालणें म्हणजे केवळ रूढीला मान वांकविणें होय. प्राचीनकाळीं जेव्हां ही चाल पडली असेल तेव्हां ज्ञातींत थोडेच लोक असल्यामुळें किंवा एका ठिकाणीं राहणारे एका ज्ञातीचे लोक थोडे असल्यामुळे सर्वांचा परस्परांशीं निकट संबंध येणें साहजिक होतें. त्यामुळें अशा प्रसंगीं सर्वांनीं एकत्र जमावें व एका ठिकाणींच भोजन करावें हें स्वाभाविक रीतीनें घडून आलें असेल. पुढें ज्ञातींतील मनुष्यांची संख्या वाढत चालली तरी तोच प्रघात कायम राहिला. वास्तविक अशा प्रसंगीं इष्टमित्रांनाच बोलावून त्यांच्यासह भोजन करणें इष्ट आहे. आतां हे व इतर खर्च कोणी कमी करूं लागला तर त्यास लोक कृपण म्हणतील किंवा त्याच्यावर दुसरेही कांहीं आरोप करतील, परंतु तिकडे लक्ष न देतां, ज्याला खरोखर सामर्थ्य नसेल त्यानें ते सहन करणें हेंच उत्तम. ज्याला सामर्थ्य असेल त्यानें दुसऱ्या उपायांनीं पहिल्या आरोपांतून मुक्त व्हावें हें चांगलें. वरील गोष्टींसाठीं जो खर्च लागण्याचा संभव असेल त्याचा त्यानें कोणत्या तरी परोपकाराचे कामीं उपयोग करावा व तसें करितांना, अमुक रीतीनें वांचविलेल्या पैशाचा हा व्यय आहे असें आपल्या वर्तनावर टीका करणाऱ्या लोकांना समजेल अशी तजवीज करावी.

युरोपियन लोकांत मुलींचे लग्नासाठीं आईबापांवर फारसा बोजा बसत नाहीं, परंतु त्या लोकांत वधूवरांना बाक्षिसें देण्याचें वेड बरेंच माजलें आहे व तें कमी करण्याविषयीं त्या लोकांचे यत्न चालले आहेत. नवीन वधूव-

रांना नवा संसार मांडावयाचा असतो, तेव्हां सुरुवातीच्या वेळीं ज्यांचा उपयोग होईल अशा पदार्थांचें बक्षीस देण्याची पूर्वी चाल होती, आणि ह्या उद्देशानें जर अजून देखील कोणी कांहीं बक्षिसें देत असतील तर त्यांस नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. लग्न झाल्याबरोबर मुलानें बापाचे घरीं न राहतां आपल्यासाठीं निराळी व्यवस्था करावी अशी त्या लोकांची चाल आहे, व एकदम नवा संसार मांडणें बरेंच कठिण असल्यामुळें त्यांना मदत करणें ह्यांत वावगें कांहीं नाहीं. परंतु ह्या चांगल्या हेतूनें सुरू केलेल्या चालीला रूढीनें निराळें स्वरूप आलें आहे. ज्यांच्या घरीं कशाचीही वाण पडण्याचा संभव नाहीं, अशा वधूवरांनाही त्यांच्या मित्रांकडून इतकीं बक्षिसें मिळतात कीं त्यांची व्यवस्था लावितांना पुरेवाट होते. हीं बहुतेक बाक्षिसें मित्रभावानें किंवा प्रेमानें दिलेलीं असतात अशीही गोष्ट नाहीं. तीं दिलीं नाहींत तर वाईट दिसेल व न देणारावर टीका होईल ह्या भयानेंच तीं दिलीं जातात. ज्याला पुष्कळ मित्र असतील त्याजवर हा एक करच म्हणावयाचा. अलीकडे तर बड्या लोकांमध्यें ही चाल इतक्या शिखरास जाऊन पोंचली आहे कीं, अशा रीतीनें दिलेल्या नजराण्यांची यादी व ते देणारांचीं नांवें निर्लज्जपणानें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केलीं जातात. ह्या यादीवरून वधूवरांची सामाजिकस्थिति व त्यांचें वैभव आणि नजराणे देणारांचें औदार्य ह्यांची कल्पना केली जाते.

* ईस्टर आणि ख्रिस्तमस (नाताळ) ह्या सणांचे वेळीं लग्नाच्या वेळेप्रमाणेंच एकमेकांस बाक्षिसें पाठविण्याची चाल युरोपियन लोकांत आहे. पारीस शहरांत तर ईस्टरच्या सणाचीं बाक्षिसें वांटण्याचें खूळ फारच माजलें आहे. कित्येक लोक हा त्रास टाळण्याकरितां कांहीं तरी कारण काढून ह्या प्रसंगीं बाहेर निघून जातात. हा एकप्रकारचा परस्परांवर खासगी करचें आहे. अ नें ब, क, ड वगैरे लोकांना बक्षिसें द्यावयाचीं आणि ह्याप्रमाणें मूळाक्षरें संपतपर्यंत किंवा त्याचे पुढेंही चालावयाचें. ह्या बाक्षिसांप्रमाणेंच प्रत्येक मनुष्याच्या जन्मदिवशीं त्याच्या आप्तइष्टांनीं बक्षिसें पाठविण्याची चाल बहुतेक युरोपियन लोकांत आहे. बाक्षिसें व नजराणे देण्याची चाल आमच्याही लोकांत बरीच फैलावत आहे. ख्रिस्तमस व ईस्टर ह्या सणांचे वेळीं, कांहीं शुभचिंतक मजकूर लिहिलेल्या छापील कार्डा मित्रांमध्यें—विशेषतः

---

* ईस्टरचा सण एप्रिल महिन्याचे सुमारास पडतो. गुडफ्रायडे हा त्या सणांतील मुख्य दिवस आहे.

मुलांमध्यें—वांटण्याची इंग्लिश लोकांत बरीच चाल आहे. ह्या सर्व गोष्टींत पैसा, श्रम व वेळ ह्यांचा खर्च होऊन शिवाय आणखी दोन अनिष्ट प्रकार होतात. एक, ह्या चाली जितक्या जितक्या जुन्या होतात व अधिकाधिक पसरत जातात तितका तितका त्यांचा मूळ उद्देश एकीकडे राहून त्यापासून आनंद होत नाहींसा होतो; व दुसरा कोणाच्या हातून त्याप्रमाणें वर्तन घडण्यांत हयगय झाली तर संबंधी मनुष्याला वाईट वाटतें. जोंपर्यंत हीं प्रेमसूचक चिन्हें अंतर्यामींच्या स्फूर्तीनें विशेष प्रीतींतल्या मनुष्यांना मात्र दर्शविलीं जातात तोंपर्यंत उपयोग असतो; तींच मर्यादेबाहेर गेलीं व नित्यक्रमांतील होऊन बसलीं म्हणजे अगदीं निरर्थक होऊन जातात.

अशा प्रकारच्या सामाजिकवर्तनाच्या संबंधानें मनुष्यानें सत्य व प्रामाणिकपणा ह्यांचें अवलंबन करून, आंतून एक व बाहेरून एक असें वर्तन करावयाचें सोडिलें पाहिजे. मनांतून आवडत नसतां केवळ लौकिकाचारासाठीं एकादी गोष्ट करणें म्हणजे एका प्रकारचें असत्याचरण आहे. शक्य असेल तितकें अशा प्रकारचें असत्याचरण टाळण्याचा जर प्रत्येक मनुष्य यत्न करील तर समाजाचें जीवित बरेंच अधिक जोमदार होईल.

नीतिशास्त्रावरील पुस्तकांत परोपकाराविषयीं विचार चालला असतां, सामाजिकसुधारणेच्या विषयांचा उल्लेख केलेला पाहून पुष्कळांस आश्चर्य वाटेल, व आपण परोपकारावरील लेख वाचीत आहों किंवा सामाजिकसुधारणेवरील एकादा निबंध वाचीत आहों ह्याचाही मधूनमधून कित्येकांस संशय पडेल. सामाजिक आचारांकडे नीतीच्या दृष्टीनें पाहण्याची पुष्कळांना संवयच नसते; परंतु ज्या वर्तनापासून मनुष्याच्या सुखदुःखांत कमीअधिकपणा होण्याचा संभव असेल, त्या वर्तनाचा नीतिदृष्ट्या विचार करणें अवश्य आहे. आणि नित्यक्रमांत गोंवून गेलेल्या सामाजिक रूढाचारांचा मनुष्याच्या सुखदुःखाशीं संबंध नाहीं असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं.

परंतु अपायकारक सामाजिक चालींना प्रतिबंध करून त्यांत योग्य फेरफार करण्याचा यत्न करणें हें सामाजिकपरोपकाराचें काम अंगावर घेणें कोणास आवडत नाहीं. कारण त्या भानगडींत पडणाऱ्या मनुष्याला लोक विक्षिप्त समजतात. कित्येक लोकांस असें वाटतें कीं, सामाजिक सुधारणेच्या कामांत पडून आपण विक्षिप्त आहों असा एकदां लोकांचा समज झाला व आपणावरचा त्यांचा भरंवसा उडाला म्हणजे आपल्या हातून अधिक मह-

त्यांच्या सुधारणा होणार नाहींत. हें ह्या लोकांचें मत कबूल करितां येत नाहीं. कारण सामाजिक आचार व रीतिभाति ह्यांत सुधारणा करण्याचें काम इतर सुधारणांपेक्षां कमी महत्त्वाचें नाहीं. ह्या प्रकरणांत सांगितलेल्या कित्येक रूढाचारांपासून लोकाचें फार नुकसान होतें. ह्याशिवाय अनेक अहितकारक चाली व समजुती दाखवितां येतील. दिवसांतून दोनदांच जेवावयाचें व प्रत्येक वेळीं पोट अगदीं खचून भरावयाचें ह्या चालीमुळें शरीरावर वाईट परिणाम होतात. पोटाला तडस लागेपर्यंत जेवल्याशिवाय दुसऱ्या जेवणापर्यंत धीर धरवत नाहीं व एकदम फार खाल्ल्यानें त्रास होतो. बेताचें खाणें दिवसांतून चारदां खालें तर केव्हांही आहारून पडण्याची अवश्यकता भासणार नाहीं, व नेहमीं काम करण्यास अंगांत तरतरी राहील. व्यायामासंबंधानेंही आपल्या लोकांची समजूत चमत्कारिक आहे. श्रम होण्यासारखे मर्दानी खेळ खेळण, धांवणें, कुस्त्या खेळणें वगैरे प्रकार सभ्यपणास योग्य नाहींत असें पुष्कळांस वाटतें. ही समजूत मोठमोठ्या शहरांतून बरीच कमी होत आहे, परंतु इतर ठिकाणीं तिचा अद्यापि बराच जोर आहे. आमच्या वरच्या वर्गांतील लोकांच्या बायकांनीं पादत्राण घालणें व डोक्यावर छत्री घेणें म्हणजे केवढातरी प्रमाद समजला जातो. ह्या नेहमींच्या अत्यवश्यक पदार्थांचा उपयोग करण्याला प्रतिबंध असल्यामुळें स्त्रियांची फार गैरसोय होते, व कित्येक वेळां तर ह्या गैरसमजुतीमुळें त्यांच्या शरीरावरही वाईट परिणाम होतात. भरदोनप्रहरीं उन्हांतून कामानिमित्त बाहेर पडावयाचें असेल तर तापलेल्या रस्त्यावरून त्यांना तळमळत व ऊन खात जावें लागतें व पावसांतूनही भिजत जाण्याची पाळी येते. स्त्रिया स्वभावतः कोमल असल्यामुळें त्यांना ह्या पदार्थांची विशेषच अवश्यकता आहे. अशीं दुसरींही अनेक उदाहरणें देतां येतील.

आमच्याच लोकांना अपायकारक सामाजिक चालींनीं ग्रासिलें आहे असें नाहीं. प्रत्येक समाजांत कमीअधिक प्रमाणानें त्या आहेतच. युरोपियन लोकांत रात्रीचा दिवस करून काम करण्याची चाल आहे, त्यामुळें फार वेळ दिव्यांपासून उत्पन्न होणाऱ्या वाईट हवेंत श्वासोच्छ्वास करीत बसावें लागतें. ते दिवसांतून जरी चारदां अन्न खातात तरी त्यांच्या मुख्य जेवणाची वेळ भलतीच ठेविली आहे. अहोरात्र चोवीस तास पचनशक्ति सारखी नसते. दिवसाच्या चढ-उताराच्या मानानें पचनशक्तिही अधिकउणी होत

असते. मुख्य जेवणाची वेळ ज्यावेळीं पचनक्रिया फार जलद होत असेल त्याचे अगोदर ठेविली पाहिजे. परंतु त्यांच्या मुख्य जेवणाची वेळ पचनक्रिया मंद होण्याचे वेळानंतर ठेविली आहे. पोषाखाच्या व इतर नेहमींच्या राहटीच्या संबंधानें त्या लोकांत इतका दिखाऊपणा शिरला आहे कीं, त्यामुळें पुष्कळ लोकांचा बराच वेळ अनवश्यक गोष्टी करण्यांत जात असतो. परस्परांच्या भेटी घेण्याची तर त्यांची तऱ्हा विलक्षणच आहे. ह्या भेटी कांहीं कामाच्या उद्देशानें होत असतात असें नाहीं. कोणी कोणाकडे भेटावयास गेला म्हणजे तो मनुष्य घरीं नसून त्याची भेट झाली नाहीं तर भेटावयास जाणारा मनुष्य आपल्या नांवाची छापील कार्ड त्याच्या चाकराजवळ देऊन परत जातो. मग त्या मनुष्यानें पुन्हां परतभेट दिली पाहिजे. पुष्कळ वेळां आपण भेटावयास आलों होतों असें दाखविण्याकरितां, ज्यांना भेटावयाचें असेल ते घरांत नसतील असा अजमास पाहूनच लोक भेटावयास जातात. भेटावयास न जातां चाकराबरोबर आपल्या नांवाच्या कार्डा पाठविण्याचीही चाल आहे. ज्यांच्याकडे ह्या कार्डा आल्या असतील त्यांनीं आपल्या नांवाच्या कार्डा पुन्हां परत पाठविल्या पाहिजेत. स्त्रियांमध्यें हा प्रकार फार आहे.* अशीं अनेक उदहरणें देतां येतील. सामाजिक रूढाचारांचे गुलाम होऊन राहिल्यानें मनुष्यांना होणारा त्रास दुर्लक्ष करण्यासारखा नाहीं. जे लोक ह्या आचारांना धरून वर्तन करितात त्यांना खऱ्या सुखाची प्राप्ति न होतां ते एका प्रकारच्या नकली सुखावरच तृप्त असतात.

सामाजिकव्यवहारांतील नाटकीथाटामुळें, दिखाऊपणांत खऱ्या सुखाचा कसा लोप होतो हें दर्शविणारीं दोन उदाहरणें **स्पेन्सर** साहेबांनीं आपल्या अनुभवांतलीं दिलीं आहेत. बडे लोकांच्या सामाजिक रीतीभातींना कंटाळलेल्या एका श्रीमंत घराण्यांतील बाईशीं स्पेन्सर साहेबांचें संभाषण चाललें असतां आगगाडींतून प्रवास करण्याच्या संबंधानें गोष्टी निघाल्या.

---

* एका वर्तमानपत्रकारानें ह्या प्रकाराची थट्टा करण्याकरितां विनोदानें पुढील सूचना केली होती:-शहरांत प्रसिद्ध ठिकाणीं एक जागा भाड्यानें घेऊन तेथें ह्या कार्डा वांटण्यासाठीं एक कचेरी ठेवावी, व दररोज नियमित वेळीं स्त्रियांनीं आपापले चाकर जरूर तितक्या कार्डा त्यांच्याजवळ देऊन तेथें पाठवावे. ज्यांना ज्यांना म्हणून हा कार्डांचा व्यवहार करणें असेल त्या सर्वांचे चाकर एके ठिकाणीं जमले म्हणजे त्यांना तेथच्या तेथें सर्व कार्डांची देवघेव करितां येईल व घरोघर हिंडण्याचे त्यांचे निरर्थक श्रम वांचतील.

आगगाडींतला प्रवास अतिशय त्रासदायक व कंटाळवाणा असतो असें स्पेन्सर साहेबांनीं आपलें मत दिलें. त्यावर ती बाई म्हणाली: "मला तर आगगाडींत पाय ठेविल्याबरोबर एका प्रकारच्या त्रासांतून सुटल्यासारखें वाटून विलक्षण प्रकारचा आनंद होतो. घरीं असलें म्हणजे आपल्या इच्छेविरुद्ध दिवसांतून दहा वेळ पोषाख बदलण्यांत, भेटी देण्याघेण्यांत, कुटाळक्या करण्यांत, निरर्थक पत्रव्यवहार करीत बसण्यांत व आंतून एक आणि बाहेरून एक असा बेगडी देखावा करण्यांत सर्व वेळ जाऊन जीव अगदीं त्रासून जातो, व अशा प्रकारचें जीवित अगदीं कंटाळवाणें वाटतें." दुसरें उदाहरण इंग्लंड सोडून न्यूझीलंड येथें जाऊन राहिलेल्या स्पेन्सर साहेबांच्या ओळखीच्या दोन गृहस्थांचें आहे. इंग्लंडांतील लोकांचा कळसूत्रीबाहुल्यांप्रमाणें यांत्रिक वर्तनक्रम व त्यांच्याच वसाहतींतील लोकांचें वर्तनस्वातंत्र्य ह्या दोहोंचाही अनुभव ह्या गृहस्थांस घ्यावयास सांपडला होता. श्रीमंत लोक बहुधा देशांतरास जाण्याचा विचार करीत नाहींत. मध्यमस्थितींतले व गरीब लोक ह्या भरीस फार पडतात. ह्या लोकांच्या रीतीभातींत बेगडी प्रकार कमी असतो व परदेशीं गेलेल्या उद्योगी लोकांच्या रीतीभातींत तर तो त्याहूनही कमी होतो. हे दोन गृहस्थ पुष्कळ वर्षें न्यूझीलंडांत राहून तेथील साधे आणि सरळपणाचे व्यवहार अंगवळणीं पडल्यावर पुन्हां इंग्लंडांत परत आले. प्रथमतः त्यांचा विचार म्हातारपणचे दिवस इंग्लंडांत घालवावे असा होता. परंतु तेथल्या वर्तनक्रमांतील कृत्रिमपणाला ते लवकरच कंटाळले आणि परत न्यूझीलंडास गेले.

वरील प्रतिपादनावरून लक्षांत येईल कीं, विचाराच्या दृष्टीनें युक्तायुक्त पाहून सामाजिक रूढाचारांत फेरफार करण्याचा यत्न करणें हें काम इतर सुधारणांहून कमी महत्त्वाचें आहे असें जें कित्येकांचें मत आहे तें खरें धरितां येत नाहीं. उलट, सुखदुःखाच्या कमीअधिकपणावरून जर परीक्षा करावयाची म्हटली तर इतर सुधारणांपेक्षां सामाजिकसुधारणा अधिक महत्त्वाची आहे असा संशय घेण्यास जागा आहे. मनुष्यजातीचें कल्याण करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें सामाजिक आचार व त्यांचीं उपकरणें ह्यांत जितका साधेपणा आणवेल तितका आणण्याचा यत्न करून मनुष्याच्या शक्तीचा निरर्थक व्यय न होईल ह्यासाठीं फार जपलें पाहिजे. हा सामाजिक परोपकाराचा प्रकार प्रत्येक परोपकारी मनुष्यानें लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

ग्रं. प्र. मंडळी म. म. द. वा. पोतदार संग्रह
420

# प्रकरण १५

## राष्ट्रीय परोपकार

"राजकीय कामांत तुम्ही ढवळाढवळ करूं नका" असें इंग्लंडच्या पहिल्या चार्ल्स राजाचें आपल्या प्रजेस सांगणें असे. राजानें अशा प्रकारचा उपदेश आपल्या प्रजेस करावा, किंवा तिच्या हातून वरील इच्छेप्रमाणें वर्तन घडेल ह्याविषयीं यत्न करावा हें स्वाभाविकच आहे. अनियंत्रित सत्ता आपल्या हातांत असावी असें कोणात्या राजाला वाटत नाहीं ? प्रजेनें मात्र राजाच्या इच्छेस मान देऊन तीप्रमाणें वर्तन ठेवणें हें तितकें स्वाभाविक नाहीं. तथापि आजपर्यंतच्या इतिहासावरून पाहतां, राजा व प्रजा ह्यांमधील संबंध बहुतेक राजाच्या इच्छेप्रमाणें चालला आहे व अजूनही कांहीं अपवाद खेरीजकरून जिकडेतिकडे तोच प्रकार आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. राजकीय स्वातंत्र्याचा व हक्कांचा डौल मिरविणाऱ्या देशांतही लक्षावधि लोक पहिल्या चार्ल्स राजानें आपल्या प्रजेसाठीं घालून दिलेल्या नियमानें वागत आहेत. अशा प्रकारें वागण्यांत मोठें भूषण आहे असें मानणारेही पुष्कळ लोक आढळतात. "राजकीय प्रश्नांच्या भानगडींत मी कधीं मन घालीत नसतों" अशा अर्थाचीं वाक्यें अनेक धंदे करणाऱ्या लोकांच्या तोंडून निघत असतात; आणि तीं अशा झोंकानें उच्चारिलीं जातात कीं आपण कांहीं अभिमान बाळगण्यासारखी गोष्ट करीत आहों असा बोलणारांच्या मनांतला भाव ऐकणारांच्या मनांत यावा.

ही मनाची स्थिति पूर्वींच्या एका काळाला योग्य होती व त्यावेळीं ती पूर्णतेस येऊन तिचा अंमल अद्यापि लोकांच्या मनावर शिल्लक राहिला आहे. प्राण्याच्या शारीरिक व मानसिक उत्क्रमणांत एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं, एका प्रकारच्या परिस्थितीमुळें जे शारीरिक व मानसिक विशेष उत्पन्न होतात, ते ती परिस्थिति बदलली तरी एकदम नाहींतसे होत नाहींत. त्यांमध्यें नवीन परिस्थितीस योग्य असा फेरफार होण्याला फार काळ लागत असतो. हीच स्थिति राजा व प्रजा ह्यांच्यामधील संबंधाची झाली आहे. प्राचीनकाळीं "राजा म्हणजे ईश्वराचा अंश" "राजाची आज्ञा शिरसामान्य केली पाहिजे" इत्यादि समजुती लोकांत होत्या. ज्यावेळीं टोळ्याटो-

व्यांमध्यें चाललेल्या युद्धांत सरशी मिळविण्यास टोळींतील मुख्याचा त्या टोळींतील लोकांवर पूर्ण अंमल असणें अवश्य होतें त्यावेळीं ह्या कल्पनांचा उदय झाला असला पाहिजे. अशा स्थितींत व्यक्तीच्या विचारस्वातंत्र्याची व आचारस्वातंत्र्याची कल्पना येणें असंभवनीय होतें. परंतु त्याच स्थितींतून हल्लींचीं युरोपियन राष्ट्रें उत्क्रांत झालीं आहेत व त्यांच्या हल्लींच्या स्थितींत राजकीय कारभारांत लक्ष घालणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य होऊन बसलें आहे. इंग्लिश लोकांच्या सहवासामुळें, व तिकडील राजकीय संस्थांचें वळण इकडील राज्यपद्धतीला देण्याचा जो क्रम त्या लोकांनीं हळूहळू सुरू केला आहे त्यामुळें, आमच्या लोकांनाही आपल्या देशाच्या राज्यकारभाराच्या गोष्टींत मन घातलें पाहिजे. हें कर्तव्य न बजाविणें म्हणजे मनुष्यानें आपणाला अदूरदृष्टित्व, कृतघ्नपणा आणि नीचपणा ह्या तीन दोषांस पात्र करून घेणें होय. सर्व लोक जर राजकीय गोष्टींच्या संबंधानें उदासीन राहूं लागले, तर लोकांच्या उद्योगानें किंवा राज्यकर्त्यांच्या मेहेरबानीनें जे हक्क राष्ट्रास प्राप्त झाले असतील ते नाहींसे होतील, व ज्या उपयुक्त राजकीय संस्था अस्तित्वांत आल्या असतील त्या लयास जाऊं लागतील. ह्यामुळें आपल्या राष्ट्रीय कर्तव्यांत हयगय करणाऱ्या लोकांच्या माथीं अदूरदृष्टित्वाचा दोष येतो. आपल्या देशाभिमानी पूर्वजांनीं किंवा समकालीनांनीं मिळविलेल्या हक्कांविषयीं व उत्पन्न केलेल्या संस्थांविषयीं बेफिकीर असणें म्हणजे त्यांनीं आपणांवर केलेले उपकार विसरणें होय. अशा रीतीनें कृतघ्नपणाचा दोष येतो. आणि नीचपणाचा दोष येण्याचें कारण त्या हक्कांचा व संस्थांचा प्रत्येक मनुष्यास उपयोग होत असून त्यांचें संरक्षण करण्याचें काम मात्र प्रत्येकाकडून होत नाहीं. कोणत्याही गोष्टीचा फायदा घेऊन त्याबद्दल कांहींएक मोबदला न देणें हें नीचपणाचें लक्षण आहे.

कोणत्याही स्वातंत्र्यमूलक राजकीय संस्थेचें अस्तित्व कायम राहण्यास व ती चांगल्या रीतीनें चालण्यास तिच्या घटकावयवांनीं आपापल्या वांट्याचें काम संभाळिलें पाहिजे. ज्यांच्या हातून तें होत नसेल त्यांच्या पुरती तरी ती संस्था मेलेलीच असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. शरीराच्या कांहीं भागांचे व्यापार बंद पडले तरी शरीर जसें जिवंत राहूं शकतें त्याचप्रमाणें असल्या संस्थांचें आहे. शरीराचा अधिकाधिक भाग लुळा पडत चालला तर लवकरच सर्व शरीर जसें नष्ट होतें त्याचप्रमाणें अधिकाधिक लोक असल्या

संस्थांकडे दुर्लक्ष करूं लागले म्हणजे लवकरच त्या लयास जातात. हा प्रकार न होऊं देण्यासाठीं झटणें हें राष्ट्रीय परोपकाराच्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. ह्या कर्तव्याकडे दुर्लक्ष केल्यामुळें स्वतःचे व इतरांचे कोणते तोटे होतात व विशेष लक्ष दिल्यानें कोणते फायदे होतात तें पाहूं.

मनुष्यांच्या पायरीप्रमाणें त्यांजकडे कामें वांटून देऊन तीं त्यांजकडून जुलमानें करून घेण्याची समाजव्यवस्था बंद पडून आपखुषीच्या कराराची व्यवस्था सुरू झाल्यामुळें करार पूर्णपणें पाळिले जाणें अवश्य झालें आहे. मनुष्याच्या जीविताचें व स्वातंत्र्याचें तर रक्षण झालेंच पाहिजे; पण शिवाय मजुरानें कबूल केलेलें काम केल्यावर त्याबद्दल जी मजुरी ठरली असेल ती त्यास बिनहरकत मिळाली पाहिजे; एखाद्या दुकानदाराकडून कोणी कांहीं जिन्नस विकत घेतला तर त्याची किंमत किंवा उभयतांचे विचारें ठरलेला त्याच्या मोबदला दुसरा जिन्नस त्या दुकानदारास परत मिळाला पाहिजे; व कांहीं नियमित अटींवर एकादें काम करावयाचें ठरलें असल्यास त्या अटी अक्षरशः पाळिल्या जाऊन तें काम झालें पाहिजे. कोणी कोणाला प्रत्यक्षरीतीनें त्रास देईल तर त्याचें निवारण फौजदारी कायद्याच्या अंमलानें व्हावें व अप्रत्यक्षरीतीनें म्हणजे करार मोडल्यामुळें झालेल्या त्रासाचें निवारण दिवाणी कायद्यानें व्हावें. हीं कामें योग्य रीतीनें बजाविलीं जाण्याला, प्रत्येक मनुष्य आपापल्या शक्तीप्रमाणें कांहीं अंशानें जबाबदार आहे.

अशा प्रकारची कांहीं जबाबदारी प्रत्येक मनुष्यावर आहे ही कल्पना देखील आजच्या स्थितींत फारशी कोणाच्या डोक्यांत येत नाहीं ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. राष्ट्रीय कारभारांत आपण मन घालावें व राष्ट्राच्या संबंधानें आपलें कर्तव्य करावें असें पुष्कळांच्या मनांत येतें; परंतु हा विषय त्यांच्या मनांत अगदीं येत नाहीं. कोणी प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क लोकांकडून चांगला बजाविला जावा म्हणून खटपट करितो; कोणी प्रतिनिधि निवडण्याचा हक्क अधिक लोकांस मिळावा म्हणून चळवळ करितो; कारखान्यांतील मजुरांकडून दिवसांतून अमुक तासांपेक्षां अधिक काम घेऊं नये म्हणून कोणाचा उद्योग चाललेला असतो; अमक्या पदार्थावर कर बसवावा आणि तमक्यावर बसवूं नये म्हणून कोणी म्युनिसिपालिट्यांच्या कामांत मन घालून शहराला पाण्याचा पुरवठा करणें किंवा घोड्यांच्या गाडीचा लोखंडी रस्ता विकत घेणें इत्यादि कामांची परवानगी मिळविण्याच्या उद्योगांत गुंत-

लेले असतात. परंतु समाजाला अत्यवश्यक अशा गोष्टींकडे कोणी लक्ष देत नाहीं. प्रत्येक मनुष्याला त्याच्या चांगल्या कृत्यांचा पूर्ण फायदा मिळावा व त्याच्या वाईट कृत्यांचे दुष्परिणाम दुसऱ्या कोणास भोगावे लागू नयेत ह्या दोन गोष्टी समाजाच्या स्थैर्याला अत्यंत अवश्य आहेत, व त्या साध्य होण्याला प्रत्येक मनुष्यानें जीं कामें करण्याचें कबूल केलें असेल तीं त्याजकडून करविलीं पाहिजेत व त्यांबद्दल जो मोबदला देण्याचें ठरलें असेल तो त्याला देवविला पाहिजे. राष्ट्राच्या अस्तित्वाच्या मुळाशीं जे प्रश्न आहेत त्यांजकडे दुर्लक्ष होऊन मनुष्याचें लक्ष वरवरच्या गोष्टींकडे लागतें. ज्या प्रजेला मार्ग दर्शविण्यासाठीं कायदे केले जातात त्या प्रजेला ते समजावे ह्याविषयीं ज्या राज्यपद्धतींत पिढ्यानुपिढ्या कांहींएक यत्न केला जात नाहीं तिचा मूर्खपणा लोकांच्या बिलकुल लक्षांत येत नाहीं. आधींच कायद्यांचा केवढा तरी ढीग पडला आहे व त्यांतच कायदे करणाऱ्या मंडळ्या दर वर्षी आणखी भर घालीत आहेत. कायदे करणाऱ्या मंडळ्या म्हणजे कायदे उत्पन्न करणारीं यंत्रेंच होत. हीं यंत्रें इतक्या झपाट्यानें काम करितात व इतके नवेनवे कायदे तयार करितात, कीं जुने कायदे व नवे कायदे ह्यांचा एकच घोंटाळा होऊन गेलेला आहे. ह्या सर्व गोष्टींकडे लोक शून्यदृष्टीनें पाहत असतात. वीज पडून घर जळणें, वादळांत सांपडून तारूं फुटणें इत्यादि आकस्मिक गोष्टींचे परिणाम ज्याप्रमाणें कपाळाला हात लावून मनुष्यें निमूटपणें सहन करितात, त्याचप्रमाणें कायद्याच्या अपुरतेपणामुळें केव्हां मुदतींत फिर्याद झाली नाहीं म्हणून, केव्हां कमी किंमतीचें तिकीट लाविलें म्हणून, केव्हां बारा वर्षांवर चालू वहिवाट झाली म्हणून वगैरे क्षुल्लक चुक्यांसाठीं न्यायाच्या कोर्टांत होणारे अन्यायही सहन करण्याची त्यांस संवय झाली आहे. शिवाय सरकारमार्फत कोणत्याही गोष्टीची दाद लाविणें म्हणजे मोठ्या खर्चाची बाब आहे. ज्या रकमेसाठीं फिर्याद करावयाची त्या रकमेचा बराच भाग फिर्यादीच्या खर्चांत गडप होऊन जातो. श्रीमंत आणि गरीब ह्यांची झटापट लागली तर श्रीमंतलोक अपिलांवर अपिलें करून गरीबांचा अगदीं चुराडा उडवितात. आणि ह्या सर्व गोष्टी मनांत आणून वरेच लोक सरकारांत दाद मागावयास जाऊन आणखी खर्चांत न पडतां आपणांवर झालेले अन्याय निमूटपणें सहन करितात.

शासनपद्धतींत इष्ट फेरफार करणें व राज्यव्यवस्था सुधारणें हीं का

देखील राष्ट्रीय परोपकाराचींच आहेत, परंतु ह्यापेक्षां लोकांवर होत असलेले अन्याय त्यांना सहन करावे लागत असल्यामुळें जे अनर्थावह परिणाम होतात ते नाहींसे करण्याचा यत्न करणें हें काम अधिक महत्त्वाचें आहे. मनुष्यांचे व्यवहार अन्यायानें होत असल्यामुळें त्यांना अनेक अडचणी सोसाव्या लागतात. बाजारांत कोणताही जिन्नस विकत घ्यावयास गेलें तर बहुधा त्यांत लबाडी आढळल्यावांचून राहत नाहीं. तुपांत चरबी मिसळून तें मिश्रण 'तूप' म्हणून विकावें; तिळांच्या तेलांत आणखी अनेक प्रकारचीं तेलें मिसळावीं; लोंकर आणि कापूस ह्यांचें सूत बरोबरीनें घालून तयार केलेलें कापड लोंकरीचें म्हणून विकावें; चांगल्या मालांत त्याच जातीचा वाईट माल मिसळून तो चांगल्या भावानें विकावा; एका प्रकारचा माल दाखवावा आणि दुसऱ्या प्रकारचा द्यावा; वजनें व मापें खोटीं वापरावीं; इत्यादि फसवाफसवावीचे हजारों प्रकार निर्वाहाच्या पदार्थांच्या देवघेवींत क्षणोक्षणीं होत आहेत आणि हें सर्व होण्याचें कारण मनुष्यें कराराप्रमाणें वागत नाहींत व त्यांजकडून कराराप्रमाणें वर्तन करविण्याचे मार्ग फार कठिण आहेत. ह्याशिवाय कायदेशीर व्यवहारांच्या त्रासामुळें व खर्चामुळें प्रत्येक जिन्नसाबद्दल मनुष्याला अधिक किंमत द्यावी लागते. व्यापारी मंडळ्यांना नेहमीं मोठमोठाले पगार देऊन वकील लोक चाकरीस ठेवावे लागतात व हा खर्च पदार्थांच्या किंमती वाढवून गिऱ्हाइकांपासून घ्यावा लागतो. व्यापाराच्या कामांत अप्रामाणिकपणाचे व्यवहार चालल्यामुळें वारंवार अनेक व्यापाऱ्यांचीं व व्यापारी मंडळ्यांचीं दिवाळीं निघत असून त्यामुळें हजारों लोकांचें नुकसान होत आहे. ह्या अन्यायाची दाद लावण्याला मार्गच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. न्यायदानाचें काम सोप्या रीतीनें, प्रामाणिकपणानें, व थोड्याच खर्चानें होण्याविषयीं खटपट केल्यानें जितका राष्ट्रीय परोपकार होण्याचा संभव आहे तितका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें व्हावयाचा नाहीं हें विचारी मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

लोकांचे रायकीय व्यवहार प्रामाणिकपणानें चालतील तरच राष्ट्राच्या [अं]गीं जोम राहील हें तत्त्व सर्व लोक कबूल करतील, परंतु राजकीय प्रश्नावचर्चा करितांना निरनिराळ्या मताच्या लोकांच्या फळ्या पाडून रणें माजवि[ण्य]ाचा जो प्रकार सर्वत्र चाललेला आहे त्यामुळें अप्रामाणिकपणाचें वर्तन क[रण्य]ां बऱ्याच लोकास भाग पडतें व राष्ट्राला अपाय होतो, ही गोष्ट मात्र पु-

एकळ लोक कबूल करणार नाहींत. तथापि निरभिमानानें विचार करणाऱ्या मनुष्यास ती कबूल करावी लागेल. राजकीय प्रकरणांतील हे आपसांमधील तंटे मिटविण्याविषयीं यत्न करणें किंवा त्यांचे दुष्परिणाम करवतील तितके कमी करण्यासाठीं झटणें हें राष्ट्रीय परोपकाराचें काम आहे. राजकीय प्रश्नांची व्यवस्था लावण्याचें काम ज्या मंडळ्यांच्या हातांत असतें त्यांच्या सभासदांत अनेक तट पडल्यामुळें एका देशांतील लोकांचें कसें नुकसान होतें हें दुसऱ्या देशांतील लोकांच्या लवकर लक्षांत येतें. इंग्लंडांतील लोकांना अमेरिकेच्या स्वतंत्र संस्थानांतील लोकांचे दोष ताबडतोब दिसतात. एका पक्षाच्या हातांतून राज्यसूत्रें दुसऱ्या पक्षाच्या हातांत गेलीं म्हणजे पूर्वीचे मोठमोठे कामगार जाऊन त्यांच्या जागीं एकदम नवे आल्यामुळें राज्यव्यवस्थेचें पूर्वीचें धोरण बदलून कसा घोंटाळा होऊन जातो; बाहेरून आंत येणाऱ्या आणि आंतून बाहेर जाणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या मालांवर जबर कर बसवून उत्पन्न केलेल्या सरकारी पैशाचा प्रतिनिधींच्या निवडणुकीच्या वेळीं खासगी हेतु साधण्याकारितां कसा दुरुपयोग केला जातो; व ह्या गोष्टींमुळें स्वतंत्र संस्थानांतील राज्यपद्धतींतही किती उणेपणा राहिला आहे; ह्या गोष्टींवर इंग्लिश लोक पाहिजे तितकें पांडित्य करूं शकतील. परंतु इंग्लंडचीं राज्यसूत्रें एका पक्षाच्या हातांतून दुसऱ्या पक्षाच्या हातांत गेल्यामुळें त्यांचें स्वतःचें जें नुकसान होतें तें त्यांस दिसत नाहीं.

पाश्चात्य राजकीय संस्थांचें हिंदुस्थानांतील लोकांस नुकतें व शिक्षण मिळूं लागलें आहे व राजकीय व्यवस्थेपैकीं कोणताच महत्त्वाचा भाग लोकांनीं नेमिलेल्या प्रतिनिधींच्या हातांत नाहीं ह्यामुळें इकडील लोकांत राजकीय प्रश्नांसंबंधानें जोरदार पक्ष झालेले नाहींत. जोंपर्यंत हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें परकीयांच्या हातांत राहतील तोंपर्यंत राज्यव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग येथील लोकांचे हातांत येण्याचा संभव नाहीं, व तो आला नाहीं म्हणजे पोकळ चर्चेपलीकडे जाण्याचें येथील लोकांस कारणच पडणार नाहीं. तथापि म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्ड वगैरे हलक्या जबाबदारीच्या कामांच्या ज्या संस्था आपणांवर सोंपविलेल्या आहेत त्यांत देखील इतर लोकांच्या मोठ्या जबाबदारीच्या कामांत होत असलेल्या चुक्या पाहून आपणांस फायदा करून घेतां येईल. राज्यव्यवस्थेचें काम मोठें असो किंवा लहान असो, तें ज्या लोकांच्या हातून व्हावयाचें असतें त्यांच्यामध्यें तट पडले म्हणजे अभिमानामुळें

अप्रामाणिकपणाचें वर्तन मनुष्याच्या हातून होण्याचा संभव असतो. तेव्हां असल्या लहान कामांत देखील फळ्या न पडूं देणें इष्ट आहे.

राज्यकारभाराच्या व्यवस्थेसाठीं प्रतिनिधि निवडून देण्याचे कामीं एक अनिष्ट प्रकार सर्वत्र घडत आला आहे व तो दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावरच आहे. लोकांची मुखत्यारी मिळविण्यासाठीं ज्यांचा यत्न असतो ते आपले स्वतःचे विचार एका बाजूस गुंडाळून ठेवून लोकांचा कल पाहून त्यांच्या तोंडासारखें बोलतात व ज्या गोष्टी करणें अशक्य आहे असें त्यांस पक्कें ठाऊक असतें त्या करण्याविषयीं वचन देतात. सारांश, जेणेंकरून अधिक मतें मिळून आपली निवडणूक होईल अशा प्रकारचें वर्तन त्यांजकडून होत असतें, आणि हें सर्व करण्याचा हेतु आपल्या पक्षाच्या पुढाऱ्यांपासून आपणांस कांहीं फायदा व्हावा व आपलें पाठबळ त्यांस मिळावें. प्रतिनिधि होऊं इच्छिणारांचा हेतु लबाडीनें आपल्या हातांत सत्ता मिळविण्याचा असतो असें म्हटलें असतां थोड्या शब्दांत वरील प्रकाराचें वर्णन होऊं शकेल. हे प्रतिनिधि आपलें प्रतिनिधित्वाचें काम बजावूं लागले असतां त्यांजकडून जे अप्रामाणिकपणाचे प्रकार घडत असतात ते पाहिले म्हणजे त्यांस काय म्हणावें हें समजत नाहीं. स्वतःची समजूत असावी एक व मत द्यावें भलतेंच. वास्तविक कोणत्याही प्रतिनिधीनें ज्या लोकांचा तो प्रतिनिधी असेल त्यांचें हित पूर्णपणें मनांत वागवून एकाद्या प्रश्नाविषयीं जें त्यांचें मत झालें असेल तें त्यानें प्रामाणिकपणानें सांगितलें पाहिजे. लक्षावधि लोकांच्या सुखदुःखाविषयीं ज्यांचा संबंध असतो अशा प्रश्नाचा निकाल ह्या प्रतिनिधींच्या मतांवर अवलंबून असतो; परंतु हे प्रतिनिधि त्या प्रश्नांचा विचार करणें एका बाजूस ठेवून, कोणत्या पक्षाची ( पार्टीची ) सरशी झाली पाहिजे व मोठमोठाल्या पगाराच्या जागा कोणत्या लोकांच्या हातांत असल्या पाहिजेत ह्या गोष्टींकडे लक्ष देऊनच मतें देत असतात.

स्वपक्षनिष्ठेमुळें आपल्या समजुतीविरुद्ध मत देणें भाग पडतें अशी सबब पुष्कळांच्या तोंडून ऐकूं येते. अनियंत्रितसत्तेचा उपयोग करणाऱ्या राजांचें ज्यावेळीं सर्व ठिकाणीं वर्चस्व होतें त्यावेळीं स्वराजनिष्ठेचें मोठें महात्म्य होतें व तें अजूनही बहुतेक तसेंच राहिलें आहे. हल्लीं ज्याठिकाणीं राज्यकारभाराचें काम कांहीं अंशांनीं किंवा सर्वच प्रजेच्या हातांत गेलें आहे, त्याठिकाणीं प्रजेच्या मुखत्यारांत अनेक पक्ष होऊन स्वपक्षनिष्ठा म्हणून एक नवाच

सद्गुण अस्तित्वांत आला आहे ! कोणत्या नीतिशास्त्रांत स्वपक्षनिष्ठेला सद्गुणांत स्थळ मिळालें आहे तें नकळे. आपलीं स्वतःचीं मतें कशींही असलीं तरी आपल्या पक्षांचे पुढारी सांगतील त्याप्रमाणें प्रतिनिधींच्या सभेंत मतें दिलीं पाहिजेत व त्याप्रमाणें आपल्या समजुतीविरुद्ध देखील लोकमत तयार करण्यास झटलें पाहिजे, असा स्वपक्षनिष्ठेचा अर्थ आहे. गाढवावर घोड्याचा पोषाख घालून जसा त्याला घोडा बनविण्याचा यत्न करावा त्याप्रमाणेंच दुर्गुणांवर सद्गुणाचा पोषाख घालून त्याला सद्गुण बनविण्याचा यत्न झाला आहे. नुसत्या भपकेदार नांवांनीं जर दुर्गुणांचे सद्गुण बनते तर काय न होतें ? लोकांचे अंगीं स्वातंत्र्याचा उपभोग करण्याची योग्यता अद्यापि आली नाहीं एवढें मात्र ह्या दुर्गुणाच्या अस्तित्वावरून सिद्ध होतें.

हें स्वपक्षनिष्ठेचें खूळ इतकें माजलें आहे व त्यामुळें लोकांचे विचार व मनोविकार ह्यांत इतका फरक झाला आहे, कीं जे मनुष्य आपापल्या पक्षास चिकटून न राहतां स्वतंत्रपणें वर्तन करूं इच्छितात त्यांना नानाप्रकारचीं उपरोधिक नांवें मिळून त्यांचा छळ केला जातो व राष्ट्रीय सुधारणेला प्रतिबंध केल्याचा दोष त्यांचे माथीं मारिला जातो. इंग्लंडापेक्षां अमेरिकेंत निरनिराळ्या मतांच्या पक्षाची घटना अधिक पद्धतवार आहे व त्यामुळें मतदारांच्या स्वातंत्र्याला विशेष धक्का पोंचतो. प्रतिनिधींच्या निवडणुकीच्या वेळीं अडाणी लोकसमुदायाचा बऱ्याच विचारी लोकांवर शुद्ध जुलूम होतो. अविचारी लोकांबरोबर मतें देण्याच्या ठिकाणीं जाऊन त्यांच्या इच्छेप्रमाणें मत देणाऱ्याच्या वाटेस कोणी जात नाहीं. परंतु कोणीं त्याच्या विरुद्ध मत दिल्यास ते त्याची हुर्यो करून त्याला नकोसें करून टाकितात. पक्षाभिमानामुळें अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांत सुद्धां मतस्वातंत्र्याचा उपयोग करणें म्हणजे एकप्रकारचा गुन्हा करणें असें झालें आहे. वरवर पाहणाराला प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेचा भास होईल, परंतु अंतःस्थिति भिन्न आहे. बाहेरून दिसण्यांत जरी प्रजेनें आपल्या खुषीनें निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हातांत राज्यसूत्रें आहेत असें दिसतें, तरी खरा सूत्रधारपणा मोठमोठ्या हुद्याच्या जागांवर असलेले कामगार व त्या जागा मिळविण्याविषयीं यत्न करणारे लोक आणि त्यांचे साथीदार ह्यांजकडे असतो.

राष्ट्रांतील लोकांमध्यें अनेक फळ्या पडल्या असतां ज्या फळींतील लोकांची सरशी होते तिच्या हातांत राज्यसूत्रें गेल्यामुळें, राष्ट्राच्या इच्छेप-

माणें राज्यव्यवस्था चालविण्यास मदत होते असें कित्येकांस वाटत असतें, परंतु तें चुकीचें आहे. पुष्कळ वेळां अशा व्यवस्थेमुळें राष्ट्राच्या इच्छेविरुद्ध गोष्टी होत असतात. निवडणुकीच्या वेळीं एका पक्षाची सरशी झाली तर त्यावरून ज्या प्रश्नाकडे सगळ्या राष्ट्राचें लक्ष लागलेलें असेल त्यासंबंधानें राष्ट्राचें मत त्या पक्षाच्या मतासारखें आहे एवढें गृहीत घेतां येईल. परंतु एकदां राज्यसूत्रें ह्या पक्षाच्या पुढाऱ्यांच्या हातांत गेलीं म्हणजे बहुतेक प्रश्नांचा निकाल त्या पक्षाच्या पुढाऱ्यांच्या इच्छेप्रमाणेंच होत असतो. पुष्कळ मतदारलोक उमेदवारांच्या भुलथापांना भुलून त्यांना मतें देतात व पुढें पस्ताव्यांत पडतात. निवडणुकीसाठीं यत्न करणाऱ्या उमेदवारांचें सर्व लक्ष मुख्यप्रश्नावर लागून राहिलें असतें व इतर प्रश्नांच्या संबंधानें ते लोकांना पाहिजे तशीं वचनें देत असतात. एकदां निवडणुकी झाल्या म्हणजे बहुतेक प्रतिनिधि पूर्णपणें आपापल्या पक्षाच्या पुढाऱ्यांच्या ताब्यांत असतात, व त्याच्या धोरणानेंच ते मतें देत असतात. ह्यामुळें अधिकारारूढ पक्षाच्या पुढाऱ्यांना आपल्या इच्छेप्रमाणें पुष्कळ गोष्टी करावयास सांपडतात. हे पुढारी इतर प्रतिनिधींच्या स्वपक्षनिष्ठेच्या बळावर असे अनेक कायदे करूं शकतात कीं, ज्यांच्याबद्दल प्रतिनिधि निवडणारांचीं मतें घेतलीं असतां ते पसंत होणार नाहींत. राष्ट्राच्या इच्छेप्रमाणें राज्यकारभार चालावा हा प्रतिनिधींवर सोंपविलेल्या राज्यव्यवस्थेचा हेतुही पक्षाभिमानामुळें तडीस जात नाहीं. एकादा जुलमी राजा ज्याप्रमाणें आपल्या इच्छेनें सर्व राष्ट्राला वांकवितो त्याप्रमाणें अधिकारारूढ पक्षाचा पुढारी कांहीं काळपर्यंत सर्व राष्ट्राला मुठींत ठेवितो.

"पण दुसऱ्या कोणत्या रीतीनें हीं कामें करितां येण्यासारखीं आहेत?" हा प्रश्न हल्लींच्या राज्यपद्धतीच्या कैवाऱ्याकडून विचारिला जातो. हा प्रश्न विचारण्यांत चालू पद्धतीचें समर्थन करण्याचा त्यांचा हेतु असतो. ह्या पद्धतीचे पोवाडे गाणाऱ्या एका अमेरिकन ग्रंथकाराच्या लेखणींतून पुढील वाक्यें निघालीं आहेत:—"कोणत्याही सार्वजनिक प्रश्नासंबंधानें एक त्याच्या तर्फेनें व दुसरी त्याच्या विरुद्ध अशा दोन फळ्या असल्या पाहिजेत. तात्कालिक फलाकडे लक्ष द्यावयाचें असल्यास दोहोंहून अधिक फळ्या होणें कधींही संभवनीय नाहीं." ह्या विचारसरणींतील पोकळपणा तेव्हांच लक्षांत येण्यासारखा आहे. एकाच प्रश्नाच्या संबंधानें दुफळी झाली असेल व

त्या प्रश्नाची वाट लागल्याबरोबर दुफळी मोडत असेल तर वरील विचार ह्या ठिकाणीं लागू पडतील. परंतु एका प्रश्नावर झालेल्या दुफळीनें जेथें इतर प्रश्नांचा निकाल लागतो तेथें ह्या सिद्धांताचा काय उपयोग ? एकाच प्रश्नासंबंधानें एका पक्षांतील लोकांचीं मतें त्यांच्या पढाऱ्यांच्या मतासारखीं असलीं तरी जोंपर्यंत त्या पक्षाच्या हातांत सत्ता असेल तोंपर्यंत जितके प्रश्न उद्भवतील तितक्या सगळ्या प्रश्नांवर त्यांचीं मतें त्यांच्या पक्षाग्रणींच्या मतांसारखीं असतील अशी कल्पनाही संभवत नाहीं. चालू पद्धतीचें समर्थन करण्यासाठीं वरच्या सारखाच आणखी एक प्रश्न विचारिला जात असतो. "कोणत्याही पक्षांतील लोकांनीं आपल्या पुढाऱ्यांच्या धोरणानें जर मतें दिलीं नाहींत तर एकाच प्रधानमंडळाच्या हातांत पुष्कळ दिवस राज्यकारभार रहावा कसा ? आणि प्रत्येक प्रश्नावर मतभेद होऊन जर निरनिराळ्या फळ्या होऊं लागल्या, व आज हें प्रधानमंडळ तर उद्यां दुसरें अशी स्थिति होऊं लागली तर राज्यव्यवस्थेचें तारूं कोणीकडे भडकत जाईल ह्याची कल्पना करवेल काय ?" एका गोष्टींत फेरफार होईल असें गृहीत धरून बाकीच्या गोष्टी जशाच्यातशाच राहतील अशी कल्पना केल्यामुळें जीं चुकीचीं अनुमानें निघतात त्यांचेंच उदाहरण वरील प्रश्नांत मिळण्यासारखें आहे. राज्यकारभारांत पडणारे लोक जर प्रामाणिकपणें वागूं लागले, तसें वागण्याचा परिणाम जर प्रत्येकानें आपल्या समजुतीप्रमाणें मत द्यावें असा झाला, आणि ह्यामुळें जर हल्लींप्रमाणें प्रतिनिधींच्या दोन मुख्य फळ्या न होतां लहानलहान पुष्कळ फळ्या झाल्या व पुष्कळ प्रतिनिधि कोणत्याही फळीला न मिळतां स्वतंत्ररीतीनें वागूं लागले, तर आपलें मताधिक्य होईल अशी प्रधानमंडळाला कधींही खात्री वाटणार नाहीं; व अभिमानास पडून पाहिजे तसें वर्तन करण्याला प्रधानमंडळापैकीं कोणी धजणार नाहीं. अशा स्थितींत आपल्या बाजूचें मताधिक्य झालें नाहीं तरी कोणाला राजीनामा देण्याचें कारण पडणार नाहीं. प्रधानमंडळाच्या विरुद्ध प्रतिनिधींच्या सभेचें मत पडलें तर प्रतिनिधींच्या म्हणजे राष्ट्राच्या मताप्रमाणें कोणत्याही प्रश्नाचा निकाल लागला म्हणजे झालें. हल्लीं प्रधानमंडळाकडे धनीपणा आला आहे व प्रतिनिधींच्या सभेकडे सेवाधर्म गेला आहे; ती स्थिति बदलून प्रतिनिधींच्या सभेकडे तिचा स्वाभाविक धनीपणा जाईल व प्रधानमंडळ ह्या सभेचें अंकित होऊन राहील. प्रधानमंडळानें ठराव करावे व प्रतिनिधींनीं त्यांना माना डोलवाव्या हा प-

कार नाहींसा होऊन प्रतिनिधींच्या सभेनें ठराव करावे व प्रधानमंडळानें ते अमलांत आणावे असा प्रकार सुरू होईल. मग कोणत्याही प्रश्नाचा निकाल प्रतिनिधींमध्यें जे पुष्कळ लहानलहान पक्ष झालेले असतील त्यांपैकीं बऱ्याच पक्षांच्या मताच्या धोरणानें होत जाईल व त्यांत राष्ट्राचें मत प्रतिबिंबित झालेलें दिसेल. अशा व्यवस्थेनें प्रत्येक प्रश्नाचा निकाल लावण्यास वेळ फार लागेल असाही आक्षेप कित्येकांकडून येईल, परंतु वेळ लागण्यांतच राष्ट्राचा फायदा आहे हें सिद्ध करणें फारसें कठिण नाहीं. राज्यव्यवस्थेंत जे फेरफार व्हावयाचे ते त्यांची चांगली भवतिनभवति होऊन व अनेक अडचणींतूनच पार पडून घडून येणें इष्ट आहे.

परंतु हे विचार एकीकडे ठेवून नीनितत्त्वांच्या दृष्टीनें पाहिलें असतां हल्लीं चाललेला प्रकार अनीतिकारक आहे असें स्पष्ट दिसतें. मनांत एक व बाहेर एक, बोलावयाचें निराळें आणि करावयाचें निराळें, अशा वर्तनाला हल्लींच्या व्यवस्थेनें चोहोंकडे उत्तेजन मिळत आहे. ह्या गोष्टींना नीतिशास्त्राचें पाठबळ कधींही मिळणार नाहीं. परोपकाराचा उगम सदाचारमूलक नीतितत्त्वांपासून आहे व ह्यामुळें सत्य आणि परोपकार ह्यांची सांगड कधींही तुटणार नाहीं. म्हणून राजकीय कर्तव्यें बजाविण्यांत लोकांकडून जें असत्याचरण होत आहे तें नाहींसें करण्यासाठीं यत्न करणें हा राष्ट्रीय परोपकार होईल.

न्यायतत्त्वांना अनुसरून केलेले कायदे राष्ट्रांतील सर्व लोकांना कळविणें, व त्यांच्या अनुरोधानें त्यांजकडून वर्तन करविणें, आणि राजकीय प्रश्नांची चर्चा करितांना व मतें देतांना लोकांकडून प्रामाणिकपणाचें अवलंबन करविणें ह्या गोष्टींच्या अवश्यकतेबद्दल एवढा वेळ विचार झाला. आतां राष्ट्रीय परोपकारांत अंतर्भूत होणाऱ्या आणखी एका गोष्टीचा विचार करूं.

राज्याधिकाराचा अंमल बजाविण्याचें काम सचोटीनें व हुषारीनें होण्यास प्रथमतः निरनिराळ्या स्थळांचे व वर्गांचे प्रतिनिधि निवडण्याचें काम काळजीपूर्वक व चोख झालें पाहिजे. ह्या गोष्टींत सुधारणा करण्याची अवश्यकता बऱ्याच लोकांस वाटते, परंतु त्यासंबंधानें व्हावा तितका यत्न होत नाहीं. मतदारांना प्रतिनिधि निवडून देण्याच्या संबंधानें आपलें कर्तव्य काय आहे ह्याची बरोबर कल्पना नसते. जे उमेदवार पुढें आले असतील त्यांपैकीं आपलें प्रतिनिधित्व करण्याची अधिक योग्यता कोणाचे अंगीं आहे तें पाहून

मत देण्याची अवश्यकता तर आहेच, परंतु त्यापूर्वी चांगले लोक उमेदवार होण्यासाठीं पुढें येऊन निवडणूक चांगली होईल अशाविषयीं यत्न केला पाहिजे. पुढें आलेल्या उमेदवारांतून निवड करण्याचें काम जरी बऱ्याच चांगल्या रीतीनें होतें, तरी उमेदवार पुढें आणण्यासाठीं जी लोकांची निवड होते ती लबाडीनें केलेली असते. वास्तविक उमेदवारांच्या जागीं योजना करण्यासाठीं चांगल्या लोकांची निवड करणें हें कामच अधिक महत्त्वाचें आहे. कारण अंतःस्थ सूत्रें ज्यांच्या हातांत असतात त्यांनी जर अ आणि ब ह्या दोन मनुष्यांस उमेदवार म्हणून पुढें केलें आणि ते दोघेही मनुष्य त्या कामास योग्य नसले, तर त्या दोघांपैकीं पाहिजे त्याला निवडून देण्याचें मतदारांना कितीही स्वातंत्र्य असलें तरी तें निरुपयोगी होतें. इंग्लंडांत उमेदवार ठरविण्याची व्यवस्था पुढें दिल्याप्रमाणें होतेः—लंडन शहरांत प्रत्येक पक्षाचे जे पुढारी असतात त्यांच्या हुकुमांत राहणारे त्यांच्या पक्षाचे अनुयायी प्रत्येक निवडणुकीच्या स्थळीं असतात. हे निरानिराळ्या पक्षाचे ठिकठिकाणचे एजंटच म्हटले तरी चालतील. ह्या एजंटांनीं मतदारांस दोनतीन नांवें सुचवावीं व त्यांपैकीं त्यांस पाहिजे तें नांव पसंत करण्यास सांगावें. वर अ आणि ब चें उदाहरण दिलें त्याप्रमाणें होऊन सुचविलेल्या मनुष्यांपैकीं जो कमी निरुपयोगी असेल त्याचें नांव त्या पक्षाचा उमेदवार म्हणून पुढें केलें जातें. असा जेथें प्रकार चालतो तेथें उमेदवाराच्या अंगीं खरी योग्यता आहे कीं नाहीं ह्याचा विचार व्हावा कसा? अमुक मनुष्य मोठा परोपकारी म्हणून नांवाजलेला असल्यामुळें लोकप्रिय झाला आहे काय? आपल्या पक्षाग्रणीला त्याजकडून मदत होऊन तो नेहमीं त्याच्या धोरणानें वर्तन करण्याचें कबूल करील काय? अमुक प्रश्नासंबंधानें त्याचें मत आपणास पाहिजे तसें आहे काय? तो मोठ्या घराण्यांतला आहे काय? त्याच्या वजनानें त्याला पुष्कळ मतें मिळूं शकतील काय? ह्या व ह्यांसारख्याच दुसऱ्या अनेक प्रश्नांचा विचार करून कोणत्याही पक्षाचे स्थानिक पुढारी उमेदवाराची योजना करीत असतात. उमेदवारांच्या अंगीं वास्तविक ज्या गुणांचें वास्तव्य पाहिजे त्यांची मुळींच कोणी चौकशी करीत नाहीं. राष्ट्रनीतितत्त्वाचें पाय शुद्ध ज्ञान त्यास आहे काय? इतिहासाच्या ज्ञानानें त्यांत भर पडली आहे कीं नाहीं? जबाबदारीच्या राज्यकारभाराच्या कामांचा त्याला अनुभव आहे काय? त्याच्या नेहमींच्या वर्तनांत दूरदर्शीपणा आढळून येतो काय? प्रामाणिकपणा आणि

स्वातंत्र्य हे सद्गुण त्याच्या अंगीं आहेत काय ? जी गोष्ट त्याला पसंत नाहीं किंवा जी त्याच्या हातून होण्यासारखी नसते ती करण्याविषयीं पोकळ वचनें देऊन मागून फसविण्याची त्याला दुष्ट खोडी नाहींना ? हे प्रश्न कोणाच्या मनांत येतच नाहींत. ह्याचा परिणाम जसा व्हावा तसाच होतो. राजकीय प्रश्नांच्या संबंधानें अगदीं अपरिचित, लोकप्रियता संपादन करण्यासाठीं आतुर झालेले व वेळ मारून नेणारे अशा लोकांनीं पार्लमेंट भरून जातें. त्यांचे विचार त्यांना निवडून देणाऱ्या अडाणी लोकांच्या विचारांहून फारसे अधिक योग्यतेचे नसतात. मनुष्यसमाज म्हणजे एक सजीव संस्था असून तिची वनस्पति व प्राणी ह्यांसारखी वाढ होत असते ही कल्पना त्यांच्या डोक्यांत शिरत नाहीं. लांकडाचा एकादा ओंडा असला तर त्याला तासून पुसून जसा पाहिजे तो आकार देतां येतो त्याचप्रमाणें कायद्यांत फेरबदल करून समाजाला वाटेल तें स्वरूप देतां येईल असें त्यांचें मत असतें. ह्या समजुतीला अनुसरून कायद्याच्या साह्यानें समाजाची स्थिति एकदम पालटावी म्हणून ते यत्न करितात आणि स्वहित व स्वपक्षहित ह्यांच्या पाठीमागें लागून आपण योजिलेल्या उपायांचे समाजावर काय परिणाम होतील ह्याविषयीं विचार करीत नाहींत. राष्ट्रीय परोपकाराच्या दृष्टीनें, प्रतिनिधि निवडून देण्याचा हा मूर्खपणाचा प्रकार बंद करण्याटीं नेटानें यत्न करणें फार अवश्यक आहे. त्याचप्रमाणें मतदारांना हल्लीं केवळ नांवाचा-मात्र हक्क आहे, ती स्थिति नाहींशी होऊन त्यांना खरोखर आपल्या हक्काचा उपयोग करावयास मिळावा व त्यांजकडून निवडले जाणारे प्रतिनिधि हल्लींप्रमाणें पक्षाग्रणीच्या हातांतलीं बाहुलीं नसून कायदे करणाऱ्या मंडळीला शोभण्यासारखे सभासद असावे असा निवडणुकीचा नवा मार्ग प्रचारांत आणण्याचा यत्न करणें फार अगत्याचें आहे.

स्थानिक कौन्सिलें, म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्ड वगैरे मंडळ्यांचे सभासद निवडण्याची जेव्हां वेळ येते, तेव्हां सभासद निवडून देण्याचें काम ज्यांच्याकडे असतें त्यांच्यामध्यें त्यांचे पुढारी चळवळ करूं लागतात. एकदां त्या पुढाऱ्यांना मतें मिळून निवडणुकीचें काम पुरें झालें म्हणजे प्रतिनिधि निवडून देणारे लोक पूर्वीप्रमाणें खुशाल झोंपीं जातात. मग ह्या मंडळ्यांचें काम कसें चालतें व आपण निवडून दिलेले प्रतिनिधि आपलें काम योग्यरीतीनें बजावितात कीं नाहीं, हें पाहण्याची कोणास बुद्धि होत नाहीं. एकादा

हयगयीचा किंवा लांचलुचपतीचा प्रकार त्यांचेपुढें कोणीं आणिला तरी देखील त्याचा पुरा तपास करून अपराध्याला योग्य शासन होईल अशा तजविजीस लागण्याचें कोणाच्या मनांत येत नाहीं. कोणी दुकानदारानें ह्या भानगडींत पडावें तर जो लबाडीचा प्रकार झाला असेल त्याशीं त्याच्या कांहीं गिऱ्हाइकांचा तरी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असतोच आणि त्यांच्या विरुद्ध खटपट केल्यानें त्याची गिऱ्हाइकी कमी होणार म्हणून तो ही गोष्ट आपल्या अंगाबाहेरच टाकीत असतो. डाक्टराची तीच स्थिति होते. ज्या लोकांचा निष्काळजीपणा किंवा खोटेपणा उजेडांत आणावयाचा असतो त्यांच्याकडेच प्रत्यक्ष जरी त्याची वैद्यकी चालत नसली तरी त्यांच्या अनेक मित्रांशीं त्याचा स्नेह असतो व त्यांच्यापासून त्याला बरीच प्राप्ति असते. हे मित्र जेणेंकरून दूर होतील व प्राप्तीलाहि थोडाबहुत धक्का बसेल अशा प्रकारचें वर्तन करण्याला त्याचें काय अडलें आहे! पैशाच्या संबंधानें ज्यांचें कोणत्याही प्रकारचें नुकसान होण्याचा संभव नाहीं असे पैसेवाले लोक सुद्धां ह्या भानगडींत पडूं इच्छीत नाहींत. कारण लोकांची अप्रीति करून घेण्याचें काम कोणीं करावें? त्यांना पक्कें ठाऊक असतें कीं, अशा प्रकारच्या भानगडींत पडल्यानें नवीन शत्रु मात्र पुष्कळ उत्पन्न होतील; परंतु नवीन मित्र जोडण्याची आशा नको. ह्याशिवाय दुसरे पुष्कळ लोक असे असतात कीं, वरील कारणांचा जरी त्यांच्यावर परिणाम झाला नाहीं, तरी ज्या गोष्टीनें स्वहित साधत नाहीं तिच्यासाठीं विनाकारण त्रास काय म्हणून करावा हें त्यांस समजत नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें सार्वजनिक कामांत लबाडीचे प्रकार राजरोस चालत असतात.

राज्यव्यवस्थेच्या बहुतेक खात्यांची हीच स्थिति असते व लोकांना आपल्यावरची जबाबदारी बिलकुल कळत नाहीं. राजकीय संबंधाचीं स्थानिक व इतर ठिकाणचीं कामें व्यवस्थित रीतीनें व प्रामाणिकपणानें चाललीं आहेत कीं नाहींत हें पाहणें, व कोठें काळेंबेरें दिसल्यास तें उजेडांत आणून अधिकारी लोकांना चांगली दहशत पडेल अशा रीतीनें त्यांच्या कामावर नजर ठेवणें हें राष्ट्रीयपरोपकाराच्या दृष्टीनें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.*

---

* म्युनिसिपालिट्यांच्या निष्काळजीपणामुळें हजारों लोकांना त्रास होत असतां तो दूर करण्याचें कोणाच्या हातून घडत नाहीं. सभासदाजवळ गोष्ट काढिली असतां, आपल्या अधिकाराबाहेरची ती गोष्ट आहे असा त्याजकडून जबाब मिळेल. ज्या लोकांचे हातीं अधि-

" सार्वकालिक दक्षता ही स्वातंत्र्याची किंमत आहे " असें एका अमेरिकन ग्रंथकाराचें म्हणणें आहे. स्वातंत्र्याचे फायदे होण्यास ज्याप्रमाणें दक्षतेची जरूर आहे त्याचप्रमाणें सार्वजनिक संस्थांचीं कामें सुव्यवस्थित चालण्यास सर्वकाळ दक्षता राखिली पाहिजे. मनुष्यस्वभावांत जो उणेपणा राहिला असेल तो मनुष्यांनीं चालविलेल्या संस्थांमध्येंही दिसून येणारच. परंतु त्या संस्थांमधील दोष जर बाहेर काढिले नाहींत व ते कमी करण्यासाठीं एकसारखा यत्न चालू ठेविला नाहीं तर त्यांची स्थिति फार शोचनीय होईल.

ह्याकरितां राष्ट्रीय परोपकराच्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्याचें जें कर्तव्य आहे त्याजकडे लक्ष देऊन, जेव्हां एकादा निष्काळजीपणाचा किंवा लबाडीचा प्रकार नजरेस येईल तेव्हां त्याला भयंकर स्वरूप येईपर्यंत वाट न पाहतां ताबडतोब त्याचें निर्मूलन करण्याविषयीं यत्न केला पाहिजे. ज्या अव्यवस्थेच्या व अप्रामाणिकपणाच्या कामांनीं अनेक संस्था अगदीं निरुपयोगी किंवा अपायकारक होऊन जातात त्यांचें मूळ पाहूं गेलें असतां अगदीं क्षुल्लक गोष्टींत असतें. प्रथमतः बारीकसारीक गोष्टींत अपराध होऊं लागतात व त्यांजकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं म्हणजे ते करणारांचा धीर चेपत जातो व मोठमोठाले अपराध करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते. हा प्रकार वाढतांवाढतां त्याचा इतका विस्तार होतो व इतक्या मनुष्यांचा त्या प्रकाराशीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध पोचतो, कीं तो नाहींसा करणें अशक्य होऊन जातें. अत्यंत क्षुल्लक गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यानें त्यांना कालांतरानें कसें भयंकर स्वरूप येतें ह्याचीं उदाहरणें जडसृष्टींत देखील आढळून येतात. पाणी अडविण्यासाठीं जेथें दगड, भिंती किंवा तट घातलेले असतात तेथें त्यांजकडे नेहमीं लक्ष द्यावें लागतें. जरूर नाहींशी झाल्यामुळें किंवा हयगयीमुळें जर अशा एकाद्या भिंतीकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं, तर तिच्या कांहीं भागांतून पाणी झिरपून बाहेर जाऊं लागतें. हा क्रम तसाच चालू राहिला म्हणजे भिंतीतील छिद्रें किंचित् मोठीं होऊन त्यांतून बारीक धारा पडूं लागतात व दगडांना जोडून धरणारा चुन्याचा थर हळूहळू धुपून जातो. अशीच स्थिति आणखी कांहीं काळपर्यंत चालू राहिली तर त्या भिंतीचा एकादा भाग पडून जातो

---

कार असतो ते लोक आपला अधिकार नीटरीतीनें बजावीत नाहींत आणि हा अधिकार त्यांच्यावर सोंपविणारे लोक एकदां निवडणुकीच्या वेळीं मतें देण्यापुरते जागे होऊन नंतर निजून राहणारे असतात.

व एकदम पाणी आंत शिरून राहिलेली भिंतही वाहून जाते. ह्याप्रमाणेंच एकाद्या संस्थेंत क्षुल्लक गोष्टींसंबंधानें अफरातफर होण्यास सुरुवात होते व लोकांच्या उदासीनपणामुळें तिकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं म्हणजे तो प्रकार दिवसेंदिवस वाढत जाऊन सरतेशेवटीं सगळ्या संस्थेचा घात होतो.

स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठीं जशी नेहमीं दक्षता राखावी लागते तशीच सचोटीचें रक्षण करण्यासाठींही नेहमीं सावधगिरी राखिली पाहिजे; व ती राखण्यास लोकांचें वर्तन ज्या तत्त्वावर चाललेलें असतें त्याच्या अगदीं विरुद्ध तत्त्वाचें अवलंबन केलें पाहिजे. सार्वजनिक कामांत काय किंवा खासगी व्यवहारांत काय, जोंपर्यंत अव्यवस्थेचा किंवा अप्रामाणिकपणाचा प्रकार कोणीं सिद्ध करून दाखविला नाहीं तोंपर्यंत सर्व कारभार सुरळीत चालला आहे असें गृहीत धेऊन पुष्कळ लोक चालतात; परंतु जोंपर्यंत कोणत्याही व्यवहाराचा व्यवस्थितपणा किंवा प्रामाणिकपणा सिद्ध झाला नाहीं, तोंपर्यंत त्याच्या उलटच कल्पना करून चालणें बरें. चांगली चौकशी न करितां उगीच एकाद्या मनुष्याविषयीं किंवा संस्थेविषयीं वाईट ग्रह करून ठेवणें चांगलें नाहीं; पण त्यांच्याशीं व्यवहार करण्याचा प्रसंग आल्यास पूर्ण अनुभवावांचून त्यांच्या प्रामाणिकपणावर विश्वास न ठेवितां, त्यांचा अप्रामाणिकपणा गृहीत धरूनच दक्षतेनें वर्तन करणें चांगलें. दुष्टपणा मनुष्याच्या हाडीं खिळून गेलेला आहे अशा अर्थाचे उद्गार अनुभवी मनुष्याच्या तोंडून अनेक वेळां बाहेर पडतात; व वर्तमानपत्रांतून हरहमेश नानाप्रकारच्या लबाड्याचे प्रकार प्रसिद्ध केले जातात. मनुष्याची बुद्धि जसजशी वाढत जाते तसतशी चांगल्या गोष्टींप्रमाणेंच वाईट गोष्टींतही त्याची विलक्षण करामत दिसून येते. आज एक कंपनी उभारावी व उद्यां तिचें दिवाळें काढून आपला लाट साधून ध्यावा, असे प्रकार प्रतिष्ठित म्हणून नांवाजलेल्या लोकांच्या हातून सुद्धां घडतात. मोठमोठाल्या कामगारांनीं लांच खाल्लेला किंवा दिलेला उघडकीस येऊन त्यांस शिक्षा झाल्याचीं उदाहरणेंही कधींकधीं घडून येतात. असे प्रकार बाहेर पडतात त्यांच्या अनेकपटीनें होत असतात. हें सर्व डोळ्यांपुढें असतांही आपला ज्यांशीं संबंध आहे अशा सार्वजनिक संस्थांची कामें कोणत्याही प्रकारची लबाडी न होतां चाललेलीं आहेत असा लोकांचा समज असतो. लबाडी होऊं नये, म्हणून प्रत्येक मनुष्य कोणाला पैसा द्यावयाचा झाला असतां त्याची पावती घेतल्यावांचून राहत नाहीं; कायदेशीर

कागदपत्र करणें झाल्यास, कोणत्याही प्रकारचा गैरसमज होऊं नये म्हणून कितीतरी काळजी घेतली जाते; पळून जाण्याला लहानशी वाट सांपडली कीं तिचा उपयोग करून घेणारे लोक थोडे नाहींत हें लक्षांत ठेवून कायदे करितांना भाषेचा उपयोग फार जपून केला जातो; व किती जपलें तरी त्यांतूनच चोरवाटा काढून त्यांचा फायदा घेतल्यावांचून लोक राहत नाहींत. ह्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष घडत असतांही विश्वसनीय पुरावा पुढें आल्यावांचून सार्वजनिक संस्थांच्या किंवा सरकारच्या कारभारांत शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं असें पुष्कळांस वाटतें. अनुभवावांचून भलत्याच मनुष्यावर विश्वास ठेविल्यामुळें व फसवणुकींचे प्रकार होऊं न देण्याविषयीं अवश्य तितकी काळजी न घेतल्यामुळें व्यापारी पेढ्या व कंपन्या ह्यांचीं नेहमीं दिवाळीं निघत आहेत व हजारों लोकांचें नुकसान होत आहे तरी लोक जागे होत नाहींत. मोठमोठाले सावकार, कायदे करणाऱ्या मंडळ्यांचे सभासद, राज्यकारभाराचीं महत्त्वाचीं कामें करणारे लोक, ह्यांवर नानाप्रकारचे आरोप होत असतां व पटाईत वकिलांच्या काव्यांचेंही कांहीं न चालतां त्यांपैकीं कित्येकांवर ते आरोप शाबीत होत असतां नेहमीं नवी टूम निघत असते, व तिच्यावर विश्वास ठेवून हजारों लोक फसत असतात.

राष्ट्रीयपरोपकारासाठीं झीज सोसणाऱ्या मनुष्यांनीं सार्वजनिक कामांत ज्या ज्या ठिकाणीं लबाडी होण्याचा संभव असेल त्या त्या ठिकाणीं डोळ्यांत तेल घालून पाहरा करीत बसलें पाहिजे. क्षुल्लक गोष्टींतही कोणी भलत्याच रीतीनें आपल्या अधिकाराचा उपयोग करूं लागेल तर त्यास प्रतिबंध केला पाहिजे. कोणत्याही व्यवहारांत सरळपणाचा मार्ग सुटल्याचा संशय आल्याबरोबर कोणाची भीडमुरवत न धरितां ताबडतोब त्याच्या तलासास लागलें पाहिजे. व हें सर्व केल्यामुळें लोकांनीं नांवें ठेविलीं किंवा छळ केला तरी सर्व निमूटपणें सहन करून आपल्या कर्तव्याकडे दृष्टि ठेविली पाहिजे.

# परोपकाराविषयीं सामान्यतः विचार

निवृत्त्यात्मक व प्रवृत्त्यात्मक परोपकारांवरील अनेक प्रकरणांत ज्या कित्येक गोष्टींचा उल्लेख केला आहे व विशेषतः शेवटल्या कित्येक प्रकरणांत ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांचा परोपकारांत समावेश केलेला पाहून पुष्कळ वाचकांस मोठें आश्चर्य वाटेल. सामाजिक व राष्ट्रीय वर्तनाच्या कांहीं विशेष भागांचा मात्र नीतीशीं आणि नीतीचा अंगभूत जो परोपकार त्याशीं संबंध आहे असा पुष्कळांचा समज आहे. आणि त्यांच्या समजुतीविरुद्ध ह्या पुस्तकांत त्या वर्तनाच्या बहुतेक भागांचा विचार परोपकाराच्या दृष्टीनें केलेला त्यांच्या नजरेस पडेल. परंतु ज्या मताला अनुसरून विषयाचें विवेचन केलें आहे व ज्याचा उल्लेख ह्या पुस्तकांत कित्येक प्रसंगीं केला आहे त्याजकडे वाचकांनीं लक्ष दिलें असतां, परोपकाराचें विवेचन करितांना ह्या गोष्टींचा त्यांच्याशीं संबंध दाखविणें जरूर होतें असें त्यांस दिसून येईल. ज्या वर्तनाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें मनुष्याच्या सुखाशीं किंवा दुःखाशीं संबंध पोंचतो तें नीतिशास्त्रविषयक विचारांचा विषय होऊं शकेल. ज्या वर्तनाचें तत्काल किंवा कालांतरानें सुखांत पर्यवसान होतें तें दुर्वर्तन. मनुष्याच्या वर्तनाचे तीन विभाग करितां येतात व त्यांना अनुसरून नीतिशास्त्राचेही तीन विभाग होतात. मनुष्याच्या आचरणांत कित्येक गोष्टी अशा असतात कीं, त्यांचा परिणाम त्या मनुष्यावरच होत असतो व इतरांशीं त्यांचा संबंध पोंचण्यास तो फारच दूरचा असतो अशा गोष्टींचा विचार करणें हें आत्मनीतिशास्त्राचें काम आहे. दुसऱ्या कित्येक गोष्टी अशा असतात कीं, त्यांचा संबंध समाजांतील इतर मनुष्यांशीं पोंचतो व समाजाचें अस्तित्व शक्य करण्याकरितां ह्या गोष्टींत मनुष्याच्या स्वातंत्र्याला कायद्यानें बंधन घालावें लागतें. ह्या गोष्टींचा विचार करणें हें न्यायनीतीचें काम आहे. आत्मनीति व न्यायनीति ह्या दोहोंत ज्यांचा समावेश होतो त्या गोष्टी वजा केल्या असतां बाकी राहिलेल्या मनुष्याच्या आचरणांतील बहुतेक गोष्टींचा विचार करणें हें परोपकारनीतीचें काम आहे. कारण ह्या बाकी राहिलेल्या मनुष्याच्या आचरणानें इतरांस घडोघडीं सुख किंवा दुःख होत असलें पाहिजे.

वर दिलेल्या विषयविभागाची बरोबर कल्पना करितां आली म्हणजे परोपकाराचें क्षेत्र किती विस्तृत आहे हें ध्यानांत येईल व एवढा वेळपर्यंत ज्या गोष्टींचा परोपकारांत समावेश केला आहे त्यांहूनही अधिक गोष्टींचा

समावेश करावा लागेल असें दिसून येईल. आपल्या सभोंवतालच्या मनुष्यांशीं वर्तन करितांना क्षणोक्षणीं कोणत्या गोष्टी करण्यासाठीं मनाला उत्तेजन दिलें पाहिजे, व कोणत्या गोष्टींत मनाला आंवरून धरणें जरूर आहे; ह्याचा बारकाईनें विचार करूं गेलें तर पुष्कळच विस्तार होईल. क्षणोक्षणीं मनुष्याला इतरांशीं भाषण करण्याचा प्रसंग येतो व त्यावेळीं बोलणाराची शब्दांची योजना करण्याची खुबी, बोलण्याची ढब व आंतील विचारांचें प्रतिबिंब दर्शविणारी मुखचर्या, ह्यांवरून ऐकणारांच्या मनांत प्रसंगानुसार सुखोत्पादक किंवा दुःखोत्पादक विकार उत्पन्न होत असतात; आणि ह्या क्षुल्लक गोष्टींपासून होणारें सुख किंवा दुःख पुष्कळ प्रसंगीं इतरांवर प्रत्यक्ष उपकार किंवा अपकार करण्यासाठीं केलेल्या ठळक कृतींपासून होणाऱ्या सुखापेक्षां किंवा दुःखापेक्षां अधिक असतें. सभोंवतालच्या मनुष्याच्या मनांत अनुकूल किंवा प्रतिकूल वेदना उत्पन्न करणारा जो विशेष मनुष्याच्या स्वभावांत किंवा वर्तनांत आढळून येतो, तो केवळ परोपकारप्रेरित मनोविकारांच्या अस्तित्वावर किंवा अभावावर अवलंबून असतो असें नाहीं. लोकांनीं आपणास चांगलें म्हणावें ही इच्छा प्रत्येक मनुष्याच्या मनांत असणारच; व तीमुळें अनेक प्रसंगीं लोकांस खुष करण्यासारखें वर्तन त्याच्या हातून घडत असतें. परंतु इतरांच्या सुखदुःखामुळें सुखोत्पादक किंवा दुःखोत्पादक मनोविकार उत्पन्न होऊन, केवळ परोपकाराच्या इच्छेनें मनुष्यस्वभावांत जें सौजन्य उत्पन्न होत असतें तें सहज ओळखितां येण्यासारखें असतें. अंतःकरणाच्या कळवळ्यामुळें उत्पन्न झालेल्या स्वाभाविकसौजन्यानें इतरांस जें सुख होतें तें, स्वार्थाच्या हेतूनें दर्शविलेल्या कृत्रिमसौजन्यानें कधींही होणार नाहीं.

सदाचरणाची अत्युच्च कल्पना डोळ्यांपुढें ठेवून व नेहमीं कर्तव्यबुद्धि मनांत वागवून इतर प्रकारचे परोपकार मनुष्य करूं शकेल, परंतु वर सांगितलेला परोपकार त्याच्या हातून घडून येण्याला त्याच्या मनांत आपल्या बांधवांविषयीं प्रेमबुद्धि असली पाहिजे. कांहीं थोड्या मनुष्यांच्या स्वभावांची घटना अशी आढळून येते कीं, तींत हें स्वजातीयांविषयीं प्रेम बरेंच उत्कट असतें व तें त्यांच्या वर्तनांत स्वाभाविक रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतें. अशा मनुष्यांच्या अंगस्वभावांत परोपकाराचा हा भाग भिनून गेलेला असतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. हीं मनुष्यें जवळ असलीं म्हणजे सर्वांना आनंद होतो. तेजोमय पदार्थांपासून प्रकाशाच्या लहरी निघून त्या ज्याप्रमाणें इतर

पदार्थांस प्रकाशित करितात, त्याप्रमाणें ह्या मनुष्यांपासून आनंदाच्या लहरी निघून त्या सभोंवतलाच्या मनुष्यांस आनंदित करितात. ज्यांच्या स्वभावांत ह्या गुणाचा फारच थोडा अंश असतो किंवा त्याचा मुळींच अभाव असतो अशा लोकांचा भरणा फार आढळतो. त्यांनीं सभोंवतालच्या मनुष्यांशीं कोणत्या प्रकारची वागणूक ठेविली पाहिजे तिचें चित्र नेहमीं डोळ्यांपढें वागविलें असतां त्यांच्या वागणुकींत थोडाबहुत इष्ट फेरफार होऊं शकेल; तथापि स्वभावांत फरक पाडणें फार कठिण जातें. कधींकधीं अनिष्ट मनोविकार आपल्या हृदयांत उत्पन्न होत आहे व त्याचा परिणाम आपल्या वागणुकीवर होऊं न देण्यासाठीं त्याला आंवरून धरणें जरूर आहे असा विचार योग्यवेळीं मनुष्याच्या मनांत येऊं शकेल व तत्क्षणींच त्याला आपल्या वागणुकीचा रोंख पालटतां येईल. त्याचप्रमाणें कळवळा दाखविण्याचा प्रसंग नजरेस पडल्याबरोबर त्या प्रकारच्या मनोविकारांना उत्तेजन देऊन मनुष्याला आपल्या चर्येंत व बोलण्याचालण्यांत थोडासा फरक करितां येईल. ह्या परोपकाराच्या दृष्टीनें मनुष्याची नित्याची चालचळणूक कशी असली पाहिजे तें ध्यानांत ठेवून प्रत्येकानें आपल्या स्वभावाला त्या प्रकारचें वळण लाविण्याचा यत्न करावा.

कुटुंबांतील मनुष्यांशीं किंवा इष्टमित्रांशीं वर्तन करितांना ज्याप्रमाणें परोपकाराच्या विचारांचा परिणाम मनुष्याच्या मनावर होणें इष्ट आहे, त्याप्रमाणेंच हाताखालच्या लोकांशीं किंवा सामाजिक स्थितीच्या मानानें खालच्या वर्गांतील लोकांशीं वर्तन करितांनाही तो परिणाम झाला पाहिजे. ह्या लोकांविषयीं कळकळ दाखवून त्यांजवर करितां येणाऱ्या परोपकाराचें क्षेत्र देखील बरेंच विस्तृत आहे. पूर्वीच्या समाजपद्धतींतील क्रमाक्रमानें चढत जाणाऱ्या पायऱ्या व वरच्या पायरीवरील लोकांचे खालच्या पायरीच्या लोकांवरील जुलमी हक्क ह्यांचा पुष्कळ शतकेंपर्यंत मनुष्यांना सहवास घडल्यामुळें त्यांच्या एकमेकांशीं वर्तन करण्याच्या पद्धतींत उच्चनीचपणाचा भाव वारंवार दर्शविण्याचा जो त्यांचा स्वभाव बनून गेला त्याचा बराच अंश अजूनही दृष्टिगोचर होत असतो. समाजांत वरपासून खालपर्यंत हा प्रकार मनुष्यस्वभावांत इतका भिनून गेला आहे कीं, त्याला प्रतिबंध करणें फार कठिण आहे. जरी एकपक्षीं वरच्या वर्गांतील सुस्वभावी व समंजस लोकांना खालच्या वर्गांतील लोकांशीं वर्तन करितांना त्यांचा कमीपणा वारंवार नजरेस

आणणाऱ्या ज्या चाली लोकांत रूढ आहेत त्यांच्याविषयीं तिरस्कार वाटं लागला आहे, व अन्यपक्षीं खालच्या वर्गांतील स्वातंत्र्यप्रिय लोकांनाही त्या प्रघाताची चीड येऊं लागली आहे, तरी मनुष्याच्या हाडीं खिळलेल्या प्रघातांना एकदम रजा देऊन उभयपक्षांत उत्पन्न होणाऱ्या अनिष्ट मनोविकारांचें निर्मूलन करणें संभवनीय नाहीं. पूर्वीची समाजघटना बदलून कराराच्या तत्त्वावर मनुष्याचे व्यवहार होऊं लागल्यापासून खालच्या पायरीवरील लोकांचा अपमान करणाऱ्या बऱ्याच रीतीभातींचा जोर दिवसेंदिवस कमी होत चालला आहे हें निःसंशय आहे. अलीकडे कित्येक ठिकाणीं हा उच्चनीचपणाचा भाव नाहींसा करण्याकडे लोकांचें इतकें लक्ष लागलें आहे कीं, सभ्यपणाच्या कल्पनेंतच हा अनिष्ट प्रकार नाहींसा करणाऱ्या वर्तनाचा समावेश होऊं लागला आहे. सभ्य मनुष्याचें त्याच्या खालच्या पायरीवरील लोकांशीं वर्तन असें असलें पाहिजे कीं, त्याशीं बोलण्याचालण्याला त्यांना संकोच वाटूं नये. मनुष्यांमधील उच्चनीचपणाचा भाव जेणेंकरून विसरला जाईल त्या प्रकारचें परस्परांशीं वर्तन करण्याचा यत्न करणें हें खऱ्या सभ्यतेचें लक्षण मानण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

जेणेंकरून कमी दैववान् मनुष्यांच्या सुखाची वृद्धि होईल असें मनुष्यांमधील दळणवळणाला स्वरूप देण्यासाठीं परोपकाराच्या तत्त्वांचा उपयोग झाला पाहिजे. जोंपर्यंत परस्परांचा समागम असेल तोंपर्यंत तरी अधिकार, संपत्ति, जाति, धंदा इत्यादि भेद मनांत न आणतां सर्वांनीं बरोबरीच्या नात्यानें एका ठिकाणीं बसावें व सुखदुःखाच्या गोष्टी कराव्या असा प्रघात पडल्यानें मनुष्यांमधील भेद बराच कमी होऊन खालच्या वर्गांतील लोकांचें एक दुःखाचें कारण नाहींसें होईल.

ज्यांना हल्लींची समाजस्थिति पसंत नाहीं त्यांना हल्लीं आहे तशी स्थिति येऊन तींत हळूहळू सुधारणा करीत जाण्याचे जे उपाय या ग्रंथांत सुचविले आहेत ते रुचत नाहींत. अनेक प्रसंगीं त्या लोकांच्या विचाराची दिशा दर्शविली आहे व त्यांच्या मतांचें खंडनही केलें आहे. हल्लीं बहुतेक मनुष्यांना जीं असंख्य दुःखें भोगावीं लागत आहेत तीं एकदम नाहींशीं करण्याविषयीं उतावीळ झाल्यामुळें, व हीं दुःखें हल्लींच्या सामाजिक स्थितीमुळें उत्पन्न झालीं आहेत असा त्यांचा पूर्ण ग्रह झाल्यामुळें ज्या उपायांनीं सध्यांच्या स्थितींत एकदम बदल होणें शक्य नाहीं त्या उपायां-

विषयीं त्यांच्या मनांत एकदम तिटकारा उत्पन्न होतो. प्रथम त्यांचें म्हणणें काय आहे तें पाहूं.

"तुमची परोपकाराची इमारत अपकाराच्या पायावर उभारलेली आहे. निवृत्त्यात्मक परोपकाराच्या पहिल्या दोन प्रकरणांत चढाओढीविषयीं आणि कराराविषयीं जे विचार प्रदर्शित केले आहेत त्यांवरून तुमची अशी इच्छा दिसते कीं, हल्लींप्रमाणेंच पुढेंही मनुष्यांनीं स्वार्थासाठीं भांडत रहावें. दुसऱ्या एका ठिकाणीं आपल्या स्थितीहून ज्यांचा स्थिति चांगली आहे त्यांच्यावरही उपकार करण्याची अवश्यकता तुम्हीं दर्शविली आहे. परोपकाराच्या ज्या अनेक प्रकारांविषयीं तुम्ही आपली पसंती किंवा नापसंती दर्शविली आहे त्यांचा विचार करितांना हल्लींप्रमाणेंच पुढेंही श्रीमंत आणि गरीब हा भेद कायम राहील असें गृहीत घेतलेलें आहे. आणि आतांच ह्या प्रकरणांत मनुष्यांनीं परस्परांशीं दळणवळण ठेवितांना कोणत्या प्रकारचें वर्तन करावें ह्याविषयीं जो उपदेश केला आहे तो उच्चनीच वर्ग मनुष्यांमध्यें तसेच चालू राहणार असें गृहीत धरून केला आहे. परंतु पूर्वीपासून चालत आलेल्या समाजव्यवस्थेमुळें उत्पन्न झालेल्या समजुतीपासून ज्यांनीं आपणांस मुक्त केलें आहे त्यांना वर दर्शविलेले मनुष्यांमधील संबंध वाईट असून ते बदलले पाहिजेत असें वाटतें. नीतीच्या व तींत अंतर्भूत होणाऱ्या खऱ्या परोपकाराच्या कल्पनेंत तुम्हीं गृहीत घेतलेल्या वैषम्याला थारा मिळणें शक्य नाहीं. खऱ्या नीतिशास्त्राच्या सिद्धांतांवरून ठरविलेले वर्तनाचे नियम जर अमलांत आणणें असतील तर पहिल्यानें हल्लींच्या समाजव्यवस्थेंतील वर सांगितलेल्या प्रकारचे संबंध एकूनएक नष्ट करून टाकून त्यांच्या जागीं अशा नवीन संबंधांची योजना केली पाहिजे कीं, त्यांत संपत्तिभेद किंवा जातिभेद उत्पन्न होण्याला यत्किंचित्‌ही स्थळ मिळणार नाहीं. अशा प्रकारची व्यवस्था झाल्यानंतर तुम्हीं ज्या गोष्टींचा परोपकारांत समावेश केला आहे, त्यांपैकीं बऱ्याच गोष्टींना त्याठिकाणीं स्थळ मिळणार नाहीं. त्यांपैकीं कित्येक निरर्थक व कित्येक अशक्य होऊन जातील."

केवळ तात्त्विकदृष्टीनें विचार केला असतां वरील आक्षेपास जागा आहे हें कबूल केलें पाहिजे. ज्या सामाजिकस्थितींत वर्गावर्गांतील भेद मनुष्यांच्या मनांत पक्के बाणलेले आहेत त्या स्थितींत मनुष्याच्या सुखाची परमावधि होणें शक्य नाहीं. नैसर्गिक गुणांची सर्वांत सारखी वांटणी होऊन मनुष्यांमध्यें सारखेपण

उत्पन्न होण्याचा तर संभवच दिसत नाहीं, आणि कदाचित् तशी स्थिति येणें शक्य असलें तर ती किती भयंकर होईल ह्याची कल्पना करवत नाहीं; परंतु अशी एक स्थिति प्राप्त होणें शक्य दिसतें कीं, तींत शारीरिक किंवा मानसिक सामर्थ्य, अधिकार, संपत्ति इत्यादि अनेक शक्ति मनुष्यांमध्यें विभागल्या जातांना, प्रत्येक शक्तीच्या वांटणींत जरी सारखेपणा असला नाहीं तरी सरासरीच्या मानानें सर्वांना जवळजवळ सारख्या सुखाचा लाभ व्हावा. एका गोष्टींत एका मनुष्यानें दुसऱ्यावर सरशी केली तर आणखी एखाद्या गोष्टींत दुसऱ्यानें पहिल्यावर करावी. अशा रीतीनें मनुष्यांमध्यें एका प्रकारचा सारखेपणा उत्पन्न झाला तरी इतर प्रकारचें वैचित्र्य कायम राहील आणि समाजांतील उच्चनीच वर्ग नाहींसे होतील. केवलनीतिशास्त्राचा विचार करितांना मनुष्याची व मनुष्यसमाजाची अशीच कांहीं काल्पनिक स्थिति मनांत ठेवावी लागते.

परंतु देशकालवर्तमानाकडे लक्ष देऊन, हल्लीं ज्या स्थितींतून मनुष्यसमाज हळूहळू मार्गक्रमण करीत आहे त्या स्थितीला लागू पडेल अशा प्रासंगिक नीतीचा विचार आपणांस कर्तव्य आहे ही गोष्ट मनुष्याच्या लक्षांत राहत नाहीं. केवलनीतिशास्त्राचे सिद्धांत किरत्याप्रमाणें नेहमीं आपल्या डोळ्यांपुढें ठेविले पाहिजेत व जसजशी वस्तुस्थिति बदलत जाईल तसतसा प्रासंगिकनीतीचा विचार करून ठरविलेल्या वर्तनाच्या नियमांत हळूहळू बदल करीत गेलें पाहिजे. एकदम वस्तुस्थिति पालटणें शक्य नसल्यामुळें ज्या स्थितींत मनुष्याच्या सुखाची परमावधि होणें शक्य आहे त्या स्थितीला लागू पडणारे केवलनीतिशास्त्राचे नियमही एकदम अंमलांत येणें अशक्य आहे.

वस्तुस्थितींत थोडथोडा फेरफार करून जी सुधारणा घडवून आणलेली असते ती टिकाऊ होते; परंतु कित्येक लोकांची ह्या मंदगतीनें तृप्ति होत नाहीं. पूर्वीची स्थिति अजीबात नाहींशी करून तिच्या जागीं नवीन काल्पनिक स्थितीची एकदम स्थापना करावी असें त्यांस वाटतें. अशा विचारांचे लोक एक गोष्ट गृहीत घेत असतात ती ही कीं, मनुष्याचें मन देखील एकदम बदलूं शकेल व त्याचे दुर्गुण आणि दुर्विचार नाहींसे होऊन एका क्षणांत त्याचे जागीं सद्गुण आणि सद्विचार ह्यांचा उदय होईल. समाजाच्या व्यवस्थेंत एकदम फेरबदल करून इष्ट परिणाम घडवून आणण्याची हल्लींच्या कांहीं लोकांची इच्छा पूर्वीच्या लोकांच्या कल्पवृक्ष किंवा कामधेनु ह्यांची प्राप्ति करून घेऊन इष्ट मनोरथ पूर्ण करून घेण्याच्या इच्छेप्रमाणें किंवा परिसाची प्राप्ति

करून घेऊन त्याच्या द्वारें लोखंडाचें पाहिजे तितकें सुवर्ण बनविण्याच्या इच्छेप्रमाणेंच आहे.

आशियाखंडाच्या पूर्वेकडील टोंकापासून तों अमेरिकाखंडाच्या पश्चिमेकडील टोंकापर्यंत व उत्तराध्रुवापासून तों दक्षिणध्रुवापर्यंत मनुष्यांनीं व्यापिलेले जे विस्तीर्ण भूप्रदेश आहेत त्यांत जिकडेतिकडे नित्यशः अन्यायाचे व जुलुमाचे प्रकार घडून येत आहेत. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला पादाक्रांत करावें व एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याचा वाटेल त्या रीतीनें फायदा घ्यावा हा प्रकार सर्वत्र कमीअधिक प्रमाणानें आढळून येतो. अशा जगांत, मनुष्यांनीं परस्पराशीं बंधुप्रेमानें वागलें पाहिजे हें जिचें प्रधानतत्त्व आहे त्या समाजव्यवस्थेला कोठें अवकाश मिळेल असें वाटत नाहीं. ज्या स्वभावामुळें राष्ट्राराष्ट्रांत रणें माजून राहतात व एकमेकांचा सूड घेण्याविषयीं मनुष्यांच्या मनांत अत्युत्कट इच्छा उत्पन्न होते, त्याचप्रमाणें ज्या स्वभावामुळें थोडा अपमान झाल्याबरोबर अपमान करणाऱ्याशीं द्वंद्वयुद्ध करण्यास मनुष्य तयार होतो व आपला जीव देण्यास आणि दुसऱ्याचा घेण्यास मागेंपुढें पाहत नाहीं, त्या स्वभावाच्या मनुष्यांनीं आपल्या इच्छेप्रमाणें चालणारा काल्पनिक समाज बनवितां येणें शक्य नाहीं. अनेक प्रकारच्या खेळांचे भयंकर सामने पाहण्यास ज्या लोकांच्या झुंडीच्याझुंडी जमतात आणि कोणी पडला किंवा कोणाला इजा झाली म्हणजे त्याच्या दुःखानें आपली करमणूक करून घेतात, व खेळणाऱ्या दोन पक्षांमध्यें कांहीं भांडण लागल्यास न्याय करणाऱ्या तिऱ्हाईत मनुष्यानें त्यांच्या इच्छेप्रमाणें न्याय दिला नाहीं तर दगडधोंड्यांची वृष्टि करण्यासही जे कमी करीत नाहींत व ज्यांना ताळ्यावर आणण्यास पोलिसच्या शिपायांना मध्यें पडावें लागतें, त्या लोकांच्या हातून समाजाच्या हिताकरितां एकोप्यानें यत्न व्हावा व परस्परांच्या हक्कांचा पूर्ण विचार होऊन आचरण घडावें हें अशक्य आहे. राजकीय, सामाजिक व धार्मिक गोष्टींत मतभेद झाल्याबरोबर जे लोक एकमेकांचा प्राण घेण्यासही मागेंपुढें पाहत नाहींत व भिन्न मताच्या लोकांच्या घरादाराचा किंवा वित्ताचा अपहार करणें म्हणजे त्यांस कांहीं वाटत नाहीं; लोकांना दशहत घालण्याकरितां जे आगी लावून किंवा दारूनें एकदम घरांचीं घरें उडवून देऊन निरपराध्याचे बळी घेतात; व असल्या गुन्ह्यांत पकडले जाऊन शिक्षा भोगण्याचा वेळ आला म्हणजे उलट दुसऱ्यानांच नांवें ठेवितात; त्या मनुष्यांसाठीं कितीही कौशल्य खर्च करून

नवीन व्यवस्था बनविल्या तरी थोड्या दिवसांत तीं त्यांची दुर्दशा करून टाकितील. वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून मनोराज्यांत गढून जाणाऱ्या लोकांशिवाय कोणालाही हल्लींचीं मनुष्यें प्रस्तुतच्या स्थितीहून चांगल्या समाजस्थितीला योग्य आहेत असें वाटणार नाहीं. जीं मनुष्यें साधनाच्या योग्यायोग्यतेचा विचार न करितां आपल्या श्रमांबद्दल जितका अधिक मोबदला मिळेल तितका मिळविण्यासाठीं यत्न करितात त्यांची स्वार्थबुद्धि एकदम नष्ट होऊन परार्थबुद्धीचा त्यांवर एकदम अंमल बसेल, व आपल्या आचरणानें दुसऱ्याच्या सुखांत व्यत्यय येईल कीं काय ह्याचा विचार करून तीं वर्तन करूं लागतील, अशी कल्पना करणें म्हणजे मनुष्यस्वभावाविषयीं आपलें पूर्ण अज्ञान प्रकट करणें होय.

वर जें मनुष्यस्वभावाचें वर्णन दिलें आहे तें विशेषतः अज्ञानी व आडदांड लोकांस लागू पडणारें आहे. सुशिक्षित व विचारी म्हणविणाऱ्या लोकांची स्थिति पाहिली असतांही त्यांची स्वार्थाची बुद्धि एकदम नाहींशी होऊन तिच्या जागीं परार्थबुद्धि उत्पन्न होणें किती असंभाव्य आहे तें दिसून येईल. जुगार खेळणें, पैजा मारणें, सोडतींत पैसे घालणें इत्यादि प्रकार समाजांतील वरच्या पायरीच्या लोकांकडूनही घडत असतात. आणि ह्या सर्व प्रकारांचें बीज म्हटलें म्हणजे दुसऱ्याच्या नुकसानानें आपला फायदा करून घ्यावा. आणि हेच मनुष्य उद्यां नवीन समाजव्यवस्था सुरू झाल्याबरोबर इतरांचा फायदा व्हावा म्हणून स्वतः झीज सोसण्यास तयार होणार! मनुष्यस्वभावांत बदल झाल्यावांचून समाजव्यवस्थेंत बदल करून, जो चांगुलपणा अंगीं नाहीं त्याचीं फळें मिळवितां येतील अशी ह्या लोकांना आशा आहे.

मनुष्यस्वभावाच्या संबंधानें दोन प्रकारच्या समजुती लोकांत आढळून येतात. कित्येकांस वाटतें कीं, मनुष्यस्वभावांत मुळींच बदल होण्यासारखा नाहीं, व दुसऱ्या कित्येकांस वाटतें कीं, थोड्या अवकाशांत त्यांत पाहिजे तितका फेरफार करितां येईल. ह्या दोन्ही समजुती चुकीच्या आहेत. मनुष्यस्वभावांत पाहिजे तितका फेरबदल होऊं शकेल; परंतु त्याला युगांचीं युगें लोटलीं पाहिजेत. निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांच्या स्वभावामध्यें जो थोडथोडा फरक दिसून येतो तो पडण्यासही कांहीं शतकांची जरूर लागते. ह्यावरून मनुष्याची स्वार्थबुद्धि नष्ट होऊन तिच्या जागीं परार्थबुद्धि उत्पन्न होण्याला किती काळ लोटला पाहिजे ह्याची कल्पना करितां येईल. समाजाच्या सम-

जुतींप्रमाणें वागलें असतां सुख होतें व त्यांच्या विरुद्ध वागलें असतां दुःख होतें अशी स्थिति असल्यामुळें साधारण मनुष्यांची प्रवृत्ति नेहमीं समाजाच्या समजुतींप्रमाणें आचरण करण्याकडे होते. ह्यासाठीं समाजाच्या समजुतींत थोडथोडा बदल करण्याचा यत्न करून मनुष्याच्या ह्या स्वाभाविक प्रवृत्तीमुळें त्याच्या मनावर जो हळूहळू संस्कार होत जाईल त्यावांचून इष्ट फेरफार घडवून आणण्याला दुसरा मार्ग नाहीं.

हें सांगण्याची काहीं जरूर नव्हती, परंतु उत्तम व मध्यम स्थितींतील लोकांस जें शिक्षण मिळतें व जें कनिष्ठ स्थितींतील लोकांस देखील सक्तीनें देण्याविषयीं चोहोंकडे प्रयत्न चालले आहेत, त्यामुळें उघडउघड दिसणाऱ्या सृष्टींतील सामान्यतत्त्वांचा देखील मनुष्यांस विसर पडूं लागला आहे, ह्यासाठीं वरील उल्लेख करणें भाग पडलें. ह्या तत्त्वांपैकीं एक असें आहे कीं, अमुकएक सामाजिक किंवा राष्ट्रीय गोष्ट करावी असें मनुष्याच्या मनांत आल्यावांचून ती त्याजकडून घडावयाची नाहीं; मनुष्याचे मानसिक व्यापार त्याच्या जीविताचाच एक भाग होत व ते जीविताच्या सामान्य नियमांनाच अनुसरून होत असतात. आणि सृष्टींतील सर्व जीवांच्या जीविताचे जे नियम आहेत त्यांतच मानवी जीविताच्या नियमांचा अंतर्भाव होतो. राजकीय, सामाजिक व इतर गोष्टींच्या संबंधानें समाजांत एकदम बदल करूं इच्छिणारे लोक जर हें तत्व ध्यानांत बाळगितील तर त्यांना समाजाच्या मंदगतीबद्दल संतापण्याचें कांहीं कारण उरणार नाहीं. त्यांच्या लक्षांत येईल कीं, मनुष्याच्या उत्पत्तीपासून तों आजपर्यंत मनुष्याच्या जीवितासंबंधीं ज्या ज्या गोष्टी झाल्या आहेत त्या सर्व, सभोंवतालची स्थिति बदलल्यामुळें प्राण्याला आपल्या आचरणांत व स्वभावांत जो फरक करावा लागतो त्यामुळें घडून आलेल्या आहेत; व पुढेंही हाच क्रम सुरू राहील. जसजशी परिस्थिति बदलत जाईल तसतसें प्राणिमात्रानें त्या स्थितीची योग्यता आपल्या अंगीं आणण्यास झटावें ह्या प्रवृत्तीमुळें जीवसृष्टींतील सर्व घडामोडी होत आहेत. रानोमाळ भटकत फिरून लुटालूट करून निर्वाह करणारा मनुष्य सुधारत जाऊन तो एका ठिकाणीं राहूं लागला व उद्योगधंदा करून आपला चरितार्थ चालवूं लागला. हा सर्व फरक वरील कारणामुळेंच घडून आलेला आहे. ही क्रिया चाललेली असतांना मनुष्याचे विचार, मनोविकार व संवयी ह्यांमध्यें देखील बदल होत असतो. आणि हें काम दीर्घकालपर्यंत मनुष्यजातीनें पुष्कळ दुःख सहन के-

त्यावांचून घडून येत नाहीं. पूर्वी अंगवळणीं पडून गेलेल्या गोष्टी करावयास न सांपडल्यामळें व अगदीं अपरिचित अशा गोष्टी कराव्या लागल्यामुळें होणारें दुःख भोगिल्यावांचून सुटका नाहीं. ह्या स्वाभाविक क्रमाला अडथळा करून व्यक्तीचें किंवा वर्गाचें संरक्षण करण्यासाठीं कृत्रिम प्रयत्न केले असतां हें दुःख कमी होण्याचा तर संभव नाहींच, पण उलट अधिक मात्र होईल. कारण योग्यता अंगीं आल्यावांचून एकदम पुढली स्थिति झेंपत नाहीं, असें दिसून आल्यानंतर पुन्हां आरंभापासून सुरुवात करावी लागेल व सर्व दुःखें सहन करावीं लागतील.

हे सर्व विचार मनांत आणिले म्हणजे परोपकारामुळें उत्पन्न होणाऱ्या कर्तव्यांत त्या त्या स्थितीच्या मानानें फेरफार करण्याची अवश्यकता दिसून येईल. मनुष्याच्या अत्युन्नतस्थितींतील कर्तव्याची अवश्यकता मनुष्य जसजसा त्या स्थितीच्या जवळ जाईल तसतशी अधिक वाटूं लागेल. तीं कर्तव्यें करवतील तितकीं करून शिवाय सभोंवतालच्या स्थितीकडे लक्ष देऊन परोपकाराच्या दृष्टीनें उत्पन्न होणारीं कर्तव्यें मनुष्याला आणखी हजारों वर्षेंपर्यंत करावीं लागतील. वस्तुस्थितीचा विचार न करितां एकदम समाजाची सुधारणा करण्याविषयींचे प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर त्यांचे डोळे उघडतात, व आजपर्यंत ज्या सृष्टिक्रमानें सुधारणा घडून आली आहे त्याच सृष्टिक्रमाचा अवलंब पुढील सुधारणेसाठीं करणें जरूर आहे ही गोष्ट त्याच्या लक्षांत येते. पृथ्वीवरील बहुतेक देशांतून मनुष्यभक्षकपणा नाहींसा झाला आहे आणि तो नाहींसा करणें हें भूषणास्पद समजलें जात आहे. परंतु निरनिराळ्या समाजांतून समाजभक्षकपणा अजून गेला नाहीं. एका समाजानें दुसऱ्या समाजाला खाऊन टाकावें व त्याबद्दल मोठी मिरवावी अशी अजून स्थिति आहे. ही स्थिति ज्यावेळीं नाहींशी होईल त्यावेळीं मनुष्याची पशुवृत्ति नाहींशी होऊन त्याच्या अंगीं मनुष्यवृत्ति उत्पन्न होऊं लागेल. जोंपर्यंत निरनिराळे समाज परस्परांशीं शत्रुत्वानें व अन्यायानें वागत आहेत तोंपर्यंत त्या समाजांतील मनुष्यांमध्येंही म्हणण्यासारखी सुधारणा होणें शक्य नाहीं. समाजांतील मनुष्यांचे परस्परांशीं संबंध ठरविणारी अंतर्नीति व त्या समाजाचा इतर समाजांशीं संबंध ठरविणारी बहिर्नीति ह्या दोहोंचा परस्परांशीं बराच संबंध आहे. ह्या दोहोंमधील विरोध ज्यावेळीं नाहींसा होईल, त्यावेळीं ज्या स्थितीची पुसटपुसट कल्पना मनोराज्यांत गढून गेलेल्या लोकांच्या मनांत येत

आहे त्या स्थितीकडे मनुष्याचें पाऊल विशेष प्रतिबंध न होतां बऱ्याच वेगानें पडूं लागेल.

मध्यंतरीं परोपकाराचें एक मुख्य काम म्हटलें म्हणजे संक्रमणस्थितींतील दुःखें कमी करणें हें होय. बदलत जाणाऱ्या स्थितीची योग्यता अंगीं आणण्याकरितां जीं दुःखें सहन करावीं लागतील तीं तर चुकावयाचीं नाहींतच, परंतु त्यांशिवाय संक्रमणस्थितीमुळेंच उत्पन्न झालेलीं दूर करितां येण्यासारखीं इतर दुःखें असतात तीं कमी करण्यासाठीं परोपकाराचा उपयोग केल्यानें समाजाचा पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. ज्या परोकारानें एकाद्या व्यक्तीचें दुःख कमी केलें जातें त्या परोपकारांत त्याचे इतर परिणाम वाईट असले तरी तेवढ्यापुरता चांगलेपणा आहे हें कबूल केलें पाहिजे. ज्या परोपकारानें व्यक्तीच्या पुढील हिताला कोणत्याही प्रकारचा व्यत्यय न येतां जितकी मदत करणें शक्य असेल तितकीच केली जाते तो परोपकार त्याहून चांगला. परंतु व्यक्तीच्या तात्कालिक व पुढील सुखाकडे नजर देऊन न थांबतां, पुढील पिढ्यांच्या व एकंदर समाजाच्या हिताकडे लक्ष देऊन केलेला जो परोपकार तो सर्वांत उत्तम होय. ज्या मनुष्याला आपल्यावरच्या जबाबदारीची पूर्णपणें ओळख पटलेली असेल त्याच्याच हातून इतका दूरवर विचार होईल. दुःखितांच्या दुःखानें स्वतःला दुःख झालें तरी असा मनुष्य सहन करील, पण ज्या प्रकारच्या मदतीनें आज कमी होणाऱ्या दुःखाच्या अनेकपट दुःख पुढील पिढ्यांचे लोकांस भोगावे लागण्याचा संभव असेल त्या प्रकारची मदत करणार नाहीं. कांहीं लोकांना तत्कालिक सुख देण्यासाठीं त्यांना मदत करून पुढल्या लोकांसाठीं दुःखाचा संचय करून ठेवणें अशा मनुष्यास कधींही आवडणार नाहीं. परोपकाराच्या अत्युन्नतकल्पनेप्रमाणें ज्याला वागावयाचें असेल त्यानें जरूर पडेल तेव्हां स्वार्थाचा त्याग करण्यास तयार असून अनेक प्रसंगीं आकुंचित दृष्टीच्या परोपकारापासून होणाऱ्या सुखालाही मुकण्यास तयार झालें पाहिजे.

संक्रमणावस्थेंत कराव्या लागणाऱ्या परोपकारासाठीं मनुष्यांना जो स्वार्थत्याग करावा लागत आहे तो मनुष्य जसजसा उन्नतावस्थेकडे जात जाईल तसतसा कमी होईल आणि शेवटीं त्याची फारशी जरूरच राहणार नाहीं. हल्लींच्या स्थितींत परोपकाराचें मुख्य काम म्हटलें म्हणजे दुःखितांचीं दुःखें कमी करणें हें होय. अजून हजारों वर्षें परोपकाराला हेंच मुख्य काम करा-

वें लागेल; परंतु पुढें हें काम कमी होत जाऊन सभोंवतालच्या मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करणें हें परोपकाराचें मुख्य काम होऊन बसेल. दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी झाल्यानें जसें त्याचें दुःख कमी होतें तसें दुसऱ्याच्या सुखानें सुखी झाल्यानें त्याचें सुख वाढतें. हे दोन्ही मनोविकार परोपकाराला कारणभूत आहेत. जसजसें मनुष्याचें दुःख कमी होत जाईल तसतसें समदुःखीपणामुळें उत्पन्न होणाऱ्या मनोविकारांचें क्षेत्र मर्यादित होऊन परस्परांच्या सुखाचे विभागी होण्यानें सर्वांच्या सुखाची वृद्धि होऊं लागेल.

ज्या स्थितींत सरासरीच्या मानानें मनुष्याच्या आयुष्यांत सुखापेक्षां दुःखाचा अंश फार असतो त्या स्थितींत दयेचे मनोविकार फार प्रबल झाले तर जगांत दुःखाची वृद्धि होऊन मनुष्यजातीचें अकल्याण होईल. सुदैवानें जीं मनुष्यें चांगल्या स्थितींत असतील तीं जर फार कोमल मनाचीं असलीं व त्यांच्या हृदयांत त्यांच्या बांधवांच्या विपत्तीचें हुबेहुब प्रतिबिंब उठलें, तर त्यांचेंही जीवित कष्टमय होईल. आरब लोकांनीं नीग्रो लोकांना पकडून गुलाम करितांना त्यांना दिलेलीं दुःखें, सकाळपासून संध्याकाळपर्यंत चाबकाच्या माराखालीं गुलामांकडून घेतलेलें काम, तांबड्या इंडियन लोकाचें निर्मूलन करण्याकरितां अमेरिकेंत वसाहत करणाऱ्या युरोपियन लोकांनीं केलेलीं अमानुषकृत्यें, दुष्काळांत भुकेनें तडफडून मरणाऱ्या व लढाईंत जखमी होऊन विव्हळणाऱ्या लोकांच्या विपत्ति, इत्यादि गोष्टी त्या त्या काळच्या सुखी लोकांच्या हृदयांत जर रात्रंदिवस मूर्तिमंत उभ्या राहत्या तर त्यांचें जीवित असह्य झालें असतें. डोळ्यांआड घडणाऱ्या विपत्तींचे विचार जर मनुष्याला एकसारखे खाऊं लागतील तर जगांत रहावयास नको असें त्याला होऊन जाईल. पोटासाठीं बाराबारा तास काम करावें लागणें, इतकें करूनही कित्येकांस अर्धपोटीं राहण्याची पाळी येणें, घरदार नसल्यामुळें झाडाखालीं राहण्याचा प्रसंग येणें, थंडीच्या दिवसांत देखील अंगभर वस्त्र न मिळणें, तशा स्थितींतही मुलांचा त्रास पाठीमागें असणें, इत्यादि प्रकार कोणत्याही ठिकाणीं नजरेस पडण्यासारखे आहेत. ही सर्व विपत्ति भोगिल्यावांचून गत्यंतर नाहीं हा विचार तर फारच दुःखद आहे. मनुष्यस्वभावांत इष्ट फेरफार होत असतांना मनुष्याला जीं आगंतुक दुःखें सहन करावीं लागतात तीं कमी करण्याकडे जरी हल्लीं मनुष्याच्या दयालुत्वाचा थोडासा उपयोग होण्यासारखा आहे, तरी वर सांगितलेल्या अपरिहार्यविपत्तीच्या विचारामुळें दयालुत्वाच्या

मनोविकाराची व्हावी तितकी वाढ होत नाहीं. ही विपत्ति जसजशी कमी होत जाईल तसतशी मनुष्यांना परस्परांविषयीं अधिक कळकळ वाटूं लागेल व ज्यावेळीं ती बहुतेक नाहींशी होईल त्यावेळींच मनुष्याचें बंधुप्रेम पूर्णावस्थेस जाऊन पोंचेल.

जेव्हां दूरदृष्टीच्या विचारांनीं किंवा प्रजोत्पादनशक्ति कमी झाल्यामुळें लोकसंख्या कमी होईल व युद्धोपयोगी सामान पदार्थसंग्रहालयांत मात्र दृष्टीस पडूं लागेल, तेव्हां एकमेकांच्या सुखदुःखाचे वांटेकरी होण्याची मनुष्याची इच्छा इतकी प्रबल होईल कीं आज तिच्यासंबंधानें कल्पनाही करितां येणार नाहीं. कारण, मनुष्यस्वभावाचें उत्क्रमण चाललें असतां, ज्यांच्या योगानें मनुष्याच्या सुखांत भर पडण्याचा संभव असेल अशा मनोवृत्तींस नेहमीं उत्तेजन मिळत जाईल. मनुष्याची भाषा व मुखचर्येत विचारांचें प्रतिबिंब उठविण्याची कला ह्या जसजशा सुधारत जातील तसतसें मनुष्यांना परस्परांच्या मनांत शिरतां येऊं लागेल, आणि एका मनुष्याच्या सुखोत्पादक मनोधर्माचा परिणाम इतरांवर होऊन एकंदर सुखाची वृद्धि होईल.

ह्या रीतीनें जसजसा मनुष्य अधिकाधिक वरच्या पायरीवर जात जाईल तसतसें परस्पराचें दुःख कमी करण्याचें परोपकाराचें काम कमी होऊन एकमेकांची सुखवृद्धि करण्याचें काम वाढेल.

पुष्कळांना वरील अनुमान निरर्थक वाटतें. ह्या लोकांचे दोन वर्ग आहेत. एका वर्गातील लोकांना उत्क्रमणवाद खरा वाटतो व अशक्य वाटण्यासारख्या गोष्टी उत्क्रान्तीमुळें घडून आल्या आहेत हें ते कबूल करितात. परंतु उत्क्रान्तीमुळें मनुष्यस्वभावांत वर दर्शविलेला फेरफार होईल असें मात्र त्यांस वाटत नाहीं. दुसऱ्या वर्गांत बऱ्याच लोकांचा भरणा आहे. ह्या वर्गांतील लोकांना मनुष्याचें पुढें काय होईल ह्याविषयीं विचार करावासा वाटत नाहीं. ज्या गोष्टींपासून इहलोकीं किंवा परलोकीं त्यांला स्वतःला सुख मिळण्याचा संभव नसेल त्यांविषयीं ते अत्यंत उदासीन असतात.

परंतु ह्या दोन्ही वर्गांतील लोकांच्या विचारांशीं ज्यांचे विचार जुळत नाहींत असे कांहीं थोडे लोक आढळतात. उत्क्रान्तीमुळें मनुष्यस्वभावाला अधिकाधिक उन्नतस्वरूप येत जाईल अशी त्यांची समजूत आहे इतकेंच नव्हे, तर त्याविषयीं संशय घेणें हें अविचाराचें द्योतक आहे असें त्यांस वाटतें. गतकालीं ज्या कारणांपासून विलक्षण प्रकारचीं कार्यें घडून आलीं त्याच का-

रणांपासून भविष्यत्कालींही तसेच परिणाम घडून आले पाहिजेत असें त्यांचें मत आहे. हल्लींच्या समाजांना किंवा हल्लींच्या मनुष्यजातींनाच तें उन्नतस्वरूप प्राप्त होईल असें त्यांचें म्हणणें नाहीं; तथापि युगांचीं युगें नानाप्रकारचे बरेवाईट फेरफार होऊन अखेरीस मनुष्यसमाज अत्युन्नतस्थितीस जाऊन पोंचेल अशी त्यांची पूर्ण खात्री आहे. अशा विचारांच्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व त्यांच्या मनांत ह्या उत्क्रांतीला मदत करावी अशी इच्छा उत्पन्न होत आहे. कित्येक लोकांना आपल्या राष्ट्राच्या कल्याणाविषयीं व त्यांतील उपयुक्त संस्थांविषयीं बरीच काळजी वाटते; इतर राष्ट्रांविषयीं व लोकांविषयीं काळजी वाहणारेही कांहीं लोक आढळतात. दिवसेंदिवस हे मनुष्याचे विचार अधिकाधिक उन्नत होत जाऊन मनुष्यजातीच्या प्रगमनाविषयीं काळजी करणारे लोक उत्पन्न होऊं लागतील.

ह्यापुढें परोपकारी गृहस्थांचें सर्व लक्ष मनुष्याला पुढील स्थितीस योग्य करण्याकडे लागेल, व मनुष्याला ती स्थिति प्राप्त करून देण्याचे कामीं आपला अत्यल्प तरी उपयोग व्हावा अशी उत्कट इच्छा त्यांस होईल. केवळ परोपकाराचीं कामें करण्यांत मनुष्याचें मन गढून जाणें शक्य आहे असें अनुभवावरून दिसून येतें. दिवसेंदिवस अशा मनुष्यांची संख्या वाढत जाण्याचा संभव आहे. परोपकारी गृहस्थ विचारसृष्टीच्या अत्युच्च प्रदेशांत जाऊन तेथून युगांतरीं प्राप्त होणाऱ्या स्थितीकडे अवलोकन करूं लागले, व मनुष्याला त्या स्थितीकडे नेण्याला आपल्या हातून थोडीतरी मदत झाली आहे असा विचार त्यांच्या मनांत आला, म्हणजे त्यांना आपल्या जन्माचें सार्थक्य झालें असें वाटून अंतःकरणापासूत समाधान होईल.

## मीं प्रसिद्ध केलेले ग्रंथ

( ज्यांच्या किंमती दिल्या नाहींत, ते शिल्लक नाहींत. )

१. नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें. २. न्यायतत्त्वें २ रु०. ३. ज्योतिर्विलास १।।। रु०. ४. संसारसुख. ५. शास्त्ररहस्य. ६. आत्मनीतीचीं तत्त्वें. ७. नीतिसिद्धांत १।।। रु०. ८. धर्ममीमांसा-नैसर्गिक धर्म आणि भौतिक धर्म २।। रु०. ९. राजनीतीचीं मूलतत्त्वें २।। रु०. १०. अज्ञेयमीमांसा. ११. धर्ममीमांसा--पितृमूलक धर्म आणि आध्यात्मिक धर्म २।। रु०. १२. जीवनशास्त्र १।।। रु०. १३. ज्ञेयमीमांसा ( पूर्वार्ध ) २।। रु०. १४. भारतवर्षीय भूवर्णन. १५. ज्ञेयमीमांसा ( उत्तरार्ध ) २।। रु.; १६. जीवितकर्तव्य २।। रु०; १७. राणीच्या राज्याचा इतिहास २ रु०. १८. आत्मविद्या २।। रु०. १९. समाजशास्त्राचे मूलसिद्धान्त. २०. समाजशास्त्राचे अनुभवजन्य सिद्धान्त आणि गृहसंस्था. २१. जननमरणमीमांसा १।।। रु०. २२. राजकीय संस्था. २३. निबंधरत्नमाला २।। रु०. २४. विधिसंस्था व धर्मविषयक संस्था. २५. उद्योगसंस्था आणि धंदेसंस्था. २६. सुख आणि शांति २।। रु०. २७. मानसशास्त्राचीं तत्त्वें. २८. मानसशास्त्राची संघटना. २९. जीवितविद्या २।। रु०. ३० तत्त्ववेत्ता स्पेन्सर ह्याचें चरित्र २।। रु०. ३१. मानसशास्त्राचें विशिष्ट विवरण २।। रु०. ३२. शील आणि नीतिमत्ता १। रु०. ३३. मराठी भाषेची घटना ३ रु०. ३४. सामाजिक वाद २।। रु०. ३५. परोपकार किंमत २।। रुपये.

बळवंत गणेश दाभोळकर, ग्रंथप्रकाशक.

५४९ नारायण पेठ, पुणें सिटी.